# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४१** **दि. ०८/०८/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | महाजन सुनिल सुपडु |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | शेख शबानाबी सादीक |
| नेरकर सरीता अनंत | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे प्रतिभा चंद्रकांत | बालाणी भगतराम रावलमल |
| खान रुकसानाबी गबलु | देशमुख प्रतिभा गजानन | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरिफ | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे ललीत विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे भारती कैलास | बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| भंगाळे विष्णु रामदास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे राखी शामकांत | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे निता मंगलसिंग |
| तायडे ज्योती शरद | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | कैलास नारायण सोनवणे |
| सोनवणे धीरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.शाम गोसावी, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, नगररचनाकार, तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्य कापसे मयुर चंद्रकांत, तसेच २) सन्मा.सदस्या चौधरी चेतना किशोर, ३) चौधरी मंगला संजय, ४) भोळे सिमा सुरेश, ५) भोईटे लताबाई रणजित, ६) कोल्हे सिंधु विजय, ७) सोनवणे अंजनाबाई प्रभाकर यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८६० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | कोल्हे ललित विजय | श्री.विलास विठ्ठल पाटील यांचे वडील स्व. विठ्ठल रामचंद्र पाटील, मनपा सेवानिवृत्त कर्मचारी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | शिंदे गायत्री उत्तम | शिवाजी नगर मधील रहिवासी कै.आनंदा भिकू पोळ यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८६१ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | बारी शोभा दिनकर | श्री.धरमसिंग सदाशिव पाटील (माजी सरपंच,पिंप्राळा) यांनी संत मिराबाई नगर, पिंप्राळा येथील गेल्या २० वर्षापासून असलेला अत्यंत महत्वाचा व नागरीकांच्या आरोग्याविषयी निगडीत असलेल्या जवळ जवळ १००-२०० घरांचा सांडपाणी विषयी असलेला प्रश्न मार्गी लावुन सदरिल नागरीकांची सांडपाण्याची व्यवस्था करुन दिल्याबद्दल श्री.धरमसिंग सदाशिव पाटील यांचे सर्व पिंप्राळा परिसरातील नागरीक व लोकप्रतिनिधी तर्फे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील समाजसेवक यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** मागच्या मिटींगचा विषय आहे. ७ व्या वेतन लावण्याचा विषय कुठपर्यंत आला. मला वाटते या महिन्यात देणार होते. तुम्ही मागच्या महिन्यात कबुल केले होते. ऑगस्टचा पगार सप्टेंबर मध्ये देण्यात येईल. तर काय कुठपर्यंत आले, सांगा. आणि बाकीच्या कर्मचाऱ्यांचा जे काहींना लागतो आहे काहींना लागत नाही. ते पण डिटेल माहिती सांगा आम्हाला.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** मी उत्तर दिले होते की, आपल्या महानगरपालिकेचे जितके कर्मचारी आहे त्यांना ७ वा वेतन ऑगस्ट पेड इन सप्टेंबर लावायचे आहे. ज्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये आक्षेप नाही.अश्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये आपण ७ व्या वेतन आयोगाची जवळ जवळ तयारी पुर्ण केलेली आहे. त्याचे स्टेटमेंट वगैरे तपासुन तयारी पुर्ण केलेली आहे. ज्या कर्मचाऱ्यांना आक्षेपाचा प्रॉब्लेम नाही असे कर्मचाऱ्यांना आपण ऑगस्ट पेड इन सप्टेंबर मध्ये ७ वा वेतन लावणार आहे. आता उर्वरित जे ११८७ आपले आक्षेपार्थी कर्मचारी आहे. ज्यांच्या विरोधात आक्षेप नोंदविलेले आहे. स्थानिक राहु द्या, ऑडिट ॲब्जेक्शन आहे लेखापरिक्षणमध्ये. तर पहिल्या फेज मध्ये ज्या कर्मचाऱ्यांना प्रॉब्लम नाही. त्यांना आपण ऑगस्ट पेड इन सप्टेंबर मध्ये लावणार आहोत.आणि ११८७ ज्यांचा ऑडीट मध्ये नांव आहे. अश्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा आपण २ फेज मध्ये ज्यांचे आक्षेप वेतनाशी निगडीत किंवा त्याच्यावर परिणाम होणारे नाही. अश्याबाबतीत सुध्दा आपण तपासणी करु. ऑडिटमध्ये जे आक्षेप

दर्शविलेले आहे. त्याच्या बाबतीत समजा ७ वा वेतन लावता येईल तर तो आपण २ फेज मध्ये लावणार आहोत.आणि ३ रा फेज म्हणजे जे आक्षेपातील प्रकरणे आहे. तर त्याच्या बाबतीत सुध्दा प्रशासन शासनाशी पाठपुरावा करुन त्या ऑडिट आक्षेपाबाबत कार्यवाही करत आहे. ती कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर. त्यांचे सुध्दा आक्षेपाचा निकाल झाल्यानंतर त्यांची सुध्दा याबद्दल कार्यवाही करणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** फक्त एक विनंती राहिल. तुम्ही हे करत असतांना आता तुम्ही सांगितले की, त्यांच्या वेतनावर काही फरक पडणार नाही. त्यांचा २ फेज मध्ये तुम्ही करणार आहे. त्या कामी तुम्ही येथील काही कर्मचारी अधिकारी आहे. त्यांना विश्वासात घ्या. त्याच्यामध्ये समजा, गोराणे साहेब आहे, उदय पाटील आहे आणखी एक दोन जण असतील. तर त्यांची मदत होईल आपल्याला. त्यांनी असे सांगितले की, जवळ जवळ ५०० लोक त्यांनी असे काढुन ठेवलेले आहे की, त्यांना लावता येईल. आणि ते झाले की मग तिसरा जो टप्पा आहे. त्याच्यासाठी मला वाटते मॅडमांनी पाठवुन दिलेले आहे. ते ही प्रयत्न प्रशासन आणि आमचे जे अधिकारी असतील. ते त्याच्या मध्ये नाही ते ही मिळुन प्रयत्न करतील.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** पहिल्या फेज मध्ये जवळ जवळ ९०० कर्मचाऱ्यांना लावायचा प्रयत्न आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता यांना भेटेल ना पगार जे बाकीचे आहे त्यांना.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** ऑगस्ट पेड इन सप्टेंबर मध्ये यांना ९९.९९% मिळेल.

**श्री.कैलास सोनवणे :- फक्त हे** १% या ९९.९९% वर जड जायला नको.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** १००% याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या संदर्भात बोलायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, महापौरताई. मी परवानगी मागितलेली आहे.

**मा.महापौर :-** एका वेळेला दोन व्यक्ती कसे बोलणार, एक एक बोला. बाकीचे बसुन घ्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आम्हाला शिवाजी नगर उड्डाणपुलाचा खुप लांबलेला विषय आहे. त्याच्यामुळे आमच्या प्रभागातील नागरीकांचा खुप रोष आहे, दोन चार दिवसांमध्ये ते चालु होण्याची शक्यता आहे. परंतु त्या ठिकाणची जी लाईट व्यवस्था आहे. त्याच्या संदर्भामध्ये प्रशासनाने काय उपाययोजना केलेली आहे ते सांगा. पुलावर लाईट लावावे लागतील ही गोष्ट प्रशासनाला केव्हा समजली हे ही सांगा. त्याचे टेन्डर निघाले का? त्याचे टेन्डर निघालेअसेल तर त्याची निविदा प्रक्रिये झाली असेल तर ती का थांबलेली आहे ते सांगा. आणि त्याचे नियोजन कसे होईल आणि किती काम होईल ते सांगा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी बोलतो, संविदा करण्याच्या संदर्भात आपला वेळ जाईल. जर कधी निविदा प्रक्रियेमध्ये ३% बिलो आलेले असल्या कारणाने दुसरी कुठलीही अडचण नसेल तर आपण कार्योत्तर मंजुरीच्या आधारावरती गुजरातच्या मक्तेदाराला त्वरीत काम सुरु करण्याच्या संदर्भात आदेश द्यावे जेणे करुन पुल आणि महिन्याभरामध्ये पथदिव्यांचे काम सुध्दा पुर्ण होण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासनाने तसे आदेश द्यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरा विषय.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याला किती वेळ लागेल ते सांगा. म्हणजे आम्हाला ते कळाले पाहिजे. आम्हाला लोकांना सांगावे लागते त्याठिकाणी. उद्या जर पुल चालु झाला तर संध्याकाळी ६.०० वाजेनंतर भाऊ तेथे काहीच दिसणार नाही. अश्या परिस्थिती मध्ये तुम्ही आम्हाला कमिटमेंट द्या सभागृहामध्ये किती वेळेत, किती दिवसात, किती महिन्यात किंवा किती वर्षात पुर्ण करणार. म्हणजे आम्हाला लोकांना सांगायला बरे पडेल.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** सन्मा.सभागृह, निविदा दर ३% बिलोने आलेला आहे. ३% बिलोने असल्या कारणाने आपण त्या एजन्सीकडुन आपण प्रपोजल शिटही बनवुन घेतलेली आहे. आणि त्याचा कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव आपण दिलेला आहे. संबंधीत एजन्सीला आपण कामाच्या बाबतीत सुचना देऊन आता आपला काम जे आहे. पुलावर केबलींग आहे, पुलावर पोल उभे करणे आहे. साधारणता आपण सव्वा महिन्यामध्ये पुर्ण करण्याचा आपण पुर्णपणे १००% प्रयत्न करणार आहोत.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आपण सुरु केव्हा करणार.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** कार्योत्तर मंजुरीचा जो प्रस्ताव आहे. दोन दिवसामध्ये ते पुर्ण करु त्यानंतर मक्तेदाराला आपण काम करण्यासाठी सुचना देऊन टाकु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना लाईन-आऊट द्यावा लागेल ना.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** आपण लाईन-आऊट वगैरे सगळे दिलेले आहे. साईटवरती कुठे काम करायचे आहे. कुठे पोल लावायचे आहे. त्याठिकाणी केबल कशी पुर्णपणे लावायची आहे. सप्लाय कुठुन करायचे आहे याचा पुर्णपणे आपण नियोजन केलेले आहे. जवळ जवळ तिन चार दिवसात आपले काम चालु होईल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे विषय आवश्यक आहे, फक्त एक विनंती आहे. कारण ६.०० नंतर संध्याकाळी तेथे पुर्ण आंधार राहील पुलावर, तेथे याच्या आधी ट्रॉफिक जाम झालेले आहे. पुल चालु होतो त्या पुर्वी. भरपुर वेळा ट्रॉफिक जाम झालेले आहे. तर या विषयाला हलगर्जीपणा करुन घेऊ नका. तो आता सेफ्टीचा विषय म्हणुन करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरा विषय, पुतळा शिवाजी नगरचा, त्याचे काय कुठपर्यंत आला. शिवाजी नगरचा महाराजांचा पुतळा.

**श्री.सोनगीरे :-** महापौरताई, आणि सर्व सन्मा.नगरसेवक, श्री.नवनाथभाऊंनी जो प्रश्न विचारले त्याच्या अनुषंगाने मी सर्वांना सांगु ईच्छितो की, शिवाजी नगर मधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उंच करण्याच्या संदर्भामध्ये आपण जागेवर जाऊन सर्व्हेक्षण करुन त्याचे प्लॅन्स आणि डिझाईन सगळे तयार झालेले आहे. फक्त त्याचे ईस्टीमेटसाठी स्टार्टर चेकींगचा जो विषय होता. तो नवनाथ भाऊंनीच माझा तो विषय सॉल्व करुन दिलेला आहे. संबंधीत पी.डब्ल्यु.डी.चे इंजिनिअर श्री.राऊत साहेब आणि त्या ठिकाणी आलेले मक्तेदार यांनी त्या ठिकाणी माती परिक्षण केले होते. त्या माती परिक्षणाचा अहवाल आपल्या आर्किटेक्टला पाहिजे होता. जेणे करुन ते डिझाईन तो व्यवस्थीत करु शकेल आणि पातळीचा उंचीचा जो विषय आहे. ते जवळ जवळ १२ मिटर उंच होणार आहे. त्यामुळे त्याचे फाऊंडेशन मजबुत असले पाहिजे. त्यामुळे माती परिक्षणाच्या अहवालाची आवश्यकता होती. अहवाल मला मिळाला मागच्या गुरुवारी, गुरुवारी ती मला ऑनलाईन व्हॉटसअपवर कॉपी मिळाली. मी ती आर्किटेक्टकडे पाठविलेली आहे. आणि ते त्या अनुषंगाने ईस्टीमेट तयार करुन साधारणता तीन ते चार दिवसामध्ये तो ईस्टीमेट मला मेल करणार आहे. ते ईस्टीमेट आपल्याला प्राप्त झाल्यानंतर रितसर मंजुरी घेऊ आणि मग त्याची टेन्डर प्रक्रिया राबवु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती दिवस लागतील याला.

**श्री.सोनगीरे :-** पुढच्या आठवडयापर्यंत ईस्टीमेट मंजुरीची कार्यवाही होऊन जाईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरा विषय.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पुर्ण ट्रॉफिक निर्भर होती. तो सुध्दा महाराजांच्या पुतळयासाठी प्रलंबीत आहे. त्याची हाईट वाढल्यानंतरच तो पुल चालु होणार होता. आता मागच्या ६ महिन्यापासुन नवनाथभाऊंनी आम्ही हे सर्व विषय लावुन धरलेले आहे. आज हे ईस्टीमेटचा विषय येत आहे. ईस्टीमेट आणतील केव्हा. मला सांगा त्याची सुरक्षासाठी काय कराल. तुम्हाला वेळ लागत असेल त्या पुतळयासंदर्भात, त्याची सुरक्षा कशी करणार, विटंबना त्याची होणार नाही याची काळजी कोण घेणार त्यासाठी प्रशासनाने काय प्रिकॉशन तयार केलेले आहे. ते सांगावे मला.

**श्री.सोनगीरे :-** त्या संदर्भात श्री.गिरगावकर साहेब आणि आम्ही त्याठिकाणी जाऊन पाहणी केली होती. पुल चालु झाल्यानंतर पुतळयाची कुठल्याही प्रकारची विटंबना होणार नाही यासाठी आपण काय नियोजन करु शकतो. अशी आम्ही पाहणी केली. त्यावेळेला एक सजेशन असे होते की, त्याठिकाणी पुलाची जी लांबी आहे. त्या लांबीपासुन आपला छत्रपती महाराजांचा जो पुतळा आहे तो ६-६.५ मिटर लांबीवर आहे. तरी सुध्दा आपण प्रिकॉशन म्हणुन त्या ठिकाणी एक ॲक्रिलीक शिट बसविले जाऊ शकते. जेणे करुन पुतळयाला कुठल्याही प्रकारची धुळ-वगैरे किंवा वरतुन जर कोणी कागद पत्ता फेकला तर तो पुतळयापर्यंत जाणार नाही. अशी दक्षता घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. परंतु त्याला अंतिम रुप अजुन दिलेले नाही. गिरगावकर साहेब आल्यानंतर ते सुरु होईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरे असे की, प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम जे आहे. कुठपर्यंत विचार केले की, त्याला जिना कुठुन द्यायचा, वाहतुकीस लोकं जातील येतील कसे. पाई पाई जाणारे लोकं, चढतील कसे उतरतील कसे.

**श्री.सोनगीरे :-** भाऊ हा प्रश्न पुर्णपणे बी ॲण्ड सी.चा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मग हे तर चालतच राहील ना. बी ॲण्ड सी.ला तुम्ही विचारणार आम्ही तुम्हाला विचारु. हे केव्हापर्यंत चालणार आहे. आपल्याकडुन एन.ओ.सी. मागतात ते लोकं. पण तुम्ही तरी विचार करायला पाहिजे ना त्या विषयाचा.

**श्री.सोनगीरे :-** भाऊ जो पुलाचा नकाशा मंजुर झाला आहे त्याच्यात कुठेही प्रावधान दिसुन येत नाही. फक्त तो टी आकार जो आहे साळुंखे चौकापर्यंत उतरेल. जिन्याचा नकाश्यामध्ये किंवा ईस्टीमेटमध्ये कुठेच प्रावधान नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्या दिवशी अधिकारी वर्ग आले होते मॅडम मी तुम्हाला सांगितले की, जिना ठेवा म्हणुन. तुम्ही ते कसे देणार कुठे देणार त्याचा पाठपुरावा करायला पाहिजे महानगरपालिकेने. शिवाजीनगरचे नागरिक आम्हाला विचारतात. त्यांना बी ॲण्ड सी. शी काय घेणे देणे. ते म्हणतात तुम्ही काय करतात?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्याठिकाणी तुम्ही नियमाने एक प्रेस घ्या आणि लोकांना सांगुन द्या की, त्या पुलाला जिना नाही. तो प्रश्न निकाली काढा. लोकं आम्हाला विचारतात की, भाऊ पाई कुठुन जायचे. भाऊ पाई जाण्याचा विषय असा आहे आता, शिवाजी नगरची जी मंडळी आहे त्यांना किती दुर जाऊन असे परत फिरुन जावे लागते. आणि जिना तेथे पुर्वीपासुन होता.एकतर प्रशासनाने याची पुर्ण जबाबदारी घ्यावी. लोक आम्हाला विचारतात तिथले, शिवीगाळ आम्हाला खावी लागते. तुम्ही त्या ठिकाणी येऊन सगळयांना सांगा. तेथे जिना आहे नाही आहे. कसा राहणार, काय राहणार, कसे यायचे आहे. म्हणजे आम्हाला त्यामधुन सुटका मिळेल.

**मा.आयुक्त :-** एक दोन आठवडया अगोदर आपण एकत्रीत व्हिजीट केली होती. पी.डब्ल्यु.डी.चे अधिकारी होते आपणही होतात त्यामध्ये. तेव्हाही पी.डब्ल्यु.डी.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. तेथे जिना करुन ठेवला आहे आणि ते आपल्याला विचारुनच पोझिशन फायनल करणार आहे. ते करुन देतो असे सांगितलेले आहे. जर पी.डब्ल्यु.डी.ने जबाबदारी नाही घेतली. तर आपण मनपाकडुन करु. पी.डब्ल्यु.डी.ने म्हटले ना की, करणार म्हणुन.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त महोदया, बोलते, सांगते, आज करु उद्या करु. असे उडवा उडवीचे उत्तर देतात. आता चालु झाल्यावर त्या लोकांनी काय करायचे.

**मा.आयुक्त :-** नवनाथ भाऊ तुम्ही होते आणि तुमच्या समोर हो म्हटले ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो, तेवढेच बोलत आहे. पण त्याचा पाठपुरावा तर आपल्या लोकांनी करायला पाहिजे ना.

**मा.आयुक्त :-** जर पी.डब्ल्यु.डी.ने नाही केले तर आपण पाठपुरावा करु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि भारतीताई सोनवणे असतांना छत्रपती शिवाजी महाराजांचा नांव द्यायचे आहे त्या पुलाला. त्या संदर्भात एक ठराव झालेला आहे. आता महाराजांचे नांव कोणत्या साईडला मोठया अक्षरात देण्यात येईल. हे सांगावे प्रशासनाने.

**मा. आयुक्त :-** आपण सर्व याचा साईट इन्स्पेक्शन करुन निर्णय घेऊ.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर, आयुक्त मॅडम, मी जे काही विचारणा केली, त्याचे खरोखर उत्तर मिळणार आहे का ? हा पहिला माझा प्रश्न आहे. आणि त्यानंतर कार्यवाही होणार आहे का ?कारण मी मागच्या ३ महासभा झाल्या मी हा प्रश्न मांडत आहे. आणि याच्यावर मागच्या वेळेस महापौरताईंनी सुध्दा संताप व्यक्त केलेला आहे. पहिल्यांदा एका रिक्षावाल्यानी अडविले आणि त्याच्यावर खुप म्हणजे पहिल्यांदा ताईंचा आक्रमक आणि संतापजनक रुप आम्ही बघितलेले आहे. ताई म्हटल्या होत्या की, ८ दिवसांमध्ये खड्डे बुजवले गेले पाहिजे. आता मला वाटते महिना, महिन्यापेक्षा जास्त झाले, मला वाटते मागची महासभा दि.०७/७/२०२२ ला होती. आता ही दि.०८/०८/२०२२ आहे. बरोबर एक महिना झालेला आहे. काहीच कार्यवाही त्याच्यावर झालेली नाही. मला असे वाटते की, एक खड्डा तेथे बुजवलेला नाही. वारंवार सुचना करुन सुध्दा, मॅडम मी आपल्याला वारंवार सांगितले व्हिजीट करा ही विनंती केलेली होती. गिरगावकर साहेबांना सुध्दा विनंती केलेली होती. आपण माझ्या प्रभागात व्हिजीट करा. गिरणा टाकी ते काव्यरत्नावली चौक, गिरणा टाकी ते पॉलिटेक्नीक वॉल कंपाऊंड पर्यंत. आणि आस्वाद चौक ते गिरणा टाकी, असा जो रस्ता आहे. याच्यावर आपण टु-व्हिलरने म्हणा, पाई म्हणा, फोर व्हिलरने जातात. फोर व्हिलरने काही कळत नाही. आपण पाई चालावे. गाडीवर जाऊन बघावे. काय परिस्थिती आहे त्या रस्त्यांची. आणि प्रत्येक वेळी हेच उदहारण दिले जात आहे की, अमृतचे कनेक्शन व्हायचे आहे. अमृतचे कनेक्शन व्हायचे आहे. त्या अडचणी आहे. मला असे म्हणायचे आहे. योगेश बोरोले साहेब आहे त्यांना विचारा की, किती कनेक्शन राहिलेले आहे. जर राहत असतील तर ते उभे राहुन पुर्ण करुन घ्या. जेणे करुन पुढचे कामे मार्गी लागेल. खड्डे बुजवायचे आहे. रस्ता होणार आहे तर होणार आहे. पण निदान खड्डे तर बुजा. खड्डे पण जर बुजणार नसतील तर शिव्या आम्हाला मिळतात. प्रशासनाला कुठल्याही प्रकारची जाणिव आहे मला असे वाटत नाही. त्यांना काय फक्त ऐकता आणि सोडुन देता. महासभेमध्ये सदस्य वारंवार बोलत आहे. वारंवार संताप व्यक्त करत आहे. पण त्याच्यातुन निष्पण काही निघत नाही. फक्त आम्ही महासभेमध्ये बोलायचे आणि परत जायचे. बाकी दुसरे काही करायचे नाही. त्याच्यामुळे जे काही असेल आता किती दिवसामध्ये त्या रस्त्याचे काम करुन मिळणार आहे. याचे आश्वासन द्यावे ही विनंती. तो पर्यंत मी महासभा चालु देणार नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ही गोष्ट खुप गंभिर आहे की, त्या दिवशी महापौरताई ज्या पध्दतीने आक्रमक झाल्या होत्या. पण आक्रमक झाल्यानंतरही त्यांची भुमिका विनंतीची होती. हे लक्षात घ्या कार्यवाहीची नव्हती कोणावरती. त्यांची भुमिका विनंतीची होती की, मी हात जोडते. या सभागृहामध्ये हात जोडावे लागतात महापौरताईंना. हे आमच्या सारख्याला शोभनिय वक्तव्य नाही. त्यांचा मान ठेवला पाहिजे. त्यांचा सन्मान ठेवला पाहिजे. प्रशासनाने ८ दिवसात खड्डे बुजुन घ्यायला पाहिजे होते जळगांव शहराचे. इतक्या तातडीने काम झाले पाहिजे होते. पण आपण काढतो काढतो टेन्डर कोटेशन हा भरत नाही तो भरत नाही. ह्या कोणत्या पध्दती आहे. काही गोष्टी प्रशासकीय आहे. प्रशासनाने तातडीने करुन टाकायला पाहिजे. आपण बाकी गोष्टी खरेदी करुन करतो की, नाही करतो ऐमर्जन्सीला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विशालभाऊ जे बोलत आहे ती अगदी वस्तुस्थिती आहे. थोडक्यात एका प्रभागाची समस्या ही महापौरताई आपण ही चांगली जाणत आहात. आपण स्वत: या रस्त्याची खंत, खेद, संताप सगळे व्यक्त करुन झालेले आहे. हे ढिम्म प्रशासन जागणार कधी आहे. आयुक्त महोदया, आपल्याला प्रश्न आहे माझा की, काय अडचणी आहे. जळगांव शहरातल्या कोणत्याही रस्त्यावरुन जा एक खड्डे विरहित रस्ता मला दाखवुन द्या. टु-व्हीलरवर पाई ज्या नागरीकांना फिरावे लागते त्या नागरीकांचे काय हाल होतात. आणि लोकप्रतिनिधी म्हणुन आम्हाला शिव्यांची काय राखोळी वाटत असेल. मला वाटते की, कोणीही सदस्य माझ्या या वाक्याशी असहमत असेल की, कोणालाही शिव्या खाव्या लागल्या नाही रस्त्यांच्या विषयावरुन एका तरी सदस्यानी येथे उभे रहावे आणि सांगावे की, रस्ते या विषयावर ते समाधानी आहे. नागरीकांकडुन त्यांना कोणत्याही तक्रारी नाही. संपुर्ण सभागृहाच्या संतापणीय प्रतिक्रिया आहे. आणि त्यानंतरही काहीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे आजची सभा येथेच थांबवा जो पर्यंत याचा निर्णय होत नाही तोपर्यंत सभेचे कामकाज पुढे जाणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.सदस्या सौ.उज्वलाताई बेंडाळे यांनी आता ज्या ज्या रस्त्यांची नावे घेतली. त्या त्या सगळया रस्त्यांचे कार्यादेश देण्यात आलेले आहे. मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडे त्या कामाचे कार्यादेश आहे. वारंवार सुचना केल्यानंतरही प्रतिसाद मिळत नसेल तर मला वाटते की, सन्मा.सदस्यांनी एकदा त्या मक्तेदाराला बोलवुनच जाब विचारायला पाहिजे. का तर मक्तेदार संबंधीत सदस्यांचे अत्यंत जवळचे आणि परिचित आहे. जवळपास ४२ कोटींच्या कामांच्या वेळचे आहे. आणि हे जी उज्वलाताईंनी कामे नमुद केली सभागृहात त्या कामांचे कार्यादेश सुध्दा देण्यात आलेले आहे. त्या कामांचे नळ संयोजन पुर्ण झाल्याचे दाखले सुध्दा देण्यात आलेले आहे. असे असेल तर सर्वांनी एकमुखी मागणी करावी. मक्तेदारास काळया यादीत टाकण्याची गोष्ट असेल तर तसा प्रस्ताव मांडावा. आणि तसा प्रस्ताव मांडला तर हे सभागृह मान्य करेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, माझ्या प्रभागातला जो रस्ता आहे. बहुतेक आपण पाहणी करुन गेलेल्या आहेत. त्यावेळेस सन्मा.नगरसेवक श्री.धिरज सोनवणे आपल्या सोबत होते. त्या रस्त्याची दुरुस्ती होऊ शकत नाही हे आपले वाक्य आहे. रस्त्याची इतकी चाळणी झालेली आहे. दुरुस्ती सुध्दा होऊ शकत नाही. आम्ही फक्त खड्डे बुजुन द्या अशी मागणी वारंवार करतो आहे. खड्डेही बुजले नाही. पावसाळा संपल्यानंतरही खड्डे तसेच राहणार असतील तर पावसाळयात ज्या नागरीकांचे हाल झाले त्यांचे काय करायचे. आपण स्वत: येऊन बघुन गेलेले आहे.

**मा.महापौर :-** गिरगावकर साहेब, आपण श्री श्री इन्फ्राला आठ रस्त्यांच्या एन.ओ.सी.दिलेल्या आहेत की, जेथे अमृतचे काम पुर्ण झालेले आहे. आणि त्यांना सांगितले होते की, डब्ल्यु. बी.एम.ला काम करायला तुम्ही सुरुवात करुन द्या. आपण पाहिले मागचा आठवडा जो होता त्यात पाऊस सुध्दा नव्हता. मग त्यावेळेला ते काम का सुरु झाले नाही. मी वारंवार सुध्दा हा प्रश्न आपल्याला विचारला. याबाबत मी वृत्तपत्रांना सुध्दा कळविले होते. पत्र सुध्दा पाठविलेले होते. पण एवढे सगळे करुन सुध्दा डब्ल्यु.बी.एम. ने का सुरु केले नाही. नक्की काय अडचण होती. शहर अभियंता नाही तर आयुक्त मॅडम आपण याच्यावर खुलासा द्यावा. कमीत कमी तेवढे रस्ते जरी झाले असते तर तेवढा रिलीफ नागरीकांना मिळाला असता.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** जे मोठे मोठे खड्डे आहे. त्या खड्डयांचे परिक्षण सगळे करा आणि त्या खड्डयांना महानगरपालिकेच्या कुठल्या अधिकारीचा प्रभाग अधिकाऱ्याचे नांव द्यायचे ते ठरवा. एका खड्डयाला त्या ठेकेदाराचे नांव द्या. एकाला आयुक्तांचे नांव द्या. एकाला संबंधीत अधिकाऱ्याचे नांव द्या. एका खड्डयाला जे.ई.चे नांव द्या, इंजिनिअरचे नांव द्या. लोकांना कळु द्या हे खड्डे कशामुळे होत आहे. कारण त्या खड्डयाला आम्हाला स्वत:ला सगळ सहन करावे लागत आहे. आता आपण ७५ वा अमृत महोत्सव येथे मनवितो आहे. आणि आपले जळगांवाला खड्डे चालु आहे, दुषित पाणी, खड्डे, गटारी भरल्या, लाईट लागत नाही. आता मला लाज वाटते त्या गोष्टी बोलायची.

**मा.महापौर :-** मी आपल्या भागात त्याची उर्वरित कॉन्टीटी जी होती. त्यांना परत बोलवुन ते काम करायला सांगितले होते की, पुन्हा तुमचे काम तुम्ही सुरु करा. परंतु ते जर सुरु झाले असते. तर मला वाटते की, बऱ्याच वार्डातले खड्डे बुजले गेले असते. पण बऱ्याच ठिकाणी ते सुध्दा झालेला नाही.

**श्री.धीरज सोनवणे :-** मागची महासभा झाल्यानंतर हा सगळा विषय ठरलेला होता. या सगळया प्रक्रियेला एक महिना होऊन गेला तरी ही एकही ठेकेदार तयार नाही ते खड्डे भरायला. आणि पावसाळा संपत आला आहे. आता नाही पण भरले ते खड्डे तर अडचण नाही लोकं असे पण सहन करत आहे. आम्ही पण सहन करतो आहे. करुन घेऊ. पण असे जर कागदोपत्री तुम्ही जर भरोसा आणि आशा देसान की, या भरोस्यावर आम्ही काम करत आहे. तर ते शक्य नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर महोदया, जे शहरात आता खड्डे पडलेले आहे. ते आपण सद्या मुरुमाने बुजतो आहे. म्हणजे एक पाऊस पडताच ते वाहुन जात आहे. मग डांबरानेच बुजवायला काय हरकत आहे. पाऊस उघडल्यावर डांबराने आपण खड्डे बुजु शकतो. शिवाजीनगरच्या पुलावर काम चालुच आहे की नाही डांबराचे. चार चार पाच पाच दिवस आपल्याला वेळ मिळतो ना. त्या वेळेत आपण करु शकतो ना. का नाही करत आहे असे. मुरुम एका दिवसाच्या पाऊसात वाहुन जातो तो. परत खड्डा तेथे. डबल डबल ट्रिपल ट्रिपल खर्च करायचे का? परत पुढच्या वेळेस आपण रिपेरींग करु त्यावेळेला मुरुम काढायचा खर्च आपल्याकडुन घेईल तो. मग डांबरी रस्ता करायला काय प्रॉब्लम आहे.

**मा.महापौर :-** याच्यासाठी इम्लशनचा वापर करायला सुध्दा सांगितले होते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** जर इम्लशन आपण जास्त वापरले ना तर खड्डे जास्त पडत नाही. पण अशी ही एक चर्चा माझ्या कानावर आलेली आहे की, इम्लशन मध्ये पाणी टाकले जाते आणि पाणी टाकुन ते खड्डे बुजले जातात. बाकीचे डब्बे गायब होता. त्याच्यामुळे खड्डे परत पडतात. पाच महिन्यात सहा महिन्यात. लक्ष द्यायला पाहिजे ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई जे आहे ते आताच याच सभेत करा तुम्ही.

**मा.महापौर :-** नाही आता याच्यावर कार्यवाही करावीच लागेल, कारण खड्डे खुप वाढलेले आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** जे जबाबदार असतील, त्यांच्यावर कार्यवाही करा. नाही तर आजची महासभा काहीच कामाची नाही. घेऊ नका रद्द करा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, आप्पा एक मिनीट, ज्या वेळेला आपल्याला एका रिक्षा वाल्याने अडवणुक केल्यावर आपण तेथे जी आक्रमकता दाखविली. ती शहरामध्ये का दिसत नाही. म्हणजे वार्डवाईज, म्हणजे आम्हालातर विरोधी पक्षनेते कुठेच दिसत नाही. विरोधीपक्ष नेत्याच्या माध्यमातुन सत्त्याधाऱ्यांना जाग आणली जाते. विरोधीपक्ष नेते तर आम्हाला कुठेच दिसत नाही. आपण तरी महापौर पदाधिकारी म्हणुन तितपर्यंत पोहचले पाहिजे. नाही हसण्यात घेऊ नका. गंभिरतेने घ्या. आम्ही २२ ते २५ ट्रॅक्टर मुरुम टाकले स्वखर्चाने. हसण्यावर घेवु नका. आपण काळजीपुर्वक फिरता कुठे. महापौरांनी फक्त मोजक्याच ठिकाणी फिरायचे का ? आपल्याला ज्या ज्या ठिकाणी जातात तेच आपल्याला दिसतात ईच्छादेवीचा रस्ता. इतर शहराचे रस्ते दिसत नाही का ?

**मा.महापौर :-** सर्व जळगांव शहराच्या रस्त्यांचा विषय आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पण काम होत नाही ना. एक एक महिना झाला, काम होत नाही ना. नुसते मुरुमाने बुजले जात नाही.

**मा.महापौर :-** गिरगावकर साहेबांना विचारा, मी ५०-५० लाखाचे चार प्रभागाचे चार टेन्डर काढायला सांगितले होते. प्रशासनाने त्याची सुध्दा प्रोसिजर कोणतीच केलेली नाही.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना गोंधळ सुरुझाले व काय बोलले ते समजले नाही.)

**मा.महापौर :-** एक एक जण बोला.

**मा.उपमहापौर :-** एक एक जणाने बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई तुम्ही गिरगावकर साहेबांचे नांव घेतले आणि त्यांना ५०-५० लाखाचे ईस्टीमेट करायला सांगितले. तुम्ही करा ईस्टीमेट ठेकेदार घेणार नाही. कारण टेन्डर येण्याच्या अगोदर गिरगावकर साहेब टेन्डर तयार करणे अगोदर पैसे मागतात ते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सस्पेंड करा, सस्पेंड करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी अगोदरच विचारले साहेबांना की, गिरगांवकर कुठे आहे. मिटींग सुरुहोण्याच्या अगोदरच विचारले की, गिरगांवकर कुठे आहे. ते आता येथे नाही त्यांच्या अनुपस्थीत बोलायला नाही पाहिजे. हा विषय आला म्हणुन मी बोलत आहे. मॅडम तुम्ही त्या गिरगांवकरांना समज द्या.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना गोंधळ सुरुझाले व सन्मा.सदस्य काय बोलले ते समजले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मनोज, काही नगरसेवक घेतात. घेतात काही नगरसेवक.

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा, घेतात ना तर नावे डिक्लेअर करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** बात निकली है तो बहोत आगे तक जाऐंगी, मॅडम, महापौरताई तुम्ही गिरगावकरांना, माझी विनंती आहे. तुम्ही गिरगांवकरांना समज द्या. मला काही मक्तेदार भेटले होते. मी आल्या बरोबर जावळेंना विचारले की, तुम्ही कसे काय येथे. तुम्ही त्यांना समजुन सांगा आणि तुमच्याकडे ठेकेदार केव्हा येईल. त्याला जेव्हा काम परवडेल तेव्हा येईल. टॅक्सेस किती कपात होतात बिलांमधुन कोण कोण किती किती पैसे घेतात त्यामुळे आणि ते मनपा फंडाचे आहे. तुम्ही त्यांना तयार करायला पाहिजे. त्यांना सवलती द्यायला पाहिजे. तुम्ही त्यांना त्रास देता म्हणजे.प्रशासन त्रास देत आहे मक्तेदारांना सुध्दा आणि ताई आपले काही वरचे काही नाही तरी तुम्ही काही दिवसापुर्वीचा दिव्यमराठी वाचला तर सिव्हिलच्या रस्त्यावर जातांना दोन डिलीवरी झाल्या आहेत. किती दुरदैव म्हणजे आतापर्यंत आम्ही काहीच बोलले नाहीये या सभागृहामध्ये असे काही परंतू संपुर्ण जळगांव शहरात इतक्या शिव्या देतात लोक नगरसेवकांना कालच्या पेपर मध्ये दिव्य मराठी मध्ये काय काय बोलतात नागरीक , सगळया ठिकाणी चालु आहे हे , तुम्ही पण होते तिथे कालच्या दिवशी ओरड किती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तर तुम्ही काही तरी याच्यावर निर्णय घ्या तुम्ही..

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आजची सभा तहकुब करा. जर निर्णय होत नाही. आजची सभा तोपर्यंत तहकुब करा.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना गोंधळ सुरुझाले व सन्मा.सदस्य काय बोलले ते समजले नाही.)

**मा.महापौर :-** सगळयांनी शांतता ठेवायची आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना सन्मा.सदस्य श्री.मनोज पाटील हे सन्मा.श्री.कैलास सोनवणे यांच्या आसनाजवळ आले आणि त्यांच्याशी बोलायला लागले. परंतु गोंधळामुळे काय बोलले ते समजले नाही. त्यांचे बोलणे संपल्यानंतर मा.महापौर यांच्याशी बोलणे करीता सन्मा.सदस्या सौ.उज्वला बेंडाळे व्यासपीठावर आले.)

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रभाग क्र.५ मध्ये हे रस्ते झालेले आहे. या रस्त्यांचे काय एक एक कोटी जर आपण खर्च करत आहे. हा धांडेनगरचा रस्ता आहे. धांडेनगर ते समता नगरला जाणार रस्ता आहे. ही परिस्थिती सगळया रस्त्यांची आहे. त्यांची ही परिस्थिती असेल तर म्हणजे पैसा कशासाठी खर्च करतो आहे आपण. डी.पी.रोड आहे पैसा कशासाठी खर्च करतो आहे आपण. म्हणजे प्रशासनाचे कुठलेच लक्ष नाही याच्यामध्ये. त्यांनी ना क्युरींग केलेले आहे. ज्यांनी ते केलेले आहे त्यांनी बघितले पण नाही. काहीच करत नाही ते. याचा अर्थ हे आहे ना. स्पष्ट दिसत आहे पुर्ण उखडलेला रस्ता आहे. संपुर्ण ठिकाणी आहे ना, पहा ना. म्हणुन मी आयुक्त मॅडमांना विनंती केली होती की, या आणि बघा. काय परिस्थिती आहे तिथली.

**श्री.नितीन बरडे :-** प्रभाग क्र.१२ मध्ये साधारण पौनेदोन वर्षापुर्वी आदरणीय पालकमंत्री श्री. गुलाबभाऊ पाटील यांच्या माध्यमातुन प्रभाग क्र.१२ मध्ये काही निधी मिळालेला आहे. काही निधी ४२ कोटी मधुन आहे. मॅडम मी आपल्याला पत्र दिलेले आहे. शिवराम नगर, सुयोग कॉलनी, गुलमोहर कॉलनी, म्हणजे आस्वाद हॉटेल पासुन ते काही ८ कामांचे नावे दिलेले आहे. ८ कामांपैकी चार कामांची एन.ओ.सी. बांधकाम विभागाने मक्तेदाराला दिलेली आहे. ४ कामांची एन.ओ.सी. बाकी आहे. शिवराम नगर आस्वाद चौकापासुन या भागातील जी एन.ओ.सी.बाकी आहे. मॅडम आपल्या अधिकाऱ्यांमुळे त्याठिकाणी पाणी कनेक्शन अजुन सुध्दा झालेले नाही. त्यांचे पाणी कनेक्शन का झालेले नाही. या पाऊसाळयात एन.ओ.सी. भेटेल की नाही. आणि रस्त्याचे काम सुरु होतील की, नाही. अपार्टमेंटची एन.ओ.सी. का मिळालेली नाही अजुन कनेक्शन का झालेले नाही. संबंधीत अधिकाऱ्यानी आम्हाला सांगावे. एकतर अजुन किशोर ढाके यांच्या घरापासुन ते पार्वती नगर आणि अजिंठा सोसायटी या रस्त्याचे अजुन टेन्डर ओपन केलेले नाही. तो एक रस्ता झालेला आहे. ॲड.उज्वल निकम यांच्या घरामागील एक रस्ता झालेला आहे. आपल्या अधिकाऱ्यांची चुक पहा मॅडम, तुम्ही ५० हजार क्लव्हर्टसाठी देत नाही. १२ लाख रुपयाचे काम होते. रस्ता पुर्ण झालेला आहे. अधिकाऱ्यांने बिल नोंदलेले आहे. आणि अडीच लाख रुपये त्या कामात शिल्लक आहे. सांगा बरं शासनाला पैसे परत जात आहे. अडीच लाखात २० मिटरची एक गल्ली बाकी आहे. ते काम झाले नसते

का ? तुमचे अधिकारी जागेवर जात नाही. रामदास कॉलनीचा नाला बनवितांना पुल जेथे बनला, परवा बातमी आहे सकाळला. मला अकाऊंट विभागाने सांगावे की, त्या नाल्याचे किती पेमेंट केलेले आहे ठेकेदाराला. तेथे २१ दिवस होऊन सुध्दा आपला अभियंता तेथे रस्ता सुरु करायला व तिथे खड्डे वगैरे पडलेले होते. तेथे जायला कोणी तयार नाही. परवा आम्ही साफ केलेले आहे ते. नळ कनेक्शन का देत नाही. नविन कनेक्शन घ्यायला तुमचा अधिकारी एक हजार रुपये घेतो म्हणुन राहिल आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे:-** रु.४०००/-

**श्री.**कैलास सोनवणे :- घेता घेता पैसे घेतात.

**श्री.नितीन बरडे :-** मी साक्षीदार उभे करुन देईल. मीच पाठविलेले होते त्या लोकांना आणि रु.१०००/- मीच दिलेले आहे. मीच द्यायला लावलेले आहे. म्हणजे पौनेदोन वर्ष झाले निधी येऊन पडलेला आहे. एका बाजुला महापालिका सांगते आपल्याकडे पैसा नाही. एका बाजुला पैसा आहे तर दिडवर्ष झाले आपण खर्च करु शकत नाही. काही टेन्डर ओपन करु शकत नाही. तुम्हाला सांगितले एमर्जंसी काही कल्व्हर्ट आहे. दोन दोन तीन तीन महिने लागले ५०-५० ६०-६० हजार रुपयाचे टेन्डर मनपा निधीतुन काढायला. काव्यरत्नावली चौक ते गिरणा टाकी पर्यंत पाणी कनेक्शनचे किती कामे बाकी आहे. तो ४२ कोटी मध्ये रस्ता आहे कुठुन होणार तो लवकर. २ वर्ष जर तुम्ही पाणी पुरवठयाचे कामे करणार आहे. तर त्या रस्त्याचे काय होणार आहे. खड्डे पण बुजवु शकत नाही तुम्ही. ऐवढे खड्डे पडलेले आहे त्याच्यावर. सांगावे तुमच्या अधिकाऱ्याने, मला सांगावे ठेकेदारांचे किती बिले आलेले आहे आणि किती पेड केलेले आहे. प्रत्येक टेबलावर टक्केवारी आहे. एकच ठेकेदार आहे आमच्या वॉर्डात त्याचे बिल ही निघाले नाही काही कामे पुर्ण झालेले आहे काही अपुरे आहे आणि सकाळ मध्ये बातमी येते. नाल्याचे पैसे पुर्ण काढले आणि काम अपुरे आहे. आलेले बिले पडलेले आहे. कसे काय काम करणार ठेकेदार, तुम्हाला पाहुन जे करायचे ते करत आहे. जे रस्ता सांगत आहे तुम्ही समतानगरचा महापौर ताई. कोणता रस्ता सांगत आहे तुम्ही.

**मा.महापौर :-** समतानगर ते धांडे नगर.

**श्री.नितीन बरडे :-** समता नगर ते धांडे नगर, तुमचे अधिकारी या रस्त्यावर किती गेले. आज मला या नोटीसची कॉपी भेटलेली आहे.त्या मक्तेदाराला नोटीस दिल्याची आज १०.४५ वाजता कॉपी भेटलेली आहे रस्ता दुरुस्तीसाठी मी अजुन बोलणार नाही. त्याचा पिरियेड आहे. किती पिरियेड आहे त्याचा अजुन ६ महिने उरलेले आहे. ६ महिने दुरुस्तीचा पिरियेड आहे. त्यानंतर मी जे पत्र देईल. त्या अधिकाऱ्यांना तुम्हाला सस्पेंड करावे लागेल. मी अजुन त्या मक्तेदाराची जो पर्यंत लायबीलीटी आहे. तो पर्यंत रितसर पत्र देणार नाही. तो रस्ता कॉंक्रीटचा रस्ता आज उखडुन गेला ६ महिन्यात काही ठिकाणी. मी ज्या दिवशी पत्र देईल त्या दिवशी तुम्हाला त्या अधिकाऱ्यांना सस्पेंड करावे लागेल. आमचे कामे का होत नाही मॅडम. ६ महिने झाले पाठीमागे लागलेलो आहे. जय नगर, वगैरे विद्या नगर, रामदास कॉलनी पाण्याचे कनेक्शन पुर्ण करा. का होत नाही पाण्याचे कनेक्शन उत्तर द्यायला लावा त्यांना. उत्तर द्यायला लावा. आमच्या आनंद सोसायटी मधील अर्ध काम बंद पडले चालु काम. फक्त पाणी कनेक्शन नव्हते म्हणुन, अपार्टमेंटच्या कनेक्शनांचे काय झाले.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- अपार्टमेंटच्या कनेक्शनसाठी मक्तेदाराला एक्स्ट्रा आईटम म्हणुन त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. त्याच्याप्रमाणे एक्स्ट्रा आईटमसाठी जिवन प्राधिकरणाकडुन मान्यता आलेनंतर त्याचे मटेरियल अव्हेलेबल झाल्यानंतर अपार्टमेंट मध्ये कनेक्शनचे काम चालु होईल. एक ७-८ दिवसात त्या अपार्टमेंटचे काम चालु होणार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम, समजा, सहा महिने एम.जी.पी.ने दिले नाही तुम्हाला मग काय आमचे प्रभागच्या कामे होणार नाही का ? निधी जाऊ द्या मग परत.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- एम.जी.पी.कडे एक्स्ट्रा आईटम म्हणुन मंजुर होईल तो आणि मग त्याच्यानंतर ८ दिवसात करु.

**श्री.नितीन बरडे :-** या एक महिन्यात तुमचे हे कामे पुर्ण झाल्यानंतर आम्ही पावसाळा संपल्यानंतर कामे प्रपोझ करु. कधी होतील हे कामे. कसे होतील.

**मा.महापौर :-** पावसाळा संपेपर्यंत हे कामे पुर्ण करायचे आहे हे माहित आहे त्यांना.

**श्री.नितीन बरडे :-** मक्तेदाराला किती पैसे भेटतील यात ॲनालेसीस केलेले आहे का ?

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- सगळे कायद्याने जे मटेरियल लागणार आहे ते सगळे अमाऊंटसह काढुन दिलेले आहे आपण.

**श्री.नितीन बरडे :-** मटेरियल किती लागणार आहे आणि त्याच्या मोबदले त्याला पैसे किती भेटणार आहे. नुस्ता बाजाराचा खेळ चालु आहे मक्तेदाराचा आणि अधिकाऱ्यांचा, मी तुम्हाला सांगितले आहे ते ही त्यांना दिलेले नाही. संबंधीत इंजिनिअर कधीच कामावर जात नाही. अडीच लाख रुपये परत जात आहे एका कामातुन तुम्ही ५० हजाराचा एक कल्व्हर्ट मंजुर करत नाही येथे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई. नितीनभाऊंचे आणि माझे म्हणणे एकच आहे. नितीनभाऊ जे काही बोलले. आम्ही सोबतच सोचतो आहे आणि भोगतो आहे. मला फक्त दोन गोष्टींचे उत्तर द्या आयुक्त मॅडम, एक विषय असा आहे की, जवळपास १२ ते १४ कॉलन्यांचे आणि त्यातील सिंगल रोडचे, आस्वादचा रोड असेल, धांडेनगरचा रोड असेल असे काहींची मंजुरी होऊन वर्क ऑर्डर झालेल्या आहेत. नितीनभाऊंचे म्हणणे प्रमाणे १००% कनेक्शन या रस्त्यांवर आहे. पण याचे दोन भाग करावे. मी गेल्या मिटींगलाही बोललो होतो.आपण कृपया, मी महापौरताईंना आपल्या कार्यालयात विनंती देखील केली होती. जे जे.ई. आहे त्या त्या प्रभागातले त्यांना मिटींगला आपण बोलविले पाहिजे. होते का की, नेमाडे साहेब असतील पाणीपुरवठयाचे किंवा बांधकामचे गिरगांवकर साहेब असतील किंवा जे कोणी असतील, आता जावळे साहेब बसलेले आहे येथे. यांना आर्ध्या गोष्टी माहित असतात. आर्ध्या गोष्टी माहित नसतात. तेथे काय चालढकल होते किंवा काय कामचुकारपणा होतो. तो येथे सिध्द झाला पाहिजे त्या जे.ई.ला म्हणुन मिटींगला आपण या सगळया जे.ई.ना बोलवायला पाहिजे. आपला कार्यकाळ जो आहे वर्षभराचा महापौरताई त्यात जे.ई.ना सभागृहात बसविले पाहिजे. आयुक्त मॅडम माझ्या प्रभाग क्र.१२ मध्ये आपण दोन भाग केले पाहिजे. मी दोन ते तीन मिनीट घेईल. जास्त वेळ घेणार नाही सभागृहाचे. काही कॉलनींच्या एन.ओ.सी.आम्हाला मिळालेल्या आहे. ज्या ठिकाणी नळ कनेक्शन झालेले आहे, व्हॉल लावले गेलेले आहे. टेस्टींग फिक्सींग सगळे झालेले आहे. त्या ठिकाणी आपण डांबरीकरणाचे काम सुरु करु शकतो. आपल्याकडे होत काय की, आपण आदेश केलेले आहे मक्तेदारांना की, पाऊसाळयात डांबरीकरणाचे काम करायचे नाही म्हणुन, आणि आपण शिवाजी नगर पुलावर डांबरीकरण करु शकतो. मग आमच्या प्रभागाचे का करु शकत नाही. ज्या ठिकाणी आम्हाला एन.ओ.सी. मिळालेल्या आहे. ज्या ठिकाणी कनेक्शन पुर्ण झाले असेल किंवा अमृतचे काम पुर्ण झाले असेल. आणि पाणी पुरवठा विभागाने आम्हाला एन.ओ.सी. दिलेली असेल. आपण जर मक्तेदाराला सांगितले की, तेथे काम करायला हरकत नाही. त्याला पाऊसाळयात ऊन ही मिळेल. त्या ठिकाणी तो काम करु शकतो. आणि दुसरा विषय नितीनभाऊंनी सांगितले प्रमाणे अनेक ठिकाणी एन.ओ.सी.आज पण नाही. त्या ठिकाणी कनेक्शन बाकी असतील, फिक्सींग किंवा टेस्टींग बाकी असतील, व्हॉल किंवा पाईप टाकणे बाकी असतील. त्याचे मी मागच्या मिटींगला ही बोललो की, पाऊसाळयात जर तुम्ही आम्हाला एन.ओ.सी. मिळुन दिली. किमान पाऊसाळयानंतर आम्ही ते कामे करु शकतो. मॅडम हे खरंच दुरदैव आहे. इतक्या पोटतिडकीने ते नितीन भाऊ बोलले किंवा आम्ही जे बोलतो हे दुरदैव आहे मॅडम. आपल्याकडे महापालिकेमध्ये आर्थिक परिस्थिती नाजुक आहे. शहराच्या प्रत्येक नागरीकाला माहित झालेले आहे. मा.ना.श्री.गुलाबभाऊ, पालकमंत्र्यांच्या वतीने इतका भव्य निधी मिळालेला आहे मॅडम आणि एक वर्षाच्या वर झाले मॅडम. म्हणजे वर्कऑर्डर होऊन कमीत कमी ५-७ महिने झाले.आणि त्याच्या पुर्वीचेही काम बंद आहे. महापौरताई विराजमान झाल्या या पदावर तेव्हापासुन आम्हाला तो निधी मिळालेला आहे. विचार करा आम्ही पैसे नाही म्हणतो आणि पैसे असतांना निधी उपलब्ध असतांना आपण कामे करु शकत नाही ही शौकांतिका आहे. आणि लोकांना काय सांगायचे मॅडम. त्याच वेळी सांगितले की, निधी मंजुर झालेला आहे. ३-४ महिन्यात आपले सगळे रस्ते होऊन जातील. आज वर्षाचे वर झाले आहे. काय सांगायचे. आता ज्या रस्त्यांचे विषय चालु आहे. या रस्त्याचे खड्डे बुजवले त्या रस्त्याचे खड्डे बुजवले. सर्वांचे वर्क ऑर्डर झालेल्या आहे मॅडम. मग का काम पुर्ण होत नाही आणि जे.ई. तर पाहिजेच मिटींगमध्ये. जावळे साहेबांना सगळी गोष्टी माहित असतील किंवा गिरगांवकर साहेबांना सगळी गोष्टी माहित असतील असे नाही. नेमाडे साहेबांना सर्व माहिती आहे असे नसते.जे.ई.ना येथे बोलवा त्यांची जबाबदारी त्यांना कळवु द्या. आम्हाला त्यांना एक एक प्रश्न विचारु द्या. त्यांना एक एक उत्तर देऊ द्या. मग त्यांना कळेल की, काय होते. ते येतच नाही समोर. हे उत्तरे देतात. यांना आर्धी गोष्ट माहित नसते. टोलवा टोलवीचे उत्तरे देतात सभागृहात किंवा महासभा पुढे. तसे सांगुन मोकळे होतात. हे योग्य नाही. आता विषय निघाला खड्डयांचा म्हणुन सांगतो. मी किमान, आता गाडयांचा विषय सांगितला नितीनभाऊंनी २०-२० २५-२५ दिवस जे.सी.बी.साठी थांबावे लागतात. ठिक आहे तो विषय झाला आता ते आम्ही

केले परवा जे काही आहे. मी आपल्याला ही व्हिडीओ टाकलेला होता. तर ते झाले आता तो विषय नाही. मी दोन ठिकाणचे खड्डे बुजण्यासाठी एक गणपती नगरचा सम्राट अपार्टमेंटचा रस्ता आहे. आणि एक माजी.नगराध्यक्षीका पुष्पाताई पाटील यांच्या घराचा रस्ता आहे. या ठिकाणी मोठे खड्डे आहे. महिला तर टु-व्हिलर चालुच शकत नाही. खुप अडचण येते त्यांना बॅलेंसच करता येत नाही लहान मुले असतात सोबत मी किमान दोन ते तीन महिन्यापासुन सांगत आहे त्या रस्त्यांवरचे खड्डे बुजायला आपल्या इंजिनिअरला. २० दिवसांच्यावर झालेले आहे मुरुम सारखा विषय टाकु शकत नाही तुम्ही. त्या रस्त्यांचे कामे मंजुर आहे. वर्कऑर्डर झालेल्या आहे. त्याला डांबरीकरण होऊ शकत नाही. त्याला अमृत कारण आहे, पावसाळा कारण आहे जे काही असेल. मग तेथे दोन चार पाच मोठे खड्डे आहे तेवढे बुजायला काय हरकत आहे. त्याच्यासाठी आम्हाला २०-२० दिवस फॉलोअप घ्यावा लागतो. आणि आम्ही जेव्हा सभागृहात बोलतो तेव्हा वृत्तपत्रात बातमी छापुन येते. सत्ताधाऱ्यांचा अंकुश नाही किंवा महापौरांचा अंकुश नाही. जर प्रभागात आम्ही सांगितले. हो हो मी सांगितलेले आहे खड्डे बुजायला ते करतील. पण ते म्हणतात तुम्ही काय कामाचे. १५ दिवस तुम्हाला खड्ड्यांसाठी फिरावे लागतात. मग तुम्ही बसले कशासाठी. ही आमची नाचक्की आहे आम्हाला खुप त्रास सहन करावा लागत आहे. नाटकांचा अंत जसे आपण बघतो तसे आमचा ही अंत बघु नका आमची विनंती आहे. आता महापौर ताईंनी सांगितले, गेल्या एक महिन्यापुर्वी त्यांनी महासभेत संताप व्यक्त केलेला होता. आणि त्याच्यानंतर जर प्रशासन हलत नसेल. वाईट आहे फार वाईट आहे. आणि मिटींग झ ााल्यानंतर विसरुन जातो आपण  सगळे आपआपल्या कामाला लागुन जातो. आणि हे सगळे मागे पडुन पुढची मिटींगपर्यंत जातो. माझी विनंती आहे की, असे करु नका, जळगांवकरांचा अंत बघु नका आणि लोकप्रतिनिधींचा पण बघु नका.

**श्री.मनोज चौधरी :-** चंदु आण्णा नगर मध्ये आपण आले होते. लोकांनी आपल्याला रस्ता रोक केला होता. आपण कचरा फॅक्टरी कडे जातांना, मनपा फंडातुन कोणीही ठेकेदार काम करायला तयार नाही. कोणीही ठेकेदार नाही. आम्ही कोणाला तरी तयार करुन काम करायला सुरुवात केली. टेन्डर प्रोसेस झाली, वर्कऑर्डर झाली. पण देत का नाही. कैलास चौधरी कोण आहे त्यांनी समोर येऊन सांगायला पाहिजे का देत नाही. आज तीन तीन महिने होऊन गेले, वर्कऑर्डर देत नाही. तुम्हाला माहिती आहे त्या कामाबद्दल. स्ट्रीट टॅक्ससाठी लोकं अक्षरश: शिव्या घालतात आम्हाला, इतके घाण बोलतात ना. अक्षरश: असे वाटते की, नगरसेवक पदाचा राजीनामा तेथेच द्यायला पाहिजे मी. कधी ते काम आमच्या कडुन होत नसेल तर आम्ही वारंवार त्यांना सांगतो. आपले कर्मचारी सांगतात ते ठेकेदाराचे काम आहे. ठेकेदार मटेरियल पुरवत नाही. मेढे म्हणुन असतील बोलवा त्यांना समोर बोलवा. माझ्याकडे रॅकॉर्डींग आहे सर्वांच्या. जे जे ते बोलले ना त्याच्या रॅकॉर्डींग आहे सर्वांच्या. आज आपण याच्यावर कठोर निर्णय घेतला पाहिजे आणि कार्यवाही केली पाहिजे आजच्या आज. बघु आणि त्यानुसार करु. ते चालणार नाही. यांच्यावर कार्यवाही करा. तुम्ही कठोर कार्यवाही करायला पाहिजे. ही सर्व नगरसेवकांची मागणी आहे. असे कोणीच नगरसेवक म्हणणार नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौरताई, माझ्या वार्डातला विषय आहे. प्रेम नगर मध्ये आता अमृतचे कनेक्शन देणे चालु झालेले आहे. म्हणजे खुप लेट चालु झाले ते काम. दुरदैवाने काय झाले अपार्टमेंटला कनेक्शन देत असतांना प्रत्येक फ्लॅट धारकाकडुन रु.४०००/- रु.४०००/- मागीतले जात आहे. ते कोणत्या पॉलिसीने ठरविले गेले. कोणत्या अधिकाऱ्याने ठरविले, कोणत्या बॉडीने ठरविले त्याचा खुलासा आज प्रशासनाकडुन पाहिजे. लोकांना तुम्ही म्हणता रु.४५००/- तुम्हाला मटेरियलला लागेल. घरपट्टी ॲडव्हान्स भरावी लागेल. काल एक मंदिर होते सप्तश्रंगीचे त्यांना सांगितले की, रु.४०००/- भरा. पुजारी आला की, मी जेमतेम येथे काम करत आहे. आणि मला रु.४०००/- भरावे लावले ही पॉलिसी ठरविणारा कोण आहे. याचा मला खुलासा पाहिजे. मागच्या आठवडयामध्ये आपण माझ्या प्रभागात कार्यक्रमात होते. त्या ठिकाणी आपण प्रत्येक्ष नागरीकांच्या प्रतिक्रिया बघितल्या. संतप्त प्रतिक्रिया होत्या. श्रृती अपार्टमेंट जे आहे त्याची प्रतिक्रिया काय होती. मी आयुक्त मॅडमांना भेटलो. त्या ठिकाणी महापौर आणि उपमहापौर दोघांनी सांगितले की, कार्यवाही करु. अधिकाऱ्यांच्या बाबतीत तक्रारी होत्या. आपण कार्यवाही करु असा शब्द दिला. जसे खड्ड्यांच्या बाबतीत आपण एक महिना पास केला तसेच आता ही आमचे १५-२० दिवस पास झाले. जर आपण कमिटी म्हणुन किंवा सदस्य म्हणुन कुठे कार्यवाही करत नसाल. मला वाटते लोकांपुढे उद्या आपल्याला जायला तोंड राहणार नाही. आपण कोणी २० वर्षापासुन निवडुन येत आहे. आम्ही पहिल्यांदा निवडुन आलो. लोकांचे जर कामे होत नसतील तर हे सभागृह काही कामाचे राहणार नाही. अधिकाऱ्यांकडे जाणार.अधिकारी असे वारंवार करतात. भोसले साहेबांचा एक विषय आहे. अधिकारी पदावर कामावर घेणेबाबत.

जर कामचुकारपणा होत असेल तर अधिकारी का कामावर येतात. जसे नितीनभाऊंनी सांगितले, बंटीभाऊंनी सांगितले, जितुभाऊंनी सांगितले, स्वखर्चाने जर आम्ही खड्डे बुजवतो आहे तर आम्हाला प्रशासनाची गरज नाही. जर मागच्या तीन महासभेपासुन विशालभाऊ मांडत आहे की, आम्हाला आमचा निधी द्या. आम्ही बुजवतो ना आमचे खड्डे भरून दाखवितो ना लोकप्रतिनिधी म्हणुन आम्हाला काय करता येईल. पण तुमच्या छोटयाश्या सह्यांमुळे आमचे कामे थांबतात. इतके मोठमोठे प्रश्न माझ्या प्रभागात आहे. कचरा प्रकल्प जो आहे. घनकचरा प्रकल्प, या अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे लटकलेला आहे तो विषय. आज ३० हजार लोक संख्याचा माझा प्रभाग आहे. लोकांना लहान लहान मुलांना काय काय व्याधी जळल्या असतील डॉक्टर म्हणुन मला माहिती आहे. त्या प्रश्नाला एकही अधिकारी सिरियसपणे घेत नाही. एक तिन लाखाच्या गटारीमध्ये आपण ठेकेदाराला ब्लॉक लिस्टची नोटीस देतो. आणि ३२ कोटीच्या ठेकेदाराला आपण काहीच नोटीस दिली नाही आजपर्यंत. त्याला ब्लॉक लिस्टेड केले नाही. ४२ कोटीचे कामे पडलेले आहे. एन.ओ.सी. दिल्या गेलेल्या आहेत. तरी प्रशासन जाणुन बुजुन आपल्या आतील सहकार्याशिवाय हे होत नाही. हा माझा स्पष्ट आरोप आहे जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. माझ्या प्रभागामध्ये जे रु.४०००/- आता अमृतच्या कनेक्शनसाठी मागत आहे. माझ्या कानावर भरपुर आले. त्या फ्लॅट धारकांमध्ये काही आपल्या कर्मचाऱ्यांचेच फ्लॅट आहे. त्यांनी सुध्दा ती फी भरायची तयारी केली. त्याची पॉलिसी काय. ते रु.४०००/- का घेतले जात आहे. ॲडव्हान्स घरपट्टी का घेतली जात आहे. शहरातला कोणता घरपट्टीधारक आहे ज्याची घरपट्टी बाकी आहे. आपण मार्केटला घ्यायला जात नाही. आपली ताकद होत नाही मार्केटला घ्यायला आणि घरपट्टीसाठी बिचाऱ्या ७०० स्के. फुटाच्या फ्लॅट धारकाकडे आपण छाती ठोकुन जातो की, तुला घरपट्टी भरावी लागेल. आपण काय सर्व्हीस दिली त्याला. काही सर्व्हीस आपण देऊ शकलो नाही. अमृतच्या कनेक्शनसाठी असे रस्ते खोदुन ठेवलेले आहे की, गावठी माणुस पण नाही खोदेल असे करुन ठेवलेले आहे. गाड्या फसत आहे. अमृतच्या बाबतीत मी विचारतो की, प्रशासनाने काय काय कार्यवाही केली. माझ्या प्रभागामध्ये कनेक्शन टाकण्याचे काम फक्त एकच टक्का झालेले आहे. मी बोरोले साहेबांना मागच्या एक वर्षापासुन सांगत आहे की, आपण काय केले. काही त्यांच्याकडुन उत्तर येत नाही. ५००-६०० कोटीचा एकच व्यक्ती प्रोजेक्ट बघत आहे. राजा माणुस आहे लोकांशी काही घेणे देणे नाही. माझी विनंती आहे प्रशासनाला आयुक्त मॅडम तुम्हाला सभागृहाच्या माध्यमाने, एवढया मोठया प्रोजेक्टला अजुन एक टेक्नीकल माणुस उपलब्ध झाला पाहिजे. आणि त्याच्या माध्यमाने प्रभागात काय अडचणी असतील. आता परत अमृत २.० चा तुमचा अमृतचा एक ठराव येत आहे आपला.त्यामुळे मागच्या ज्या चुका झाल्या. त्याच चुका आपण आता करणार आहे. तर आपल्या इतका ढही कोणी राहणार नाही. आपण एवढी दुरुस्ती केली पाहिजे. मागच्या अधिकाऱ्याकडुन जर चुका झालेल्या आहे तर त्यांना का चार्ज देत आहे तुम्ही आता. त्याला बाजुला काढा. ज्याची करायची दानत असेल त्याला काम द्या. मागच्या चुका परत झाल्या नको पाहिजे. आणि एवढे सन्मा.सदस्य या ठिकाणी बसले आहेत. प्रत्येक जण ज्याच्या त्याच्या वार्डात काम करत आहे. प्रत्येकाला अडीअडचणी आहेत.प्रत्येकाला समजत आहे. मग त्यांचे काही सजेशन घ्यायला तुम्हाला काही बंधने आहेत का? प्रशासनाने सजेशन घेतले का नाही पाहिजे. या मागच्या अमृत मध्ये या चुका झाल्या तर आम्ही काय दुरुस्ती केली पाहिजे. आपण आपल्या स्तरावर हुशार असाल पण तुमच्या पेक्षाही हुशार लोकं आहेत. आपल्या पेक्षाही हुशार नागरीक आहे. त्यामुळे नागरीकांचे सजेशन घ्या. लोकप्रतिनिधींचे सजेशन घ्या.मागचे जसे डुप्लीकेट डी.पी.आर. झाले. अमृतचा डुप्लीकेट डी.पी.आर. झाला. हा घनकचऱ्याचा डुप्लीकेट डी.पी.आर. झाला. कॉपी पेस्टचा कार्यक्रम कृपया प्रशासनाने करायचे नाही. प्रॅक्टीकली आहे. जवळपास सर्व सन्मा.सदस्य जे आहे आज सुशिक्षीत आहे जे या ठिकाणी बसलेले आहे. तर प्रशासनाने नागरीकांना,लोकप्रतिनिधींना वेडा बनविण्याचा कार्यक्रम करु नये. जो जो प्लॅनींग व्यवस्थीत होत असेल. त्याला व्यवस्थीत मान्यता महासभेत घेतली पाहिजे आणि नागरीकांची गैरसोई होईल अश्या पध्दतीने डी.पी.आर. बनविले गेले नको पाहिजे. महापौरताई माझे तुम्हाला प्रश्न आहे की, रु.४०००/- आपण अमृतच्या कनेक्शनला का मागत आहे. आणि घरपट्टी ॲडव्हान्स भरायला का मागत आहे. याचा खुलासा मला पाहिजे. फ्लॅट धारकांकडुन.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- त्या ठिकाणी काही अपार्टमेंट मध्ये कनेक्शन नसल्यामुळे, त्यांना दोन हफ्त्यापासुन पाणी पुरवठा काही होत नव्हता. त्या मार्गाशी संबंधीत इंजिनिअर जे आहे सुनिल तायडे, जर कोणाला पौना इंची कनेक्शन जर पाहिजे असले तर अपार्टमेंटला ६ ब्लॉक होते. त्या ठिकाणी जर तीन पौना इंची कनेक्शन पाहिजे असले तर तुम्ही त्याचा फार्म भरा. त्यानुसार रितसर त्यांचा फार्म भरुन घेतला. त्या नागरीकांकडुन त्या कनेक्शनचे ते रु.४०००/- चार्जेस आहे. ते भरल्यानंतर आपण त्यांना ते कनेक्शन देणार होते.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** जर आपण एक्सीस्टींग कनेक्शन ठेवले असेल.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- त्याच्या आधी ते सन्मा.नागरीक माझ्याकडे आले. त्यांनी सांगितले की, सर आम्हाला आर्धा इंची कनेक्शन सुध्दा चालेल. तर त्यांना सांगितले की, अपार्टमेंटचे अमृतचे जे कनेक्शन आहे ते आठ दिवसात चालु होणार आहे. तुम्हाला जर आर्धा इंची कनेक्शन पाहिजे तर आठ दिवसात तुम्हाला ते आर्धा इंची कनेक्शन देण्यात येईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** साहेब, एक निरदईपणा कशाला म्हणतो ते सांगतो तुम्हाला. तुम्ही जी जुनी पाईपलाईन आहे त्याचे कनेक्शन कट मारुन दिले. काही तरी वाटायला पाहिजे माणसाला काम करतांना लोकांना दोन्ही सप्लायचे पाणीच भेटले नाही.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- आपण प्रत्येक भागामध्ये अमृतची पाईप लाईन आणि चालु पाईप लाईन आपण दोन्ही सप्लाय रेग्युलर देत राहतो.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** झाले नाही ना ते. एक्झीस्टींग तुमचे जे घरपट्टी धारक आहे यांच्याशी तुम्ही रु.४०००/- कशासाठी मागत आहे. ते मटेरिअल लागत आहे म्हणुन.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- नाही, त्यांचे रितसर पौना इंचीचा फार्म भरलेला आहे. त्या नळ कनेक्शनसाठी ते रु.४०००/- रितसर भरायचे आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** जसे नितीनभाऊंनी प्रश्न मांडला.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- जर त्याला पौना इंची कनेक्शन पाहिजे तर.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आता त्या मक्तेदाराला नागरीक रु.४०००/- भरुन देणार आहे पण तुम्ही कनेक्शन केव्हा देणार आहे. आणि रु.९०००/- घरपट्टी ॲडव्हान्स.

**श्री.नितीन बरडे :-** नेमाडे साहेब, रु.४०००/- तुमचे आणि अभियंता फार्मवर सही करायचे रु.१०००/- आणि अभियंता फार्मवर सही करतो त्याचे रु.१०००/- हे चार जणांचे पैसे मी पाठविलेले आहे माझ्या घरातुन मुद्दाम.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांचे तुम्ही नंबर ठेवले पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** नंबर ही ठेवलेले आहे त्या लोकांनाही साक्षी ठेवलेले आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** एका फ्लॅट धारकाने रु.२४०००/- भरले दुरदैवाने त्याला पावतीही मिळालेली नाही. त्यातला एक आपला महानगरपालिकेचा कर्मचारी आहे फ्लॅट धारक, म्हणजे २५०००-२५००० भरुन जर आपण त्यांना पावती देत नसाल. तर मग काय अर्थ आहे. म्हणजे याला कुठेतरी म्हणतो ना आपण शेत कुंपन खात आहे कार्यक्रम आहे हा. तुम्ही ठरवा ना. रु.४०००/- घ्या. रु.४०००/- ची परवानगी कोणाकडुन घेतली तुम्ही. ते विषय सभागृहासमोर आणला, कुठे काय. त्याची पॉलिसी काय.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा** :- हे तर रितसर चार्जेस आहे, पौना इंची घ्याचे चार्जेस आहे हे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आपल्या मागच्या मिटींगला ठरले आहे की, फ्लॅट धारकांना इनडिव्हीजल कनेक्शन द्यायचे आहे. ठरले सगळे काही झाले. काहीच नाही आपण पैसे मागायला लागलो. आपण ॲडव्हान्स त्याना रु.९०००/- घरपट्टी भरायला लावतो आहे. पुढच्या वर्षाची. रु.४०००/- हे भरायला लावतो आहे आणि मटेरिअल काही लागेल त्याचे रु.२०००/- वेगळे लागत आहे आणि चहा पाणी वेगळी लागेल. म्हणजे किती किती तुम्ही लोकांचा जिव घ्याल. खड्डयांमध्ये जिव घेत आहे, गटारीमध्ये जिव घेत आहे. रस्त्यांमध्ये जिव घेत आहे. अमृतच्या कनेक्शनमध्ये जिव घेत आहे. काय काय कराल आणि लोकं आमचा जिव घेत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** डॉक्टर साहेबांकडुन जे ऐकले. तर आपली ड वर्ग महापालिकेला ढ वर्ग महापालिका करुन टाकायला पाहिजे. शिक्षणाचा अभाव आहे हे सगळे, ईललिट्रेट कर्मचारी ज्यांना लिहता वाचता येत नाही त्यांच्या हातात कारभार देऊन ठेवला आहे जळगांवचा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** त्यापेक्षा ग्रामपंचायत करुन टाका, ठराव करुन घ्या आणि ग्रामपंचायत करुन टाका. अधिकारी काम करत नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** रस्ते चांगले नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** खेडयागावात बघा, धरणगांव बघा, पारोळा बघा, अमळनेर बघा, त्या मॅडम होत्या. काय परिस्थिती आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अपार्टमेंटच्या कनेक्शनचा विचारा. साहेब केव्हा होतील हो हे अपार्टमेंटचे कनेक्शन.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** अपार्टमेंटच्या कनेक्शनचे काय होईल. त्यांचे पाणी थांबलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** डी.ए.पाटील ठेकेदार यांनी ते काम घेतलेले आहे. दिड महिना होऊन गेलेला आहे. त्याची यंत्रणा आणुन. काम करायला तीन वेळा आली तीन वेळा परत गेली आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्या संदर्भामध्ये जी अपार्टमेंट असेल. तेथे २५ फ्लॅट असतील. पण त्यांना तेवढेच पाणी लागत आहे. तर एक कनेक्शन काढुन द्यायचे आणि त्याच्यावरुन २५ कनेक्शन. इतके चांगले सॉल्युशन काढले त्याची अंमलबजावणी होत नाही. कुठे काम होत आहे. ओरड का आहे सगळयांच्या अपार्टमेंटची.

**मा.आयुक्त :-** विशालभाऊ ते सोल्युशन आहे. त्याला एम.जी.पी.ला तपासायला दिले आहे. ते आईटम त्याच्यामध्ये नव्हते. आता नितीनभाऊ म्हणालेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एम.जी.पी.ला काहीच येत नाही. मी तुम्हाला सांगतो काहीच येत नाही एम.जी.पी.ला. एम.जी.पी.मुळे अमृतचा सर्व सत्यानाश झालेला आहे. काही तरी निर्णय घ्या ना आपण करुन टाका.

**मा.आयुक्त :-** एम.जी.पी.शासकीय कंसल्टंट आहे आपले, आपले शासन पैसे देते त्यांना आपल्यावतीने.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ही पध्दत बदलुन टाका.

**श्री.नितीन बरडे :-** अहो मॅडम, आपली गिरणा टाकी चालु होत नाही अजुन पाण्याची लाईन चुकीच्या पध्दतीची झाली आहे तर ते अजुन त्यांच्याकडुन होत नाही. मी किती दिवस झाले सांगतो आहे त्यांना.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, सन्मा.सदस्य सन्मा.सभागृहाचा आग्रह आहे. आता नितीनभाऊंनी जो मुद्दा मांडला की, अपार्टमेंटला कनेक्शन मिळत नाही. त्याच्यामध्ये जे आईटम्स त्या टेन्डरमध्ये नव्हते. ते टेन्डरच आपण एम.जी.पी.ला मंजुर करायला दिलेले आहे. एम.जी.पी.ला काही येत नाही. आपल्या इंजिनिअर्सला काही येत नाही असे म्हटले तर कामच होणार नाही. आपल्याला त्या यंत्रणे कडुन ते काम करुन घ्यावे लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम, आता निधी येऊन किती वर्ष झाले ३ वर्ष निधीची मुदत संपली की, सौवा कोटीचा गॅप आहे त्या शिवराम नगर आणि त्याचा निधी परत गेला तर तुम्ही सौवा कोटी देणार का मनपा फंडातुन. काम नाही झाले तर तुम्ही देणार का?

**मा.आयुक्त :-** आपण आपण

**श्री.नितीन बरडे :-** आम्ही नेत्यांच्या पाठीमागे फिरुन फिरुन आणलेला निधी आहे तो. तुम्ही देणार आहे का ? सौवा लाख रुपयाचे काम देत नाही तुम्ही लवकर. ते धांडेनगरचा पुल वाहुन गेलेला आहे. येण्या-जाण्या करीता रस्ता नाही. पाच लाख रुपये चार वर्ष झाले मागत आहे. कोणता इंजिनिअर गेला का तेथे पुल बघायला. सर्व वाहुन गेलेले आहे आता.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपल्याला माहित आहे आपण दोन वेळा तेथे जाऊन आलात. आपण पुलावरचे डांबरीकरण काम करु शकतो.आमच्या वार्डात आर्धवट कामे सोडलेले आहे ठेकेदाराने. ते का करु शकत नाही. दुसरी अमृतची टेस्टींग झाली परंतु टाकीचा जो सप्लाय आहे पाणीपुरवठयाचा सप्लाय तो अजुन पर्यंत कम्पलेशन  झालेले नाही. मगाशी ज्या वेळेस जावळे साहेबांशी बोलणे झाले होते. त्यांनी १० दिवसात पाईप येतील. आणि जे कनेक्शन आहे अमृतचे टाकी वरुन ते करण्यात येतील. अजुन पर्यंत एक महिना झाला. पाईप काही आले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, गेल्या दोन तिन वर्षापासुन आपण कोविड सारख्या महामारीमध्ये आपण सगळे त्रासलो होतो. त्याच्यामध्ये कुठलेही धार्मिक उत्सव, धार्मिक कार्यक्रम असे कुठलेच झालेले नव्हते. या वर्षाला, आपल्या मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी सगळे धार्मिक उत्सव जे पण असतील. खुप मोठया प्रमाणात कुठलेही बंधन न ठेवता, ते मनवायचे, उत्सव साजरा करायचा.या पार्श्वभुमीवर गणपती स्थापनेचा १५-२० दिवसाच्या अंतरावर गणपती स्थापनेचा विषय आहे. त्याच्यानंतर तुमचा दुर्गा उत्सव आहे. त्याच्यानंतर तुमची परत दिवाळी आहे. गेल्या मागची दिवाळी आठवत असेल आपण पत्रकार परिषद घेतली होती महापौरताई. आपण सांगितले होते की, या दिवाळीनंतर जळगांव शहरातील अनेक रस्त्यांचे कामे झालेले दिसतील. ती दिवाळी गेली, आता पुढच्या सप्टेंबरमध्ये आपल्याला दिड वर्ष होतील. या महापौर पदावर विराजमान होण्यासाठी. त्या दिड वर्षामध्ये आपण रस्ते तर जाऊ द्या पण निदान खड्डयांच्या संदर्भातले काही नियोजन आज तारखेत काही झाले नाही तरी आपण पावरफुल निर्णय घेऊन आपण सांगितले पाहिजे. आपण वेळोवेळी सांगतात की, प्रशासन ऐकत नाही. अधिकारी ऐकत नाही. आपण पिठासीन अधिकारी आहात. आपण ठोस भुमिकेतुन निर्णय घेतला पाहिजे. आपल्याकडुन उत्तरांची अपेक्षा

आहे आणि खड्डयांच्या संदर्भामध्ये आज या क्षणाला ठोस भुमिकेतला काही निर्णय आम्हाला सांगितला पाहिजे. निर्णय झालाच पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** १५ ऑगष्टच्या आधी खड्डे बुजले गेलेच पाहिजे. आपले कार्यक्रम आहे. आपल्या मिरवणुका आहे. देशाचा अमृत महोत्सव आपण साजरा करणार आहे. नाही ठेकेदार यापुर्वी डिपार्टमेंटचे लोक घेऊन सुध्दा आपण कामे केलेले आहे. आपण डांबरी रस्ते खड्डे डिपार्टमेंटली केलेले आहे. डिपार्टमेंटने खड्डे बुजणे. कशाला ठेकेदाराला हे करायचे. उद्या सगळे साहित्य मागवा, सगळे ट्रॅक्टर, यंत्रणा आहे आपल्याकडे मशिनरी आहे सगळी.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर मॅडम.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट खड्डयांचा विषय पुर्ण होऊ द्या.

**मा.महापौर :-** खड्डयांचाच विषय असेल ना याच्या व्यतिरिक्त काय असेल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अमृतचा विषय आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अमृत महोत्सव आहे. अमृत महोत्सवामध्ये आपल्याला खड्डे बुजवण्याचे कार्यक्रम करायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सगळया नगरसेवकांचा प्रश्न एकच आहे. कामे व्हायला पाहिजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, आपण खड्डयांच्या संदर्भात नियोजन करावे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** प्रशासन असे ढिम्म झालेला आहे. निर्लज्ज सदा सुखी. आपण काही बोला त्यांना काही फरक पडणार नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** इबा भाई, तुमच्या वार्डात खड्डे नाही का ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** भयानक आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आज काही ठोस निर्णय देणार आहे.

**मा.महापौर :-** ह्या तिव्र असे आपल्या भावना प्रशासनापर्यंतही मला वाटते पोहचल्या असतील. त्यामुळे मला वाटते याचे उत्तर प्रशासनानेच सांगावे त्यानंतर मी डायरेक्ट निर्णय घेणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अत्यंत गंभिर विषय आहे. यात काही दुमत नाही. सदस्यांच्या भावना ज्या आहे अतितिव्र आहे त्याबद्दल दुमत नाही. परंतु काय की, खड्डे महानगरपालिकेने आपल्या स्तरावर बुजविण्याचा जर निर्णय घेतला, आपण मुरुम आणि खडीने ते खड्डे बुजविण्याचे निर्देश दिलेले आहे. आज खड्डा बुजविला उद्या पासुन आला, पुन्हा परिस्थिती जैसे थे वैसे. याचा एकमात्र सोल्युशन असे आहे की, साधारणता ४२ कोटीचे कार्यादेश आपण दिलेले आहे. त्या व्यतिरिक्त अजुन जवळपास २०-३० कोटीचे कार्यादेश मक्तेदाराच्या हातामध्ये पडलेले आहे. संपुर्ण ४२ कोटी आणि उर्वरित जे काही कार्यादेश असतील.त्या सगळे कार्यादेशांचा एकत्रीकरण करुन त्या मक्तेदारांसोबत मिटींग करणे. आणि त्यांना सख्त पध्दतीने सुचना द्याव्यात. मी म्हणतो निम्मे शहराचे प्रॅाब्लम त्याच्यातुन सॉल होवुन जातील. ज्याच्या वरती महानगरपालिकेला अतिरिक्त खर्च सुध्दा करावा लागणार नाही. फक्त मक्तेदारांकडुन सख्तीने कामे करुन घेणे. ही याबाबतीत एक महत्वाची सुचना या निमित्ताने मी करु ईच्छितो. नाही तर काय होईल. सदस्यांच्या भावना त्यांच्या जागी योग्य आहे. नागरीकांचे हाल होत आहे ते ही योग्य आहे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर त्या मक्तेदारांना पाऊसाळयानंतर सुध्दा ते कामे करायचे आहे. परंतु पॉटहोल फिलींगचे जे कामे आहे. त्याच्यामध्ये मुरुम भरणे, खडी भरणे किंवा तात्पुर्ते त्या खड्डयांचे पॅटहोल फिलींग करणे. ही जबाबदारी तशी त्या कार्यादेशामध्ये त्या मक्तेदारावरतीच असते.फक्त त्या मक्तेदाराकडुन सख्तीने काम करुन घेणे हे अत्यंत गरजेचे आहे. आणि त्या संदर्भात त्या मक्तेदाराला अत्यंत कडक अशी सुचना देणे गरजेचे आहे की, जेणे करुन त्या मक्तेदाराने काम सुरु नाही केले. तर निश्चितपणे त्या मक्तेदारांचे कार्यादेश रद्द करणे किंवा त्या मक्तेदारांना काळया यादीत टाकणे या संदर्भात काही तरी कडक धोरण आपल्याला अवलंबल्या शिवाय या विषयाचा मार्ग निघणार नाही. कारण याच्यावरती चर्चा सातत्याने होत असते. सातत्याने आपण याच्यावर महानगरपालिकेचा पैसाही खर्च करतो. जसे अश्विनभाऊंनी सांगितले की, आज तुम्ही मुरुमाने खड्डे बुजले, उद्या पाऊस पडला ते वाया जाणार आहे. १००% आपल्याकडे मुळात निधीची कमतरता आणि अश्या पध्दतीने त्या निधीचा विनियोग होत असेल. तर मला वाटते महानगरपालिकेचा आर्थिक बोझाही वाढत जाईल आणि जे कार्यादेश आपण दिलेले आहे. ते कामे जर आपण विहित वेळेमध्ये मार्गी लागले तर निश्चितपणे नागरिकांना मोठया प्रमाणावरती दिलासा मिळु शकेल. मला वाटते आज आपली सभा झाल्यानंतर मा.आयुक्त महोदयांनी या संदर्भात तात्काळ एक मिटींग घ्यावी. जितके मक्तेदार असतील किंवा जी काही वर्क ऑर्डर्स असतील. बांधकाम विभागाकडुन संपुर्ण मक्तेदारांची आणि त्यांना

दिलेल्या कार्यादेशाची सुची आपण डोळयासमोर ठेवा. त्यांना तात्काळ बोलवा आणि तात्काळ हे सर्व कामे सुरु करण्याचे सक्त आदेश द्यावे. हाच एकमात्र सोल्युशन याप्रसंगी मला आता दिसत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, प्रशासनाची कामगिरी काही दिसुन येत नाही. आम्ही ऐवढया पोटतिडकीने मांडतो. माझ्या वार्डात बांभोरीचा एक पार्ट आहे. तेथे पाण्याची टाकी झालेली आहे अमृतची. आमच्यावार्डात टेस्टींग सुरु आहे. म्हणजे ते पाणी न घेता उल्टे लोकांकडुन पाणी सप्लाय करुन टेस्टींग करण्यात येत आहे. तेथे मगाशी आपण, महापौरांनी एम.ई.सी.बी.ला पत्र दिले, पाईप लाईनवर यांनी डी.पी. टाकलेली आहे. जो पर्यंत ती डी.पी. बाजुला होणार नाही तोपर्यंत माझ्या वार्डाची आखरी टेस्टींग होणार नाही. आम्ही मेहनत करुन वार्डात निधी आणतो इकडुन तिकडुन महापालिका रु.१/- देत नाही. अजुन सुध्दा जर कामे होत नसतील. आम्ही कोणाकडे मांडावे. एवढेसे काम आहे ते होत नाही. लेटर देऊन सुध्दा उडवा उडवीचे जबाब मिळत आहे. एम.ई.सी.बी.वाले सांगतात की, खर्च कोण करणार. मग काय नगरसेवक खिश्यातुन करणार आहे. का? तुमच्यामध्ये काही गांभिर्यच नाही. आम्ही फक्त मांडुन देतो, उडवा उडवीचे उत्तर मिळाले झाले समाधान, काम कुठे होणार अजुन तिसऱ्यांदा हा विषय मी मांडत आहे. महापौरांनी तसे लेटर पण दिलेले आहे. आपण त्यांना पत्र दिलेले आहे. त्यांना बोलवा, का होत नाही आमचे कामे. त्यांच्यामुळे एक फक्त डी.पी.साठी १० फुटाचे, तर आमचे कामे केव्हा होतील.

**श्री.जितेंद्र मराठे :-** इबाभाई एक मिनीट, माझ्या प्रश्नाचे उत्तर नाही मिळालेले आहे मला, ते घेवु द्या. महापौरताई आपण काहीतरी नियोजन करा या रस्त्यांच्या खड्डे संदर्भात.

**मा.महापौर :-** काही ठिकाणचे मंजुर झालेले आहे. हे आपल्याला सुध्दा मान्य आहे. फक्त मंजुर झाले असुन वर्कऑर्डर सुध्दा देण्यात आलेली आहे. परंतु तेथील काम सुरु झालेले नाही. प्रशासनाने ज्या ज्या रस्त्यांची वर्कऑर्डर देऊन झालेली आहे परंतु काम सुरु झालेले नाही. त्याची एक लिस्ट बनवावी. ठेकेदारांची सुध्दा मिटींग घ्यावी आणि ते रस्ते का सुरु झाले नाही. याबाबतचा सगळा अहवाल सादर करावा. ज्या ठिकाणी हे रस्ते मंजुर झालेले नाही. परंतु त्या ठिकाणची डागडुगी करणे हे आवश्यक आहे. तर मनपा फंडातुन ते करण्यात यावे की, कशी तुम्ही हे डायरेक्ट इनहाऊस करु शकतात. आणि त्यासाठी जर आपल्याकडे वाहने नाही. तर मी मागच्या वेळेला गोसावी साहेबांना सांगितले होते की, काही वाहने जी आहे. ते भाडयाने लावा. जर आपल्याकडे दोन जे.सी.बी. दोन डंपर असेल तर एवढया पुर्ण जळगांव शहरासाठी आपल्याला अव्हेलेबल होत नाही वेळेवर.तर तुम्ही वाहनांचा सुध्दा भाडयाच्या तत्वावर लावण्याचे काही करता येत असेल तर ती प्रोसिजर करा. आणि इनहाऊस मध्ये ते आपल्याला खर्च करावे लागणार आहे. बऱ्याच वेळेला असे होते की, आपण माटी टाकायची, कस टाकायचा, पण लगेच ते पाऊस पडला की, ते वाहुन जातात. पण आपल्याला हे सर्व गोष्टी सहन करावे लागतात. वृत्तपत्रात जरी बातम्या आल्या तर आपल्याला सहन करावे लागेल. परंतु आता जर पाऊस येत नसेल तर इमलशनचा वापर करुन आपण ते खड्डे बुजवले पाहिजे. तर या संदर्भात पुर्ण चारही प्रभागांमध्ये आपण कश्या पध्दतीचे टेन्डर काढु शकतो. शॉर्टटर्म टेन्डर.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ताई ताई, एक मिनीट, आपण एक महिना वेळ घेतला ताई. आपल्या आक्रमक भुमिकेला पाहुन आम्हाला असे वाटले की, या जळगांव शहरातले बऱ्यापैकी खड्डे बुजविले जातील.पण असे काहीच झाले नाही. एक महिना उलटुन गेला. परंतु ई-टेन्डरकडे जाऊ नका.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** डिपार्टमेंटली करा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** दिवाळी येऊन जाईल, उपयोग नाही.

**मा.उपमहापौर :-** नाही ज्या ठिकाणी आपल्याला इनहाऊस मधुन खड्डे बुजुन घेण्यात येईल आपण त्याठिकाणी आपण इनहाऊस मधुन खड्डे बुजुन घेवु. जर आपण आपल्याकडची यंत्रणा पाहिली तर खुप तोडकी यंत्रणा आहे. ज्या ठिकाणी प्राथमिकता आहे, आपल्याला काम करुन घ्यायचे आहे इनहाऊस मधुन करुन घेऊ आणि ज्या ठिकाणी आपल्याला काम जास्तीचे असेल व्याप असेल त्याठिकाणी आपण त्याची टेन्डर प्रोसेस करु. शॉर्ट टेन्डर प्रोसेस करु.

**श्री.धीरज सोनवणे :-** तोडकी यंत्रणेच्या नावावर आपण असे किती वर्ष लोकांना हे करणार आहे की, आपल्याकडे यंत्रणा नाही, आपल्याकडे कनटेनर नाही, आमच्याकडे कर्मचारी नाही. आपल्याला काही तरी करावे लागेलच ना.

**मा.उपमहापौर :-** जरी आपण हे सगळं बोलत असतो, परिस्थिती जी आहे तिच आहे. सद्या परिस्थिती लपविता येणार नाही. सद्या परिस्थिती तिच आहे. आपल्याकडे जी यंत्रणा आहे. त्या असलेली यंत्रणेतुन आपण.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक महिना झाला ना.

**मा.उपमहापौर :-** १००% जो त्रास तुम्हाला होत आहे तो सर्व सदस्यांना आहे. आपण शहरातली आजची परिस्थिती जर पाहिली आपण. अमृत ड्रेनेज आणि भुयारी गटार या दोन योजना आहेत.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपण अधिकाऱ्यांना सांगुन ठोस भुमिका घ्या ना. आपण टेन्डर का काढायला लावत आहे परत परत.

**श्री.धीरज सोनवणे :-** जो त्रास अधिकाऱ्यांकडुन तुम्हाला आहे तोच त्रास तुम्हाला पण आहे.

**मा.उपमहापौर :-** तुमचे म्हणणे बरोबर आहे त्यात काही शंका नाही. परंतु आपल्याला इनहाऊस एकाच वेळी सगळे नाही करता येणार. इनहाऊस जे कामे सुरु करता येतील ते इनहाऊस सुरु करु आणि आपल्याला इनहाऊसपेक्षा जर जास्तीचे काम असेल. आणि आपल्याला यंत्रणा तोडकीही पडत असेल तर नियोजन करावचं लागणार आहे ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जे काही करता येईल ते करा पण १५ ऑगस्टच्या आधी सगळे खड्डे भरा.

**श्री.धीरज सोनवणे :-** इमलशनने खड्डे भरा.

**श्री.सुनिल महाजन :-** यांनी सांगितले ना १५ ऑगस्ट पर्यंत, आयुक्त साहेबांनी ते डिक्लेअर करायचे की, १५ ऑगस्ट पर्यंत मॅक्सीमम रस्त्यांची डागडुगी आम्ही करु म्हणजे हा विषय परत येणार नाही. आणि खरोखर तसे करायला पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विरोधीपक्ष नेत्यांचे अभिनंदन आज बरोबर बोलले ते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आज आम्हाला सापडले जळगांव शहरात.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही नाही. महापौरांसाठी थांबुन गेले ते.

**मा.महापौर :-** आप्पा, माझी भुमिकाही आक्रमकच असते. मला ही जळगांव शहरांच्या खड्डयांची काळजी जशी नगरसेवकांना आहे तशी मला सुध्दा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोधीपक्ष नेत्यांना पण आहे.

**मा.महापौर :-** नगरसेवकांमध्येच विरोधीपक्ष नेता पण येतात.

**श्री.धीरज सोनवणे :-** पण कामे होत नाही ना ताई, कामे दिसत नाही.

**मा.महापौर :-** बोला ताई, सांगा.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर, सर्व सन्मा.सभागृह मागच्या वेळेस जेव्हा हा विषय जनरल बॉडीमध्ये चर्चेला आला होता. त्यानंतर सुध्दा आपण प्लॅनींग केलेले होते. मागचे जे वेन्डर आहे त्यांच्याशी कॉन्टेटी टेन्डर केलेले होते रिस्पॅन्स नाही आला आपल्याला सगळयांना माहित आहे. मागचे जे मक्तेदार होते त्यांचे हे म्हणणे होते की, त्यांना पेमेंट मिळेल की नाही. या पेमेंटची शाश्वती देऊन आपण जवळपास ६६ रस्त्यांच्या त्याला वर्कऑर्डर दिलेल्या आहे. जवळपास त्यातील २० ते २५ रस्त्यांवर त्यांचे कामे देखील सुरु झालेले आहे. डिपार्टमेंटल आजही आपले ट्रॅक्टरने आपले लेबर लावुन बांधकामचे पुर्णचे पुर्ण आपले लेबर फक्त खड्डे बुजवण्यावर आहे. नितीनभाऊंनी जसे सांगितले की, आपण दाबतो आणि नंतर पुन्हा पाऊस येतो.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट मॅडम, एक मिनीट,

**मा.आयुक्त :-** एकदा पुर्ण होऊ द्या आता पुर्ण होऊ द्या. त्याच्यामध्ये गिरगावकर साहेबांनी असे केले होते की, त्याच्यावर आधी मटेरीअल टाकायचे, मुरुम टाकायचे त्याच्या शिवाय.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हे सगळे खोटे वाटते, फक्त कागदावर नाही,

**मा.उपमहापौर :-** बोलणे पुर्ण होऊ द्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** त्याच्याशी संबंधीत इंजिनिअरला येथे बोलवा आणि त्यांच्या समोर सांगा आम्हाला.

**श्री.सुनिल महाजन :-** पुर्ण बोलु द्या त्यांना.

**मा.आयुक्त :-** संबंधीत जे.ई.ना आपण येथे बोलविले आहे. संबंधीत जे.ई.येत आहे येथे. त्या वर्कऑर्डरच्या कॉपीस देखील माझ्याकडे आहे. जेव्हा आपण हा निर्णय घेतला होता की, अगोदर मटेरिअल टाकायचे मग मुरुम टाकायचे, आणि रुटीन करुन घ्यायचा, पाऊस झाल्याच्यानंतर तो मुरुम वाहुन गेला अश्याही तक्रारी आल्या की, त्या मटेरिअल वरुन मोटरसायकली घसरत आहे. म्हणुन आपल्याला पुन्हा त्याच्या बाबतीत विचार करावा लागेल. मुरुमाच्या सहाय्याने आपल्याला ३ महिने मुरुम टाकले, खुप जपुन केले. राहिला विषय पाऊस आल्यानंतर तो वाहुन जातो, आपल्या सगळयांना माहित आहे. त्याची माती होऊन जाते. जसे नितीनभाऊंनी सांगितले की, मुरुमाच्या साहयाने जर

आपण खड्डे बुजविण्यावर पैसे वेस्ट करणार आहे तर हे नक्की पाण्यातच जाणार आहे. त्यामुळे खुप मेजर जेथे आहे की, नागरीकांना चालताच येवु शकत नाही. तेथे आपण खड्डे बुजवण्याचे करतो आहे. ६६ कामांच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत. ३९ रस्ते जे आपले ४२ कोटी मध्ये आहेत. त्यासाठी भाऊ आपण ४ तारखेला इंजिनिअर्सची, पी.डब्ल्यु.डी.ची बैठक घेतली होती. अ च्या त्यांना एन.ओ.सी. दिलेल्या आहे. क च्या सुध्दा त्यांना रस्ते बुजुन घेण्याचे तातडीने सांगितलेले आहे. पुन्हा आपण एक रिपोर्ट आपण पी.डब्ल्यु.डी.ला देऊ या. जर यांनी केले नाही तर त्यांना आम्ही ब्लॅकलिस्ट करायचे विचार करु म्हणुन. उरला आता जो रस्ता आता बेंडाळेताईंनी दाखविला. सन २०१८-१९,२०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ पर्यंत या ४ वर्षामध्ये आपण जे रस्ते डी.पी.डी.सी.मधुन केलेले आहेत. परंतु तक्रारी येत आहे की, खराब आहे. त्याची सुध्दा चौकशी समिती लावलेली आहे. त्याच्या डी.एम.पी. पिरिऐड मधुन आपण ते करून घेणार आहे. डी.एम.पी.पिरिऐड नसला तर आपण त्यांना दंड लावु. परंतु त्यांच्याकडुन आपण ते काम करून घेऊ. यानंतर उरला पाण्याचा कनेक्शनचा जास्तीचा निधी जात आहे असे आपले सगळयांचे, काही लोकांचे आरोप होते. सन्मा.सदस्यांचे आरोप होते. मी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करेल की, कृपया ज्याची पावती मिळणार नाही. त्यांनी कृपया कोणीही एक रुपया देऊ नका. देत असाल तर तसा मला फोन करून सांगा त्याची प्रत्यक्ष स्वत: तपासणी करेल. कोणत्याही कर्मचाऱ्याची चुक पाठीशी घातली जाणार नाही. कर्मचारी जेव्हा तो दोषी असेल तेव्हा त्याच्यावर तातडीने कार्यवाही करेल. अशी प्रशासनाच्या वतीने ग्वाही देते.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मॅडम, नागरीक पण करु शकतात आपल्याला फोन.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांनी सांगावे, मला फोन करु शकता, माझा फोन नंबर सगळयांकडे आहे.

**श्री.अनंत जोशी :-** नागरीक फक्त १००० - २००० रुपयांसाठी तुमच्यापर्यंत येणार नाही. कसे येतील. त्यांना कनेक्शन घ्यायचे पडलेली असते.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई.

**मा.आयुक्त :-** सर, तक्रार येणार नाही तर मला चौकशी कशी करता येईल. किमान सन्मा.सदस्य मला सांगु शकतात. जसे आता नितीनभाऊंनी सांगितले. मी रिप्लाय करते त्या तक्रारला.

**श्री.अनंत जोशी :-** अशी ताकीद आपल्या लोकांना द्या ना आपण की, असे माझ्या कानावर आलेले आहे. असे होता कामा नये. मी मगाशी बोललो. एकच सेकंद फक्त, मागच्या मिटींगमध्ये पण आपण भुमिका मांडली होती. आज देखील फार पॉझिटीव्ह घेतले सगळेच लोकांनी पण माझी एक विनंती आहे की, आपण एक दोन लोकांना घरी बसविल्या शिवाय हे लोकं जागेवर येणार नाही. आपण एक दोन लोकांना घरी बसवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम, बोललेले होते ना की, मी देतो पुरावा कायद्याने. संगमकुमार प्रमोद झा, दि.२२/०४/२०२२ ला पावती फाडलेली आहे. आपल्या युनिटला सॉरी, प्रभाग समितीला, त्यानंतर ते आपल्या युनिटला आले पांझरापोळ टाकीच्या, तेथे काय काळे, संजु काळे, तेथुन त्यांनी मंजुर खानकडे पाठविले कारण कोल्हे साहेबांना तेथुन काढुन टाकले तर तो चार्ज आता मंजुर खानकडे आहे. आता दि.२२/०४/२०२२ पासुन किती दिवस लागायला पाहिजे मॅडम कनेक्शन द्यायला, पावती फाडलेली आहे त्यांनी रेग्युलर, किती दिवसात व्हायला पाहिजे हे.

**मा.आयुक्त :-** नेमाडे साहेब, प्रोसिजर सांगा, पावती फाडल्यानंतर काय काय प्रोसिजर असते ती सांगा.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** साधारणता पावती फाडल्यानंतर त्यांना १५ दिवसात कनेक्शन दिले पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** १५ दिवसही जास्त सांगत आहे तुम्ही म्हणता आहे या कामाला सरसकट १५ दिवस चला ॲग्री.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** हो.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुर्ण पैसे भरल्यानंतरही त्याला दिले कनेक्शन त्यांनी दि.३०/०७/२०२२ ला. म्हणजे ३ महिने ५ दिवस. म्हणजे ३ महिने त्यानी भरलेल्या पैश्यांचे पाणीच भेटले नाही त्याला. आता का नाही भेटले, हे जे सगळे येथे ओरडत आहे ना की, कनेक्शनचे पैसे मागतात. तोच प्रकार आहे मॅडम, मी सकाळी तेथे जाऊन आलो. मजुरांचे काम लावतात ना ते रजिष्टर तपासुन आलो की, याची पावती कशी लिहीत आहे. त्यानी माझ्याकडे तक्रार केली. खेडी रोडला राहतो तो बिचारा, त्यानी माझ्याकडे तक्रार केली, मी सकाळी पाहिले, त्याची पावती पाहिली आणि हा खरं बोलतो आहे की नाही चेक केले तर दि.३०/०७/२०२२ तेथुन लोकं गेलेले आहे काम करायला. मुकादमशी विचारणा केली, हे कसे ? म्हणे आम्हाला इंजिनिअर सांगतात तेव्हा आम्ही करतो. दि.३०/०७/२०२२ ला

मॅडम, आता तुम्ही याच्यावर काय कार्यवाही करतात मी आता पाहतो, तुम्ही आता आम्हाला शब्द दिलेला आहे. त्यानी पैसे भरलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** आप्पा कोणता वार्ड, कोणत्या प्रभागातले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** खेडी रोड, मी नांव सांगितले, संजु काळेचा वार्ड आहे ना. आता लक्षात आले सगळे, नेमाडेंच्या लक्षात येऊन गेले सगळे. तुम्ही मला आता फक्त हे सांगा, ३ महिन्याचे पैसे परत देणार का? पुर्ण पैसे भरले, ३ महिन्यानंतर काहीच भेटले नाही त्याला. सांगितले त्यांनी मला काही तरी रु.६०/- सांगितले त्यानी, त्यानीच सांगितले की, रु.५००/- द्यायला पाहिजे कमीत कमी. आणि पैसे पण फार कमी मागीतले होते त्याला. कमी पैसे जरी दिले त्यांनी रु.२००/- मागीतलेले आहे. म्हणजे यांचे कृत्य इतक्या खालच्या स्तरावर आलेल्या आहे की, हे ५-५० रुपये पण सोडत नाही. रु.२००/- तो माणुस देऊ शकला नाही. मला रु.२००/- द्यायचे नाही. त्याचे रु.५००/- आपण बुडविलेले आहे. त्याला रु.५००/- परत करणार आहे का आपण ? करायला पाहिजे प्रशासनाने. हे पहा, त्याची चुक आहे का ? तुम्ही जास्त दिवस त्याच्याकडे बिल जर पेंडींग राहिला तर आपण व्याज लावतो मॅडम लावतो की नाही आपण व्याज, मी मागेही बोललो आहे या सभागृहात, समान्य नागरीकाला त्रास व्हायला नाही पाहिजे. ते जे सामान्य लोकांना त्रास झाला, जैन समाजाला, त्याच्यासाठी आपण येथे मिटींगमध्ये धोरण ठरविले, ते लोकं खुश झाले. त्यांच्यासाठी पण तुम्ही काही डिसिजन घ्या मॅडम. त्याला जर घरी जाऊन रु.५००/- परत दिले ना तर आपल्या महानगरपालिकेला आदर्श महानगरपालिका मानेल तो.

**मा.आयुक्त :-** आप्पांनी जो प्रश्न मांडला, त्या प्रकरणाची मी चौकशी करते, परंतु कर्मचाऱ्यांमध्ये आपण जे बघतो आहोत की, एक एक शिस्त लावण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. एक आता ड्रेसकोड झाला, बायोमेट्रीक सुरु केलेले आहे. तसा तो जॉब कार्ड असतो आणि एस.ओ.पी. असतो, Standard operating procedures प्रत्येक काम करण्याची एक पध्दत असते. त्याला दिवस घालुन दिलेले असतात. ते आपण तयार करुन डिसप्ले करु. त्यानंतर जर त्यांनी डिले केला तर नक्कीच त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही आपल्याला करता येईल. तर या दोन गोष्टी आपण पुढच्या एका महिन्यामध्ये आपण इमप्लीमेंट करु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दिड पौनेदोन तासापासुन रस्ते खड्डे लाईट, या संदर्भात सर्व अमृत योजनेचे कनेक्शन, सर्व सन्मा.नगरसेवकांचे आणि नागरीकांचे प्रश्न या ठिकाणी उपस्थित होते. माझे छोटेसे सजेशन आहे, सुचना आहे. तर ते आपल्याला करता आली तर बघा की, ज्या प्रमाणे दिव्यमराठीने रूबेरू चा एक कार्यक्रम सुरु केलेला आहे. जनता, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी. तर माझे असे सजेशन आहे. तर आपण पण तसा एक प्रयोग महापालिकेत करू. आता जसे सन्मा.बंटीभाऊंनी सांगितले की, येथे जे.ई. पाहिजे. तर एक रूबेरूचा कार्यक्रम नगरसेवक त्या डिपार्टमेंटचे सर्व अधिकारी, सन्मा. महापौर, आयुक्त या सगळयांनी एक एक प्रभागाचे एका दिवसात दोन दोन तीन तीन किंवा प्रभाग समिती निहाय एक रूबेरू कार्यक्रम होऊन जाऊ द्या.

**श्री.अनंत जोशी :-** त्याचा उपयोग काय ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** काम तर होईल ना. आता तुम्ही जे जे.ई.ला बोलवायला सांगितले, महापौर असतील आयुक्त असतील, सर्व अधिकारी असतील, छोटी महासभा ज्याला आपण म्हणु.एक कायम करु की, तुमच्या समस्या किती दिवसात सोडवतील. मी फक्त सुचना केली सदस्यांना.

**श्री.मनोज चौधरी :-** समस्या जर नागरीक मांडतील तर आमचे नगरसेवकांचे काय काम राहिल. डॉक्टर साहेब उठा दोन मिनीट, आम्ही जे काही कामे केलेले आहे ते पेपरात डिक्लेअर झालेले आहे. पेपरात डिक्लेअर करा ना की, नगरसेवकांनी हे हे कामे केलेले आहे वार्डात, आम्ही ३.७५ कोटीचे वार्डात कामे केलेले आहे. ते मांडले नाही. आणि फक्त नागरीकांची भावना आणि आपल्या जळगांव शहरातला आमचा प्रभाग क्र.८ एवढा वाढलेला आहे की, १५ कोटी रुपये आमच्या वार्डात दिले तरी कमी पडतील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नागरीकांचे खुप प्रश्न आहे. तेथे रस्तेवाल्यांना बोलवा तेथे, अमृतवाल्यांना बोलवा तेथे, स्वच्छतेवाल्यांना बोलवा तेथे, सर्व एच.ओ.डी. सर्व त्या प्रभागातील इंजिनिअर असतील. सर्व डिपार्टमेंटचे अधिकारी बोलवा.

**श्री.सुनिल महाजन :-** प्रभाग समिती निहाय करु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रभाग समिती निहाय करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, आता आपण विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**श्रीमती सरिता नेरकर :-** नितीनभाऊ दोन मिनीट, महापौरताई, गेल्या तिन महिने झाले माझ्या प्रभाग क्र.१ महावीर नगर मध्ये इन्ट्रीलाच एक खड्डा आहे. आपल्या महापालिकेच्या अमृत योजनेचा, मी तुम्हाला फोटो पण टाकेल. सुनिल तायडेंना किती वेळा फोन पण केले. अजुन सुध्दा तो बंद होत नाही. अक्षरशा त्यात घान पाणी जात आहे. त्याचे काय करायचे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तो रस्ता ४२ कोटीत आहे.

**श्रीमती सरिता नेरकर :-** आणि बरं तेथे त्या दिवशी बाळ खेळत होता तो पडला, ते काढले, त्याचे व्हिडीओ पण देईल मी. त्या दिवशी पण कळविले होते मी तुम्हाला. स्वत: फोन केला, तुम्ही आम्हाला विनंती करता पण मी तुम्हाला विनंती करते की, आता काय करायचे.

**श्री.सुनिल महाजन :-** सुनिल तायडे यांच्या संदर्भात वारंवार तक्रारी आहे मॅडम आणि सर्वांच्याच आहे. त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्याचा तुम्ही डिसीजन घ्या. नाही तर पुन्हा पुढच्या महासभेला हेच विषय येईल.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मी जशी निवडुन आली तेव्हापासुन मला सुनिल तायडे पासुन खुप त्रास आहे.

**मा.आयुक्त :-** सर्व इंजिनिअर्सची मिटींग घेऊ आता.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्यांचे कामात लक्ष नाही.

**श्रीमती सरिता नेरकर :-** बिल्कुल नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** खुप नवाजलेले आहे. माझ्या मागे खुप मोठे काम आहे. पुर्ण महानगरपालिकेतले महाराष्ट्राचे जिवन प्राधिकरण मी एकटा सांभाळतो आहे. अश्या त्यांच्या विरुध्द नागरीकांच्या पैसे घेतल्याचे तक्रारी आहेत. आयुक्त ऑफिसला ते अर्ज आजही पेंडींग पडलेले आहे. कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. कोणावर तरी कार्यवाही झाली पाहिजे. ती कार्यवाही झाली तर रिजल्ट मिळतील.नाही तर हे असेच चालु राहणार.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सहा महिन्यापासुन तो खड्डा पडलेला आहे तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ, नितीनभाऊ, आपण म्हणतात की, बरीच चर्चा झाली आता अजंडयावरील विषय घेऊ. पण मी १०-१५ मिनीटासाठी विनंती करतो. आपण जे.ई.ना बोलावायचे सांगितले होते. सगळे जे.ई. आलेले आहे येथे.

**मा.महापौर :-** आलेले आहेत.

**श्री.अनंत जोशी :-** माझी सभागृहाला, महापौरताईंना आणि आयुक्त मॅडमांना विंनती आहे. त्यांच्याकडे जे ही युनिट दिलेले असतील प्रभाग दिलेले असतील, त्यांना याठिकाणी डाईसवर बोलवायचे. आणि कधी करणार आहे. माझ्या एरियामधील जे जे.ई.आहे त्यांना मी दोन ठिकाणचे खड्डे भरायला सांगितले आहे. ते मी १५-२० दिवसांपासुन सांगत आहे. माझ्या वार्डाचे मी सांगुन ठेवलेले आहे. सगळया रस्त्यांवरच खड्डे आहे. ज्या ठिकाणी जास्त त्रास आहे तेथे आम्ही सांगतो. त्याची जर दखल घेतली जात नाही. तर हे वाईट आहे. खड्डयांबद्दल बोलवा आणि याच्यानंतर प्रत्येक महासभेत जे.ई.ना ही बोलवायचे कारण की, ते येथे समोर उत्तर देतील. ते बांधील राहतील त्या गोष्टीला. आपण त्यांना येथे बोलवुन ज्या ज्या समस्या आहे. १५-२० मिनीट जातील भाऊ माझी ही विनंती आहे. आपण त्यांना बोलविले आहे तर त्यांना येथे समोर बोलवा.

**श्री.नितीन बरडे :-** बोलवा बोलवा.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषय सुरु करावे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १**) दि.०७/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०७/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सुट देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट, या मध्ये एक असे आहे की, महिलांसाठी जी ५% सुट आपण या वर्षापासुन सुरु केलेली होती. तर आपला अमृत महोत्सव सुरु आहे. आजादी का अमृत महोत्सव. तर १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट पर्यंत १०% सुट आणि परत महिलांसाठी ५% सुट ही करण्यात यावी. अशी माझी सभागृहाला विनंती आहे. परत १०% काही लोकांचे भरण्याचे बाकी आहे. म्हणजे ९०% लोकांनी भरलेले आहे. एक विनंती होती सभागृहाला, १५ दिवस वाढुन द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्यांनी भरलेले आहे त्यांना पुन्हा याच्या संदर्भात तफावत होतील. पुन्हा त्यांना तुम्ही जे नियम ३० ऑगस्टपर्यंत लागु करायचे म्हणतात. तर पुन्हा अकाऊंटींगला प्रॉब्लेम येईल. तर त्याच्यामुळे तसे करणे योग्य होणार नाही. असे मला वाटते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, अध्यक्ष महोदया,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** १५ च दिवस फक्त.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले आहे ऑलरेडी आपण दोन वेळा मुदतवाढ दिलेली आहे. आणि अश्या पध्दतीने वारंवार मुदतवाढ देत गेलो ना, तर सामान्य नागरीक मनामध्ये तोच एक संभ्रम असतो कायम. आणि मग वेळे अभावी कोणीच भरायला तयार होत नाही. प्रत्येकाला वाटते की, लिमीट याची एक्सटेंड होईल आणि ते एक्सटेंड झाल्यानंतर आपण भरु. तर त्याच्यातुन एक चुकीचा मॅसेज जाईल तो. कारण आपण दोन वेळा मुदतवाढ दिली. आणि बऱ्याच पैकी त्याच्यातुन आपल्याला प्रतिसाद ही मिळालेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काही नागरीकांची मागणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बघा ताई, तुम्ही पुर्ण वर्षभर ही ठेवले ना. तरी सुध्दा त्यांची मागील बाकी असते. ते वेळेवरती येताच नाही भरायला. जे पंक्चुअल लोकं आहे. त्यांनी वेळेवर भरलेले आहे. मला वाटते असा चुकीचा पायंडा पाडण्यात येऊ नये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या बद्दल अजुन एक विषय आहे. असे म्हटलेले होते. आता काही ठिकाणी टेक्नीकल अडचणी अश्या आलेल्या आहे. काही प्रॉपर्टी ही घराच्या बघिणींच्या नावावर आहे. सोबतच घराच्या पुरुषाचा सुध्दा नांव आहे. मग तो पती असेल, भाऊ असेल, मुलगा असेल. असे नाव टाकलेले आहे आणि अश्या ज्या केसेस आहे. त्यांनाही ५% ची सुट नाकारली जात आहे. तर सभागृहाला विनंती की, जेथे जॉईंट नावे आहे. पण महिलेचे नांव दिसत आहे. तर अश्यांना द्यायला हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २.५% द्यायला हवे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काही हरकत नाही नितीनभाऊ, हे टेक्नीकल आहे आणि एक अजुन याच्यामध्ये विषय होता. मला वाटते घुगेदादांच्या प्रभागातला हा विषय होता. आयुक्त महोदया, महापौरताई, एक विषय असाही होता की, काही वेळेस वारसा हे जेव्हा मयत झाले, त्यामुळे वारसा मयत झाले म्हणुन मुलीचे नाव लागलेले होते की, वारसाहक्काने तिला ती प्रॉपर्टी मिळाली. वडील मयत झाल्यानंतर पण वारसाने, ते मयत झाल्यानंतर म्हणुन तीचे नाव ग्राहय धरले जात नाही या ५% च्या सुटसाठी. अश्या ज्या काही टेक्नीकल अडचणी येत आहे. त्याच्या मध्ये विचार व्हावा या गोष्टींचा. मला वाटते, राजेंद्र घुगेंच्या प्रभागातला हा विषय होता.

**मा.महापौर :-** मला वाटते, नांव असेल तर मिळायला पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मिळायला पाहिजे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मिळायला पाहिजे ना. माझ्या प्रभागातला विषय आहे. आईच्या आणि मुलाच्या नांवावर प्रॉपर्टी आहे. पण ५% ची सुट का नाकारण्यात आली.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये आपल्याला ती वारस हक्काने जरी आली. तरी महिलेचे नांवाने आलेली असल्याने ५% सुट द्यायला हरकत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काहीच हरकत नाही.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त** :- ती मुदत गेली आता.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पाटील साहेब, त्यांचा अर्ज मुदतीत दिलेला आहे. माझ्या प्रभागातील एकाने सुध्दा फोन केला होता. त्यानी सुध्दा प्रभाग समिती कार्यालयाला अर्ज दिलेला आहे. आईचे नाव वर आहे आणि मुलाचे नांव सेकंड आहे. ह्या दोन केसेस मला माहिती असलेल्या, अश्या असलेल्या अनेक केसेस असतील. ज्यांनी मुदतीत अर्ज दिलेले आहे. त्यांचा विचार करायला हरकत नाही.

श्री.नवनाथ दारकुंडे :- त्या प्रकरणाची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करायला पाहिजे.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त** :- आता नाही देता येणार ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आता देता येणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्यांनी जर मुदतीत अर्ज केलेला असेल तर का देता येणार नाही. अर्ज जर मुदतीत आहे. आपण ते नाकारलेला आहे. टेक्नीकल अडचण आहे असे म्हणुन आपण ते नाकारलेले आहे. जर सभागृह आपल्याला सांगत आहे, विनंती करत आहे. तर नाकारण्याचा काही प्रश्न येत नाही.

**मा.उपमहापौर :-** मुदतच्या आत आहे ना. अर्ज मुदतीच्या आत असल्याने ते आपल्याला देता येईल. गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मध्यंतरी असे ऐकले होते की, आपण मिळकतीचा उतारा मागतो. आपण ७/१२ मागतो. जेव्हा घरपट्टीच्या रेकॉर्डलाच महिलेचे नांव असेल. तर त्याला उताऱ्याची गरज काय. मिळकत कराच्या डाटा रजिष्टरवर महिलेचे नांव असेल. तर तिचा ७/१२ चा उतारा मागण्याची गरज काय ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** उतारा काढायला रु.५००/- लागुन जातात. तेथे तर सुट पण तितकी भेटत नसेल.

**मा.महापौर :-** हो कागदपत्रांची मागणी होते त्या ठिकाणी, पण आपण सर्व करुनच नांव आलेले आहे ना त्या घरपट्टीवर. तर त्यांना प्रुफ मागण्याची आवश्यकताच नाही. असे भरपुर प्रॉब्लेम्स आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** यामुळे असे होत आहे महापौरताई की, प्रत्येक्षात आम्हाला बेनिफीट मिळतच नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, दिले आपण, बहुतांशी महिलेचे नांवावर असलेल्या मिळकतींना आपण देतो. पण असे काही जर कॉम्पलीकेटेड विषय असतील तर त्यांच्या बाबतीत प्रशासनाने काही ना काही धोरण ठरवायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** मालमत्ता जर फक्त महिलेचे नांवावर असेल तर निश्चितच देऊ. किती लोकांचे नांव घेतले आहे.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त** :-ताई आपण ज्या वारस हक्काबाबत बोलल्या, त्यांनी जर मुदतीत अर्ज दिलेले असतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ते माझ्यापर्यंत आलेले आहे की, मुदतीत आम्ही अर्ज दिलेला आणि आम्ही सुट मिळालेली नाही. अशी माझ्यापर्यंत तक्रार आलेली आहे. मी स्वत: शाहनिशा करुन आपल्या पर्यंत पाठविते. मुदतीत जर त्यांचा अर्ज असेल तर द्यायला हरकत नाही. आणि जेथे दोन नांव आहे, जर सभागृहाने ठरविलेले आहे तर मला वाटते तेथे पण सुट द्यायला काही हरकत नाही.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त** :-महिलांच्या बाबतीत आपण ते फक्त एका निवासी मिळकतींना ते अलॅट केलेले आहे. एकापेक्षा जर अधिक मिळकती असतील, म्हणुन आपण एक स्वयम घोषणा पत्र घेतो आहे त्यांच्याकडुन की, शहरात माझ्या नांवाने एकच मिळकत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताईंचा मुद्दा वेगळा आहे. ताईंचा मुद्दा काय आहे की, जॉईंट नेम आहे. माझा आणि, तर तश्या पध्दतीने महिला गृहीत धरून त्यांना सुध्दा ती सुट दिली गेली पाहिजे. आपण फक्त ज्या उताऱ्यामध्ये फक्त महिलेच्या नांवावर प्रॉपर्टी असेल. त्याच्या संदर्भातच सुट देतो आहे. जेथे जॉईंट नावे असतील तेथे आपण ती सुट नाकारत आहे.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त** :- आपण जो ठराव पारित केलेला आहे. त्याच्यात स्पष्ट म्हटलेले आहे की, केवळ निवासी आणि महिलेच्या नांवाने असेल तर, त्याला जॉईंट मिळकतीच्या बाबतीत आपण धोरण ठरविलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते धोरण कसे असते. भविष्याच्या अनुषंगाने ते तसे बदलुन घ्यावे लागेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ज्या वारसाच्या बाबतीत मी म्हटली ना. त्यांनी मुदतीत अर्ज दिलेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साहेब येणाऱ्या पुढच्या सभेमध्ये तुम्ही तसा धोरण द्या.

**मा.महापौर :-** फक्त महिलांसाठी ती स्किम आपण सुरु केलेली आहे. जॉईंटला असेल तर ते लागु होणार नाही. फक्त महिलेचे नांवावर असेल तरच ते ५% सुट मिळेल.

**मा.उपमहापौर :-** मॅडमांचे म्हणणे आहे की, फक्त महिलेचे नावावरच प्रॉपर्टी असली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महिला खाजगीकरणाचा प्रयत्न चालु आहे.

**मा.महापौर :-** त्यामुळेच ती सुरु केलेली आहे आपण.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, सर्व प्रॉपर्टी तुमच्या नावावर करून घेतली वाटते तुम्ही.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलांत विनिर्दीष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर संपुर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारित करील अश्या दराने मालमत्ताकर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.

वरिल तरतुदींनुसार यापुर्वी महासभा ठराव क्र.८१० दि.३०/०५/२०२२ अन्वये सन २०२२-२३ साठी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांनी मालमत्ता व पाणीपट्टी कराचा भरणा दि.३०/०६/२०२२ पर्यंत केल्यास १०% सुट देण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये मालमत्ताकराचे फेरमुल्यांकन करुन सुधारित मागणी देयकांचे वाटपाचे काम मार्च २०२२ च्या शेवटच्या आठवडयात करण्यात आले आहे. तसेच जवळ-जवळ २० वर्षानंतर फेरमुल्यांकन झालेले असल्याने मालमत्ताकरांच्या मागणीत वाढ झालेली आहे. त्यामुळे मालमत्ताकर व पाणीपट्टी कराच्या वसुली चांगली होणेसाठी सदर सुटचा कालावधी दि.३०/०६/२०२२ पर्यंत वाढविण्यात आला होता. तसेच महासभा ठराव क्र.८११ दि.३०/०५/२०२२ अन्वये महिलांच्या नावे असलेल्या मिळकतीस अतिरिक्त ५% सुट देणे बाबत मान्यता प्रदान केलेली आहे. सदर सुट फक्त कलम १४० अ नुसार दिल्या जाणाऱ्या १०% सुटचा कालावधी असेल त्याच कालावधीत देणेस मान्यता मिळालेली आहे. सदर ५% अतिरिक्त सुट घेण्यासाठी नागरीकांना खुपच कमी कालावधी मिळाला, तसेच फेरमुल्यांकनांत झालेल्या चुका दुरुस्तीसाठी मिळकतधारकांचे अर्ज अजुनही प्रभाग समिती कार्यालयात प्राप्त होत आहेत. त्यामुळे सन २०२२-२३ साठी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांनी मालमत्ताकर व पाणीपट्टी कराचा भरणा दि.३१/०७/२०२२ पर्यंत केल्यास १०% सुट व महिलांच्या नांवे असलेल्या निवासी मिळकतीस एकुण १५% सुट (महासभा ठराव क्र.९११ दि.३०/०५/२०२२ नुसार) दि.३१/०७/२०२२ पर्यंत देणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३**) जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या रस्त्याच्या दुभाजक / डिव्हाइडर मध्ये जाहिरात / बॅनर उभारणे कामी धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो धोरण ठरवायला हरकत नाही परंतु मा.महापौरताई, याच्या संदर्भात एक विस्तृत धोरण ठरवा की, याच्यामध्ये सुसुत्रता येत नाही. फलक लावण्याच्या संदर्भातले फारपुर्वी एक धोरणात्मक निर्णय महासभेसमोर आलेला होता. आपल्याच कार्यकाळात आलेला होता परंतु तो त्यावेळेला रद्द करण्यात आलेला होता. म्हणजे याच्यासंदर्भात कसे आहे की, जाहिरातीचाच मक्ता काढण्यात यावा. जाहिरातीचा मक्ता काढतांना त्याच्या मागचे

उद्दीष्ट हे की, कमीतकमी एका युनिफॉमली पॅटर्नमध्ये संपुर्ण शहर हे दिसायला पाहिजे. वेगवेगळया दुभाजकांमध्ये आपण समजा बोर्डची साईज ही निश्चित करतो आहे. परंतु आज जर आपल्या दुभाजकांची परिस्थिती बघितली आपण अत्यंत वाईट अशी दुभाजकांची परिस्थिती आहे. बऱ्याच ठिकाणी प्लान्टेशन नाही, बऱ्याच ठिकाणी तोडक्या पध्दतीने बोर्ड लावले जातात. तर याच्या संदर्भात महानगरपालिकेला उत्पन्न म्हणुन ही पाहिले जाईल आणि उत्पन्नाचा स्त्रोत म्हणुनही त्याच्याकडे बघणे गरजेचे आहे की, संपुर्ण याच्या संदर्भातला वर्कींग करुन एक मक्ता काढण्यात यावा. ज्याच्यामध्ये जो मक्तेदार महानगरपालिकेला जास्तीत जास्त उत्पन्न देईल. तसा ३ वर्ष किंवा ५ वर्ष असे लॉंग पिरियेडसाठी तो मक्ता काढावा जेणे करुन डिव्हायडरला असलेला ग्रिल प्रोटेक्शनसाठी, ते पण मक्तेदारानेच विकसीत करायचे.त्याच्यावरचे वृक्षांचे संगोपन सुध्दा त्या मक्तेदाराने करायचे. जागेचे जे काही दर त्याचे असतील त्यानी घ्यायला पाहिजे. आणि जो पॅटर्न महानगरपालिका निश्चित करुन देईल. ग्रिलचे फ्रेम म्हणा, बोर्डची साईज म्हणा, या सगळया गोष्टी त्याला आपण निर्धारीत करुन द्यायच्या. जो मक्तेदार महानगरपालिकेला जास्तीत जास्त पैसा देईल. अश्या पध्दतीने तो मक्ता काढायला पाहिजे. जेणे करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नमध्ये पण भर पडेल. आणि शहराच्या सौंदर्यकरणामध्ये सुध्दा भर पडेल. तर तसा प्रस्ताव तातडीने एका महिन्यात तयार करावा. मागील काही प्रस्ताव असतील तसे ते ही मी आपल्याला प्रशासनासमोर देईल. आणि प्रशासनाने सुध्दा त्याचा सखोल अभ्यास करुन शहर कश्या पध्दतीने जास्तीत जास्त सुंदर करता येईल आपल्याला त्या दृष्टीकोणातुन विचार करावा.

**मा.उपमहापौर :-** हे अगोदर ठरलेले नव्हते. किंवा याच्या बाबतीतला कुठलाच निर्णय सभागृहात झालेला नव्हता. तरी सुध्दा आपण जर शहरात बघितले असेल तर जवळपास सगळेच दुभाजकांमध्ये जाहिरात फलक हे कॉंक्रीटने पक्के केलेले आहे. एक लोखंडी बोर्डावर लावलेले आहे. असा कुठलाच दुभाजक सुटलेला नाही. त्याच्या संदर्भात मी दि.१७/०६/२०२२ ला पत्र पण दिलेले आहे. परंतु त्याच्या संदर्भामध्ये आता पर्यंत कुठलीच कार्यवाही झालेली नाही. आणि आता जर ते बोर्ड पाहिले. तर ते इतके अस्तवेस्त आहे. आणि समोरुन येणाऱ्या गाडयांचा प्रकाश असेल तर समोरुन येणारी जी गाडी आहे. तर ती दिसत नाही त्या फलकामुळे. आणि जो जाहिरातदार त्या डिव्हायडरचा किंवा दुभाजकचा असेल त्याने आतापर्यंत त्या दुभाजकाची डागडुगी केलेली नाही. अश्या लोकांवर आपण काय कार्यवाही करणार आहे मॅडम.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, आयुक्त मॅडम, माझे असे प्रश्न आहे की, आपले जे डिव्हायडर आहे. ते आधीच काही संस्थांना किंवा काही प्रतिष्ठीत व्यक्तींनी घेतलेले आहे. त्या डिव्हायडरचे सुशोभिकरण राहिलेले नाही. तर मग त्याचे काय करणार. मग हा मक्ता देतांना कसे करणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे ताई. बऱ्याचश्या वेगवेगळया संस्थांना किंवा वेगवेगळया उद्योजकांना अश्या पध्दतीने डिव्हायडर दिलेले आहे. आता आपण बघाल, आपण कोर्ट चौकातुन येतो. पुर्वी एक इन्फोटेक म्हणुन संस्था होती. त्यांना आपण सुशोभिकरणाचा कोर्ट चौकाचा प्रस्ताव दिलेला होता. त्यांनी त्याच्यामध्ये काही डेव्हलपमेंटस केल्या होत्या. परंतु कालांतराने ती कंपनी चालली गेली. पुढच्या चौकामध्ये आपण इकडे येतो. गोविंदा रिक्षा स्टॉपपर्यंत तो आपण ॲक्सीस बँकेला दिलेला होता. ॲक्सीस बँकेने तात्पुर्ता त्याच्यामध्ये सुशोभिकरण केले. परंतु कालंतराने त्यांचे ही दुर्लक्ष झाले.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये भाऊ तुम्ही जर बघितले असेल तर आज सर्व दुभाजकांची परिस्थिती एकदम दयनिय आहे. कुठे आहे कुठे नाही. आपण ज्यांना ते दिला असेल, आपल्या परवानगीने आणि कुठल्याही अटीशर्तीने दिलेला असेल. त्यांनी ते कुठल्याही अटीशर्तीचा पालन केलेले नाही. दुभाजकांची दुरावस्था झालेली आहे परंतु त्यांची जाहिरात मात्र आजही त्या डिव्हायडरवर तश्याच्या तश्या आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्यांनी अटीशर्तीचे उल्लंघन केले असेल ते रद्द करावे. आणि रद्द करुन नव्याने बेसीस वरतीच मागवावा. जेणे करुन त्या मक्तेदारावरती दर ३ वर्षांनी डिव्हायडरला रंगरंगोटी करण्याची जबाबदारी, त्याचे वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी, त्याच्यामध्ये लावलेले ग्रिलला मेंटेन करायची जबाबदारी, या सर्व जबाबदाऱ्या त्याच्यावरती फिक्स करण्यात याव्या. आणि त्याच्या उत्पन्नातुन दर वर्षी तो महानगरपालिकेला काय देईल. याच्या संदर्भातील ओपन ऑफर मागवावे.

**मा.उपमहापौर :-** विस्तृत धोरण ठरविण्यासाठी विषय तहकुब ठेवायचा का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, नाही, आता तात्पुर्ता, जो पर्यंत प्रस्ताव येत नाही, तो पर्यंत दर मान्य करुन घ्यायचे. कारण काय होते की, कोणाकडुन आपण २ दिवसाचे पैसे भरुन घेतो, कोणाकडुन ८ दिवसांचे भरुन घेतो. तर त्यासाठी प्रशासनाचे हे दर मान्य राहतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, हे दर थोडे जास्त वाटत आहे. या संदर्भात थोडे असे वाटते की, प्रशासनाने समकक्ष महानगरपालिकांचे अभ्यास करावे. राज्य शासनाच्या सुचना आहे या विषयावर त्यांचा अभ्यास व्हावा. ६०% दर कसे काय ठरविले याच्या बद्दल काहीच स्पष्टीकरण नाही. ६०% जास्तीचे दर म्हणजे नियमित.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण त्याची तुम्ही आकडेवारी बघाल ना. टक्केवारी अशी दिसते.

**मा.महापौर :-** एकदा हे समजुन सांगा ना.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** समजुन सांगा ना ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अतिशुल्लक दर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** म्हणजे आपण हे समकक्ष नगरपालिकांचा अभ्यास केलेला आहे का ? तेथे काय कश्या पध्दतीने होतात. त्यानुसार हे बरोबर आहेत का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यातुन खुप काही महानगरपालिकेला अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** उत्पन्नापेक्षा याचा त्रास खुप जास्त होतो नितीनभाऊ, शहराचा विद्रुपीकरण, ट्रॅफिकला अडथळा, आणि डिव्हायडरमध्ये मुळातच आपल्याकडील परिस्थिती बघितली तर फार कमी रस्त्यांवरचे डिव्हायडर आहे. जे अतिशय चांगल्या स्थितीत आहे. म्हणजे आता १५ ऑगस्टची पुर्व तयारी म्हणुन डिव्हायडर मधला कचरा काढणे, झाडांना आकार देणे, तेथील रंगरंगोटी करणे. हे सगळं होत आहे. बाकी जर आपण बघितले तर आपले डिव्हायडर अत्यंत दुरावस्था झालेल्या स्थितीत आहे. आणि तेथे फलक, आता उपमहापौर साहेबांनी जसे सांगितले, वस्तुस्थिती आहे ही, तेथील फलक ट्रॅफिकला प्रचंड त्रासदायक ठरणारे असतात. आयसाईटला बाधा आणणारे असतात. समोर कोण आहे हे अजिबात कळत नाही. अपघातांना निमंत्रण देणारे असतात म्हणुनच मला वाटते, समकक्ष महापालिकांचा अभ्यास करुन तेथे या विषयाबद्दलचे काय रूल्स ॲण्ड रेग्युलेशन्स आहे. ते तपासुनच देण्यात यावा. आणि नितीनभाऊंनी जो प्रस्ताव मांडलेला आहे की, टोटल एकच निविदा काढावी. टोटल प्रोजेक्टला क्लब करण्यात यावा. तो सुध्दा प्रस्ताव सादर झालेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे त्याच्यातले आपल्याला बेनिफीट काय राहील. आज पर्यंत काय होते. जे नविन भागात झालेले विस्तारीत दुभाजक जे आहे ते दुर्लक्षीत होतात. आपण मक्ता देतांना सर्व समावेशक मक्ता दिल्यानंतर मक्तेदारावर संपुर्ण जळगांव शहरातील दुभाजकांची जबाबदारी निश्चित केली जाईल. जेणे करुन त्या दुभाजकांना जाहिरातीचा प्रतिसाद कमी मिळेल. परंतु मेनटेन करण्याची जबाबदारी ते नाकारु शकणार नाही. आणि दोन पैसे त्यांना उत्पन्नाचे मिळणेच्या दृष्टीकोणातुन शहराचा दुभाजकांमधला तो प्रश्न मिटेल आणि ते दुभाजक तो मेनटेन करु शकेल.

**श्री.अनंत जोशी :-** माझे या ठिकाणी मत असे होते, भाऊ जसे म्हटले की, ज्या ठिकाणी अटीशर्तींचा भंग झाला असेल. त्यांचे निर्णय वेगळे घेतले पाहिजे आणि बाकीच्यांचे वेगळे. पण भाऊ माझे असे म्हणणे आहे की, ते आपण फार पुर्वी केलेले आहे. आणि अटीशर्तींचा भंग जवळपास सर्व्याच ठिकाणी झालेला असतो. आपण नव्याने निविदा प्रक्रिया करणार असुन तर सगळयांचे जुने जे आपण नांव घेतले, ते सगळेच रद्द करण्यात यावे. कारण जो आता नव्याने येईल. त्याला काही सगळयाच ठिकाणी पैसे मिळणार नाही जाहिरातींचे. पुर्ण शहराचे जर त्याला मिळाले तर तो इन्ट्रेस्ट घेईल. त्यामुळे असे करायलाच नको की, ज्यांनी अटीशर्तीचा भंग केलेला असेल, सगळयांनीच केलेला असतो. सुरुवातीलाच मेनटेन करतात नंतर कोणीच काही करत नाही. याच्यात नितीन भाऊंनी म्हटल्याप्रमाणे मी परत एकदा सुचना करु इच्छितो की, कलर इस्कीम जी असेल डिव्हायडरची ती युनिफॉर्म असली पाहिजे पुर्ण शहराची. आणि जी फ्रेम आपण लावणार आहोत. जाहिरातीसाठी फलक आपण लावणार आहोत. त्याच्यात फ्रेम जी असेल. त्याचा स्ट्रक्चरची जी काही असेल, कलर इस्कीम असेल किंवा डिझाईन असेल. सेम असले पाहिजे, सिमीलर असले पाहिजे. भलेही त्यांच्या जाहिरातीचा फलक जो आहे. ते वेगळया प्रॉडक्टचा असेल. त्यांची कलर इस्कीम वगेरे त्यांनी ठरवावी. पण आपल्या डिव्हायडरची कलर स्कीम असेल किंवा त्याचा स्ट्रक्चर असेल. ढाचा असेल, ते आपण ठरवुन दिला पाहिजे. ज्याच्यामुळे विद्रुपीकरण शहराचा होणार नाही. नाही तर ते अतिशय घाण दिसेल दिसतांना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई, विशेष महासभेमध्ये प्रस्ताव सांगितला होता की, जे राष्ट्रीय, राज्यस्तरीय किंवा मनपा स्तरावरती जनजागृतीसाठी जे काही आपण होर्डिंग लावणार आहे. जर आपल्याला कोणही प्रायोजक मिळत असेल. तो त्याच्या खर्चाने लावत असेल, त्याचे कंपनीचे नाव लावत असेल किंवा आपण देतच आहे आताही. तर त्याचा एक ठराव करुन घ्यावा आजच्या तारखेला अशी माझी विनंती आहे. निशुल्क त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक आदमी २०-२२ हजार रुपये के लिए कब तक जान निकालेंगा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ २०-२२ हजाराचा विषय नाही. उद्या आपल्याला नगरसेवकांना लावायचेच आहे प्रभागात की, हर घर तिरंगा लावायचे आहे. त्याला पावती फाडावी लागेल ना. खाली त्याचे नाव येईल. त्याच्यात काय नुकसान आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमदार, खासदार, मंत्री महोदय, ते ही पावती फाडत नाही. थोडा महानगरपालिका का भी हिस्सा निकलने दो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीन भाऊ, हे आमदार खासदारांचे झाले, उद्या एखादी कंपनी म्हणेल किंवा व्यापारी म्हणेल, एखादा उद्योजक म्हणेल. तर निशुल्क करावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे. मी ठराव मांडतो, वाटलेस, माझे ठराव मांडुन घ्या, ज्यांना विरोध करायचे असेल विरोध करुन घ्या. बघा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतनेसे विषय के लिए आपने या सभागृहामे चर्चा करना, मुझे लगता नही की, बहोत बडा विषय है. कैलास आप्पा जैसा आदमी बोलता है की, अपने नगरसेवकोने ५-५ १०-१० हजार झेंडे खुदने खरीद के लोगो को देणे का जिनकी ताकत नही है लगाने की, और आपन यहाँ आमदार और खासदार को लगाने के लिए २०-२२ हजार रुपये कोई बहोत बडा विषय है क्या. खुप मोठा विषय नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी प्रस्ताव मांडला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** नगरसेवकांकडुन एक एक बॅनर लावुन घ्या. ८० बॅनर होऊन जातील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** लावा ना मग प्रत्येकाने लावायलाच पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** माझ्याकडुन लावुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा आपण देऊ नाही शकत का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** देतील, देतील, मला अनुभव आहे. आपण मागे जेव्हा पुलवामाच्या मध्ये जे शहीद झाले ना सैनिक, त्याच्यात आपले जळगांव जिल्ह्याचे शेजारचे बुलढाण्याचे दोन सैनिक होते. आपण त्यांच्यासाठी जी शहरातुन वर्गणी जमा केली ती २५ लाख रुपये होती. त्यामध्ये नगरसेवकांचा हातभार जास्त होता. सगळयांनी दिले होते. देतील, देतील.

**मा.उपमहापौर :-** भाऊ, विषयाच्या संदर्भामध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला धोरण ठरवायला प्रशासनाला एक दोन महिन्याचा कालावधी लागेल. त्याच्याने फरक पडणार नाही.

**श्री.अनंत जोशी :-** सुचना लक्षात घ्यायचे बाकी काही हरकत नाही.

**मा.आयुक्त :-** उदाहरण देऊन सांगा.

**मा.उपायुक्त,श्री.प्रशांत पाटील:-** १.२५ रुपये स्केअरफुट, ३ x५ जर घेतले तर १५ स्केअरफुट होते. १५ x १.२५ असे १८.७५ रुपये होतात याचे एका दिवसाचे. तसे रु.५० प्रमाणे आपण परवाना फी आकारतो. असे एका दिवसाचे रुपये ६८.७५/- होतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** परवाना फी आपण परडे आकारतो का ?

**मा.उपायुक्त,श्री.प्रशांत पाटील:-** नाही ती आपण वनटाईम आकारतो. तर ५ दिवसासाठी जर बॅनर लावायचा असेल तर एक ३ x५ च्या बॅनरला रु.१४३/- लागतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ५ दिवसांसाठी.

**मा.उपायुक्त,श्री.प्रशांत पाटील:-** हो ५ दिवसांसाठी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आणि हे जे डिव्हायडरमध्ये लावले जातात ते काही असे ४-५ दिवसांसाठी लावले जात नाही. ते असे कन्टीन्युवेशन मध्येच राहणार आहे. त्या दृष्टीने याच्यामध्ये काय दुरुस्ती करता येत असेल, समकक्ष महापालिकांचा अभ्यास करुन दुरुस्ती करा. माझ्या मते, जे मोठे बॅनर होर्डिंगचे लागतात ते ४-५ दिवसांसाठी लागतात. पण नॉर्मली डिव्हायडर मध्ये जे बॅनर लागतात. ते व्यवसायीकांचेच असतात. आणि ते महिनो महिने

वर्षानुवर्ष तेथेच असतात. त्याचे समकक्ष महापालिकांचे अभ्यास करुन हे दर जर एक्सेस असतील तर त्या प्रमाणात ते कमी करुन घ्यावे. ही एक सुचना आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाकडुन आलेला विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे सारखे असतील ते मंजुर करा, ४ आणि ५ पण सारखेच आहे माझ्या मते.

**श्री.सुनिल महाजन :-** ४-५ सारखेच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एकत्रित चर्चा करुन घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मालकीचे विविध रस्ते, चौक व त्यालगतचे दुभाजक /डिव्हायडर सुभोभिकरण करणे कामी बांधकाम विभाग यांच्या मार्फत विविध संस्था, फर्म, व्यावसायिक, विकासक यांना विकसीत करणे कामी देण्यात आलेले आहे.

सदर विविध संस्था, फर्म, व्यावसायिक, विकासक हे चौक, डिव्हायडर सुशोभिकरण व निगा ठेवण्याचे काम करतांना चौकात, दुभाजक मध्ये त्यांच्या व्यावसायीक जाहिराती प्रदर्शित करतात. परंतु आयुक्त यांच्या कडिल जा.क्र./जशमनपा/आका/५०३/२०१७ दि.२७/०४/२०१७ च्या आदेशान्वये ट्रॅफिक आयलॅन्ड/ डिव्हायडर/दुभाजक मध्ये जाहिरात फलक, बॅनर लावणेकामी परवानगी देण्यात येवू नये असे आदेश केलेले आहे.

त्यामुळे उपरोक्त धोरण व आयुक्त यांचे आदेश पाहता जाहिरात बॅनर,फलकास दुभाजकामध्ये लावण्यास परवानगी दयावी किंवा नाही याबाबत किरकोळ वसुली विभागास संभ्रम निर्माण होतो, तसेच अन्य जाहिरातदार यांना दुभाजकामध्ये जाहिरात प्रदर्शित करणे करीता परवानगी नाकारल्याने असे जाहिरातदार, हे संस्था, फर्म, व्यावसायीक, विकासक यांनी दुभाजकामध्ये लावलेल्या जाहिरातीचा संदर्भ देवून वाद विवाद देखील करतात.

उपरोक्त परिस्थिती पाहता दुभाजकामध्ये जाहिरात बॅनर, फलक लावणे बाबत महानगरपालिकेचे दोन वेग-वेगळे धोरण असल्याने, दुभाजकात जाहिरात लावणे कामी अडचण निर्माण होत आहे, तसेच दुभाजकातील जाहिरात फलकापासुन मनपास मिळणारा महसुलावर देखील विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे दुभाजक/डिव्हायडर मध्ये पादचारी तसेच वाहनचालकाच्या दृष्टीस (आय व्हीजनला) बाधा होणार नाही या पध्दतीने कमाल ३६ इंच बाय ६० इंच (३ फुट बाय ५ फुट) या आकारापर्यंतच जाहिरात बॅनर,फलक यांना नियमित भाडेदरांपेक्षा ६०% अधिक दराने म्हणजेच रु.२/- प्रति स्वेअर फुट प्रति दिवस (रु.२/- प्रति ०.०९३ स्वेअर मीटर प्रति दिवस) याप्रमाणे आकारणी करणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहरातील रस्त्याच्या दुभाजक / डिव्हाइडर मध्ये जाहिरात / बॅनर उभारणे यामध्ये सुसूत्रता दिसून येत नाही. एका युनिफॉमली पॅटर्नमध्ये संपूर्ण शहर हे सुंदर दिसायला पाहीजे याकरीता नविन मक्ता काढण्यात यावा त्यामध्ये जो मक्तेदार महानगरपालिकेस जास्तीत जास्त उत्पन्न देईल त्यास दिर्घ कालावधीसाठी मक्ता देण्यात येवुन त्यामध्ये मक्तेदारास डिव्हायडरला ग्रील प्रोटेक्शन, मेंटेनन्स, रंगरंगोटी, वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी मक्तेदारावर टाकण्यात यावी. ग्रिलची फ्रेम, बोर्डची साईज या सगळया गोष्टी मनपाने निर्धारीत करुन दयाव्यात तसेच दरा बाबत प्रशासनाने समकक्ष महानगरपालिकांचा अभ्यास करुन व राज्य शासनाच्या यासंदर्भातील ज्या काही सुचना असतील त्यांचा अभ्यास करुन परिपूर्ण प्रस्ताव तातडीने एका महिन्यात तयार करावा जोपर्यंत प्रस्ताव येत नाही तोपर्यंत प्रशासनाने सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावानुसार दर आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहामध्ये सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) मनुष्यबळाची कमतरता असल्याने शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये विदयावेतनावर कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (Construction Supervisor) शिकाऊ उमेदवारीच्या नेमणुकीबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर, मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका शहर हद्दीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकुण १९ प्रभागांकरीता ८ युनिट कार्यालये असुन सदर युनिट कार्यालयामध्ये संबंधीत युनिट शाखा अभियंता यांचे अधिपत्याखाली टेक्नीकल सुपरवायझर नसल्याने युनिट क्षेत्रात सुरु असलेल्या विकास कामांवर देखरेख ठेवणे, काम तांत्रिक पध्दतीने करुन घेणे इ.बाबत अडचणी होत असल्याने युनिट निहाय प्रत्येकी ०३ याप्रमाणे किमान २४ कन्स्ट्रक्शन सुपरवायझर शिकाऊ उमेदवारी तत्वावर नेमणेची बाब विचाराधीन होती.

त्याअनुषंगाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय व मुलभुत प्रशिक्षण तथा अनु.सुचना कैंद्राकडुन माहिती घेऊन शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत कन्स्ट्रक्शन सुपरवायझर या पदाचे शैक्षणिक अर्हतेनुसार २४ शिकाऊ उमेदवारांची एक वर्ष कालावधीसाठी निवड करावयासाठी दि.१९ फेब्रुवारी २०२२ चे दैनिक दिव्यमराठीमध्ये जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन web Site वर ऑनलॉईनल नोंदणी केलेल्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यांत आलेले होते.

आलेल्या अर्जांची पाहणी करुन एकुण ३६ उमेदवारांचे अर्ज वैध असल्याचे निदर्शनास आल्याने सदर उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची छाननी करण्यांत आली व त्यामधुन निवड यादीतील २६ व प्रतिक्षा यादीतील १० उमेदवारांची यादी तयार करणेंत आलेली होती. दरम्यानचे काळात महानगरपालिकेत तांत्रिक कर्मचाऱ्यांची उणीव भासत असल्याने व याबाबत इतर विभागप्रमुखांकडुन मागणी आल्याने उर्वरीत १० उमेदवारांचाही समावेश करुन घेणेबाबत इतर विभागप्रमुखांकडुन मागणी आल्याने उर्वरीत १० उमेदवारांचाही समावेश करुन घेणेबाबत आयुक्त यांनी निर्देश दिलेले आहे. सदर उमेदवारांची निवड ही प्रतिमाह रु.५०००/- या विदयावेतनावर एक वर्ष कालावधीसाठी करणेंत आलेली असुन उक्त शिकाऊ उमेदवारांकरीता विदया वेतन खर्च महानगरपालिका फंडातुन करुन सदर रक्कमेची शासनाकडे मागणी करणेंत येईल.

आयुक्त यांचे दि.१६/०६/२०२२ रोजी ज्या उमेदवारांनी Online Data सादर केलेला आहे अशा उमेदवारांना Hard Copy सादर करणेसाठी संधी दयावी / Mail पाठविणेंत यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार संबंधित २४ उमेदवारांना Hard Copy सादर करणेसाठी कळविणे प्रस्तावित आहे.

विदया वेतन देणेसाठी जशमनपा जळगांव मधील सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकात रु.३० लक्ष तरतुद करणेत आलेली आहे. रु.३० लक्ष मर्यादेत उपरोक्त नमुद ३६ शिकाऊ उमेदवारा व्यतिरिक्त आणखी गरजेनुसार निकड लक्षात घेता उर्वरीत २४ उमेदवारांपैकी Hard Copy सादर करणाऱ्या मेरीटनुसार पात्र १४ असे एकुण (२६+१०+१४) ५० कंन्स्ट्रक्शन सुपरवायझर कोर्स केलेल्या उमेदवारांची निवड करणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने शिकाऊ कन्स्ट्रक्शन सुपरवायझर यांची नेमणुक करताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दयावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५**) सन २०२२-२३ ते २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता (निविदा मंजूर झालेपासून दोन वर्षाकरीता) महानगरपालिकेत अभिकर्त्यामार्फत (Outsoursing) विविध सेवा प्राप्त करुन घेणेकरीता व्दिवार्षिक ई-निविदा मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर, मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** आप्पा विषय क्र.५.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाला मंजुर, बोलायचे आहे का तुम्हाला, बोला बोला.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** जर आपण जो निविदाधारक आहे. त्याला या लोकांचे पैसे दिले नाही गेले. मग त्याने ते मनुष्यबळ पुरविणे बंद केले. मग काय करणार. म्हणजे एकतर दोन टप्पे करा किंवा तीन टप्प्यांमध्ये निविदा करा माझे असे म्हणणे आहे. एकच तुम्ही टेन्डर काढले.

**श्री.कैलास सोनवणे :-** इतका मोठा विषय नाही ते.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** ६ कोटी आहे ते अप्पा ६.५ कोटीचा विषय आहे. तर मनपा फंडातुन करणार आहे का हे विषय.

**मा.आयुक्त :-** मन्थली बिल येईल ना. मन्थली कमी येईल ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मन्थली कमी येईल ना. ६ कोटी २४ महिन्याचे झाले. वर्षाचे ३ कोटी होतील. २५ लाख रुपये महिना झाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांचे म्हणणे काय आहे. मनपा फंड आहे. उद्या जाऊन मक्तेदाराला वेळेवर बिले नाही आले. तर तो कामे थांबुन घेतो. पुन्हा असे होऊ नये.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांनी जर बनविलेले आहे सर्व तर व्यवस्थीत प्लॅनिंग केली असेल ना त्यांनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊचे म्हणणे फक्त इतकेच आहे की, मनपा फंडातले काम आहे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** परत तेच अबकड परत सुरु होऊन जाते ते बाराखडी.

**मा.आयुक्त :-** पण त्याचे बिल कमी येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न बिलाचा आणि रकमेचा नाही. मनपा बिलाच्या संदर्भात काय होतो. बऱ्याच वेळेला आपली आर्थिक परिस्थिती नसली की, मनपा फंडातील अदायगी थांबविली जाते. किंवा वेळेवरती होत नाही. मग तश्या परिस्थितीमध्ये सदरहु मक्तेदाराने, कामगारांना मनपाने म्हणजे मनपाने मक्तेदाराने पेमेंट दिले नाही. आणि ज्या अनुषंगाने मक्तेदाराने कामगारांना पेमेंट देऊ शकला नाही. आणि काम बंद पडले, तर तशी परिस्थिती निर्माण होता कामा नये.

**मा.आयुक्त :-** भाऊ, दोन एक्सपेंसेस असतात. मॅनेटरी म्हटले तर, आस्थापना खर्च किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन, आणि विज बिल, हे आपल्याला मेनेटरी मध्ये पडतो. म्हणुन आपल्याला देणे कर्मप्राप्तच आहे. म्हणुन मन्थली बिल खुप कमी येईल.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** आता मागे, मक्तेदाराला बिले भेटले नाही. तो काम थांबुन टाकायचा. वार्डामध्ये बोमाबोम व्हायची. तशी परिस्थिती व्हायला नको. आता तुम्ही स्वत: बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता वॉटरग्रेसचा ठेका एकदम बरोबर चालु आहे कोणीच नगरसेवक बोलत नाही. पहिले सगळे बोलत होते ना.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** तर तसे व्हायला नको.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याच अनुषंगाने म्हणतो की, बरेचशे काम मक्तेदाराने केलेली आहे. आणि त्यांची बिले अजुन अदायगी झालेली नाही. या संदर्भात मी आपल्याशी ५-६ वेळा बोललो. अश्विनी भाऊ, डी.पी.डी.सी.चा जो निधी थांबविला गेलेला आहे. त्याच्या संदर्भात कसे आहे की, पाऊसाळा संपेल. त्या मक्तेदाराकडे वर्कऑर्डरी आहे. अपुर्ण अवस्थेत त्यांची कामे आहे. परंतु त्या मक्तेदाराचा सुर असा आहे की, आम्ही केलेल्या कामांच्या बिलाची अदायगीच होत नाही. मी वानखेडे साहेबांशी अनेक वेळा बोललो. याच्या संदर्भात एक आर्थिक अडचण त्यांनी मला सांगितली होती. ती आपण जिल्हाधिकाऱ्यांशी सुध्दा या विषयावर चर्चा केली. जसे मागच्या वेळेला मनपा आयुक्त पदावर कुलकर्णी साहेब असतांना आपण जॉंईट कमिशनर होतात. आणि क्याफो म्हणुन पवार साहेब होते.

अश्या पध्दतीने मुदतवाढ नसतांना सुध्दा आपली एक समिती गठीत करुन त्याच्यावर निर्णय घेऊन त्या मक्तेदारांना बिलांची अदायगी करण्यात आलेली होती. मी वानखेडे साहेबांना वारंवार तेच विनंती करत आहे की, तश्या पध्दतीने त्यांच्या बिलांची अदायगी करा. ज्यांची कामे झालेली आहे. आणि त्यांच्या बिलांची अदायगी रोखल्या गेल्या तर भविष्यात कामांवर त्यांचा परिणाम होईल.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** त्या अनुषंगाने जी तांत्रिक अडचण मी नितीनभाऊंना सांगितली आहे. त्याच्याच अनुषंगाने आपण एक समिती नेमत आहोत. त्याच्यानुसार कार्यवाही होणार आहे. तरी मक्तेदाराला मनपा हिस्सा मिळावा.पुढचे न्यायविधी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती पाहिजे ना. ती कुठे रोखली गेलेली नाही.

**मुलेअ, श्री.चंद्रकांत वानखेडे :-** त्याच्यावर समिती स्थापीत झाल्यानंतर आपण त्यावर निर्णय घेणार आहोत. संबंधीत साहेबांशी ही बोलणे झाले आहे की, कार्यवाही करणे आम्हाला आवश्यक आहे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** मक्तेदारांनी कामे थांबुन ठेवलेले आहे. दोन महिने झाले तुम्ही लोकं निर्णय घेत नाही. पुढच्या वेळेस कोणीही तयार होणार नाही काम घ्यायला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** वानखेडे साहेबांनी सांगितले की, आपण समिती गठीत करीत आहोत. माझी आपणास विनंती आहे की, ती समिती आजच गठीत करावी आपण सभा संपल्यानंतर. आणि उद्या त्यावर निर्णय घेण्यात यावा. जेणे करुन मक्तेदारांकडुन ती सबब आपल्या समोर यायला नको की, आमची कामे झाल्यानंतर ही बिले अदायगी झालेली नाही. म्हणुन आम्ही पुढची कामे करीत नाही. मग पुन्हा त्या विषयावर आलेल्या सभागृहात सदस्यांच्या तक्रारी वाढतात.

**मा.महापौर :-** विषय क्र.४ आणि ५

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मॅडम, विषय क्र.५ वर बोलायचे आहे. त्यावेळेस ५० लोकांना आपण त्या ठिकाणी जॉबला लावले. त्याच प्रकारचा हा एक ठराव आहे आता. आऊटसोरसींगद्वारे जी आपल्याला मनपावर लागणार आहे ती नियुक्ती करायची आहे. जर या मध्ये आपण जर समजा, इन्टरव्हीव घेऊन जर आपण ते कॅन्डीडेट निवडले, तर आपल्याला एजन्सीची काय गरज आहे. पेमेंटतर आपण देणारच आहे. मक्तेदारालाही पेमेंट देत आहे आपण, आणि मक्तेदार त्यांना देणार. त्यापेक्षा आपण आपल्या इन्टरव्हीवद्वारे जर चांगले कॅन्डीडेट घेतले. त्यांना जर आपणच पेमेंट दिले. मधला आपला जो गॅप आहे. भाऊंनी जो प्रश्न घेतला, त्यानी जर काम थांबविले तर. मग याच्यामध्ये पण मागच्या सारखाच विषय होणार आहे. आऊटसोर्सींगची काय गरज आहे मनपाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डॉक्टर साहेब, त्याच्यामध्ये कायदेशीर अडचण अशी आहे की, महानगरपालिकेने आणि मग कालांतराने तो महानगरपालिकेचा इमप्लॉई आहे. आणि त्या कायमस्वरुपी कायमसेवेत समावुन घ्यावा. अश्या पध्दतीने तो न्यायालयात जातो. आणि न्यायालयात गेल्यानंतर त्याला कामावर घेणे संदर्भातील न्यायालयीन आदेश होतात. आणि मग त्याला परमनंट जॉब देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेवर पडते. आऊटसोर्सींग करण्याचा हाच एक मेन हेतु आहे की तो मक्तेदाराचा एम्पलॉई आहे. आपण फक्त मक्तेदाराकडुन आऊटसोर्सींग करुन घेतो आहे. आता फक्त मक्तेदार आणि आपण याच्यामधला जो करार आहे. आणि तो कर्मचारी हा तो मक्तेदाराच्या पॅरोल वर असल्याकारणाने तो मक्ता आऊटसोर्सींग करुन आपल्याला पुरवितो. जेणे करुन भविष्यामध्ये काही कायदेशीर वाद उदभवणार ना तर महानगरपालिकेवर दायीत्व येणार नाही. त्यांना कायमस्वरुपी सेवेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात या.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आजच्या तारखेला आपण मजुरांचा ठेका दिलेलाच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज राज्य शासन सुध्दा याच पध्दतीने आऊटसोर्सींग करत आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ते आऊटसोर्सींग जर करत असले तर ते कॅन्ट्रॅक्टबेसीसच करते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज राज्य शासन सुध्दा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आज आपण ही कॉन्ट्रॅक्टबेसीसवर करु शकतो त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना आऊटसोर्स करण्याची अटच ते आहे की, तो कर्मचारी कायद्याने नगरपालिकेला क्लेम करतो की, मला २४० दिवस झाल्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावा. कारण माझ्यावर अन्याय होत आहे. आणि कोर्ट त्यांच्या बाजुने निवाडे देतात. हे कसे आहे कायमस्वरुपी नाही हे टेमपररीबेसीस वर आहे. ज्या वेळेला आपला आकृतीबंद मंजुर होऊन जाईल, आपली कायमस्वरुपी भरती प्रक्रिया

पुर्ण होईल. त्यावेळेला त्यांना क्लेमसुध्दा करता येणार नाही. हे कायदेशीर रित्या कुठलाही क्लेम महानगरपालिकवर करु शकणार नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आऊटसोर्सींग हा विषय बरोबर आहे. तर कोणता विषय आहे हे आकृतीबंधाच काय आहे.

**मा.आयुक्त :-** त्यांचा हा प्रश्न बरोबर आहे भाऊ , क्वॉलीटी वगैरे बरोबर आहे का अशा टेंडर मध्ये, डॉ. साहेब याच्यामध्ये आपण एक करू आणि मग फक्त जी मंजुर पदे जी आहेत ती डायरेक्टली झाले आहेत पण जे टेक्निकल लोक आहेत त्यांचे आपण टेस्ट करू घेवु.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मॅडम आता जे निवडले गेले, ते कोणत्या प्रकारे निवडले गेले. ही कुठलीही माहिती उपलब्ध नाही.तर कमीतकमी सांगण्याचा अर्थ हाच आहे की, याची प्रोसिजर झाली पाहिजे. आपण आऊट सोर्सींग दिले तर आपले काम संपले का? शेवटी पैसा आपला जाणार आहे लोकांचा जाणार आहे.

**मा.आयुक्त :-** ५ आणि ६ दोन वेगवेगळे विषय आहे. ५ चा जो विषय आहे. त्यांना त्या जी.आर.नुसार आपण ट्रेनिंग देतो आहे. आणि त्या ट्रेनिंगच्या बदले आपण त्यांना स्टायपन आपण त्यांना देणार आहोत तो रु.५०००/-. जेथे आपण शासन मान्य जे आय.टी.आय.चा जो पोर्टल असतो. तर त्या पोर्टलवर ज्यांचा कोर्स झालेला आहे. त्यांनी इन्ट्री करुन ते घ्यायचा असतो. हा विषय वेगळा, जे आपण कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर घेत आहोत ते ट्रेनी आहेत. ते आपल्याकडुन शिकाऊ उमेदवार. दुसरा विषय जो आहे आऊट सोर्सींगचा त्यात एक ठेका आपण देऊ. त्यामध्ये विविध पदांची आपण मागणी करु. शैक्षणिक अर्हता टाकु. फक्त टेक्नीकल पदाच्या बाबतीत आपण एक टेस्ट घेऊ. आणि मजुरांना आपण डायरेक्टली घेऊ.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आपण आऊट सोर्सींग करतो आहे मान्य आहे. पण ते आऊट सोर्सींग मक्तेदार, ठेकेदार आपल्याकडे आले. तर याला त्या पध्दतीने तितके स्ट्रीक्ट नियम आपण घेतले पाहिजे.

**मा.आयुक्त :-** नक्की, नक्की.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** कुठेतरी त्यांचा अनुभव पाहिजे. त्यांने आपल्या जळगांव शहरामध्येच काम केलेले आहे असे नको पाहिजे. त्याने कुठेतरी मोठया मेट्रो सिटी मध्ये काम केलेले पाहिजे. जेणे करुन त्याला त्या कामात बुध्दी तरी येईल. नाही तर आपल्याच मधला उचलेल आणि आपल्याच मधला टाकेल. मग ते आपल्यातलेच कामे करायचे.चांगल्या क्वालीटीचे लोकं आपण घेतले पाहिजे. हे सगळ जे चालु आहे मागच्या दिड दोन तासापासुन ते फक्त क्वालीटीमुळे काम चालु आहे. त्याच्यामुळे विनंती असेल सुचना असेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** योग्य आहे. योग्य आहे. पण त्यांची शैक्षणिक पात्रता ही पाहायला पाहिजे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि या उपरांतही आप्पा, आपल्याला अथॉरिटी दिलेली आहे. जी आपल्याला योग्य वाटेल की, परफॉरमन्स ओरियंटेड नाही. तुम्ही त्या मक्तेदाराला सांगा की ते रिपलेस करुन द्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** शेवटी जळगांव संपुर्ण शहराचा विषय आहे.

**मा.महापौर :-** हे मक्तेदार घेतांना आपल्याला काही अटीशर्ती...

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण याच्यामध्ये एक अट अशीही पाहिजे. तो बदलणारापण नको. नाही तर तो महिनाभर पाठवेल. तो गेला की, दुसरा येईल. मग परत ए बी सी डी. त्याच्यामध्ये अशी काही तरी अट टाका. ठेकेदाराचे मजुर बदलत असता. आज कोण असेल, उद्या कोण असेल, परवा कोण असेल. तसे नको व्हायला. नाही तर पहिला कोणी काम करेल मग दुसरा.

**मा.महापौर :-** सफाई कामगार आणि यात फरक आहे ना. यातच आपल्याला बदल करुन घ्यायचा आहे. यांना आपल्याला पगारावर भरावा लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो, टेक्नीकल पोस्ट आहे या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** टेक्नीकल पोस्ट आहे पण त्याने वर्षभर काम केले पाहिजे ना आपल्याकडे. नाही तर फक्त तीन महिने करेल.

**मा.उपमहापौर :-** आता आपण जे काम देऊ ना तर त्याच्या सोबत करारनामा करत असतांना हे सर्व अटीशर्ती करुन घेऊ त्याच्याकडुन.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हेच सांगतो आहे मी, तर तिच सुचना मांडली ना मी.

**मा.आयुक्त :-** टेन्डर डॉक्युमेंटस जेव्हा येतील तेव्हा सर्व अधिकारी आणि सन्मा.सदस्य बसुन या बद्दल निर्णय घेऊ.

**मा.महापौर :-** विषय क्र.४ आणि ५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** फक्त एक अट टाका टेन्डर काढतांना की, स्थानिकांना प्राधान्य.

**मा.उपमहापौर :-** आप्पा, कुठलाही मक्ता काढतांना त्याच्यामध्ये हे टाकावेच लागता कारण ते सर्व समायोजक असतो. त्याच्यात कसे असते, त्यात कुठलाही व्यक्ती पार्टीसिपेट होऊ शकतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल्याकडे नसतील तर बाहेरचे घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेची स्थापना दिनांक २१/०३/२००३ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या आस्थापनांवर आजमितीस २६३६ पदे मंजूर आहे. सुधारीत आकृतीबंध मान्यतेस्तव शासनाकडे सादर केला असून त्यास अदयाप मान्यता प्राप्त नाही. मंजूर पदांपैकी आजमितीस १५८३ पदे कार्यीरत असून १०५३ पदे रिक्त आहेत. महापालिका क्षेत्रातील नागरीकांना सोयी सुविधा देणेकामी महापालिकेचा सध्याचा कार्यरत कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा पडत असल्याने विविध विभागात अत्यावश्यक सेवेत कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने तसेच कलम ६६ व शासन निर्देशानुसार कामे करुन घेणेसाठी पदे भरणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य इ.विभागांतर्गत दैनंदिन कामकाजावर ताण पडत असलेने त्यामुळे विभागात काम करण्यासाठी तसेच प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाकडून नव्याने आकृतीबंध मंजूर होत नाही व नवीन पदे भरली जात नाही तोपर्यंत आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कामे करुन घेणेसाठी बाहय यंत्रणेमार्फत एजन्सीकडून (Outsoursing व्दारे) भरणे आवश्यक आहे. अत्यावश्यक संवर्गाच्या रिक्त पदांपैकी गरजेनुरुप खालील पदे भरुन घेणे आवश्यक आहे, जेणे करुन म.न.पा.चे दैनंदिन/महत्वाचे कामकाज करणे सुलभ होईल. तसेच नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०४/०५/२००६ नुसार महानगरपालिकेचा आस्थापनेवरील खर्च महसुली उत्पन्नाच्या ३५% च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आवश्यक पदे बाहय यंत्रणेकडून (Outsoursing) भरुन घेणे गरजेचे आहे.

| पदनाम | आकृतीबंधानुसार प्रस्तावित एकूण पदसंख्या | नव्याने प्रस्तावित केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदे | मक्तेदारामार्फत भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|
| संगणक तंत्रज्ञ (प्रोग्रॉमर) | १ | १ | १ |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १९ | १४ | ८ |
| कनिष्ठ अभियंता (विदयुत) | ५ | ५ | २ |
| कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | १ | १ | १ |
| कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल) | १ | १ | १ |
| कनिष्ठ अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) | १ | १ | १ |
| स्वच्छता निरिक्षक (S.I) | २१ | १९ | ८ |
| लिपीक टंकलेखक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | २०३ | १२७ | ४० |
| तारतंत्री (वायरमन) | ३३ | ९ | ४ |
| पंप ऑपरेटर | २० | ११ | ४ |
| वाहन चालक-यंत्रचालक (अग्निशमन) | ४५ | ४५ | ०५ |
| अग्निशामक विमोचक | १४८ | १४८ | १० |
| व्हॉलमन | ४० | ३४ | १० |
| मजुर | २१६ | ६३ | ३० |

म.न.पा.तील रिक्त पदांपैकी आवश्यक ती पदे वित्त विभाग शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि-२०२२/ प्र.क्र.१५/आ.पु.क मंत्रालय,मुंबई दिनांक २७/०४/२०२२ व त्यात उल्लेख केलेले शासन निर्णय व सुचनेनुसार बाहय यंत्रणेव्दारे भरुन घेणेस खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| पदनाम | पदसंख्या | एका पदास दयावयाचा प्रतिमहा मोबदला | दयावयाचा मोबदला वार्षिक खर्च | नियमित वेतनावर पदे भरणेस ७ वे वेतन आयोगानुसार होणारा वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| संगणक तंत्रज्ञ (प्रोग्रॉमर) | १ | २५०००/- | ३०००००/- | ७४९६२८/- |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ८ | २५०००/- | २४०००००/- | ५९९७०२४/- |
| कनिष्ठ अभियंता (विदयुत) | २ | २५०००/- | ६०००००/- | १४९९२५६/- |
| कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | १ | २५०००/- | ३०००००/- | ७४९६२८/- |
| कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल) | १ | २५०००/- | ३०००००/- | ७४९६२८/- |
| कनिष्ठ अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) | १ | २५०००/- | ३०००००/- | ७४९६२८/- |
| स्वच्छता निरिक्षक (S.I) | ८ | २०८३५/- | २०००१६०/- | ४००५७९२/- |
| लिपीक टंकलेखक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४० | २०८३५/- | १००००८००/- | १५४४८८००/- |
| तारतंत्री (वायरमन) | ४ | २०८३५/- | १०००८०/- | १५४४८८०/- |
| पंप ऑपरेटर | ४ | २०८३५/- | १०००८०/- | १५४४८८०/- |
| वाहन चालक-यंत्रचालक | ०५ | २०८३५/ | १२५०१००/- | १९३११००/- |
| अग्निशामक विमोचक | १० | २०८३५/ | २५००२००/- | ३८६२२००/- |
| व्हॉलमन | १० | १९६२०/- | २३५४४००/- | २९३११२०/- |
| मजुर | ३० | १७७९९/- | ६४०७६४०/- | ८७९३३६०/ |
| एकूण | १२५ | ३१२४२९/- | ३०७१३४६०/- | ५०५५६९२४/- |

बाहय यंत्रणेव्दारे पद भरतांना सदर पदे नियमित भरल्यास जो खर्च होणार आहे व बाहय यंत्रणेव्दारे पद भरल्यास २० ते ३० टक्के बचत होणे अपेक्षित आहे. त्यानुसार बाहय यंत्रणेव्दारे (Outsoursing) रिक्त पदे भरल्यास ३० टक्के पेक्षा जास्त मनपा निधीची बचत होणार आहे.

उपरोक्त पदे भरलेनंतर त्यांना ठोक / किमान वेतनाप्रमाणे उपरोक्त १२५ पदे भरल्यास बाहय यंत्रणेचा जवळपास प्रति वार्षिक रु.३,०८,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असुन त्यावर सेवा शुल्क धरुन अंदाजे रु.३,२५,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. नवीन पदे भरले जात नाही तोपर्यंत अथवा दोन वर्ष करीता (निविदा मंजूर झालेपासून दोन वर्षाकरीता) रु.६,५०,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तसेच किमान वेतन अधिनियमाचे ज्या-त्या वेळेचे अनुज्ञेय विशेष भत्ता / राहणीमान भत्त्यात वाढ होईल त्या खर्चासह तसेच बाहय यंत्रणेव्दारे / अभिकर्त्यामार्फत दरमहा कामे करून घेतलेनंतर संबंधित अभिकर्ता / एजन्सी मार्फत प्राप्त होणाऱ्या देयकाचा खर्च अदायगी करणेस तसेच सदर कामी ई-निविदा मागविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**
**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६**) जळगांव शहर महानगरपालिकेतील लिपीक श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांची परळी नगरपरिषद आस्थापनेवर लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील लिपीक, श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांनी परळी नगरपरिषदेत असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत, ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत मनपा सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळणेबाबत दि.२७/०७/२०२२ चे अर्जान्वये विनंती केलेली आहे.

शितल प्रकाश शंभरकर यांच्या बदलीबाबत कार्यासन अधिकारी, नगरविकास विभाग यांचे पत्र क्रमांक : जमपा-२०२२/सं.क्र.६७९/नवि-२५ दि.२०/०६/२०२२ अन्वये ठरावाच्या प्रतीसह व आवश्यकत्या ना-हरकत प्रमाणपत्रासह अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविलेले आहे. शितल प्रकाश शंभरकर यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित नाही व त्यांचेकडेस कोणतेही घेणे बाकी नाही तसेच लेखा परिक्षणाबाबत कोणताही आक्षेप नाही.

शितल प्रकाश शंभरकर यांची जा.क्र./आस्था/१९२८ दि.०९/११/२०१२ अन्वये मागासवर्गीय सरळसेवा अनुषेष भरती अंतर्गत दि.३०/११/२०१२ रोजी अनु.जाती (SC) प्रवर्गातून पाणी पुरवठा विभागात 'लिपीक' या पदावर वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२००/- ग्रेड पे रु.१९००/- मध्ये कायम पदावर नियुक्ती झालेली आहे, व त्या सध्या लिपीक म्हणून अर्थ विभागांत कार्यरत आहेत.

शितल प्रकाश शंभरकर यांचे पती श्री.रवि राजेंद्र भालेराव हे औष्णिक विदयुत केंद्र दिपनगर येथे कार्यरत असून त्यांची मुळ नियुक्ती औष्णिक विदयुत केंद्र परळी येथील आहे. तसेच शितल प्रकाश शंभरकर यांचे सासरे श्री.राजेंद्र भालेराव यांना ह्दयविकार असून त्यांचेवर वैदयकीय उपचार सुरु आहेत. त्यामुळे शितल प्रकाश शंभरकर यांनी परळी नगरपरिषदेत असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत, नार-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

शासन निर्णयातील तरतूदीनुसार श्रीमती.शितल प्रकाश शंभरकर,लिपीक यांचा जळगांव मनपा सेवेचा कार्यकाळ सुमारे ५ वर्षाचे वर झालेला असल्याने त्यानुसार त्यांनी कळविलेली पसंती, त्यांची प्रशासकीय सोय व वैयक्तीक पसंती विचारांत घेवून आंतरजिल्हा बदली करणेकामी ना-हरकत दाखला देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र सदयास्थितीत जळगांव महानगरपालिकेतील कर्मचारी संख्या कमी असून आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया किंवा अनुकंपा नियुक्ती झालेवर व मनपाला कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने श्रीमती.शितल प्रकाश शंभरकर यांना जळगांव मनपा येथून बदलीच्या जागी हजर होणेकामी कार्यमुक्त करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७**) मौजे जळगांव शिवार स.नं.१४२ मधील खुली जागा (ओपनस्पेस) सांस्कृतिक व शैक्षणिक कामासाठी श्री.श्याम परिवार फाउंडेशन जळगांव या संस्थेला मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** कोण आहे हे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** तेथीलच स्थानिक लोकं आहे.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** या सगळयां पहिले बऱ्याच वर्षानंतर प्रशासनाकडुन प्रस्ताव आलेला आहे रितसर, नाही तर आज पर्यंत प्रशासनाकडुन प्रस्ताव आलेला नाही.
**श्री.नितीन लढ्ढा :-** या प्रस्तावावर सगळया ले-आऊट धारकांच्या सह्या घेऊन खात्री केलेली आहे.
**मा.महापौर :-** त्यानंतर प्रशासनाकडुनच प्रस्ताव मागविला गेला आहे. डायरेक्टली आपण नाही आलेला आहे. विषय क्र.७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आवक क्र.१०६५ दि.२५/०७/२०२२ चे पत्रान्वये, मौजे जळगांव शिवार स.नं.१४२ मधील खुली जागा (ओपनस्पेस) विकसीत करणेकामी श्री.श्याम परिवार फाउंडेशन जळगांव यांना मिळणे बाबत विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर मा.महापौर सो यांनी डॉकेट सादर करणे बाबत आदेशीत केलेले आहे.

शासनाने डिसेंबर २०२० रोजी मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीनुसार अभिंन्यासातील भुखंडधारक यांची सोसायटी/असोशिएशन, यांनाच खुली जागा (ओपनस्पेस) वितरीत करणे बाबत नमुद केलेले आहे.

प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता श्री.शाम परिवार फाउंडेशन जळगांव ही स.नं.१४२ या अभिंन्यासातील नागरिकांची संस्था असल्याबाबत दिसुन येते, सदर अभिंन्यासात एकुण ५२ भुखंड असुन त्यांचे सदर संस्थेस खुली जागा देण्यास दि.०५/१२/२०१९ रोजीचे संमतीपत्र सादर केलेले आहे, या प्रमाणे सदर अभिंन्यासातील एकुण ५२ नागरिकांनी स्वाक्षरीसह संमती पत्र दिलेले आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता मौजे जळगांव स.नं.१४२ या मंजुर अभिंन्यासातील खुली जागा श्री.शाम परिवार फाउंडेशन जळगांव या संस्थेस देणेबाबत आयुक्त ठरवतील त्या अटी व शर्तीस अधीन राहुन खुल्या जागेतील अनुज्ञेय वापरास हस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत प्रशासनाने खात्री करुनच नियमानूसार पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- सोनार रंजना विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८**) केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानाची अंमलबजावणी करणे, स्वनिधी उभारणे तसेच अभियानाच्या सुचना/ निर्देश यांची माहीती घेणे व त्यानूसार अंमलबजावणी करणेसाठी मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. माहिती घेण्यात आलेली आहे. फक्त अमृत २.० च्या इस्टीमेट प्लॅनसाठी जागा नाही. त्या संदर्भात जिल्हाधिकारी महोदयांकडे मागणी केलेली आहे. आपण स्वत: व्यक्तिश: आयुक्त मॅडम याचा पाठपुरावा करून लवकरात लवकर आपल्याला जागा उपलब्ध होतील. जेणे करून या अमृत २.० ची अंमलबजावणी जितक्या तातडीने शक्य होतील तितक्या लवकरात लवकर करणे गरजेचे आहे. तर त्यानुसार आपण प्रयत्न करावे.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्या अमृतच्या विषयावरूनच सर्व लोकप्रतिनिधींनी खुप त्रास भोगलेला आहे. आणि त्यामुळे आता मला असे वाटते की, चुकांची पुर्नवृत्ती इथुन कुठेतरी प्रशासनाने टाळली पाहिजे. याचा विस्तृत डी.पी.आर. तयार करुन तो नागरीकांसाठी प्रसिध्द करावा. सुचना आणि हरकती मागविण्यासाठी. जेणे करून निदान यावेळेला तरी आपल्याला सफर व्हाव लागणार नाही. आयुक्त महोदया, तुमच्याही लक्षात आणुन देऊ इच्छिते मी, ज्या काही

उणिवा वगैरे असतील त्या सुचना आणि हरकती मधुन दुर होऊ शकते. आणि जामनेर नगरपरिषदेने त्यांच्या अमृतच्या कामाच्या वेळेला त्या कामातच रस्ते दुरूस्तीसाठी सुध्दा निधी उपलब्ध करून घेतलेला होता. केंद्राकडुनच तो निधी उपलब्ध झालेला होता. आपण अमृत १.० च्या वेळेला हे केले नाही. निदान २.० च्या वेळेला तरी आपण या चुकांची दुरूस्ती करावी. जे काही रस्ते आता पुन्हा खोदले जाणार आहे. ते रस्ते पुन्हा दुरूस्तीसाठीचा निधी आपण त्याच्यातच मागावा. केंद्र द्यायला तयार आहे. दोघी हातांनी भरभरून द्यायला तयार आहे. आपणच सहमत नाही की, आपण योग्य पध्दतीने योग्य वेळी मागणी करत नाही. तर इथुन कुठेतरी आपण या सगळया गोष्टींची दक्षता घ्यायची आहे. आधी ज्या चुका झाल्या त्या आपण या वेळेला टाळा आम्ही सगळे प्रशासनाकडुन आशा करतो, पुन्हा एकदा सांगते विस्तृत डी.पी.आर. नागरीकांच्या सुचनेसाठी आणि हरकतीसाठी प्रसिध्द करा. फक्त अधिकाऱ्यांच्या भरोश्यावर बसु नका. अधिकाऱ्यांनी काय काय घोड घातलेले आहे. आणि त्यामुळे आपण सगळेच किती सफर झालेलो आहोत. हे उघड झालेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, मला अश्विनभाऊ बोलले , खरं विषय अमृतचा येईल तेव्हा बोला म्हणे. या अनुषंगाने मला वाटते की, आपले जी कनेक्शनचा जो विषय आहे जळगांव शहरातले. मी अमृतचा समजुन कनेक्शनचा विषय मांडत आहे. हा मला वाटतो भुयारी गटारींचा विषय आहे. हे सुरूवातीला मांडायला पाहिजे होते. पण या माणसामुळे मला हा विषय चुकीच्या वेळेस मांडावा लागत आहे. एक आपला सुप्रिमचा निकाल लागलेला आहे. जे आपण कनेक्शन देतो ना जळगांव शहराच्या नागरीकांना, भाडेकरींना देत नाही आपण कनेक्शन तर त्या संदर्भात सुप्रीमचा निकाल आहे. दि.२३/०५ चा निकाल आहे. दोन्ही भाग मी तुम्हाला वाचुन दाखवितो. म्हणजे तो विज कनेक्शनच्या बाबतीतला आहे. तो आपल्याला तसा लागु होऊ शकतो. ते पण लक्षात घेणे आहे आपल्याला. It is now where settled a proposition of law that electricity is a basic amunity of which a person can not be deprived. Electicity can not be...

**श्री.नितीन लढ्ढा :-** जाऊ द्या ना आप्पा तुम्ही मराठीत सांगा ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरं, ठिक आहे, मी मराठी मध्ये सांगतो. ताई कडुन मी मराठीत करून घेतलेले आहे. लिगल ॲडव्हकेट कडुन मी करून घेतलेले आहे. तो कायदा असे म्हणतो की, विज देणे ही मुलभुत सुविधा आहे. कोणत्याही व्यक्तीला आपण नाकारु शकत नाही म्हणुन विज देयक नाकारु शकत नाही. संस्थेने फक्त खातरजमा करायची आहे. विज कनेक्शन मागणारी व्यक्ती प्रत्यक्ष ती जागेचा ताबा धारण करते. सुप्रिमचा निकाल आहे. न्यु दिल्ली दि.१३ मे २०२२ चा. आता बेसिक ॲम्युनिटी बोलेले आहे ते. आणि पाणी तर आवश्यक गरज आहे. ही ॲम्युनिटी आहे. अत्यावश्यक गरज आहे. भाडेकरीला जर कोणताही घर मालक, फक्त कायद्यातील आपण तरतुदी पाहावे की, त्याला कनेक्शन भेटल्यानंतर त्याच्या निकालावर काही परिणाम होत असेल. तर मालकाच्या नावाने द्या. काही तरी ते पाहुन आपण हे धोरण स्विकारायला पाहिजे. आणि आपण कनेक्शन द्यायला पाहिजे असे मला वाटते. जळगांवातील बऱ्याच भाडेकऱ्यांचे कनेक्शन बाकी आहे. प्रत्येक्ष मी सांगतो. येथे जेवढे नगरसेवक आहे त्यांच्यापेक्षा जास्त भाडेकरु माझे आहे. मी सगळयांना द्यायला लावले आहे कनेक्शन.

**मा.महापौर :-** भाडेकरुसाठी सुध्दा धोरण ठरविलेले आहे ना. देतो आहे आता आपण कनेक्शन.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही. दिलेले नाही. बऱ्याच ठिकाणी दिलेले नाही. ते द्यावे लागेल आपल्याला.

**मा.महापौर :-** द्यावे लागतील आपल्याला त्यांना.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते संस्थाचे भाडेकरु असो की, आपले भाडेकरु असो. त्यांना द्यायला पाहिजे. तुम्ही पाण्यापासुन वंचित शेवटच्या माणसाला ठेवु नाही शकत. म्हणजे पाणी शेवट पर्यंत जायला पाहिजे. प्लिज.

**मा.उपमहापौर :-** अमृत २.० चे निर्देश प्राप्त झालेले आहे. त्याच्यामध्ये मलनिस्सारण, जलनिस्सारण, हरित क्षेत्रफळ, याच्यासाठी आता, जसे आता ताईंनी सांगितले त्याचे विस्तृतपणे आपल्याला डी.पी.आर. तयार करावा लागणार आहे. म्हणजे Detail Project Report त्या Detail Project Report मध्ये मागच्या आपल्या ज्या चुका झाल्या आहेत. रस्त्यांचे नियोजन केलेले नव्हते, अमृत योजनेत, पाणीपुरवठा केला तेव्हा मिटरचे नियोजन केलेले नव्हते. त्याच्यानंतर पुढची जी आपली योजना राबविली जाणार. याच्यामध्ये ज्या मागच्या ज्या काही चुका झाल्या त्या नको पाहिजे. यासाठी डी.पी.आर. बनविण्यासाठी मॅडम आपण एक एजन्सीची नियुक्ती केली पाहिजे. अशी एजन्सी पाहिजे की, ज्याने याच्या अगोदर समकक्ष महानगरपालिकेंचा डी.पी.आर. बनविलेले असेल. आणि त्या बाबतीमध्ये ज्यांचा अभ्यास चांगला असेल. आणि ज्या ठिकाणी त्यांनी अश्या प्रकारे काम केलेले असेल. आणि

भविष्यात कुठेच अडचण निर्माण होणार नाही. तश्या पध्दतीचा डी.पी.आर. आपण संबंधीत एजन्सीकडुन तयार करून घेतला पाहिजे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, त्याच्यात असे ही टाका की, एक प्रभागाचे काम पुर्ण झाल्यानंतरच दुसरा प्रभाग सुरु करता येईल. आणि ही आवश्यक नोंद त्याच्यात करा. कारण २.० मध्ये महाबळ परिसर आहे. प्रभाग क्र.१३, पुर्ण जळगांवसाठीच असेल हे रूल. एक कोणताही करा. पण एक पुर्ण करा मगच दुसऱ्याला सुरुवात होईल. हे लिहुन घ्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर म्हणत आहे ताई. तत्कालीन जे अधिकारी किंवा जे पदाधिकारी असतील. खरंतर जेथे ही योजना पहिले राबविली गेली तेथे जाऊन पाहणी करायला पाहिजे होती. जळगांव शहर इतका मोठा आहे. सर्व जळगांव शहर खोदुन ठेवले. आता झोन वाईज, तुम्ही १० झोन करा, ४ झोन करा, ८ झोन करा. झोन करा, त्याच्यामध्ये दोन वार्ड येतील, तीन वार्ड येतील त्या वार्डाचे अगोदर करा नंतर पुढचे करा.

**मा.उपमहापौर :-** बोरोले साहेब आता याच्यामध्ये इस्टीमेट सादर केल्यानंतर तिकडुन आपल्याला आले का काही, जागा उपलब्ध करून दिले बाबत पत्र दिले किंवा काही. मॅडम त्याच्यासाठी आपल्याला पाठपुरावा करावा लागणार आहे.

**मा.आयुक्त :-** तहसिलदारांना बोलले, नायब तहसिलदाराला बोलवले, त्यांनी याद्या दिल्या. एक दिवस येतो म्हणे, पण एकही जागा आपल्याला सापडत नाही.

**मा.उपमहापौर :-** कुठपर्यंत आपण असेच चालु देणार आहे. आपल्याकडे जागा उपलब्ध नसतील, शासनाकडे उपलब्ध नसतील तर त्याच्यासाठी जागा उपलब्धी करीता काही तरी करावे लागेल ना. कुठपर्यंत हे सर्व असच चालेल. निर्देशचे तर याद्या झालेत ना फायनल.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सर्व सुचनाची इतिवृत्तात सुध्दा नोंद घ्यावी. आणि सदरचा डी.पी.आर. तयार करण्यासाठी एखादी एजन्सी आपण नियुक्त करावी. सर्वानुमते विषय क्र.८ हा मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत २.० अंतर्गत शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सुचनांनुसार महानगरपालिकेने सिटी वॉटर बॅलन्स प्लॅन, सिटी वॉटर ॲक्शन प्लॅन व Water body rejuvenation plan तयार करुन अभियानाच्या संकेतस्थळावर सादर केलेला आहे.

अमृत अभियान २.० च्या अंमलबजावणी साठी राज्य शासनाने शासन निर्णय क्रं.अमृत-२०२२/ प्र.क्रं.१४१/नवि-३३ दिनांक १४ जुलै २०२२ नुसार निर्देश सर्व महानगरपालिकांना दिलेले आहेत. सदर अभियानाचा कालावधी २०२१-२२ ते २०२५-२६ आहे. त्यानुसार सदर कामाची व्याप्ती दिलेली असून यात खालील घटकांचा समावेश आहे.

- मलनिस्सारण प्रकल्प
- सांडपाण्याचा पुर्नवापर व पुर्नप्रक्रिया प्रकल्प.
- जलसाठयांचे पुनरुज्जीवन प्रकल्प.
- हरीत क्षेत्र प्रकल्प.

सदर कामी वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| केंद्र शासन | राज्य शासन | महानगरपालिका हिस्सा |
|---|---|---|
| ३३.३३% | ३६.६७% | ३०% |

सदर अभियानासाठी महानगरपालिका हिस्याची उभारणी शासन निर्णयातील अ.क्रं.९ नुसार " राज्य शासनाने तसेच स्थानिक स्वराज्य संस्थानी स्वहिस्याचा निधी उभारतांना म्युनिसिपल बॉंड, कर्ज, राज्य शासनाने अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान याचा वापर करावा. त्याचप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अमृत २.० अभियाना अंतर्गत प्रकल्प किमतीपैकी स्वहिस्याची रक्कम वित्तीय संस्थाकडून कर्ज घेवून उभारता येईल व त्याकरीता आवश्यकतेनुसार शासनाची परवानगी घ्यावी " या निर्देशानुसार स्वहिस्याच्या रकमेचे नियोजन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच या शिवाय सदर अभियानाचे व्यवस्थापनाकामी शासनाचे निर्देश, मान्यतेच्या कार्यकक्षा यांची माहीती शासन निर्णय क्रं.अमृत-२०२२/ प्र.क्रं.१४१/नवि-३३ दिनांक १४ जुलै २०२२ च्या शासन निर्णयात दिलेल्या असून सदर सुचनांची माहीती घेवून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अमृत योजनेच्या प्रोजेक्टमध्ये मागे ज्या काही चूका झाल्या आहेत त्या चूकांची पुर्नरावृत्ती होणार नाही याकरीता याचा विस्तृत डी.पी.आर. तयार करुन तो नागरीकांसाठी प्रसिध्द करावा. डी.पी.आर. तयार करण्यासाठी प्रशासनाने निविदा मागवुन एका एजन्सीची नियुक्ती करावी. एजन्सीची नियुक्ती करताना ज्या एजन्सीने याच्या अगोदर समकक्ष महानगरपालिकेंच्या डी.पी.आर. बनविलेला असेल आणि त्याबाबतीमध्ये ज्यांचा अभ्यास चांगला असेल आणि त्यांनी अशा प्रकारे काम केलेले असेल अश्या एजन्सीची नियुक्ती करावी. याबाबत भविष्यात कुठेच अडचण निर्माण होणार नाही अश्या पध्दतीचा डी.पी.आर. संबंधीत एजन्सीकडुन तयार करुन घेण्याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.

सभागृहामध्ये सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९**) केंद्र शासनाच्या अमृत २.० अंतर्गत अंबरझरा तलाव क्षेत्राचे पुनरुज्जीवन करणे कामी प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, येथे जो मंजुरीचा प्रस्ताव आलेला आहे. अर्थातच याच्या मंजुरीला काही हरकत नाही. पण मला असे वाटते की, या वेळेला आपण जो आपला मुख्य तलाव आहे मुख्य तलाव मेहरुण तलाव त्याचा सुध्दा प्रामुख्याने विचार करायला हवे. मुख्य तलावात सगळयात मोठी अडचण जी आहे ती आहे सांडपाणी, जे सांडपाणी येत आहे. त्या सांडपाण्यावर प्रक्रिया होणे खुप आवश्यक आहे. त्यासाठी आपण काय नियोजन करतो आहे. मेहरुण तलावाच्या आजुबाजुची वस्ती ती प्रचंड वेगाने वाढत आहे आणि ती वाढतच राहणार आहे. कारण तो वाढीव वस्तीचाच भाग आहे. पुर्व, पश्चिम आणि दक्षिण भागातुन तलावात सांडपाणी येत आहे. आणि याच्यावर प्रक्रिया प्रकल्प इमिजेट होणे आवश्यक आहे. यासाठीचा सुध्दा प्रस्ताव आपला शासनाकडे ताबडतोब रवाना होणे आवश्यक आहे. एस.टी.पी. प्लॉन्ट करण्यात यावे मला असे वाटते. केंद्र यासाठी आपल्याला निश्चितच निधी देईल. कारण या सगळया योजना संपुर्ण भारत भरात योग्य पध्दतीने राबविले जावा हा केंद्राचा उद्देश आहे. आणि त्यासाठीच मी पुन्हा एकदा सांगत आहे तेच की, योग्य वेळी योग्य पध्दतीने आपल्याला मागणी करणे मात्र आवश्यक आहे. या अंबरझरा तलावाबद्दल आयुक्त महोदया तुमच्या एक लक्षात आणुन देते मी, काही व्यक्ती स्वखर्चाने मागे या अंबरझरा तलावाचा गाळ काढुन द्यायला तयार होते. मात्र तत्कालीन आयुक्तांनी, प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी त्यावेळेला त्याला नकार दिला. त्यामागची कारणे सुध्दा सांगण्यात आली नाही. थातुरमातुर कारणे सांगण्यात आली की, त्या तलावाचा गाळ काढला तर त्या तलावाचे खोलीकरण होईल. आणि तेथुन मेहरुण तलावामध्ये जे पाणी येत आहे. ते मेहरुण तलावात येणार नाही. मेहरुण तलाव कोरडा पडेल. असे हास्यस्पद कारणे त्या वेळेला काढण्यात आले. जे स्वखर्चाने काही व्यक्ती करुन द्यायला तयार होते. मी स्वत: त्याची साक्षीदार आहे आणि कदाचित आपल्यालाही तो विषय माहिती असेल ज्ञात असेल. ठिक आहे. असु द्या आता जे झाले ते. पण आता येथे जे दिसत आहे प्रस्तावात दिसत आहे, तलावाची खोली वाढविणे, तलावाची बांधण्याची मजबुतीकरण करणे. म्हणजे काय ? शेवटी प्रशासनाने मान्य केले की, तलावाची खोली होणे आवश्यक होते. त्यातील गाळ काढणे आवश्यक होते. जे आपल्याला त्या वेळेला त्यांच्या खर्चाने करुन मिळणार होते. फ्री ऑफ कॉस्ट करुन मिळणार होते. ते प्रशासनाच्या आढमोठयापणाने होऊ शकले नाही. याची सुध्दा प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. केंद्राकडे या विषयासाठी मुख्य तलाव जो आहे आपला मेहरुण तलाव त्या संदर्भातला सुयोग्य प्रस्ताव ताबडतोब पाठवावा. आपले खासदार साहेब श्री.उन्मेशदादा पाटील केंद्राकडुन आपल्याला योग्य तो निधी मिळुन

देण्याकामी संपुर्ण सहाय्य करतील. अशी मी सभागृहाला त्यांच्यावतीने ग्वाही देते. पण या बद्दलचा संपुर्ण अंगाने विचार व्हावा. अंबरझरा तलावा सोबतच मेहरुण तलावाचा सुध्दा. या सगळया सुचनांचा अंतरभाव या ठिकाणी करावा आणि या विषयाला मंजुरी द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते पाठविण्यात आले होते. आजच्या लोकमतलाही ती बातमी होती. हे जे पाणी आज सेंट टेरेसाकडुन वाहुन मेहरुण तलावामध्ये उतरत आहे. हे पुर्वी उतरायचे नाही. कुठेतरी आरोग्य विभागाकडुन या संदर्भात काही तरी दुराई होत आहे. हे पाणी पुर्वी या पध्दतीने तेथे यायचे नाही. काही भागांकडुन, श्रीकृष्ण लॅनकडुन ते पाणी येते नेहरु नगर भागाकडचा किंवा आता तेथे जी नविन वसाहत झाल्या. त्याचे पाणी येते ते आपण समजु शकतो. परंतु हे जे सेंट टेरेसाकडुन येणारे पाणी आहे. याला आपण कुठेतरी आडोसा आणु शकतो. तश्या पध्दतीने नेहरु नगर भागाकडुन आपण सर्व्हे केला. आणि जो मुस्लीम कब्रस्थान आहे पुढे मोहाडी रस्त्याकडे, त्या रस्त्याच्या बाजुला गटार आहे. हे पाणी व्यवस्थीत चैनलाईज केले. तर कमीत कमी हे आता जो जाणारा पाणी आहे. सेंट टेरेसाकडुन याला मात्र वळवता येईल. ज्या काही इस्टीमेट प्लॅनच्या संदर्भात आपल्याकडुन ज्या काही सी.एस.आर. मध्ये ज्या काही आपल्याकडे कोणी व्यक्ती अप्रुड झालेल्या आहेत. तो प्रयोग आपण करा. त्या बद्दल वाद नाही. परंतु हा जो मोठया प्रमाणावरती फ्लो जात आहे. आणि त्याच्यामुळे त्या तलावाचा सौंदर्यीकरणही खराब होत आहे. आणि पर्यावरणही खराब होत आहे. ते कमीत कमी आपल्याला छोटयाश्या स्टडीमुळे कंट्रोल करता येईल. त्याच्या बाबतीत थोडेसे गांभिर्याने विचार करावा.

**मा.आयुक्त :-** बघु ते पाणी आपल्याला डायव्हर्ट करता येईल का ? आणि मे मध्ये मॅडम अमृत पोर्टलवर माहिती मागविली होती. त्या वेळेला या मेहरुण तलावाचा सुशोभिकरण आणि अंबरझरा असे दोन्ही प्रोजेक्ट आपण भरलेले आहे. पी.एम.ओ.ऑफिस म्हणजे राज्य शासनाकडुन फक्त अंबरझराच प्रपोझड करण्यात आले.आणि तो सँक्शन म्हणुन आपण आता मान्यतेला घेतलेला आहे. मेहरुण तलावाचा सुध्दा सुशोभिकरणाचा ६८ लाखाचा प्रस्ताव आहे. तो पोर्टलवर पेन्डींग आहे. तर आपण नक्कीच खासदार साहेबांच्या मार्फत त्याचे ही करु. आणि याच्या बाबतीत जे एस.टी.पी.करण्याचा चाललेला आहे. याचे टाऊन प्लॅनिंग मार्फत सर्व्हे केला. कुठले पाणी जाते किती पाणी जाते. त्या अनुषंगाने आपण सी.एस.आर.मध्ये एस.टी.पी. घेण्याचा प्रयत्न करत आहोत. कारण अमृत २.० मध्ये ड्रेनेज लाईन आहे. तर रिपीटेशन ऑफ वर्क होऊ नये म्हणुन आपण सी.एस.आर.मध्ये करतो आहे. सुप्रिम किंवा जैन इरिगेशन किंवा अजुन एक दोन संस्था याच्यात करायला तयार आहेत. टी.पी.आर. तयार करायला सुध्दा सांगितलेले आहे. त्या सगळया पाणीच्या लाईन्स मध्ये घ्यावे लागतील आपल्याला. तो सुध्दा ४-५ सी.आर. पर्यंत कदाचित प्रोजेक्ट जाऊ शकेल. म्हणुन ते सी.एस.आर.मध्ये घेतले ते. May be ३-४ महिन्यात त्याचे काम दिसायला लागेल.

**मा.महापौर :-** विषय क्र.९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं. ८७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत २.० अंतर्गत शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सुचनांनुसार महानगरपालिकेने सिटी वॉटर बॅलन्स प्लॅन, सिटी वॉटर ॲक्शन प्लॅन व Water body rejuvenation plan तयार करुन अभियानाच्या संकेतस्थळावर सादर केलेला आहे.

अमृत अभियान २.० च्या अंमलबजावणी साठी राज्य शासनाने शासन निर्णय क्रं.अमृत-२०२२/ प्र.क्रं.१४१/नवि-३३ दिनांक १४ जुलै २०२२ नुसार निर्देश सर्व महानगरपालिकांना दिलेले आहेत. सदर अभियानाचा कालावधी २०२१-२२ ते २०२५-२६ आहे. सदर घटका अंतर्गत महानगरपालिकेने मेहरुण तलाव व अंबरझरा तलाव या जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे कामी प्रस्ताव Online सादर केलेले आहेत.

सदर कामी प्रथमत: अंबरझरा तलावाचे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार महानगरपालिकेच्या पॅनेल वर नियुक्त असलेले वास्तु विशारद ऑर्कीटेक्ट,जळगांव यांची अंबरझरा तलावाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी नियुक्ती करण्यात आलेली आहे. वास्तुविशारद यांनी दिनांक २८/०७/२०२२ ला कामाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. या कामांत तलावाची खोली वाढविणे, बांधाचे मजबूतीकरण करणे, तलावाचे गेट दुरुस्ती करणे, चारीचे मजबूतीकरण करणे, झाडे लावणे यांचे ढोबळ अंदाजपत्रक रक्कम रु.४,९८,८२,०८०/- (५ वर्षे देखभाल

दुरुस्ती खर्च रु.१०.०० लक्ष सह) मात्रला प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने याबाबत भविष्यात काही अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

तसेच मेहरुण तलावामध्ये आजुबाजूच्या परीसरातील सांडपाणी वाहून येत असल्याने सदर सांडपाण्यावर प्रक्रिया होणे आवश्यक असल्याने तसेच तलावातील गाळ काढून तलावाची खोली वाढवणे आवश्यक असल्याने व इतर कामे करणेसाठी निधीची मागणी करणे कामी प्रस्ताव मा.केंद्र शासनाकडेस पाठवावा. व मेहरुण तलावात येणाऱ्या सांडपाणी बाबत सुध्दा प्रशासनाने नियोजन करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०**) रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांचे कडुन शासकीय विश्रामगृह येथील जुने शौचालय तोडुन नविन पे अ‍ॅण्ड युज तत्वावर महिला व पुरुषांकरीता शौचालय बांधणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि या सोबतच बोरिंग करायला सुध्दा परवानगी देण्यात यावी. बोरींगचा खर्च ही सदरहु संस्था करायला तयार आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.अनंत जोशी :-** येथे सुचना करु शकतो किंवा विनंती करु शकतो. येथे अडचण कशी आहे की, आपण नविन स्टॅण्ड समोर करणार होते. सुप्रिमच्या मार्फत, जसे आपण सागर पार्कला केले, जसे आपण इतर ठिकाणी करणार आहोत. नविन स्टॅण्ड जवळ आपण जे करणार होतो तेथे आपण प्रस्तावीत केले होते की, तेथे स्नानगृह पाहिजे.म्हणजे स्थानिक परिसर असेल, मार्केटचा एरिया असेल, नविन बस स्टॅण्ड असेल किंवा शहरातील मध्यवर्ती ठिकाण असेल. एक वर्ग असा आहे शहरात, असतोच प्रत्येक गांवात असतो की, त्यांना आंघोळीची सुविधा दिलेली नसते. आणि त्या लोकांना आंघोळीसाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. आता भाऊ महापौर असतांना जुन्या नगरपालिकेच्या जागेवर जे सुप्रिमचा टॉयलेट बांधलेले आहे. त्याठिकाणी आपण स्नानगृह केलेले नव्हते पण त्या ठिकाणी मागणी यायची त्या ठिकाणचे लोकं यायचे. त्याबाबतीत आंघोळीसाठी. तर एक टॉयलेट बंद करुन आपण त्यांना आंघोळीची व्यवस्था करुन दिलेली आहे. तर माझे म्हणणे असे आहे की, आपण स्टेशन परिसर किंवा मार्केटचा भाग आहे. कारण शहरामध्ये एक वर्ग असा असतो की, त्यांना शहरामध्ये आंघोळीसाठी जागा पाहिजे असते. तर आपण त्यांना सजेस्ट केले पाहिजे की, एक स्नानगृह त्या ठिकाणी असले पाहिजे ही माझी विनंती आहे.

**मा.महापौर :-** या ठिकाणी.

**श्री.अनंत जोशी :-** या ठिकाणी, स्वच्छतागृहासोबत एक स्नानगृह, एकच एक ब्लॉक फक्त त्या करीता. एवढी माझी विनंती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे महत्वाची आहे. आता सुप्रिमवाले तेथे युरिनलचे पैसे घेतात. कारण त्यांनी त्या मध्ये घुसण्यासाठीच ते दांडा आहे. कॉईन टाकल्याशिवाय तो उघडत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे नाममात्र चार्ज आहे रु.१/-

**श्री.विशाल त्रिपाठी :-** युरिनलचे नका घ्या ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्हाला काय फरक पडतो. अहो तो रु.१०/- ची सिग्रेट पितो. रु.१०/- ची चहा पितो. रु.५/- चा गुटखा खातो. आणि रु.१/- द्यायला काय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** टॉवर पासुन ते स्वातंत्र्य चौकापर्यंत एक पण स्वच्छतागृह नाही.

**श्री.अनंत जोशी :-** मग ते टॉवरपासुन ते स्वातंत्र्य चौकापर्यंत का नाही. त्या लोकांचे नंबर तुम्हाला देईल. त्या लोकांचे नांव तुम्हाला सांगेल. त्यांना जाऊन तुम्ही जाब विचारायचे की, नविन बस स्टॅण्ड समोरचा प्रोजेक्ट तुम्ही का बंद पाडला. तुम्हाला नांव आणि नंबर देतो. तुम्हाला माहित आहे. पण तरी तुम्हाला देईल. दुसरा विषय तुम्ही जे रु.१/- बद्दल बोलत आहात ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे दोघी पण जे बोल आहे ना तेच आहे ते लोकं. तिसरा कोण आहे.

**श्री.अनंत जोशी :-** त्या ठिकाणी विशालभाऊ तुम्ही रु.१/-चा जो विषय करत आहात ना. त्या ठिकाणी दोन कर्मचारी दिवसभरासाठी असतात त्यांचा पगार २०-२० हजार रुपये असतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पगार लागतो, लाईटबिल लागतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** पे ॲण्ड युजच राहु द्या बरोबर आहे.

**श्री.अनंत जोशी :-** शौचालयासाठी शौचालयात येणारे मोजके लोकं असतात. येतात तर युरिनसाठीच येतात. आणि तुम्ही जर फुकटात घुसु दिले ना. तर महापालिकेचे स्वच्छतागृह आहे तशी अवस्था होईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी मत मांडले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मत मांडण्याचा अधिकार आहे त्यात काही दुमत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही मत मांडा. आम्ही खुलासा करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमचे मत मांडण्याचा अधिकार आहे. वादाचा मुद्दा नाही. परंतु ते शौचालय सुस्थितीत राहावे. रु.१/-ची किंमत काहीच राहिलेली नाही. परंतु कमीतकमी त्या स्वच्छतागृहाची स्वच्छता तरी राखली गेली पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही मत मांडले आम्ही खुलासा केला पण याच्या शिवाय ते मेनटेन होऊ शकत नाही महापालिकेच्या स्वच्छतागृहासारखी वाईट अवस्था होईल त्याची.

**श्री.महेश चौधरी :-** बंटीभाऊ, नितीन भाऊ, तुमचे सगळे मत मांडले जात आहे. आपल्याकडुन मी एक मत मांडल आहे त्यालाही मान्यता दिली गेली पाहिजे असे मला वाटते. त्याच प्रमाणे भंगारच्या संदर्भात जो विषय झाला. त्यालाही मान्यता झाली पाहिजे होती. कारण प्रत्येक विषयाला आपण एकमेकांना क्रॉस करत गेले तर होणारच नाही. बंटीभाऊ आपण जर प्रत्येक विषयाला क्रॉस करत गेले की, हे राहु द्या. रु.२०,०००/- कोई बडी बात नही. रु.१/- कोई बडी बात नही. मग कसे होईल काम. सगळया गोष्टी मेनटेन झाल्या पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरपालिकेच्या खजिण्यात पैसे आहे मुतारीसाठी त्याच्यातुन बांधुन घेतले पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** अहो. मेनटेन होत नाही ना भाऊ. मेनटेन होत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** लोकांना सेवा द्यायची आहे ना. लघवीचे पण पैसे घेणार आपण.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं. ८७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.संग्रामसिंग सुर्यवंशी रोटरी क्लब,जळगांव ईस्ट, अध्यक्ष (२०२२-२३) यांनी आवक क्र.३२७ म.का./दि.२०/०७/२०२२ चे पत्र मा.महापौर यांना दिलेले होते.

रोटरी क्लब ईस्ट यांनी जळगांव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शासकीय विश्रामगृह असुन त्या बाहेरील सार्वजनिक शौचालय पूर्नबांधणी करण्याचे नियोजन केलेले आहे, व त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधकाम करण्यास परवानगी दयावी अशी विनंती केलेली आहे. त्या बाबत मा.महापौर यांनी सुचित केलेली शासकीय पद्मालय विश्रामगृहाचा परिसर हा शहरातील मध्यवर्ती व वर्दळीचा असल्याने तेथे नागरिकांच्या सेवेसाठी म.न.पा.तर्फे कोणताही आर्थिक खर्च न करता अदयावत सार्व.शौचालयाची पूर्नबांधणी करणेसाठी सागरपार्क येथील सुप्रिम कंपनिने केलेल्या सुविधांच्या अनुषंगाने व अटी शर्तीवर तसेच प्रशासकीय बाबींचा विचार करुन रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांना परवानगी देण्याची शिफारस केलेली आहे.

जळगांव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पद्मालय शासकिय विश्रामगृह असुन विश्रामगृहाच्या समोर १६ मीटर रुंदीचा रस्ता असुन रस्त्याच्या कडेस विश्रामगृहाच्या भिंतीलगत गटारीजवळ ५.०० मिटर लांब २.५० मीटर रुंद या मापाची जूनी बऱ्याच वर्षापासुन कालबाहय झालेली तुटलेल्या अवस्थेतील मुतारी आहे. त्याच मुतारीच्या जागेवर विश्रामगृहाच्या कंम्पाऊड लगत गटारीवरील व जुन्या मुतारिच्या जागेवर सार्व.शौचालयाची व्यवस्था होऊ शकते असे स्थळ निरीक्षणाअंती दिसुन आले त्या ठिकाणी गटारीमुळे ड्रेजेजची सोय आहे. मात्र पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

तरी रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांना पद्मालय विश्रामगृहा बाहेरील सार्व.रस्त्याच्या जागेवर विश्रामगृहाच्या कंपाऊंडलगत जुन्या मुतारीच्या जागेवर पे ॲन्ड युज तत्वावर सुप्रिम इंडस्ट्रीजला सागरपार्कच्या धर्तिवर खालील प्रमाणे अटी व शर्तीस बंधनकारक राहुन शौचालय बांधकाम करण्यास परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) व्दितीय पक्षकार यांनी करारनाम्यानुसार सदरील सार्वजनिक शौचालयाचे काम हे महानगरपालिकेकडुन नकाशा मंजुर करुन घेवुन मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करावयाचे आहे.

२) यदाकदाचित मंजुर नकाशानुसार जागेवर काम करतांना काही अडचणी निर्माण झाल्यास व्दितीय पक्षकार त्यात आवश्यकतेनुसार बदल करुन तसा फेर नकाशा मंजुरीसाठी सादर करावा.

३) सदर करारनाम्याची मुदत ३० वर्षे राहील, या कालावधीत प्रथम पक्षकार हे व्दितीय पक्षकार यांचेकडुन जागेचे भाडे घेणार नाही. मुदतीत करारनाम्याच्या नुतनीकरणा बाबत व्दितीय पक्षकार यांनाच प्रथम प्राधान्य राहील. त्यांनी नकार दिल्यानंतरच इतर संस्थेबाबत विचार करण्यात येईल.

४) सदर जागेच्या करारनाम्याच्या मुदती पर्यंत संपूर्ण शौचालयाचे व्यवस्थापन, देखभाल, रंगरंगोटी व इतर खर्च हा व्दितीय पक्षकार करतील. या दरम्यानच्या काळात प्रथम पक्षकार अथवा त्यांचे प्रतिनिधी हे कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही.

५) सदर जागेच्या सभोवती सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी काहीही व्यवस्था नाही, तरी अशी व्यवस्था व्दितीय पक्षकार यांनी करुन घ्यावयाची आहे.

६) उपरोक्त जागेची व इमारतीची कायम मालकी सर्वस्वी प्रथम पक्षकार यांची राहील. सदरची जागा व्दितीय पक्षकार यांना व्यक्ती, संस्थेस गहाण, तारण, अगर पोट भाडयाने देता येणार नाही. तसेच सदरील शौचालयाचा व्दितीय पक्षकार हे पे ॲण्ड युज या तत्वावर वापर करतील.

७) करारनाम्यात नमुद जागेचा वापर करारात नमुद केल्या व्यतिरिक्त इतर कामासाठी व्दितीय पक्षकार यांना वापरता येणार नाही.

८) सदरील शौचालयास लागणारा विज पुरवठा आणि पाणी पुरवठा करणे ही जबाबदारी प्रथम पक्षकार यांची राहील. त्यासाठी येणाऱ्या बिलाच्या रकमेची तसेच कोणतेही शासकीय निमशासकीय कर सेस व इतर अनुशंगीक भरण्याची जबाबदारी प्रथम पक्षकार यांची राहील.

९) सदर शौचालयासाठी महानगरपालिकेकडुन कोणत्याही प्रकारचा कर लावण्यात येणार नाही. तशी हमी प्रथम पक्षकार यांची राहील.

१०) सदरील शौचालयाचा पे ॲण्ड युज तत्वावर व्दितीय पक्षकार वापर करेल त्याचे दर खालील प्रमाणे

मुतारी :- १/- रुपया

शौचालय :- ५/- रुपये

वरील दरात भविष्यात दरवाढ करावयाची झाल्यास व्दितीय पक्षकार यांनी प्रथम पक्षकार यांची मान्यता प्राप्त करणे आवश्यक राहील.

११) सदरील शौचालयाचा वापर जळगांव शहरातील तसेच बाहेरगावीच्या सर्व नागरीकांसाठी सार्वजनिक रित्या पे ॲण्ड युज या कर प्रणालीच्या अधिन राहुन करावयाची आहे.

१२) सदर शौचालया बाबत अथवा करारनाम्याबाबत कोणत्याही स्वरुपात वाद, तक्रार, अटी शर्तीचा भंग झाल्यास त्याचे निरसन प्रथम पक्षकार व व्दितीय पक्षकार हे आपसात चर्चा करुन सामंजस्याने मिटवतील. तसेच करारनामा मुदतीत वरील कोणत्याही अटी शर्तीचा भंग केलयास करारनामा रद्द झाल्यास व्दितीय पक्षकार यांना कोणतीही नुकसान भरपाई अदा केली जाणार नाही. तसेच यामुळे मनपा कधीही जागा व इमारतीचा ताबा काढुन घेईल.

१३) सदर करारनाम्यातील अटी व शर्ती या उभय पक्षकारांवर बंधनकारक आहेत व राहतील.

नविन शौचालय पे अॅन्ड युज तत्वावर बांधण्यासाठीची जागा ही शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असुन त्या परिसरात महीला व पुरुषांकरीता अशी व्यवस्था जवळ उपलब्ध नाही. त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता दिल्यास महिला व पुरुषांची आवश्यक सुविधा होणार आहे. प्रस्तावित जागा ही मनपा मालकीच्या रस्त्यासाठी जागा असुन शासकीय विश्रामगृह येथील जुने शौचालय तोडून नविन शौचालय बांधकामामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही. त्यामुळे तेथील अस्तिवातील जुनी मुतारी तोडून त्याच जागेवर नविन पे अॅण्ड युज तत्वावर शौचालय बांधणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर ठिकाणी एक स्नानगृह तयार करणेस व मक्तेदार स्वखर्चाने बोअरिंग करणेस तयार असल्याने मक्तेदार यांना त्यांच्या स्वखर्चाने बोअरिंग करणे कामी परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११**) प्रभाग क्र.१४ व १५ चा (भाग) मधील इच्छादेवी चौक ते मोहाडी फाटा पर्यंतचा पाचोरा रस्ता (घोषीत नॅशनल हायवे) डांबरी रस्ते तयार करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२,५७,६८,५८७/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे जळगांव शहरातुन जाणारा हायवे क्र.६५३ जे. ईच्छादेवी चौफुली पासुन ते मनमाड स्टॅण्ड पर्यंतचा रस्ता. हा या पुर्वी राज्यमार्ग क्र.४० होता. कालंतराने त्याचे रुपांतर नॅशनल हायवे मध्ये झाले. आणि त्याला नविन नंबर मिळाला क्र.७५३ जे. ईच्छादेवी चौफुली ते चांदवडपर्यंत हा रस्ता याचे बी.ओ.टी. बेसीस वरती याचे टेन्डर निघाले. टेन्डर होतांना या रस्त्याचे जळगांव शहरामधील ईच्छादेवी ते देवकर अप्पांचे कॉलेज तितपर्यंत ४ किलो मिटर पर्यंतचा रस्ता हा कोणत्या कारणाने वगळण्यात आला. याचे कारण अजुनही गुलदस्त्यात आहे. नॅशनल हायवेला जो शासन निर्णय आहे. राजपत्र तो येथे आहे. आणि त्या राजपत्रामध्ये सुध्दा ते नमुद आहे की, नॅशनल हायवे क्र.६ म्हणजे ईच्छादेवी चौफुली कडुन जाणारा. त्याच्या जंक्शनपासुन हा रस्ता सुरु होऊन मनमाड जंक्शनपर्यंत जातो. त्याचा डी.पी.आर. जो भाग तयार झाला. तो डी.पी.आर.सुध्दा ईच्छादेवी चौकापासुन ते चांदवडपर्यंतचा डी.पी.आर.तयार झाला. आज जवळपास ९० ते ९५ टक्के काम त्या नॅशनल हायवेचे काम अंतीम टप्प्यात आलेले आहे. नेमकं जर ते आज ४ किलो मिटरचा रस्ता त्याच्यामधुन का वगळला गेला हे माहित नाही. या रस्त्याच्या संदर्भात जिल्हानियोजनच्या वार्षिक सभेमध्ये सुध्दा हा मुद्दा मी तेथे उपस्थित केलेला होता. त्या वेळेला मला जिल्हाधिकारी साहेबांनी आश्वस्त केलेले होते की, या रस्त्याचे काम आम्ही नॅशनल हायवेच्या धुळे विभागाकडुन हा विषय मार्गी लावु. त्या अनुषंगाने पत्र व्यवहार सुध्दा झाले. जिल्हाधिकारी साहेबही सकारात्मक होते. परंतु नॅशनल हायवे अथॉरिटीने त्याच्यातुन जी क्युरी काढली ती अत्यंत हास्यस्पद अशी क्युरी आहे. सदरहु पत्र व्यवहार बघितला तर त्या पत्र व्यवहारामध्ये असे आहे की, साधारण हा काही काळापुर्वी हा रस्ता महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची मालकी असतांना जळगांव शहरातले राज्य मार्ग महानगरपालिकेकडे देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेले होते. ज्या वेळेला सन २०१७ मध्ये संपुर्ण देशामध्ये दारु बंदी झाली होती. आणि नॅशनल हायवेच्या अडचणी निर्माण झाल्या होत्या की, नॅशनल हायवे पासुन ५०० मिटर पर्यंत दारु च्या दुकानांना परवानगी नाकारण्यात आली होती. त्यावेळेला हे रस्ते महानगरपालिकेकडे राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन जळगांव शहर महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेले होते. दि.३०/०३/२०१७ रोजी हे रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले. त्यानंतर संपुर्ण जळगांव शहरामध्ये याच्या बद्दल तिव्र नाराजी आणि नकारार्थी प्रतिक्रिया सर्वसामान्यांकडुन उमटायला लागल्या. वृत्तपत्रातुन राज्य शासनावरती टिका व्हायला लागल्या. अवघे चार दिवसानंतर ४ एप्रिल किंवा ४ मे ला राज्य शासनाने दुसरा निर्णय काढला की, संबंधीत सर्व रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे राज्य शासन या शासन निर्णयाद्वारे परत

आपल्या ताब्यात घेत आहे. आणि याची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे राहील. म्हणजे महानगरपालिकेला फारपुर्वी देण्यात आलेले होते.पुन्हा सन २०१७ ला नविन शासन निर्णय येऊन परत दिले आणि एक महिन्या भरानंतर नविन शासन निर्णय काढुन हे संपुर्ण रस्ते राज्य शासनाने आपल्या ताब्यात घेतले. तद्नंतर नॅशनल हायवे घोषित झाला. राज्य शासनाने संपुर्ण कागदपत्रांच्या दस्तऐवजासह हे सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते नॅशनल हायवे अथॉरिटी, धुळे विभागाकडे वर्ग केले. वर्ग केल्यानंतर जिल्हाधिकारी महोदयांनी ज्यावेळेला या विषयाच्या संदर्भातला हा रस्ता नॅशनल हायवे अथॉरिटीने तयार करुन द्यावा. या संदर्भात जेव्हा पाठपुरावा केला. तर नॅशनल हायवे अथॉरिटीने एक हास्यास्पद पत्र पाठविले की, सदरहु रस्ते फार पुर्वी जळगांव शहर महानगरपालिकेला हस्तांतरण केल्याची ताबा पावती दिसुन येत आहे उपलब्ध दस्तऐवजामध्ये परंतु राज्य शासनाने जे दस्तऐवज आम्हाला दिले. त्याच्यामध्ये महानगरपालिकेने पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण केल्याची पावती दिसुन येत नसल्याकारणाने, हे रस्ते महानगरपालिकेने आपल्या स्तरावरती याची देखभाल दुरूस्ती करावी.मला सांगा ज्या रस्त्यांची मुळ मालकी महानगरपालिकेची पुर्वीच नाही. देखभाल दुरूस्ती करीता देण्यात आलेले रस्ते त्याच्यामध्ये सुध्दा कंडिशन हिच होती की याची मालकी ही राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील. हे फक्त तुम्हाला तात्पुरत्या स्वरूपात देखभाल दुरूस्तीसाठी देण्यात आलेले आहे आणि या राज्य शासनाने जे स्वत: या रस्त्याचे मालक आहेत. त्यांनी ते रस्ते स्वत:च्या अधिकारात नॅशनल हायवे ऑथिरीटीला वर्ग केलेले आहेत. मग महानगरपालिकेने ताबा पावती करून दिली काय आणि नाही करून दिली काय याच्यामध्ये कोणतीही कायदेशीरीत्याही काहीही फरक पडत नाही आणि अॅक्च्युली काही फरक पडत नाही. परंतू स्वत:च्या चुकीमुळे नॅशनल हायवे ऑथिरीटी कडुन हा ४ किलोमिटरचा स्पॅन हा कुठल्या पध्दतीने वगळला गेला हे जे काही आहे हा गौडबंगाल फक्त त्यांच्याच विभागाला माहिती आहे. परंतू स्वत:च्या अंगलट येणारा विषय हा अशा पध्दतीने अशी काहीतरी तांत्रिक कारणे देवुन की महानगरपालीकेने हस्तांतरणाची प्रक्रीया पावती करून दिलेली नसल्याकारणाने याची जबाबदारी आमच्यावर नाहीये. मला सांगा की जो रस्ता कधी महानगरपालीकेचा होता तो पुर्वी राज्य शासनाचा होता. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तो रस्ता नॅशनल हायवे ऑथिरीटी कडे वर्ग झाला आणि आता त्या रस्त्याची जबाबदारी कोण स्विकारणार महानगरपालिका आज याची जबाबदारी स्विकारूच शकत नाही. कारण आपण यापुर्वी या रस्त्यावर खर्च करू शकत होतो आणि करत आलेलो आहे आणि ते फक्त यासाठी की त्यामध्ये राज्य शासनाने हे रस्ते महानगरपालिकेकडे देखाभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरण केलेले होते. आज मात्र कायदेशीर रित्या त्या रस्त्यांना परत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे घेवुन नॅशनल हायवे ऑथिरिटीकडे वर्ग केल्यामुळे महानगरपालिका कोणत्या नियमानुसार त्याच्यावर खर्च करून शकेल. वानखेडे साहेब ऑडीटर कोण आहे. मला सांगा की या रस्त्यांची मालकी आपली नाहीये आणि आज त्या रस्त्यावर कधी आपण खर्च केला तर आपल्याला याच्यामुळे ऑडीट मध्ये प्रॉब्लेम येवु शकेल का ?

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त तथा मुख्यलेखापरिक्षक :-** येईल .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग आता या रस्त्यांच करायच काय आणि खर्चाच करायच काय आणि वास्तविक बघितल तर हा विषय नॅशनल हायवे ऑथिरीटीचा आहे आणि नॅशनल हायवे ऑथिरीटीचा विषय म्हणजे हा केंद्र शासनाच्या अखत्यारित्यातील विषय आहे. मा. खासदार महोदयांना सुध्दा यासंदर्भात आपण विनंती करायला पाहीजे आणि त्यांनी सुध्दा जातीने या विषयामध्ये लक्ष द्यायला पाहीजे. कारण शेवटी खासदार महोदयांचा हा मतदार संघ आहे आणि त्याच्यामध्ये जळगांव शहर आणि जळगांव शहराला जोडणारा हा राष्ट्रीय मार्ग आहे आणि तो शहरी हद्दीतुन गेलेला ४ किलोमिटरचा रस्ता आहे. तर ४ किलोमिटरच्या रस्त्याची जबाबदारी आता कोणी स्विकारावी. आपण मागच्या मिटींगमध्ये ताई बोलले की आपल्याला लाजेने मान खाली घालावी लागली. तर ही वस्तुस्थिती आहे हा रस्ता आपण तयार करू शकलो असतो मनपा फंडातुन परंतू याच्या संदर्भात याच्यामध्ये या सगळ्या ज्या अडचणी होत्या या सगळ्या ज्ञात होत्या. परंतू याच्यामध्ये जिल्हाधिकारी महोदय प्रयत्न करताहेत आणि त्या दृष्टीकोनातुन आपण सातत्याने जिल्हाधिकारी महोदयांशी यासंदर्भात पाठपुरावा करतोय. पंरतू ज्यावेळेला जिल्हाधिकारी महोदयांकडुन सुध्दा लक्षात आलं की त्याची सुध्दा या विषयामध्ये असमर्थता दिसते आहे आणि ते सुध्दा याच्यात मदत करू शकत नाहीत. परंतू आता ही जबाबदारी खासदार महोदयांचीच आहे आणि म्हणुन आता आपण या मिटींगमध्ये हे धोरण ठरवल पाहीजे की मा.खासदार महोदयांना विनंती करून तातडीने त्या रस्त्याचा विषय मार्गी लावायला पाहीजे आणि आता महानगरपालिका खर्च करू शकणार नाही आणि आतापर्यंत आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागे लागलो होतो की जळगांव

शहरातुन गेलेले राष्ट्रीय मार्ग हे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन देखभाल दुरस्तीसाठी ताब्यात घेतले असल्याकारणाने ही त्यांची जबाबदारी आहे. परंतू आता ज्यावेळेला आपण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करतो. त्यावेळेला ते म्हणतात की तो आता नही मध्ये वर्ग झालेला असल्याकारणाने आता आम्ही त्याच्यावर खर्च करू शकणार नाही आणि ते हात उंच करून मोकळे झाले. पण या रस्त्याची दुर्दशा इतकी वाईट आहे. महिन्याभरानंतर आता गणपतीचा उत्सव येईल. ३१ तारखेला गणपती बसतील. १० दिवसांनंतर विसर्जन होईल आणि तो रस्ता मुख्य विसर्जनाचा मार्ग आहे आणि तो विसर्जनाचा मार्ग गणपतीच्या पुर्वी नाही झाला. तर पुन्हा गणेश मंडळांच सुध्दा रोष शेवटी हा पुन्हा महानगरपालिकेवर येतो. शेवटी ही महानगरपालिकेची एक नया पैशाची जबाबदारी नाहीये. ही संपुर्ण राष्ट्रीय महामार्गाची ही जबाबदारी आहे आणि मा.खासदार महोदयांनी आपली जी काही शक्ती असेल आणि जे काही भारतीय जनता पक्षाचे सदस्य असतील त्यांनाही विनंती करतो की त्यांनीही खासदार महोदयांना विनंती करावी आणि आम्हीही आपल्या सोबत खासदार महोदयांना विनंती करू आणि हा विषय तातडीने मार्गी लावायच्या संदर्भात हा कुठेतरी विषय तातडीने ठोस निर्णय होण गरजेच आहे आणि हा ठराव याच्यासाठी आपल्याला मंजुर करता येणार नाही कारण हा मंजुर केल्यानंतर मनपा निधीतुन जर कधी हा खर्च झाला तर भविष्यात याच्यामध्ये ऑडीट ऑब्जेक्शन सुध्दा येईल आणि प्रशासनासहीत आपण सुध्दा सगळे जबाबदार राहु

**मा.महापौर :-** दोन मिनिंट विषय क्रं. ११ च्या संदर्भात दोन गोष्टी प्रशासनाला विचारायच्या आहेत. हा जो प्रस्ताव प्रशासनाकडुन आलेला आहे. तर राज्य स्तरावर या रोडाची जबाबदारी घेतली जात नाही. नॅशनल हायवे याची जबाबदारी घेत नाही. जिल्हाधिकारी साहेब सुध्दा याच्यात असमर्थ आहेत. मग प्रशासनाकडुन हा प्रस्ताव कसा आला, दुसरा असा विषय या रस्त्यावरच अतिक्रमण अतिशय तातडीने काढण्यात आले ते कोणत्या आधारावर काढण्यात आले. आपण अतिक्रमण काढायचा विषय केव्हा येतो की एकतर रहदारीला त्याची अडचण होत असेल किंवा आपण ते रस्ते तयार करत असु यावेळेला आपण ते अतिक्रमण काढतो. पण त्याठिकाणी पक्के घर , पक्के दुकान सुध्दा त्या ठिकाणी तोडण्यात आलेले आहे. मग प्रशासनाने ही कार्यवाही का राबवली आणि प्रशासनाने याच्यामधील या सगळया गोष्टी प्रशासनाकडुन आता ज्या गोष्टी नितीनभाऊंनी मांडल्या त्या प्रशासनाला माहिती नव्हत्या का आणि जर माहिती असल्यावर सुध्दा हा प्रस्ताव प्रशासनाकडुन येतो. याच्यामध्ये प्रशासनाने सुध्दा याची दखल घेतली पाहीजे. तर एवढ्या गोष्टीच उत्तर मला प्रशासनाने द्याव.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अस होत असतांना आपण त्याच प्रपोजल जे आहे ते डांबरीच केल आहे. माझा असा अनुभव आहे की तो जो रस्ता आहे तो कित्येक वेळा बनला आणि तो महापालिकेनेच बनविला आहे आणि आता नितीनभाऊंनी सांगीतल की हा नॅशनल हायवेचा आहे , बि एन्ड सी चा आहे , सरकारचा आहे. मग आपण शहरातुन जो जाणारा रस्ता आहे. याची शहरातील लोकांकडुन आपण जी घरपट्टी घेतो, पाणीपट्टी घेतो , इतर कर घेतो. तर याच्यामध्ये सरकारचा आणि महापालिकेचा हा विषय वेगळा वेगळा आहे. शहरातुन जाणारा प्रत्येक रस्ता जो आहे तो महापालीकेनेच केला पाहीजे अस माझ मत आहे ठिक आहे. पण तो डांबरी रस्ता तो टिकणार नाही हे सांगण्यासाठी मी उभा राहीलो आहे. कारण बऱ्याच वेळा तो बनवला आहे आणि खराब झाला आहे म्हणुन त्याला सिमेंटचाच बनवावा अशी माझी मागणी आहे आणि त्याच्यापुढे एक स्मशानभुमी आहे , कब्रस्तान आहे ते तिथे सर्व महाबळ कडील पाणी येते. ज्यावेळी पाऊस येतो त्यावेळी गटार ओवरफ्लो होते आणि जेव्हा नळाला पाणी येत तर ते रस्त्यावरून सतत वाहते. मी गेल्या चार वर्षापासुन हा विषय मांडतोय. पाणी त्या रस्त्यावरून वाहत आणि रस्ता बुडतो , लोकांच्या अंगावर ते पाणी उडत. पाचोऱ्याकडे जाणारे जे खुप सारे लोक आहेत. ते त्या ठिकाणावरून वापरतात आणि महापालिकेला फार चांगली महापालिका आहे अस म्हणुन पुढे जातात. तर तिथे ती मोरी सुध्दा बनवावी याच्याबरोबर आणि हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचाच बनवावा. अन्यथा तो टिकणार नाही. आज अशी परिस्थिती आहे की जे खड्डे आहे फार मोठे आहे आणि ते इतके त्रासदायक आहे. ते बनवलेच पाहीजे तर भाऊंच्या त्या विचाराला आम्ही विरोध करतो आणि तो रस्ता बनला पाहीजे या मताचा मी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, सभागृहाने हा ठराव मंजुर करावा आणि या विषयाला माझा विरोध नोंदवुन घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही जबाबदार नाहीये. आपला काहीच विषय नाहीये.

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई, याच्यामध्ये अस आहे की सदर फंडाच्या मान्यतेसाठी सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळवावी. सक्षम प्राधिकरण म्हणजे काय आहे. याच्यामध्ये नमुद केलेले आहे आणि त्यांचा अभिप्राय आहे.

**मा.महापौर :-** अडीच कोटी रूपयांचा हा रस्ता आहे आणि हा मंजुर केल्यानंतर याच्यामध्ये ऑडीट शक निघायला नको. आणि मी विचारलेल्या दोन प्रश्नांच उत्तर पाहीजे आहे या ठिकाणी गिरगांवकर सर

**श्री.दिलीप पोकळे :-** हे जे पत्र आहे याच्यामध्ये मुख्य कार्यकारी अभियंत्याचा अभिप्राय आहे की सदर फंडासाठी सक्षम प्राधिकरणाची मान्यता सादर करावी. तर सक्षम प्राधिकरण म्हणजे कोण त्यांची नांव या ठिकाणी प्रशासनाने सांगावे.

**मा.आयुक्त :-** कदाचित त्यावेळेस आपली टिम असेल सोनगिरे सांगा.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** मा महापौरताई, आयुक्त महोदया व सन्मा.सभागृह आता यामध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहे. त्याबद्दल मी सभागृहाला अशी माहिती देतो की अतिक्रमण काढण्यापुर्वी डिपीडीसी ची जी बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये राऊत साहेब होते, सुर्यवंशी साहेब होते, बी एन्ड सी चे वरिष्ठ अधिकारी होते. आपले सदस्यही होते. नितीनभाऊही त्या ठिकाणी उपस्थित होते. कलेक्टर साहेब होते. त्यावेळेला अस ठरल होते की , जळगांव शहरामध्ये ४२ कोटींमध्ये जे बी एन्ड सी चे रस्ते चालु होते. त्या रस्त्यांची काम बी एन्ड सी च्या अधिपत्याखाली होणार आहेत. तर त्याठिकाणी ही चर्चा होत असतांनाच त्या डिमार्टच्या रस्त्याचाही विषय निघाला होता. त्यावेळेला कलेक्टर साहेब राऊत साहेबांनी सांगीतले होते की हा रस्ता तुम्ही करायला काय अडचण आहे. त्यांनी अस सांगीतल की आम्ही हा रस्ता करायला तयार राहु. परंतू आम्हाला आधी त्या रस्त्यावरच अतिक्रमण काढुन मिळावं. ते अतिक्रमण जर काढुन दिल तर आम्ही आमच्या प्रपोजल मध्ये त्याचा समावेश करू. तर त्या हिशोबाने त्या आदेशानुसार मग आपण हे टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटला कामाला लावल आणि त्या ठिकाणी त्यांनी मार्कींग केल आणि अतिक्रमण विभागाच्या मदतीने त्याठिकाणच सगळ अतिक्रमण काढुन आपण तो रस्ता पुर्ण रंदीकरणाच काम करून दिल होत. जेणेकरून ते काम करायला बी एन्ड सी ला अडचण यायला नको. आपण परत त्या रस्त्यावर एक सर्वे केलेला होता. जे आपले ४२ कोटींचे ते रस्ते आहेत त्या रस्त्यांवरचे सर्व अतिक्रमण काढणे, टपऱ्या हटविणे हि त्यांची कंडीशन होती तर आपण त्या कंडीशनची अंमलबजावणी केली आहे आणि त्याच्यानंतरच आपण ते अतिक्रमण काढण्यात आले होते.

**ॲड. शुचिता हाडा :-** म्हणजे जे रस्ते बी एन्ड सी करणार असतील त्यांचे अतिक्रमण काढण्यात आले.

**मा.महापौर :-** नाही मग बी एन्ड सी ने सांगीतले होते की जो रस्ता ते तयार करणार आहे ते अतिक्रमण काढण्यात यावे आणि तो रस्ता तयार करून देणार होते.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** हो महापौरताई,

**मा.महापौर :-** मग आता काय अडचण आहे तो रस्ता करायला.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** महापौरताई, आता जसे भाऊंनी सांगीतले की त्यांनी जे नॉमीनल पत्र पाठविले आहे की महापालिकेने कायदेशीर ताबा पावती देवुन हॅन्डओव्हर करून दिलेली नाही.

**मा.महापौर :-** मग त्यांना हे सांगण्याच्या आधी त्याची शहानिशा करण्यात यावी. त्यांनी शहानिशा करून हे डिसीजन घ्यायला पाहीजे होते ना.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** आपण शासनाच्या जि.आर नुसार

**मा.महापौर :-** आपण अतिक्रमण हटवित आहेत, टपऱ्या काढताहेत एवढा मोठा निर्णय घेत आहेत. ठिक आहे तिथे अतिक्रमण काढायला काही हरकत नाहीये. पण तिथे अडचणीच ठरत असेल तर कारण तिथल्या नागरीकांना त्याची आशा राहाते की हा रोड होणार आहे म्हणुन त्यांनी स्वत:हुन ते अतिक्रमण काढुन घेतले आहे आणि आज आपण त्याच्यावरून हा वाद करतोय की हा रोड कोणाचा आहे. म्हणजे त्याचा मुळ मालकी हक्क कोणाचा आहे हेच आपल्याला माहिती नाहीये.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** त्याचा मुळ हक्क नॅशनल हायवेचाच आहे पण आपण बी एन्ड सी कडे ऑलरेडी हॅन्डओव्हर केलेला आहे. म्हणजे शासनाच्या जि.आर नुसार त्या रस्त्यावर आपले कुठलेही अधिकार नाहीयेत. कारण आपण शासनाचा जि.आर फॉलो करत असतो आणि त्याचीच अंमलबजावणी करत असतो.

**मा.महापौर :-** तरी सुध्दा आपण हा प्रस्ताव येतो प्रशासनाकडुन तर हा प्रस्ताव तयार करतांना इतर शहानिशा केली असेल ना की रोड कुणाचा आहे. आपण दुसऱ्याच्या मालकीच्या प्लॉट मध्ये आपण घर कसे बांधु.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** याच्या बाबतीमध्ये त्यावेळेला अनेक बैठका झाल्या आणि त्यानंतर त्यांनी असं उत्तर दिले आहे बी एन्ड सी वाल्यांनी की आपल्याला हा रस्ता तयार करण्यासाठी आम्हाला बजेट मध्ये तरतूद करावी लागेल. शासनाकडे पाठवावे लागेल आणि त्याला कमीत कमी दोन ते तिन वर्षांचा कालावधी लागेल. म्हणुन तो रस्ता तुम्ही करायला आमची कुठलीही हरकत नाही आणि त्याला कंडीशन आहे की त्यांनी आपल्याला महानगरपालिकेला लेखी पत्र दिल पाहीजे की हा रस्ता करायला आमची कुठलीही हरकत नाही.

**ॲड. शुचिता हाडा :-** मग त्यांनी आपल्याला पत्र दिल आहे का ?

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** त्यांनी फक्त लेखी पत्र अस दिल आहे की आमची काही हरकत नाही. महापालिकेचाच रस्ता आहे अस दिलेले आहे.

**(सभागृहात सन्मा.सदस्य चर्चा करीत असतांना सदस्यांनी काय चर्चा केली हे स्पष्ट ऐकु येत नाही.)**

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांनी हात झटकले आहेत. आपल्यावर रिकव्हरी येवु शकते आहे ना.

**ॲड. शुचिता हाडा :-** मागचे जे पत्र आहेत त्यांचा पाठपुरावा केला आहे का?

**श्री.सोनगिरे, क.अभियंता,बांधकाम विभाग :-** हो आपण दिलेले पत्र आणि त्याच्या सोबत शासनाचा जि.आर ही लावलेला होता आणि आवश्यक दस्ताऐवजही लावलेले होते. जस भाऊंनी आता थोड्या वेळा पुर्वी सांगीतले की तो रस्ता आपल्याकडे नव्हताच. तो बी एन्ड सी कडे होता. त्यांनी आपल्याकडे वर्ग केला आणि पुन्हा एक जि.आर काढुन शासनाकडे वर्ग केला होता. म्हणजे बी एन्ड सी कडे वर्ग झाला आणि तो बी एन्ड सी ने नॅशनल हायवेकडे ट्रान्सपर केला. कारण हायवे डिक्लिअर झाल्यानंतर म्हणजे ऑटोमेटीक तो रस्ता नॅशनल हायवे कडे वर्ग झालेला आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** हा जो रस्ता आहे डिमार्ट चा आता नितीनभाऊंनी लक्षात आणुन दिले की आक्षेप निघु शकतो. उपायुक्त साहेबांनीही मंजुर केल की भविष्यात याच्यात आक्षेप निघणार. म्हणजे तुम्हा सगळ्या लोकप्रतिनिंधीना याच्यातुन सतर्क व्हाव लागणार आहे. आमच याचा विषयी काय आहे की गेल्या काही वर्षात अनेक वर्षांपासुन या रस्त्यासाठी भांडण करत आहेत आणि हा रस्ता प्रमुख भागातील आहे तर तो रस्ता प्रमुख भागातील एक रस्ता आहे. जळगांव शहरातील अत्यंत महत्वाचा आणि वर्दळीचा रस्ता आहे. लोकप्रतिनिधींची सामान्य भावना काय आहे की जी गरजेची गोष्ट आहे ती परिपुर्ण झाली पाहीजे. ती परिपुर्ण व्हावी म्हणुन आम्ही आज हा प्रस्ताव मंजुर करणार. ती झाल्यानंतर त्याच्यामध्ये ऑडीट ऑब्जेक्शन निघणार म्हणजे प्रशासन सभागृहासमोर सांगत आहे की आपल्याला याचा अधिकार नाही मग प्रशासनाचे प्रस्ताव परिपुर्ण का येत नाहीत.या कोणत्याच गोष्टी प्रस्तावात नमुद नाहीत. सगळ मोघम स्वरूपाच आहे. याची इतकी फोड करून घेतली आहे प्रतिनिंधीनी की ते आता या सभागृहासमोर येत आहे. आता प्रशासनानेच आम्हाला मार्गदर्शन कराव की या सभागृहाने काय निर्णय घ्यायचा. कारण हा प्रशासकीय प्रस्ताव आहे. प्रशासन त्या सगळ्यांची जबाबदारी घेतं आहे का ? भविष्यात लेखापरिक्षणात जे ऑब्जेक्शन येणार आहे. त्याची जबाबदारी प्रशासन घेणार आहे का ? हा एक पार्ट झाला. दुसरा पार्ट की हा विषय आपण आज जरी नामंजुर केला किंवा तहकुब केला म्हणजे पुनश्च उद्या काय होणार की अत्यंत महत्वाचा रस्ता आपला हा पेंडीग असाच राहणार आहे. आज प्रशासनाने अतिक्रमण हटविलेले आहे. तो रस्ता तसाच पडुन राहणार आहे त्या अवस्थेत, मग त्याच्यावर आपण काय वर्कआऊट करणार. याची कोंडी कशी फोडायची हे आता आम्हाला प्रशासनाने मार्गदर्शन करावं.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई याच एक छोटस उदाहरण आहे की, आता शिवाजी नगर पुलाचा विषय होता, कुलकर्णी साहेब आयुक्त होते. सभागृहात चर्चा सुरू होती आणि त्यावेळेला जळगांव मनपाचे दिड कोटी रूपये खर्चात उड्डाणपुलाचे पोल शिफ्टिंग करण्याच्या संदर्भाचा प्रस्ताव होता सभागृहाच्या पुढे चर्चा सुरू होती आणि सभागृहामध्ये चर्चा सुरू असतांना कुलकर्णी साहेबांना ही बाब निदर्शनास आणुन दिली आहे की सदरहु रस्ता जो आहे ज्यावर विद्युत खांब आहेत. तो रस्ता सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे. म्हणजे साधारणत: सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्यावेळी त्या पुलाचा आराखडा तयार केला. त्यावेळेला हि बाब त्यांच्या निदर्शनास यायला हवी होती. कारण रस्ता मुळात सार्वजनिक बांधकाम विभागाचा होता. त्या पुलाचे काम सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाच्याच अखत्यारित राबविले जात होते आणि चर्चा त्याच विषयावर चालु होती. तरी सुध्दा पुलाच्या कामाला अजुन विलंब होवू नये म्हणुन मी सुचना मांडली की दिड कोटी रूपये मनपा फंडातुन

मिळावे आणि आपण त्याच्यावर खर्च करून तो विषय मार्गी लावावा. कुलकर्णी साहेबांनी मला सुचना केली की त्यांनी सांगीतले की जर का आपण दिड कोटी मनपा फंडातुन त्याच्यावर खर्च करू तर ते ऑडीट ऑब्जेक्शन निघेल. त्यावेळेला तो विषय तिथे थांबवला गेला आणि थांबवला गेल्यानंतर ते दिड कोटी रूपये आपल्याला राज्य शासनाकडुन जो २५ कोटी रूपयांचा मिळालेला जो निधी होता. त्याच्यातील आपल्याकडे जे ४ कोटी रूपये शिल्लक होते त्याच्यातुन ते दिड कोटी रूपयांच काम प्रस्तावित केले आणि त्याला राज्य शासनाची मान्यता घेतली आणि राज्य शासनाची मान्यता घेवुन नंतर मग आपण तो दिड कोटी रूपयांचा भरणा महानगरपालिकेने महावितरण कडे वर्ग करून ते पोल्स स्थलांतरणाचे काम पुर्ण करून घेतले. म्हणजे तो शासनाचा निधी जो होता.

**ॲड.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ त्यावेळेला तो निधी उर्जा मंत्रालयाकडुन तो निधी सेंक्शन झालेला होता. पण आपल्याच पाठपुराव्या अभावी ते सगळ प्रकरण पेंडींग होत. त्यावेळेला मी कुलकर्णी साहेबांना मागचा सगळा पत्रव्यवहार हा त्या त्या विभागातील दाखवुन हे सगळ प्रशासनासमोर आणलेल होत म्हणजे जी काम प्रशासनाने करायची आहेत. ते काम प्रशासन करतच नाही आणि हा असा सगळा घोळ होवुन बसतो. योग्य ठिकाणी योग्य वेळी योग्य तो पाठपुरावा करायला जळगांव मनपाच प्रशासन कमी पडतं आहे. लोकप्रतिनिंधींना योग्य ती माहिती दिली जात नाही आणि हे असे संभ्रमात आणणारे प्रस्ताव प्रशासनाकडुन प्रशासकीय प्रस्ताव महासभेसमोर येतात. रस्ता होणे गरजेचेच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यावेळेचा शासनाचा शासन निर्णय आपण वाचुन बघा. वर्गीकृत केलेले अवर्गीकृत केलेले आहे. म्हणजे पुर्वी यांना जे नोटीफाय केलेले होते. अवर्गीकृत केलेले ६ रस्ते पुन्हा वर्गीकृत करणेबाबत जळगांव महानगरपालिकेकडे देखभाल व दुरूस्ती साठी किंवा वर्ग हस्तांतरीत केलेले एकुण ६ रस्ते वर्गीकृत करणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग , नाशिक विभाग नाशिक यांनी सादर केलेला होता. सदर प्रस्तावातील रस्ते शासन निर्णय क्रं. सो अॅन्ड सो दि.०६/०३/२००२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन जळगांव नगरपरिषदेकडे सुधारणा, दुरूस्ती व देखभालीसाठी पुन्हा वर्ग करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने जळगांव महानगरपालिकेकडे वर्ग केलेले एकुण ६ रस्ते दि.३१/०३/२०१७ च्या शासन निर्णय क्रं. सो अॅन्ड सो अन्वये अवर्गीकृत करण्यात आले. या संदर्भ क्रं. २ व ३ अन्वये केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने सदरचे अवर्गीकृत ६ रस्ते पुनश्च वर्गीकृत करण्याचे व महानगरपालिकेच्या ताब्यात न देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासन निर्णय होता संदर्भ क्रं. १ चा शासन निर्णय क्रं. सो अॅन्ड सो दि.३१/०३/२०१७ रद्द करण्यात येत आहे. आता यापुढे संबंधित रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरूस्तीसाठी ताब्यात राहतील असा शासन निर्णय झालेला आहे. म्हणजे २०१७ सालात हे संपुर्ण रस्ते राज्य शासनाने आपल्या ताब्यात घेतले आणि राज्य शासनाने ते ताब्यात घेतल्यानंतर नॅशनल हायवे झाल्यामुळे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ते रस्ते नॅशनल हायवे ऑथिरीटी कडे वर्ग केलेले आहे. म्हणजे आज सार्वजनिक बांधकाम विभाग सुध्दा त्याच्यावर काम करण्यास तयार नाहीये. आपण त्यांनाही विनंती केली होती. पालकमंत्री महोदयांच्या मिटींग मध्ये अनेक वेळा या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली विनंती केली परंतू राज्य शासनाने सांगीतले की हे रस्ते नही कडे वर्ग केल्यामुळे आम्ही त्याच्यावर खर्च करू शकत नाही. तेव्हा राज्य शासनाचा एक सार्वजनिक बांधकाम विभाग त्या रस्त्यावर खर्च करू शकत नाही. तर महानगरपालिकेला कोणत्या अधिकार क्षेत्रामध्ये आपण त्याच्यावर खर्च करू आणि जर कधी नियमामध्ये तरतूद असती तर आपण केलीही असती. परंतू उद्या जावुन कुठेतरी काही निघाले आणि ऑडीट ऑब्जेक्शन निघाले आणि त्याच्या संदर्भात जर कधी रिकव्हरी निघाली तर त्याला कोण जबाबदार राहणार. समस्या गंभीर आहे रस्त्याचा विषय मार्गी लावलाच गेला पाहीजे. परंतू त्याच्यामध्ये कायदेशीर पध्दतीचा कोणता गुंता निर्माण झालेला आहे आणि तो कायदेशीर गुंता नॅशनल हायवे ऑथिरीटीच सोडवु शकते. कारण हे रस्ते आता त्यांच्या मालकीचे झालेले आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** भाऊ बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, धुळे यांच्याकडे हा रस्ता त्यांच्याकडे वर्ग झाला असल्याने सदर रस्ता जळगांव महापालिकेमार्फत करण्यात यावे असे सुचित केले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते काय झाले आहे ढेकळे साहेब की

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नाही भाऊ हे तसे आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो  पण मालकी हक्क आहे ना त्यांचा

**श्री.सदाशिव ढेकळे :-** भाऊ त्यांनी सांगाव , शेवटी काय आहे

**श्री.नितीन लढ्ढा :-** असल्यामुळे आपण खर्च करू शकणार नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** शेवटी केंद्र असो किंवा राज्य सरकार असो नाहीतर महापालिका असो. पैसे हे पब्लिकचेच पैसे आहेत. हे राज्य शासनाकडे किंवा महापालिकेकडे येतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना पण आपण ठराव मंजुर करावा आणि या विषयाला माझा विरोध नोंदवुन घ्यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपण सुध्दा लोकांसाठीच काम करतो आणि महाराष्ट्र शासन सुध्दा लोकांसाठीच काम करते, केंद्र शासन सुध्दा पब्लिकसाठीच काम करते. आपण आपल्या शहरामधुन जाणारा जो रस्ता आहे. तो आपण त्यांच्याकडुन टॅक्स वसुल करतो. ती आपली जबाबदारी असेल आणि या ठिकाणी कलेक्टर साहेबांनी मी आपल्याला बोललोही की त्यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग झाली आणि त्यामध्ये ठरल होत की ते म्हणाले आम्ही करू शकत नाही तर आपण महापालिकेने करावं.

**ॲड.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया या रस्त्याचे काम आपल्याला करता येणार आहे का , कारण आता याच्यावर बराच वेळ चर्चा झाली आहे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर ,सन्मा.सदस्य व अधिकारी, मा.महापौर यांनी मागील जीबी मध्ये या रस्त्याविषयी नाराजी व्यक्त केलेली होती. आणि त्या अनुषंगाने त्यानंतर रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत बैठक झाली मा.जिल्हाधिकारी महोदयांकडे तर या सर्वांचा उहापोह म्हणुन हा प्रस्ताव जिबी समोर येण खुप गरजेच होत कारण जी चर्चा झाली तर हे करणे खुप आवश्यक होते. कारण की बऱ्याच सदस्यांमध्ये संभ्रम होता की मनपा का करत नाही. आताच सन्मा.सदस्यांनी मांडले की PWD जर करत नाही तर मनपाने का करू नये. तर या सर्वांचा एकत्रित विचार करून विषय जिबी समोर येण खुप महत्वाच असत. सन्मा.सदस्य.मा.नितीनभाऊंनी जे काही मुद्दे मांडले ते बरोबर आहे. त्यात हा जो रोड होता हा PWD कडे हॅन्डओव्हर झालेला आहे. नॅशनल हायवेने डिपीआर मध्ये सुध्दा हा रस्ता घेतलेला आहे. परंतू आता ते अस म्हणत आहेत की आमच्याकडे ताबा पावती नसल्यामुळे आम्ही अजुन केलेला नाही. डिपीडीसी मध्ये हाच प्रश्न विचारला की तुमच्याकडे ताबा पावती नव्हती तर तुम्ही का डिपीआर मध्ये घेतला. तर त्यांनी मा.खासदार साहेबांच्या विनंतीमुळे डिपीआर मध्ये घेतलेला आहे. तर जस भाऊंनी आता म्हंटल की आपण खासदार साहेबांना विनंती करायला पाहीजे की नॅशनल हायवे कडुन प्रेशराईज करून हा निर्णय घेवुन हा रस्ता करून घ्यायला पाहीजे. कारण डिपीआर मध्ये त्यांनी प्रपोज केलेला आहे आणि आता जसा हा आपला जसा विसर्जनाचा महत्वाचा मार्ग आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा खडडे पडले होते. तेव्हा तेव्हा आपण ट्रक्टर तिथे मुरूमाचे टाकले होते. आजही आपण २०-२५ टाकलेले आहेतच. नागरीकांची काळजी घेण आमच कर्तव्य आहे. मा.महापौर मॅडम सुध्दा त्या रस्त्यासाठी नेहमी आग्रही असतात. तर आपण त्या रस्त्यावर आजही ४५ ते ५० मुरूमाचे ट्रॅक्टर त्या रस्त्यामध्ये टाकलेले आहेत. हा रस्ता किमान विसर्जनासाठी तसा करीत आहोत. सन्मा. सदस्यांनी जशी भुमिका मांडली की CC रस्ता होण अत्यंत आवश्यक आहे. त्यावरून हेव्ही व्हेईकल जातात म्हणुन माझी सन्मा सदस्यांना विनंती राहील की त्यांनी मा.खासदार साहेबांकडेच पाठपुरावा करून हा रस्ता नॅशनल हायवे मार्फत करून घ्यायला पाहीजे आणि ते पण म्हणताहेत की आम्ही करायला तयार आहेत परंतू आमचा डिपीआर अजुन सेंक्शन नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता हा ठराव जर मंजुर केला तर प्रॉब्लेम येतील अस ऑडीटरांनी सांगीतलेले आहे. मग आता तुम्ही सांगा प्रशांत पाटील साहेबांनी सांगीतले आहे की ठराव कधी झाला तर ऑडीटला प्रॉब्लेम येईल हा एक विषय आहे. गोराणेसाहेब तुम्ही मला सांगा की मतदान तुम्ही हजेरी पुस्तकावरून घेणार की उपस्थिती आहे त्याच्यावरून घेणार ही दुसरी गोष्ट उत्तर पाहीजे आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आता आयुक्त महोदयांनी जे सांगीतले.

**मा.महापौर :-** आप्पासाहेब आयुक्तांनी जे मांडले त्यानुसार मतदान

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही ताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मतदानाचा विषय नाहीये.

**(सभागृहात एकाच वेळी बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे आवाज स्पष्ट ऐकु येत नाही.)**

**ॲड.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया आता मी येथे हे सांगु ईच्छिते आहे की, अत्यंत जबाबदारीने आयुक्तांनी सांगीतले आहे ही जी वस्तुस्थिती आहे की ताबा पावती जी आहे. ती कोणाची कोणाला कोणाच्या अखत्यारित कोणाचे नावांवर कोण करू शकत. हे सगळ जिबी समोर येण आवश्यक होत. तर जिबी समोर हे सगळ आणण्याचा ही पध्दत आहे का ? की प्रशासकीय प्रस्ताव एक तयार करायचा मंजुरीचा की ज्यामध्ये लेखापरिक्षणाच आक्षेप निघु शकतो आणि त्या पध्दतीने जर मंजुरी दिली आणि जर भविष्यात त्याच्यावर आक्षेप निघाला. मग आमच्यावर जी लायबीलीटी फिक्स होणार आहे तर प्रशासन जबाबदारी घेतय का याची, प्रशासनाने

या गोष्टी लोकप्रतिनिधींसमोर आणण्याचे अनेक मार्ग होते. मा.खासदार. उन्मेशदादांच्या सहकार्याने हे काम करून घ्यायच आहे. आपण आम्हाला बोलवायच होत. भारतीय जनता पक्षाच्या प्रमुख लोकांना कशाला, विरोधी पक्षातील सुध्दा लोक यायला तयार राहतील. जळगांव शहराचा प्रमुख रस्ता आहे हा या संदर्भात आपण एक पदाधिकाऱ्यांची मिटींग घ्यायला हवी होती. सर्व पक्षीय गटनेत्यांना बोलवायला हव होत. प्रशासकीय प्रस्ताव सभेसमोर आणायचा आणि आयुक्त या अत्यंत महत्वाच्या पदावरील आणि सन्मा. व्यक्तीने जिबी समोर हे सांगायच की ही वस्तुस्थिती सभागृहासमोर आणायची होती. अस बोलण्याची अशी ही पध्दत निश्चितच नाहीये आयुक्त महोदया, तुमच्या सारख्या प्रमुखाला अस बोलाव लागतय. पण ही पध्दत चुकीची आहे. प्रशासकीय प्रस्ताव जर सभेसमोर येतो आहे प्रशासकीय प्रस्तावामध्ये इतके आक्षेपार्ह आक्षेप घेण्यासारखे विषय आहेत. प्रशासन सगळ येथे मान्य करतं आहे आणि प्रशासकीय प्रस्ताव तो आमच्यासमोर मंजुरीसाठी ठेवला जातोय ही कुठली प्रशासकीय पध्दत आहे. प्रशासन जबाबदारीने काम कधी करणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हे असच चालल आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आमचे सगळे ज्येष्ठ सदस्य जे आहेत. ढेकळेदादा आज सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे हा रस्ता म्हणजे , महापौरताई ज्या रस्त्यावरच्या वादांमुळे रडल्या तोच हा रस्ता आहे आणि या पध्दतीने सभागृहासमोर आणायच हे , म्हणजे जे आक्षेप निघता आहेत अस होवु शकतं आहे. हे जर सगळ सभागृहाच्या लक्षातच आल नसत आणि सभागृहाने आज मान्यता देवुन टाकली असती. कारण आमची भावना आहे की नागरीकांना होणारा त्रास थांबावा आणि ज्या नागरीकांचे प्रतिनिधी म्हणुन या सभागृहात आलेलो आहोत. त्यांचा आवाज म्हणुन आम्ही येथे आहोत. त्यांच्यासाठी आम्ही काम करतो आहेत. तर त्यांच्या सुविधेसाठी हा रस्ता झाला पाहीजे ही अजुनही आमची भावना आहे. जर कायद्याच्या चौकटीत हे बसवता येत असेल तर १००% या रस्त्याला आम्ही मंजुरी देतो.कारण हा रस्ता आम्हाला अत्यंत निकळीचा आहे. जसे आता तुम्हीच सांगितले की, आपल्या गणेश विसर्जनाचा मार्ग आहे हा रस्ता म्हणजे एक १५ दिवसात आपल्याला याची गरज पडणार आहे. आम्हीच शिव्यांची राखोली खाणार आहोत महोदया, रस्ता याच परिस्थितीत राहिल्याबद्दल लोकं प्रतिनिधी म्हणुन लोकं आम्हालाच शिव्या देणार.पण जर असे प्रशासकीय प्रस्ताव सभेसमोर येत असतील तर आम्ही काय निर्णय घ्यायचा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्याला प्रशासनाचे मत असे असेल गडबडीत तर हे महापालिकेचे दुर्देव आहे असे समजावे लागेल. हा प्रस्ताव आपण पाठविलेला आहे आणि आपणच म्हणतात. केंद्राकडुन करा, इकडुन करा, खासदारांना सांगा.मग येथे आणला कशाला हा प्रस्ताव. आणायला नको होता बरोबर नाही. तुम्हाला रिपेअरचे अधिकार दिले रिपेअर करत बसले असते. त्याला आता मार्च २०२२ च्या आसपास रिपेअर केला आहे. काय उपयोग झाला. आता सुध्दा तुम्ही माती मुरुम टाकला आहे. ते सुध्दा वाहुन गेला. आपण तर काही गेलेले नसाल. मी जातो तिकडुन रोज जातो त्या रस्त्याने. गेला तो माती,मुरुम आणि खडी पुर्ण वाहुन गेली. पुन्हा खड्डे पडले. त्या ठिकाणी अनेक दिवसापासुन पाणीपुरवठयाचा लिकेज आहे. सर्व परिसराच्या गटारीचे पाणी त्या रस्त्यानी वाहते म्हणुन मी या ठिकाणी सुचना करणार होतो की, सिमेंटचा करावा तो दुसराच मार्ग निघाला. आपण प्रस्ताव पाठवितो आणि आपणच म्हणतो की, ते योग्य नाही. मग याच्याकडुन करावा, केंद्राकडुन करावा, राज्य शासनाकडुन करावा. हे ठिक नाही. हे पहा आयुक्त आहे आज आपण. आपण याचा अभ्यास केला पाहिजे. असे मला वाटते, आपले चुकले आहे असे म्हणायला मला काहीच अडचण येणार नाही. बरोबर नाही असे.

**मा.आयुक्त :-** मोठया मनाने चुक मान्य केली जाईल त्याच्यात काहीच वाद नाही. चुक होते. जो काम करतो त्याचीच चुक होते. त्यामुळे चुकीला माफी मागायला काही लाज वाटणार नाही. परंतु या विषयाचा आपण सर्वांनी गांर्भियाने विचार केला पाहिजे की, ज्या दिवशी सुरस्ता सुरक्षा अभियानाची बैठक झाली. जेव्हा हे सर्व मुद्दे डिसकस झाले. त्या दिवशी सुध्दा नॅशनल हायवेने हीच बाजु मांडली होती की, आम्हाला रस्ता सुस्थितीत हवा आहे आणि दुसरा मुद्दा होता की, डी.पी.आर. मंजुर होऊन रस्ता तयार व्हायला २ वर्ष लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व गोष्टींचा आपण विचार करुन हा प्रस्ताव येथे मांडलेला होता की, आपल्याला माहितच आहे की, रस्ता गरजेचाच आहे. त्यामुळे आपल्याला मध्य मार्ग काढावा लागेल. शासनाकडे वर्ग झालेला आहे. याच्यात काही दुमतच नाही. त्यांनी घेतलेला नाही किंवा ताबा पावती नाही. हे ते मुद्दे मांडत आहे. परंतु नागरीकांना सोई देणे हे कर्तव्य आहे. आणि प्रशासन एकदम डोळे झाकुन काम करत आहे असे नाहीये. आम्हीही तेथुन जातो, आम्हीही तो रस्ता बघतो. म्हणुन किमान तेथे काहीतरी मोरलेबल होणे सारखे आपल्याला करणेही अपेक्षित आहे. त्यामुळे हा निर्णय जनरल बॉडीसमोर त्यासाठीच येतो की, आपल्याला या सर्व बाबींचा विचार

करुनच निर्णय घ्यायचा आहे. प्रशासनाला वाटले की, त्या ठिकाणी काही प्रमाणात खर्च करायला पाहिजे. म्हणुनच ते प्रस्ताव पाठविलेले आहे. आता जे वाटते त्यांना निर्णय घ्यायचा आहे की, करायचा की नाही करायचा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आपण सक्षम प्राधिकरण आहे. आणि येथे अभिप्राय पण तोच मागविलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही असे बोलायलाच नाही पाहिजे होते मॅडम. ज्याच्यामध्ये प्रॉब्लम येणार आहे तो विषयच करायचा नाही ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही आप्पा, धोरणच्या शेवटी सभागृहाचा निर्णय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जर त्यांनी सांगितले की, तुमच्यावरती प्रॉब्लम येणार आहे तर स्वत:हुन कोण विहीरीत उडी मारायची का आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर शेवटी तेच धोरण आपल्याला ठरवायचा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग रद्द करा ना. रद्द डायरेक्ट रद्द संपला विषय की, सगळयांना भरायचे आहे पैसे. कितीचा रस्ता आहे तो. किती जण आहे येथे आता, करा डिव्हायडेशन भरा, आपल्याला जळगांवकरांची सेवा करायची आहे तर. आपला तर विषय नाही.

**मा.महापौर :-** या महापालिकेला अधिकार नाही. हे एवढया चर्चेतुन सिध्द झालेले आहे. आणि आपण तेथे रस्ता बनविण्याच्या संदर्भात आपण जो निर्णय घेतलेला आहे तो आपल्याला नामंजुर करावा लागेल. पण मला असे वाटते हा रस्ता होण्यासाठी आपण खासदार महोदयांना विनंती करु शकतो आणि मला असे वाटते की, सर्व सन्मा.सदस्य भारतीय जनता पक्षाचे तर हे माझ्या सोबत राहतील आणि माझ्या सोबत विनंती करतील. कारण मी आता पत्र लगेच देणार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** फक्त विरोधी पक्षनेते आपल्या सोबत रहायला पाहिजे.

**मा.महापौर :-** सगळेच रहातील.

**श्री.जितेंद्र मराठे :-** गटनेते पण सोबत लागतील आपल्याला.

**मा.महापौर :-** आपल्याला नागरीकांच्या हिताचे निर्णय घ्यायचे आहे आणि आपल्याला खासदारांना पत्र द्यावच लागणार आहे. जसे आपण नागरीकांच्या सह्या घेतो तसेच सन्मा.नगरसेवकांचे सह्या घेवुन त्यांना पत्र आपण देऊ.

**श्री.धीरज सोनवणे :-** याच्यातुन एकच मॅसेज जनतेमध्ये जाणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही. कसे काय जाणार.

**मा.महापौर :-** नाही तो अधिकार आहे आपला, भाऊ तो आपला अधिकार आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** पण असे प्रस्ताव या पुढे यायला नको महासभेपुढे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** पब्लिकला आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे आणि आपण जसे म्हणत आहात नगरसेवकांनी फेटाळा. तर ते काही योग्य होणार नाही. लोकं आम्हाला दोष देतील की, एवढा रस्ता खराब असल्यावर सुध्दा तुम्ही तो रस्ता प्रशासनाने

**मा.महापौर :-** आपला आणि माझा प्रभाग जवळ जवळ असल्याने ज्या आपल्या भावना आहे त्याच माझ्या भावना आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** तुमचा प्रभाग आणि माझा प्रभाग जवळ जवळ असल्याने तुमचा रस्ता आणि माझा रस्ता.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमची सर्व पत्रकार बंधुंना विनंती आहे की, फेटाळला हा शब्द टाकतांना का फेटाळला याचे कारणही टाका. मग ते जनतेला समजेल की, का फेटाळला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई हा प्रशासकीय प्रस्ताव आपल्या समोर आलेला होता आणि प्रशासनच मान्य करत आहे की, या प्रस्तावामध्ये अनेक त्रुटी आहे. टेक्नीकली हा होऊच शकणार नाही. तर तो आपण फेटाळण्यापेक्षा, नाकारण्यापेक्षा प्रशासनानेच तो विथड्रॉ करावा. प्रशासनाने सुयोग्य प्रस्ताव पुन्हा समोर आणावा. आता जर ते करता येत नाही. आयुक्तांनी आयुक्तांच्या अधिकारात तात्पुर्ती त्या रस्त्याची ताबडतोब दुरुस्ती करावी. उन्मेशदादांच्या माध्यमातुन आपल्याला तो रस्ता डांबरीकरण करुन घेता येणार आहे. त्या बद्दल प्रशासनाने आम्हाला मार्गदर्शन करावे. आम्ही त्या संदर्भातला पाठपुरावा १००% करु. पण हा प्रस्ताव प्रशासनानेच मागे घ्यावा. जर रस्ता चुकीचा आहे आणि तो प्रशासनाने मान्य केलेला आहे. नगरसचिव साहेब आपण मार्गदर्शन करा काय करता येणार. प्रशासन जर म्हणत आहे की, याच्यामध्ये लुपहोल्स आहे. नाही तर प्रशासनानेच हे परत घ्यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, जर प्रशासनाने तो प्रस्ताव आपल्या पटलावर आणला आहे. त्यांनीच त्यांचा प्रत्येक्ष अभिप्राय द्यावा. नाही तर शासनाच्या माध्यमातुन त्यांनी हा प्रस्ताव येथे आणायलाच नको होता. आधी जर चुकीचा आणलेला आहे तर माहिती आहे ना आपल्याला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** किमान प्रशासनाने जबाबदारी घ्यावी या संदर्भातली. भविष्यात जर लेखापरिक्षणाच्या आक्षेपांची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी. आमचे तर म्हणणे आहे की, ही जबाबदारी स्विकारावी Audit Objection ची, प्रशासकीय प्रस्ताव आलेला आहे. आता ती कोंडी कशी फोडायची या बद्दल, आयुक्त साहेब आणि नगरसचिव साहेब आपण मार्गदर्शन करा.

**श्री.धीरज सोनवणे :-** आयुक्त मॅडमांनी स्वत: मान्य केलेले आहे की, चुक झालेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासकीय प्रस्ताव आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना ताई संबंधीतच येतो ना तो विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता हे जे निकाल आहे ते सभागृहाचे आहे. महापौरताई विड्रॉ करु शकत नाही किंवा आयुक्त मॅडम विड्रॉ करु शकत नाही. त्याच्यावरती पॅझिटीव्ह, निगेटीव्ह, तटस्थ, तहकुब जे काही निर्णय घ्यायचा आहे. तो निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहाला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही माझे मत असे आहे की, जिल्हाधिकाऱ्यांसोबत या संदर्भात चर्चा, आपले NAHI चे साहेब आणि आपले बि ॲण्ड सी चे साहेबांसोबत झालेली आहे. आता हे टेक्नीकल अडचण मी तुमच्या समोर मांडल्या. माझे मत आहे की, आपण हा प्रस्ताव तहकुब ठेवावा. तहकुब ठेवण्यात नुकसान काय . जर समजा त्यांचे मार्गदर्शन, आपण दिलेले टेन्डर आहेत. खासदार साहेबांना विनंती करणार आहोत. किंवा आपण जे काही करणार आहोत. समजा आपल्याला मार्गदर्शन मिळाले काही तरी राईटिंग मध्ये की, मनपाने हे करुन द्याव. त्यांनी जर आपल्याला राईटींग मध्ये दिले तर आपल्याला काय अडचण आहे. NAHI ने लेखी दिले की, तुम्ही तात्पुर्ता करु शकतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात खासदार निधीचा उपयोग करु शकाल आमदार निधीचा उपयोग करु शकणार. म्हणजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तर ठिक आहे ना. तोपर्यंत तहकुब ठेवा असे म्हणतो आहे ना मी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नॅशनल हायवे जी चर्चा आपण आज करतो आहे. १००% ही जबाबदारी नॅशनल हायवे ऑथरटीची आहे. त्या बद्दल वाद नाही. परंतु कमीतकमी काय होईल की, नॅशनल हायवे ऑथरटीला या सर्व गोष्टींचा पाठपुरावा करायला याच्यामध्ये मोठा विलंब होवु शकतो. परंतु आमदार निधीतुन आणि खासदार निधीतुन जर कधी त्यांच्याकडे निधी शिल्लक असेल. तर तातडीने त्याची निविदा प्रक्रिया जी आहे ही तातडीने मार्गी लावु शकतो. कारण शेवटी तो शासकीय निधी आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ठिक आहे ना. या सर्व गोष्टींना वेळ लागणार आहे. तर आपण तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवु आणि आपण सगळेच, गटनेते, पदाधिकारी याच्यातुन मार्ग काढु. शेवटी आपल्याला हा विषय मार्गी लावायचा आहे. पण शेवटी तो लिगली आणि टेक्नीकली पररेक्ट असला पाहिजे. त्याच्यामुळे आज हा विषय सभेमध्ये तहकुब करावा अशी मी भारतीय जनता पक्षाच्या वतीने मागणी करते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझे एक मत आहे की, तहकुब करता हा विषय आणि लवकर याचा पाठपुरावा करुन संबंधीत खासदार आमदारांकडुन निधी मंजुर होऊन येईल. तर नितीनभाऊंनी जो मत मांडलेले आहे. त्याला माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याच्यामध्ये ताबा पावतीचा घोळ नॅशनल हायवे ऑथरिटी, धुळे विभागाने करुन ठेवलेला आहे. वास्तविक तुम्ही ते बघितले तर ती एक रस्त्याची औपचारीकता आहे. रस्त्याची मालकी राज्य शासनाची होती आणि त्यांनी त्यांना सगळे दस्तऐवजासह हस्तांतरीत केलेले आहे. निव्वळ फक्त काही तरी एक कारण दर्शवायचे की, ते काम जेणे करुन त्यांना काय अडचणी असतील आणि ते करु शकले नाही म्हणुन त्यांनी ताबा पावतीचा घोळ केलेला आहे. तरी सुध्दा मी काय म्हणतो महासभा ठराव क्र.६३० दि.२९/०४/२०१७ अन्वये हे संपुर्ण रस्ते त्या वेळेला महानगरपालिकेने धोरण ठरवुन हे राज्य शासनाला ठरावाद्वारे हस्तांतरीत करणेबाबतचे धोरण ठरविलेले होते. आपण या रस्त्याची एकतर्फा का होईना ताबा पावती ही आपण आपल्याकडुन त्यांना देऊन मोकळी करायची. म्हणजे उद्या उठुन खासदार साहेबांची सुध्दा दिशाभुल करण्याच्या संदर्भातला NAHI डिपार्टमेंट मागे पुढे पाहणार नाही की, रस्त्याचा ताबाच आमच्याकडे नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** उद्यानांसाठी माळी आणि त्यांचे सहकारी, माळींच्या हाताखाली लागणारा मनुष्यबळ यासाठी कोणतीही अडचण होणार नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** रद्द करून घ्या आता.

**श्री.विष्णु भंगाळे :-** रद्द करा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** रद्द करा आणि डिजीटली एक प्रस्ताव प्रशासनाने आणावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ताई अडचण आहे तर याला रद्द केलेलेच योग्य राहील.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तर पहिलेच सांगितले होते, त्याच्यावर १ घंटा वायफळ चर्चा केली काही नाही. स्टार्टींगला सांगितले रद्द करा आणि संपवा विषय.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाकडुन जो आलेला ठराव आहे. तो सर्वानुमते नामंजुर करण्यात आलेला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.)**

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** यामध्ये इतिवृत्तात या सर्व नोंदी आल्या पाहिजे की, सभागृहात जी चर्चा झाली, प्रशासनाने हा प्रस्ताव ठेवतांना चुका ठेवलेल्या होत्या. या सगळया गोष्टींचा उल्लेख आला पाहिजे. आणि ठरावात सुध्दा हे नमुद करा की, हा ठराव परिपुर्ण नसल्यामुळे हा प्रस्ताव येथे रद्द करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** म्हणजे सभागृहात जी चर्चा झाली.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** निगेटीव्ह मॅसेजेस जातात की, लोकप्रतिनिधीच काम होऊ देत नाही. जेव्हा ही आपली भावना आहे की, हे सगळे व्हाव. पण ते टेक्नीकली आणि लिगली करेक्ट नसेल तर ते आपण करु शकत नाही. त्यामुळे हा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रशासनाकडुन आलेला प्रस्तावात बदल करत आहे म्हणुन मी सभा त्याग करत आहे आणि घरी जातो.

**(सभागृहामध्ये सन्मा.सदस्य श्री. सदाशिव गणपत ढेकळे हे सभात्याग करून सभागृहातुन निघुन गेले.)**

**श्री.कैलास सोनवणे :-** एक काम करा. आपण सगळे तहकुब करा त्यांना एकट्यांना विषय मंजुर करु द्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे. सभागृहात झालेली सर्व चर्चेची इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी. आणि ठरावामध्ये सुध्दा हा प्रस्ताव का रद्द करण्यात आला या बद्दलची सविस्तर माहिती ठरावामध्ये घेण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१४ व १५ चा (भाग) मधील इच्छादेवी चौक ते मोहाडी फाटा पर्यंतचा पाचोरा रस्ता (घोषीत नॅशनल हायवे) डांबरी रस्ते तयार करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२,५७,६८,५८७/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेत सन्मा.सदस्यांनी सभागृहाचे निदर्शनास आणून दिले की, सदर रस्ता हा पूर्वी सार्वजनीक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस शासन निर्णय क्रमांक रवियो-२०१७/प्र.क्र.२५/ नियोजन-२ दिनांक ०४ मे २०१७ अन्वये वर्ग करण्यात आला. त्यानंतर सदरील रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे वर्ग करण्यात आला. सध्या सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडेस असल्याने त्या रस्त्यावर महानगरपालिका निधीतून कायदेशीरदृष्टया खर्च करणे संयुक्तीक वाटत नाही. महानगरपालिका निधीतून सदर रस्ता तयार करण्यात आल्यास भविष्यात लेखा परिक्षणात आक्षेप निघू शकतो. तसेच प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव परिपुर्ण नसल्यामुळे सभागृहात सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव रद्द (नामंजूर) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल -६१**
**सूचक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १२ :-** विशेष रस्ता अनुदान अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० मधील हुडको दर्गा ते स्वस्त धान्य दुकाना पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरास मान्यता मिळणे कामी तसेच सदर कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६८,६७,४५२/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई आता जो विषय आहे १२ नंबरचा कॉंक्रीटीकरणचा ६८ लक्ष मनपा निधीमधुन करण्याबाबत आपल्याकडे एवढा निधी उपलब्ध आहे का ?

**मा.आयुक्त :-** लेखाधिकारी यांनी सांगाव.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** महापौर महोदया, सन्मा.सभागृह , आपण जो प्रश्न विचारलेला आहे. तर हा प्रस्ताव निविदा मंजुरी साठी ठेवण्यात आलेला आहे. तर याच्यामध्ये शासनाकडुन जे अनुदान मिळालेल होत. त्याच्यामधुन सदरचे काम जे आहे तर सदरचा निधीच्या अनुषंगाने हे काम करायचे आहे आणि त्याच्यामधुन जर सभागृहाने आपण हे मंजुर केले तर हे जे आपले सन्मा.सदस्य आहेत. तर सभागृहाने जर मंजुरी दिली आणि निधी आला तरच हा विषय मंजुर होणार आहे. याला जर सभागृहाने मंजुरी दिली तर याचे जे पेमेंट आहे तर ते महानगरपालिकेला जसा-जसा उपलब्ध झालेल्या निधीमधुन करता येणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आयुक्त महोदया, महापौरताई माझा याविषयला विरोध नाही उपमहापौर साहेब कस आहे गैरसमज होण्यास वेळ लागत नाही.

**मा.उपमहापौर :-** नाही नाही ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझा जो प्रश्न आहे तो मी उपस्थित करते आहे. शासनाचा निधी आहे मंजुर आहे. त्याला आपल्याला महापालिकेकडुन द्यावे लागतात ते पण मंजुर आहे. पण मग अशा परिस्थतीत काही भागामध्ये ५-५ जी कामं आहेत तर त्या कामांना का मंजुरी मिळत नाही त्या कामांसाठी, मी एक ६ लाखांच काम दिलेले आहे त्याची फाईलच गायब आहे. म्हणजे आपले जे जे.ई आहेत त्यांनी गिरगांवकर साहेब यांच्या टेबलवर होती आणि त्यांच्याशी चर्चा केली आणि तिथुन फाईल गायब होते आणि जर आपण मनपा फंडातुन केली असेल तर ते योग्य आहे का ? मला वाटत की एकाठिकाणी दुजाभाव केला जातो आहे का ? म्हणजे दुजाभाव लाखांने, करोडोंने एका ठिकाणी पैसा दिला जातो आणि ६-६ लाखांची आमची कामं होत नाहीयेत. सन्मा.सदस्य विशालभाऊं मागील ४-५ महासभेंमध्ये मागणी करत आहेत की सर्व सन्मा.सदस्यांना ५०-५० लाख रूपये द्या. तर ते होतच नाही आणि एकीकडे पैसे दिले जातात. काही सदस्यांना हा दुजाभाव होतांना दिसतो आहे. तर त्याच्यावर उत्तर मिळायला पाहीजे की हे अस का होतय. आम्हीपण लोकप्रतिनिधी म्हणुनच निवडुनच आलेलो आहेत ना , का होतय , मला गिरगांवकर साहेब माझ्या प्रभागाचा अजुन एक विषय आहे म्हणजे माझ्या प्रभागाचे दोन विषय आहेत असे एक गिरणा टाकी ते छाबडा यांच्या घरापर्यंत चा विषय आहे. त्यावेळी आयुक्त सतिश कुलकर्णी साहेब होते. तर त्यावेळी त्यांनी स्पॉट व्हिजीट सुध्दा केलेली होती. त्याचे एम.बी रेकॉर्ड सुध्दा झालेल आहे आणि अशा परिस्थितीमध्ये एम.बी रेकॉर्ड झालेले, काम पुर्ण झालेले आहे आणि आता ती फाईल सापडत नाही अस उत्तर मला मिळत आहे. मी गिरगांवकर साहेबांना विचारले की कुठे आहे तर ते म्हणतात की ठेकेदाराकडेच असेल. तर हे उत्तर देण बरोबर आहे की चुक आहे. अस उत्तर मिळत असेल तर मग प्रशासन काय करतय. म्हणजे ठेकेदाराला तर कामं झाल्यानंतर तर पैसे पाहीजेच असतात ना मग तो त्याच्याजवळ फाईल ठेवुन करणार काय आहे. म्हणजे याचाच अर्थ की कोणीतरी आहे की फाईल गायब करतोय किंवा त्याच्यावर काही दबाव आहे का की बिल द्यायच नाही हा एक मुद्दा आहे आणि दुसरा मुद्दा ईस्टिमेट झालेले आहे ती फाईल गिरगांवकर साहेबांच्या टेबलवर होती. ती फाईल गायब होते तर त्याच्यावर कोणाचा दबाव आहे का याचे स्पष्टिकरण मला पाहीजे आहे. संबंधितांवर काही दबाव आहे का किंवा कोणाच काय आहे.

**मा.आयुक्त :-** संबंधित जे.ई कोण आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आर.टी.पाटील साहेब आहेत.

**मा.आयुक्त :-** आर.टी. पाटील सांगा काय पोजीशन आहे ती

**श्री.आर.टी.पाटील , कनिष्ठ अभियंता :-** संबंधित लिपीकाशी बोलुन मी ती फाईल शोधुन घेतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हे किती दिवसांमध्ये होईल. ते काम झालेले आहे. दि.२२/०१/२१ मध्ये त्या कामाची तारीख आहे तेव्हाच ते काम झालेले आहे. १ वर्ष होत आलेले आहे त्या कामाला

**मा.आयुक्त :-** प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि जर फाईल नाही सापडली तर कार्यवाही कोणावर होईल.

**मा.आयुक्त :-** फाईल देतांना सही घेतलेली असते आणि ती जमा केलेली असते. जो कुणी घेतलेली आहे ते त्या अनुषंगाने ते तपासुन ती चौकशी करू आणि मग आपण संबंधितांवर कार्यवाही करू.

**श्री.कैलास सोनवणे :-** तो पर्यंत ती फाईल सापडुन जाईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तो पर्यंत ती फाईल सापडुन जाईल. दुसरा विषय ईस्टिमेटचा किती तारखेला दिले आहे आहे साहेब तुम्ही

**श्री.आर.टी.पाटील, कनिष्ठ अभियंता :-** ईस्टिमेट दिलेले आहे. साहेबांकडे दिले होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेबांनी ईस्टिमेट दिले असे सांगीतले होते.

**श्री.आर.टी.पाटील, कनिष्ठ अभियंता :-** साहेबांनी ईस्टिमेट दिले होते. मी जेव्हा माहीती घेतली तेव्हा ते म्हणाले की साहेबांकडे ईस्टिमेट दिलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब नव्हते मी दोनदा आली होती. पण आता तुम्ही आणि साहेब स्पॉट व्हिजीट ला आलेले होते त्यांनतर मी तायडे यांना विचारले की त्यांनी सांगीतले की सोनगिरे साहेबांकडे फाईल आहे आणि साहेबांना विचारले तर ते म्हणाले की मी बाहेर आहे मी आल्यावर विचारतो अस मला त्यांनी ४ ते ५ दिवस फिरवले. नंतर म्हणतात की फाईलच सापडत नाहीये. तर मग मी पाटील साहेबांना फोन केला साहेब म्हणाले की मी स्वत: जावुन बघतो व नंतर मला कळले की सापडली आहे मला , मी ऐकले पण निश्चित आहे की नाही हे मला माहीती नाही. मग असे उत्तरे का देतात.

**मा.आयुक्त :-** पाटील साहेब

**श्री.आर.टी.पाटील, कनिष्ठ अभियंता :-** मी दिली होती.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही त्यांच काही नाही त्यांनी दिली. त्यांनी त्यांच काम केले आहे. त्यांनी फाईल गिरगांवकर साहेबांच्या टेबलवर ठेवली होती. मला सांगतीले सुध्दा मग ती फाईल सापडत नाहीये असे उत्तर मला मिळाले आहे. टेबलवरून जाते कुठे ती फिरतेय का स्वत:हुन

**मा.आयुक्त :-** गिरगांवकर साहेब नाहीयेत आता नाहीतर आपण त्यांनाच विचारले असते की तुमच्या टेबलवरून फाईल हरवली का ? याच्यापुढे तुम्ही ईनवर्ड- आऊटवर्ड सिस्टिम मेंटेंन करत जा आपल्या ज्या फाईल आहेत त्यांच ईनवर्ड- आऊटवर्ड मेंटेंन करत जा

**श्री.आर.टी.पाटील, कनिष्ठ अभियंता :-** ठिक आहे मॅडम

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अजुन नाहीतर पुढच्या वेळेला असा प्रॉब्लेम येणार नाही अस पाहा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई गिरगांवकर साहेबांना विचारा की फाईल कुठे आहे ते काय आहे की ते सांगु शकतील ती फाईल कुठे आहे तर कारण एखादेवेळेस त्यांनी कुठेतरी ठेवली असेल. त्यांनी फार कमी दिवसांत वेगवेगळे हे केलेले आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आयुक्त साहेब आता आम्ही फार दिवसांपासुन मागणी करतोय तरी आम्हाला निधी मिळत नाहीये अस नका करू, जस विशालभाऊ म्हणाले की ५०-५० लाख रूपये प्रत्येक सदस्यांना देण्यात यावे आणि आता हे बघा २६ जुलै च्या पेपरला वाचले मी की पथदिव्यांचा विषय आहे. हायवे चा विषय होता तो त्याला १० लक्ष रूपये जास्तीचे द्यावे लागतात आहेत. तर आपल्याकडे जास्त पैसे आले आहेत का ? ईलेक्ट्रीसिटीच काम आपल आहे का हायवेच , तिन कोटींच आहे पण किती जास्त द्यावे लागत आहेत त्यांना आपल्याला, त्यावेळेला आपल्याला ३ कोटींमध्ये काम करायच होत.त्यावेळेला ते काम झालेले नाही. कालच्या की परवाच्या पेपरला बातमी होती. तो पेपर मी आणलेला नाही. तर आपल्याला महापालिकेला एक्स्ट्राचे पैसे द्यावे लागतात आहेत.

**मा.आयुक्त :-** एस.एस.पाटील काय विषय आहे याचा खुलासा करावा.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपले जे रोड डिव्हाईडर झालेले आहेत. तर तेथील पर्यायी पथदिव्यांची व्यवस्था करण्याचा हा विषय आहे. पुर्णपणे रस्त्याच काम जे आहे ते राष्ट्रीय महामार्गाकडुन केले गेलेले आहे. राष्ट्रीय महामार्गाने त्यांचा जो प्रस्ताव होता तो प्रस्ताव त्यांच्या ऑफीस ने नाकारल्यामुळे म्हणुन राष्ट्रीय महामार्गावर पथदिव्यांची व्यवस्था अशी असावी असा विषय उपस्थित झाला. त्यावेळेला मा.जिल्हाधिकारी साहेबांकडे त्यावर चर्चा झाल्यानंतर सदरच्या पथदिव्यांची व्यवस्था करावी व ती महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी अशा पध्दतीने त्या ठिकाणी हा विषय झाला. त्याच्यानंतर या कामाच अंदाजपत्रक तयार करण्यात आले ३ कोटींचे आणि ते अंदाजपत्रक तयार केल्यानंतर ते महासभेसमोर ठेवण्यात आल्यानंतर महासभेने असा निर्णय घेतला की हे जे ३ कोटींचे काम आहे याच्याकरीता शासनाकडे निधीची यासाठी मागणी करावी. शासनाकडुन जर

आपल्याला निधी मंजुर झाला नाही तर हे काम महानगरपालिकेच्या निधीमधुन आपण करावे. तर आपण याच्यासंदर्भात डिपीडीसीला याचा प्रस्ताव पाठविला. त्याच्यानंतर त्यांनी आपल्याला ३ कोटी रूपये मंजुर करून दिले आणि परंतू त्यानंतर राष्ट्रीय महामार्गाने हे सगळे पाहीले आणि त्यानंतर हे काम केल गेले आणि त्याच्यानंतर हे काम झाले व त्याच्यानंतर आपला हा विषय मंजुर झाला. त्यांच जे काम होते रस्त्याच ते काम पुर्ण करण्यात आले आणि हे काम जे आहे हे भुमिगत केबल टाकुन हे काम करायचे होते. त्यामुळे आपले डिपीआरमध्ये जे या कामाचे ईस्टिमेट आहे की या महामार्गावर भुमिगत केबल टाकण्याचे, परंतू आपले काम ज्यावेळी प्रत्यक्षात सुरू झाले तेव्हा आपण त्यांच्या सोबत राहुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम होणार होते. त्यांना आपण विनंती केलेली होती की डिव्हाईडर ला लागुन आपण भुमिगत केबल टाकुन ते काम पुर्ण करून देणार होते. परंतू त्यांनी एक तांत्रिक अडचण निर्माण केली की हे काम तुम्ही जर रोड डिव्हाईडर लागुन जर रोड खोदला तर किंवा तुम्ही जर पाईप टाकले तर त्या ठिकाणी आपण जे या रस्त्याचे काम आहे म्हणजे जुने आणि नविन असे करणार होते. पण भविष्यात आता आपण ज्या केबल टाकणार होते. त्याच्यामुळे याच्यासंदर्भामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे मार्गदर्शन आणि महानगरपालिकेच्या अधिकारी यांचे पालकमंत्री महोदया यांच्या समक्ष निर्णय घेण्यात आला की रस्त्यांच नुकसान होवू नये म्हणुन तो जो रोड डिव्हाडर आहे तो रोड डिव्हाडरमध्ये खोदुन त्याच्यामध्ये केबल टाकण्याचे काम करून घ्यावे म्हणुन आपण ते जे काम आहे ते रोड डिव्हाडर खोदुन ते काम आपण केलेले आहे. या कामामध्ये काम झाल्यानंतर त्याच्यावर आपल्या ईस्टिमेटमध्ये कॉंक्रीटीकरण करण्याचे काम नाहीये आणि ते कॉंक्रीटीकरण आपल्याला करून द्यावे लागणार आहे. कारण जे काही रस्त्याचे नुकसान होईल त्याची दुरूस्ती वगैरे आपल्याला महानगरपलिकेलाच करून द्यावे लागणार आहे. कारण आपल्याला राष्ट्रीय महामार्गाने परवानगी दिलेली आहे आणि ते कॉंक्रीटीकरणाचे काम असल्यामुळे आपल्याला ते काम पुर्ण करायचे असल्यामुळे ते आपल्याला करून द्यावे लागतील.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही ते आता या एकाच रस्त्याला किती खर्च येणार होता.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** मी तेच सांगतीले आता की कस आहे की राष्ट्रीय महामार्ग हे प्राधिकरण दुसरी आहे. हे प्राधिकरण वेगळे आहे. महानगरपालिका हे प्राधिकरण वेगळ आहे. ज्यावेळेला राष्ट्रीय महामार्गामार्फत काम चालु होते. त्यावेळेला त्या पथदिव्यांचा प्रस्ताव आपला मंजुर होता. त्यावेळी दोन्ही एजन्सी सांमजस्यांने काम करीत असते तर हा विषय उपस्थित झाला नसता परंतू त्यांनाही हे काम करण्याकरीता काही त्यांची मुदत होती. त्यावेळी त्यांनी त्यांच्या अखत्यारित्यामध्ये हे काम पुर्ण करून घेतले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता किती खर्च येणार आहे त्याला

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हे काम पुर्ण करण्याकरीता साधारणत: ७ ते ८ लाख रूपये खर्च अपेक्षित आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझ्या माहीती प्रमाणे जे मी वाचले तर ते ६ लाख रूपये आहेत आता आपल्याला १० लाख रूपये भरावे लागणार आहेत. म्हणजे ४ लाख जास्त भरावे लागणार आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही आपल्याला १० लाख रूपये भरयचे नाहीयेत. आपल्याला ते रोडाची सरफेसिंग करायची आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे आपल्यालाच खर्च करायचा आहे ना तो, महापालिकेचाच पैसा खर्च होणार आहे तो.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपल्याला ती केबल टाकुन ते काम करून घ्यायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो ना मग मी तेच म्हणते आहे ना ते काम महापालिकेतर्फे करणार आहे. तर आपणच खर्च करणार आहे ना तो

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हो मॅडम

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे त्यांनी जेव्हा ते काम चालु होते तेव्हाच पाईप टाकुन घ्या अस त्यांनी महापालिकेला सुचविलेले होते. पण आपण तिकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आपल्याला परत ते खोदावे लागत आहे. आता जे डिव्हायडर आहेत ते परत खोदुन

**श्री.सुनिल महाजन :-** साहेब डिपीडीसी कडुन पण घेता येतील ना आपल्याला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काय घेता येईल.

**श्री.सुनिल महाजन :-** निधी घेता येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोणता निधी

**श्री.सुनिल महाजन :-** नियोजन मंडळाकडुन निधी घेता येईल आपल्याला

**श्री.अश्विन सोनवणे :-** डिपीडीसी कडुन घेवु ना १० लाख रूपये आपण

**सौ.उज्वला बेंडाळे :-** १० लाख रूपये ठिक आहे. माझी एक आयुक्त मॅडमांना विनंती आहे की प्रत्येक नगरसेवकांना पैसे द्या.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आता याचा जो निधी आहे तर त्याचे जो आपल्याला निधी मंजुर झालेला आहे.

**(सभागृहामध्ये बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यावेळी काय चर्चा झाली ती स्पष्ट ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ताईंचे म्हणणे बरोबर आहे की, मी गेल्या ३ वर्षांपासुन तेच सांगतो आहे की, सभागृहामध्ये बरेचशे विषय मनपा निधीचे येतात. नितीनभाऊ हसायचे नाही अजिबात, आम्ही पोटतिडकीने बोलतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आम्हाला का दिला जात नाही निधी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी जे बोलतोय ते क्लिअर बोलतोय, आम्ही पोटतिडकीने बोलतोय की नगरसेवकांना, बंटी भाऊ पण बोलले की छोटे स्लॅब कल्व्हर्ट आहे. नितीनभाऊ पण बोलले आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** आता हा विषय जो आलेला आहे विशेष अनुदानाचा

**मा.उपमहापौर :-** विशेष रस्ता अनुदान आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** विशेष अनुदान रस्ता अनुदान आहे. याची २८/०२/२०२२ ला मुदत संपलेली आहे. तरी मुदत मिळाली आहे का आपल्याला

**मा.उपमहापौर :-** भाऊ याच्यामध्ये अस आहे की हा जो रस्ता बनवणार आहे. मुळात हा जो रस्ता आहे हा आपण प्रस्तावित केलेला होता परंतू आपल्या तत्कालीन अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे याला विलंब झाला आहे. निविदा प्रक्रीया ही लेट झाली निविदा प्रक्रीया लेट झाल्यामुळे याची कार्यवाही करता आली नाही याला आपल्याला आदेश न दिल्यामुळे याला प्रस्तावित करता येणार नाही. आणि याला आपली प्रशासकीय मान्यता खर्चासाठीची जी आहे ती आहे. जिल्हाधिकारी , विभागीय आयुक्त यांनी प्रशासकीय दिलेली आहे. त्यांनी हा प्रस्ताव सादर करणेबाबत मान्यता पण दिलेली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** पण याच्यामध्ये

**मा.उपमहापौर :-** भाऊ ऐका ना प्रशासकीय मान्यता दिली गेलेली आहे

**श्री.धिरज सोनवणे :-** भाऊ पण

**मा.उपमहापौर :-** भाऊ ऐका ना पण याच्यामध्ये शासनस्तरावर याला मुदतवाढ देण्या संदर्भात जो जि.आर आला होता. मार्च महिन्यातील जि.आर आहे तो वानखेडे साहेब , त्याच्यानुसार आपल्याला जो निधी १६-१७ मध्ये मिळाला होता. तो निधी आपण काही निधी जे होते जे थांबवुन ठेवले होते. त्याच्यामध्ये हा पण निधी होता तर अपण हा निधी मिळवण्यासाठी महानगरपालिकेने शासनाकडे मंत्रालयामध्ये प्रस्ताव सादर केलेला आहे. पंरतू त्याची आपल्याला मुदतवाढ मिळालेली नाहीये. आणि संबंधित तो निधी आहे आपले काम जे आहे सेविंग मधीलच आहे आणि हे पैसे आपल्याकडेच आहेत.

**श्री.धिरज सोनवणे :-** जे काम आहे ना तो रस्ता व्हायला पाहीजे रस्त्याला विरोध नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** डिसीजन घ्या ना काय आहे तर ते.

**श्री.धिरज सोनवणे :-** मुदतवाढ आपल्याला शासनाकडुन मिळु शकत नाही का?

**मा.उपमहापौर :-** मिळेल ना, आपण प्रयत्न करतोय आणि प्रयत्न चालु आहेत. पण कसे आहे. प्रस्तावातच अस म्हंटलेले आहे की शासनाकडुन मुदतवाढ न मिळाल्यास आणि मग हे काम मनपा फंडातुन करावे.

**श्री.धिरज सोनवणे :-** आणि मग नाही मिळाली तर मग या रस्त्यासाठी ६८ लाख रूपये द्यायची तयारी मनपा प्रशासनाने दाखवली आहे.

**मा.उपमहापौर :-** बरोबर आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** मग

**श्री.सुनिल महाजन :-** मनपा फंडातुन कोण तयार आहे काम करायला.

**श्री.धिरज सोनवणे :-** एक मिनिंट भाऊ आपण नाही ठरवु शकत ना भाऊ काम कोणी करायचे ते , प्रशासन ६८ लाख रूपये खर्च करायला तयार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मनपा फंडातुन कोण काम करणार आहे भाऊ प्रत्येकाला २५-२५ लाख रूपये सर्वांना द्याना मग

**श्री.धिरज सोनवणे :-** आता आमच्या प्रभागाचे आम्ही असे प्रस्ताव आणतो त्याला पण तुम्ही मान्यता देत असतील तर आम्ही हा विषय मान्य करतो.

**मा.उपमहापौर :-** सादर करा भाऊ तुम्ही

**श्री.धिरज सोनवणे :-** एक मिनिंट प्रशासनाने उत्तर द्यावे. तुम्ही नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाचाच प्रस्ताव आहे हा

**श्री.धिरज सोनवणे :-** हा प्रस्ताव ६८ लाख रूपयांचा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमच्या सारख्या सदस्यांचे काम करत नाहीत तुम्ही मॅडम, आम्ही तर घरच्यासारखे संबंध आहेत आमचे तरी तुम्ही आमचे काम करीत नाहीयेत. आम्ही ४ काम टाकले आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** हा प्रस्तावात कामाची एवढी तत्परता आणि पुढे भविष्यात येणारी अडचण लक्षात घेता त्याची तयारी आहे. आमच्या सारख्या सामान्य नगरसेवकांचे बरेचशे प्रस्ताव हे मनपा फंडातुन रस्ते, गटारी काही असतील ते पण तत्परतेने मान्य करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** निधी द्या .बोलत नाही ना कुणी

**श्री.कैलास सोनवणे :-** टाईमपास करत आहेत तुम्ही बोला ना मग

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ना आप्पासाहेब

**श्री.धिरज सोनवणे :-** जो पर्यंत या गोष्टी येत नाही तोपर्यंत हा विषय तहकुब करावा अशी माझी सुचना आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** राज्य शासनाकडुन मुदतवाढचा प्रस्ताव येवू द्या मग हा विषय मंजुर करू

**मा.उपमहापौर :-** हा जो विषय आहे ना तुम्ही

**श्री.धिरज सोनवणे :-** हा जो खर्च आहे ना ते रस्ते मनपा फंडातुन करा आमची काही हरकत नाहीये. हा एकच नको सगळ्यांचे करा.

**श्री. सुरेश सोनवणे :-** महापौरताई, याच्यामध्ये पिंप्राळा, पिंप्राळा हुडको, खंडेराव नगर, सावखेडा रोड, मयुर कॉलनी हा पुर्ण परिसर हा या रस्त्यावर पुर्ण ये-जा करतो आणि त्या रोडावर इतकी परिस्थिती खराब आहे की त्याठिकाणी रिक्षा पलटुन जाते. तरी प्रशासनाचा प्रस्ताव मला मान्य आहे. प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री. सुरेश सोनवणे :-** मान्य करावा.

**श्री. जितेंद्र मराठे :-** आम्हाला काही हरकत नाहीये .पण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्ही विरोध करत नाहीये अस काही नाही पण प्रत्येक नगरसेवकाला निधी दिला पाहीजे ही आमची भुमिका आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्प्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.धिरज सोनवणे :-** मनपा कडे निधी नाहीये आणि त्याच्या अगोदरच आपण आधीच प्रक्रीया करून ठेवतोय या सभागृहात याची मान्यता घ्यायला लागते आहे.

**श्री. जितेंद्र मराठे :-** ताई आमच्या प्रभागामध्ये याच्यापुर्वी ५ कोटींचा निधी मंजुर केला होता दलितवस्तीतील ललीतभाऊंच्या उपस्थितीत साडेतिन कोटींचा निधी वापरण्यात आला आणि बाकी निधी परत गेला प्रशासकीय कारणांमुळे, आम्ही ईस्टिमेट दिले होते प्रशासनाकडे की आम्हाला मनपा फंडातुन हे काम करून द्या. त्यावेळेला आम्हाला सांगीतले की मनपाची एवढी आर्थिक परिस्थिती नाहीये आणि आपण ते करू शकत नाही. आता तुम्ही त्या ठिकाणी रायसोनी नगरला या तुम्ही आता परवा होते त्या ठिकाणी, तिथे अक्षरश: सांडपाण्याचे शोष खड्डे बनविलेले आहेत. प्रत्येक दोन घराचे तिथे शोष खड्डे बनविलेले आहेत. तुम्ही पाहीले आहे तिथली परिस्थती त्या गटारींना तुम्ही साधी मंजुरी देत नाहीत ती अत्यावश्यक गोष्ट आहे. मग तुम्हाला या रस्त्यावरची आवश्यकता कशी काय वाटते. आपल्याकडे कितीवेळा मागणी केली आपल्याकडे पत्र पाठवले आपल्याला व्हिजीटला बोलावले. मग आमच्याकडचे अत्यावश्यक रस्ते नाहीये का ? आता सुनिलभाऊ म्हणताहेत की ठेकेदार तयार होत नाहीत. आम्हाला तुम्ही परवानगी द्याना आम्ही करू कसे करायचे ते काम , भाऊ तिथे तुम्ही बघाल ना अक्षरश: सांडपण्यासाठी शोष खड्डे केले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो.

**श्री.धिरज सोनवणे :-** भाऊ ही तरतूद केली आहे बजेट मध्ये की मनपा फंडातुन नगरसेवकांना निधी द्यावा

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** माझ्या प्रभागातील एक वैष्णवी पार्कचा विषय आहे आणि तुम्ही केले नाही अत्यंत निकडीचा विषय आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** एका ठिकाणी आपण ६८ लाख रूपये खर्च करणारच आहे आपण आपल्याला वेळ आली तर आपण खर्च करणारच आहे. तशी तयारी होती म्हणुन आपण हा प्रस्ताव येथे आणलेला आहे. मग इतर लोकांनाही मंजुर करू नये का ?

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** १० मिनिंटामध्ये आपण २ कोटी ६८ लाख रूपये आपण केले आणि १० लाख रूपये आपण वाचवले .

**श्री.धिरज सोनवणे :-** हे फक्त मंजुर करून काही फायदा नाही कारण भाऊ माझा स्वत:चा अनुभव आहे. मॅडम स्वत: साईडवर सुध्दा येवुन गेले. त्यांनी स्वत: त्यांनी सांगीतले की कृपा करून मनपा फंडाचे प्रस्ताव आणत नका जावु. कारण आपल्याकडे निधी नाहीये द्यायला. मग एवढे ६८ लाख रूपये आपण द्यायची तयारी ठेवतोय तर मग आमचे २ ते ५ लाखांचे काम होत नाहीयेत.

**श्री.सुनिल महाजन :-** आता एक मिटींग झाली, आपल्या सर्वांच्या समस्या सुटणार आहे. आपल्या जळगांव जिल्ह्यामध्ये दोन कॅबिनेट आणि एक राज्यमंत्री शपथ घेणार आहे. त्याच्यामुळे जळगांव जिल्ह्याला खुप मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होईल. निधीची अडचण राहणार नाही. निधीची भानगड राहणार नाही.

**श्री.धिरज सोनवणे :-** आमचे मंत्री सगळे खासदार, आमदार हे आमचे महापौर आहेत. आमच्यासाठी आमचे सर्व काही आमचे महापौर आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. विजय पाटील :-** भाऊ, आम्हाला त्यांच्याकडुन अपेक्षा नाही आम्हाला तुमच्याकडुन अपेक्षा आहे. आमचे कामे झाले पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सुनिलभाऊ, मांडुन घ्या ना.

**श्री.सुनिल महाजन :-** मग करा ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग बोला ना. घ्या ना ठराव करा ना.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** फक्त महानगरपालिकेचा निधी पाहिजे आम्हाला.

**सौ.शोभा बारी :-** जो सोमाणी मार्केट पासुनचा जो रस्ता आहे ना तिथे खुपच खड्डे आहेत त्याठिकाणी आणि तो रस्ता व्हायलाच पाहीजे

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी या ठिकाणी प्रस्ताव मांडतो की प्रत्येक नगरसेवकाला मनपा निधीतुन २५ लाखांचे काम करण्याची मंजुरी देण्यात यावी. जे नगरसेवक त्या कामाची शिफारस करतील त्या कामांना त्याचे ताबडतोब त्याचे ईस्टिमेट असेल किंवा कोटेशन असेल ते टेंडर असेल ती प्रक्रीया राबवुन जो ठेकेदार मनपा निधीतुन काम करायला तयार असेल त्यांचे प्रस्ताव ताबडतोब मंजुर करण्यात यावे. असा ठराव मी याठिकाणी मांडतोय.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब तशी नोंद घ्या. गोराणेसाहेब प्रत्येक नगरसेवकाला अशी नोंद घ्यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ८० नगरसेवक आहेत सगळयांना द्या. स्विकृतसह देण्यात यावे.

**श्री.धिरज सोनवणे :-** २४-२४ कोटी रूपये देत आहेत तुम्ही म्हणजे आपल्याला फसविणाऱ्यांना आपण देतोय.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. सुरेश सोनवणे :-** आयुक्त मॅडम हे काम करण्यास माझ्याकडे ठेकेदार तयार आहे.

**मा.आयुक्त :-** हो पुर्ण बरोबर आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** सगळयांकडे आहेत ठेकेदार

**श्री.कैलास सोनवणे :-** काय झाले मॅडम नाही का

**श्री.धिरज सोनवणे :-** मॅडम नाही म्हणत आहेत ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मॅडम नाही आपण ठराव करा ना आपण नंतर पाहु ते काय आहे तर

**मा.उपमहापौर :-** हो दोन मिनिंट मॅडम बोलत आहेत विशाल भाऊ त्यांना बोलु द्या पाच मिनिंट , बोला मॅडम

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता. आपल्या प्रभागामधील अगदी छोटे-छोटे काम हे करण्यासाठी नगरसेवकांना बऱ्याच अडचणी येतात. त्याअनुषंगाने सर्व नगरसेवकांना २५-२५ लाखांपर्यंतचे काम करण्यास त्यांना मंजुरी देण्यात यावी. मनपा फंडातुन काम करण्यास त्यांना मंजुरी देण्यात यावी.

**श्री.धिरज सोनवणे :-** याच्यामध्ये जी राज्य शासनाची मुदतवाढ आहे ती येत नाही तोपर्यंत हे काम देण्यात येवु नये.

**मा.उपमहापौर :-** धिरजभाऊ एक मिनिंट

**मा.महापौर :-** आणि जळगांव शहरातील बरेचशे नागरीक महापौर आणि उपमहापौरांकडे येत असतात. तिथली परिस्थिती लक्षात घेता. महापौर व उपमहापौर त्यांचे स्वत:चे वॉर्ड सोडुन इतर ठिकाणांची परिस्थिती लक्षात घेता तिथे खरच आवश्यकता असेल तर त्यांना स्पेशल निधी देण्याचा ठराव आज करावा. जर आपल्या सर्व सन्मा.सदस्यांची ईच्छा असेल तर

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही, नाही मंजुर आहे , मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, महापौर व उपमहापौरांकरीता निधी मंजुर करा. मी काय म्हणतोय की आपण आता हा ठराव केला आहे आणि मॅडम नाही म्हणतात आहे. मग पुढचा १५ नंबरचा विषय कशासाठी आणला आहे येथे म्हणजे तो अधिकार द्यायचा १० लाखांचा म्हणजे तो विशिष्ट कामांसाठीच आणला आहे का?

**श्री.सुनिल महाजन :-** जनरल विषय आहे आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही मग त्यांना १० लाखाचे तुम्ही अधिकार देणार आहेत मनपा फंडाचे

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पासाहेब कस आहे की काम लवकर व्हायला पाहीजे आणि त्या टेंडर ची प्रोसेस लवकर झाली पाहीजे म्हणुन.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी काय म्हणतोय आता मॅडम नाहीच म्हणत आहे ना मग त्यांना अधिकार कसे काय देत आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही मग प्रस्ताव आलाच कसा काय? ६८ लाखांचा कसा आला.

**श्री.कैलास सोनवणे :-** याचे उत्तर द्या आम्हाला

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासकीय प्रस्ताव आलाच कसा काय?

**श्री.कैलास सोनवणे :-** याचे उत्तर द्या आम्हाला.

**मा.महापौर :-** आप्पासाहेब हा विषय जो आहे हा आपल्या सर्व नगरसेवकांच्या सोईसाठीचा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग मी कुठे नाही म्हणतोय

**मा.महापौर :-** आप्पासाहेब ७ ते ८ लाखांची फाईल सुध्दा बिलासाठी डबल-डबल ट्रिपल-ट्रिपल वेळा फिरते. तिला कुठेतरी ब्रेक मिळावा यासाठी आपण हे अधिकार शहर अभियंत्यांना देतो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे ना आमच्याही लक्षात येत आहे ना की आपण त्यांना १० लाखांचे अधिकार देत आहेत मनपा फंडाचे पण मग मॅडम नाहीच म्हणत आहे मनपा फंडाला तर मग कसे काय देताहेत की त्यांना विशिष्ट वॉर्डासाठी नेमणुक आहे का त्यांची हे सांगा.

**मा.महापौर :-** आप्पासाहेब मला सांगा ज्या-ज्या ठिकाणी काम करणं गरजेचच आहे त्या वॉर्डात करावचं लागणार आहे ना तुम्ही अस का म्हणत आहेत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** गैरसमज होतोय मॅडम तुमचा

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई आपण जर २५-२५ लाखांचा ठराव केला याठिकाणी मनपा फंडाचा ठराव केला आणि महापौर व उपमहापौरांना समजा ५० लाख किंवा १ कोटी चा निधी दिला. तर काहीच विशेष नाहीये ते काही खिश्यातुन द्यायचे नाहीयेत. पण मॅडम जर नाही म्हणत आहेत. तर मग मनपा फंडाचे जर अधिकार यांना म्हणजे गिरगांवकर साहेबांना देताहेत १० लाखाचे अधिकार देतात आहेत. मग ते कसे करतील, पण मॅडम नाही म्हणतात आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर :-** विषय क्रं. १२ चा निर्णय बाकी आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** मला मॅडमांकडुन उत्तर अपेक्षित आहे तर त्यांना उत्तर देवु द्या. आता विषय क्रं. १२ चा खर्च करायची तयारी प्रशासनाची आहे का ?

**श्री.सुनिल महाजन :-** शासनाच्या निर्णय आल्यावर होईल ना भाऊ ते

**श्री.धिरज सोनवणे :-** काय शासनाच्या याच्यावर आहे का

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ शासनाचा निधी नाहीये ना प्रशासनाचा प्रस्ताव आहे तो

**श्री.धिरज सोनवणे :-** आयुक्त मॅडमांच्या संमतीनेच आलाय ना हा प्रस्ताव ६८ लाख रूपयांचा जो मंजुर करतोय आपण

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.धिरज सोनवणे :-** काय ? आमचा कामाला विरोध नाही. आमचा कुठल्याही कामाला विरोध नाहीये नितीनभाऊ , एकाच वॉर्डात म्हणजे आयुक्तांची भुमिका काय आहे फक्त ती विचारतो आहे आम्ही येथे

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो आयुक्तांची भुमिका काय आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** आयुक्तांची भुमिका काय आहे ती तर कळु द्या. ६८ लाख रूपये द्यायची तयारी आहे का ? तेच विचारायचे आहे फक्त दुसरे काही नाही. त्यांना देताहेत मग बाकी लोकांना का देत नाहीयेत.

**श्री.सुनिल महाजन :-** नगरसेवकांचा ठराव मंजुर केला आहे ना आपण

**श्री.धिरज सोनवणे :-** म्हणजे ६८-६८ लाख प्रत्येक वॉर्डात देणार आहे का?

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ ६८ लाख म्हंटले म्हणजे

**श्री.जितेंद्र मराठे :-** नाही ना भाऊ हे पहा ना तुम्ही

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ २५-२५ चे एक कोटी होतात की नाही?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ हा विषय वेगळा आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** हा विषय वाचुन घ्या भाऊ एकदा तुम्ही परत वाचुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** आपण जो ठराव केला आहे २५-२५ लाखांचा तर ते भाऊ बरोबर सांगताहेत की एका प्रभागामध्ये बरोबर १ कोटी होतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ठिक आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** २५-२५ चे मान्य केले की नाही आता एक कोटी होतात ना भाऊ

**श्री.धिरज सोनवणे :-** दोन मिनिंट मला माझ्या प्रश्नाच उत्तर देवुन द्या फक्त

**श्री.कैलास सोनवणे :-** ६८ लाख तर मंजुर होवुन गेले आहे आता पण बाकीचे १-१ कोटी होणार आहे का मनपा फंडातुन

**श्री.धिरज सोनवणे :-** महापौर साहेब याच्यावर मला उत्तर पाहीजे आहे. याच्यावर मला आयुक्तांकडुन उत्तर हवे आहे. कारण प्रशासनाकडुन आलेला विषय आहे हा

**मा.उपमहापौर :-** ठराव मंजुर आहे ना सर्वानुमते

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर व सर्व सन्मा.सदस्य सन २०१६-१७ मध्ये विशेष रस्ता अनुदान मंजुर झालेले होते. त्या रस्त्यांची कामे होत-होत ५ वर्षांमध्ये जो शिल्लक राहीला होता. त्या शिल्लक निधीला आपल्याला २४ फेब्रुवारी रोजी विभागीय आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तो निधी आपल्याकडे शिल्लक आहे. परंतू हे खर्चाची परवानगी आपल्याकडे नाहीये. गेल्या ५ वर्षांत खर्च करायची परवानगी आपली २८ फेब्रवारी रोजी संपलेली आहे. वर्कऑर्डर दिलेली नाहीये. मी जेव्हा फाईल २४ फेब्रुवारीला हे टेंडर झालेले आहे आता माझ्याकडे वर्कऑर्डरसाठी आलेले आहे वर्कऑर्डरमध्ये एक अट होती की जर शासनाने मुदतवाढ नाही दिली तर MC फंडातुन देण्यात येईल. या गोष्टीला माझा विरोध होता म्हणुन तो जनरल बॉडीकडे निर्णयाला आला आहे. कारण आयुक्तांना २५ लाखांच्या वरचे मान्यतेचे अधिकार नाहीत. निधी आपल्याकडे आहे परंतू शासनाची मुदतवाढ आलेली नाही. आपण शासनास मुदतवाढीसाठीचे पत्र पण दिलेले आहे. परंतू अद्याप मुदतवाढ प्राप्त झालेली नाही. MC फंडातुन हा खर्च करायचा की नाही निर्णय जनरल बॉडीचा आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** नाही मग आल्यानंतर करा मग मॅडम

**मा.उपमहापौर :-** ठराव रद्द करायचा आहे का?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही आमचा कुठलाच विरोध नाहीये. फक्त .

**मा.उपमहापौर :-** आता आपण प्रत्येक नगरसेवकांना २५-२५ लाख रूपये देण्याचा निर्णय झालेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी सांगतो की ती गोराणे साहेबांची अडचण पण मी दुरूस्त करून देतो आत्ताच म्हणजे त्यांना पण अडचण येणार नाही. साहेब आता हा जो विषय आहे हा प्रशासनाने पाठविलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा तसेच यासोबत जळगांव शहरातील प्रत्येकी नगरसेवक २५-२५ लाख रूपये मनपा निधीतुन ते जी शिफारस करतील त्या कामांना पण द्या. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मंजुरी देण्यात येत आहे. असा ठराव आपण करून घ्यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** प्रशासनाकडुन आर्थिक बाबी तपासुन निर्णय घेण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्यात ६८ लाखांच्या याच्यात कुठे म्हंटले आहे आपण

**मा.आयुक्त :-** आपण ही मुदतवाढ आल्यानंतर मुलेप कडे जाईल. टेंडर मध्ये अट टाकली जाईल आणि पैसे आहे का त्यानंतरच पुढची वर्कऑर्डर होईल. टेंडर झालेले आहे हे त्यासाठी पुन्हा वर्कऑर्डरसाठी पुढे आलेली आहे. कारण ते अधिकार आयुक्तांना नाही. आज जरी जनरल बॉडीने मान्यता दिली तरी पुन्हा मुलेपकडे प्रस्ताव जाईल. आपल्याकडे जर आर्थिक तरतूद असेल तर तो मान्य होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही पण मॅडम टेंडर झाले तेव्हा चेक केले नाही का?

**मा.आयुक्त :-** सर्व सन्मा. सदस्यांना माहीतीसाठी सांगते उस्मानाबाद नगरपालिका आहे तिथे सन्मा. अधिकाऱ्यांनी मान्यता दिली होती. पैसे नसतांना वर्कऑर्डर देण्यात आल्या आणि आज अशी परिस्थिती आहे की २ हजार रूपयांचा चेक जरी नगरपालिकेचा दिला तरी तो बाऊन्स होतो. त्यामुळे ती परिस्थिती आपल्यावर येवु नये म्हणुन आपण आर्थिक परिस्थिती बघुनच निर्णय घेतले तर आपल्या सर्वांसाठी चांगले होईन अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** मॅडम पण अस व्हायला नकोय ना आपल्याला जबरजस्तीने पैसे द्यावे लागत आहेत मॅडम आपण या ठिकाणी काही विचार करतोय का आपल्यावर काहीतरी म्हणजे ठरवुन दिलेल्या गोष्टींचे पैसे देणे आता आपला निधी चे पैसे दिले आहे. एखाद्या जागेचे पैसे दिल्यानंतर पण आपल्याला त्याला पैसे द्यावे लागले आहेत.अशा ठिकाणी आपल्याला ते द्यावेत लागत आहेत ना.

**मा. महापौर :-** विषय क्रं. १२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विशेष रस्ता अनुदान अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० मधील हुडको दर्गा ते स्वस्त धान्य दुकाना पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामास महासभा ठराव क्रमांक ६९३ दि.१५/१२/२०२१ अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांच्या कडेस पत्र क्रं.नपा/संकलन-३/३२३५/२०२२/ २८४२ दि.२४/०२/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२५/०२/२०२२ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१२९ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./१६११ दि.२८/०२/२०२२ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०१/०३/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ०३ मक्तेदारांचे प्राप्त कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार श्री.बालाजी कंन्स्ट्रक्शन यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता पुर्ण न केल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे. उर्वरीत खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५८४४६०७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दराने | ६२५३७२९/- |
| २ | पराग बिल्डकॉन | निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दराने | ६७२१२९८/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी सा.बा.पत्र क्रं.४०९ दि.२०/०६/२०२२ अन्वये दरा बाबत दि.२३/०६/२०२२ रोजी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी येवून सा.बा.आ.क्र./१३८४ दि.२९/०६/२०२२ चे पत्रान्वये सदरचे काम निविदा रक्कमेइतकेचेच दरात करण्याची लेखी संमती दिली आहे त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५८४४६०७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयलटी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ५८४४६०७/- |
| ०२ | जि.एस.टी. १२% | ७०१३५३/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २९२२३/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ४२५०/- |
| ०५ | रॉयलटी चार्जेस | २८६०१९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | ६८६५४५२/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६८६५४५२/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.६८६५४५२/- मात्र विशेष रस्ता अनुदान अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेइतकेचेच दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी विशेष रस्ता अनुदान रक्कम रु.३.७५ कोटी मात्रचा निधी सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात मंजुर करण्यात आला असून सदर अनुदाना अंतर्गत मेहरुण तलाव सभोवतालचा रस्ता डांबरीकरण करण्याकरीता रक्कम रु.३.४२ कोटी मात्रच्या अंदाजपत्रकास दि.१४/०३/२०१८ रोजी विभागीय आयुक्त नाशिक यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सदर कामी रक्कम रु.३.०६ कोटी प्रत्यक्षात खर्च झाला त्यामुळे प्राप्त अनुदानातुन रक्कम रु.६८.६७ लक्ष अनुदान शिल्लक राहिले त्याअंतर्गत वर नमुद काम करण्यास महासभा ठराव क्रं.६९३ दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली त्याअनुषंगाने दि.२०/०१/२०२२ रोजी उक्त कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणे करीता जिल्हाधिकारी यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांनी सदर प्रस्तावास शिफारस देवुन जिल्हास्तरीय समिती यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला सदर प्रस्तावास जिल्हास्तर समिती यांनी दि.१४/०२/२०२२ रोजी व्हि.सी.व्दारा बैठक घेवून समीतीत ठरल्याप्रमाणे दि.२४/०२/२०२२ रोजी रक्कम रु.६८.६५ लक्ष रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. तदनंतर दि.२८/०२/२०२२ रोजी सदर अनुदान खर्च करण्याची मुदत संपलेली असल्याने उक्त कामाची ई निविदा प्रसिध्द करतेवेळी खालील प्रमाणे टिप टाकुन प्रसिध्द करण्यात आली आहे.

"प्रशासकीय मान्यता मिळालेले काम हे विशेष रस्ता अनुदाना अंतर्गत असल्याने अनुदान खर्च करण्याची मुदत दि.२८/०२/२०२२ रोजी संपल्याने सदरचे अनुदान खर्च करण्याची मुदतवाढ शासनाकडुन मिळेल या आशेवर सदर कामाची ई निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर कामाचा कार्यादेश देण्यापुर्वी अनुदान खर्च करण्याची मुदतवाढ न मिळालयास निविदा प्रक्रिया रद्द समजण्यात यावी " अशी टिप टाकण्यात आलेली आहे.

सदर कामाची मुदतवाढ दि.२८/०२/२०२२ रोजी संपलेली असल्याने अवर सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडेस दि.१४/०३/२०२२ रोजी निधी खर्च करण्यासाठी दि.३०/०६/२०२२ अखेर पावेतो मुदतवाढ मिळण्याचे मागणी पत्र सादर करण्यात आले आहे. परंतु अदयाप पावेतो निधी खर्च करण्यास शासना कडुन मुदतवाढ मिळालेली नाही. सदर निधी खर्च करण्यास पुन्हा शासनाकडेस मुदतवाढ मागणी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदरचे काम करणे आवश्यक असल्याबाबत स्थानिक नागरीकांची मागणी विचारात घेता मुदतवाढीचे प्रस्तावास शासनाकडुन मान्यता प्राप्त न झाल्यास होणारा खर्च हा मनपा निधीतुन सन २०२२-२३ या आर्थीक वर्षाचे अर्थ संकल्प मधिल नविन रस्ते या लेखा शिर्षाअंतर्गत करावा लागणार आहे. या कामी प्रथमत: मनपा महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचे काम मनपा निधीतुन करणे झाल्यास यापुर्वीच मागविण्यात आलेले निविदा दरानुसारच म्हणजेच वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दराचे सर्वात कमी दर आलेले निविदा धारक शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन सदरचे काम पुर्ण करुन घेणे उचित होईल.

त्याकरीता सदर कामी आलेले दरास व सदरचे काम शासकीय निधी खर्च करण्यास मुदतवाढ न मिळाल्यास मनपा निधीतुन करण्यास तसेच सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात सन्मा.सदस्य यांनी मागणी केल्यानूसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जळगांव शहर महानगरपालिकेतील सर्व सन्मा.सदस्य तसेच स्विकृत सदस्य यांना आपआपल्या वॉर्डातील किरकोळ विकास कामे मनपा फंडातून करणेसाठी प्रत्येकी रक्कम रु.२५ लक्ष पर्यंतचा निधी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.२५ लक्ष पर्यंतचे सन्मा.सदस्य जी कामे मनपा फंडातून प्रस्तावीत करतील ती कामे करणेत यावीत.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ३७ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-** विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील सर्व सन्मा.नगरसेवकांनी मा.महापौर,मनपा जळगांव यांचेकडेस विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असून ते विविध शासकीय योजनांतुन घेणेबाबत विंनती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलित वस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नाविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभूत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्टयपुर्ण योजनेतुन व शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधीतील कामे सुचविलेली असून त्यास मा.महासभेची मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले असल्याने मा.महापौर,मनपा,जळगांव यांनी सादर केलेल्या यासोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ३७ विकास कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**महासभा क्र.**41 **महासभा ठराव क्र.**874 **दि.**08/08/2022

| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्य/ सदस्या** | **प्र.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 योगेश्वर नगर मध्ये आरसीसी गटारी व स्लॅब कल्व्हेट टाकणे | 80,00,000 |
| 2 | 4,00,00,000 | | प्र.क्र.3 तळेले कॉलनी मध्ये डांबरी रस्ते करणे | 1,00,00,000 |
| 3 | | | प्र.क्र.3 काशिनाथ नगर मध्ये डांबरी रस्ते करणे | 70,00,000 |
| 4 | | | प्र.क्र.3 जुना असोदा रोड परिसरात आरसीसी गटारी व स्लॅब कल्व्हेट टाकणे | 50,00,000 |
| 5 | | | प्र.क्र.3 विठोबा नगर मध्ये डांबरी रस्ते करणे | 1,00,00,000 |
| 6 | श्री.चेतन सनकत | 4 | प्रभाग क्र. 4 गुरुनानक नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 2289001 |
| 7 | 2,70,78,597 | | प्रभाग क्र. 4 बळीराम पेठ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 3157864 |
| 8 | | | प्रभाग क्र. 4 काट्याफाईल मधील रस्ते डांबरीकरण करणे | 3264855 |
| 9 | | | प्रभाग क्र. 4 इस्लामपुरा मधील रस्ते डांबरीकरण करणे | 2974097 |
| 10 | | | प्रभाग क्र. 4 गुरुनानक नगर, काट्याफाईल, ईस्लामपुरा इ. भागात रस्ते डांबरीकरण करणे | 15392780 |
| 11 | प्रा.डॉ.सचिन पाटील | 7 | गोकुळ स्वीट मार्ट ते गणगोपी अर्पाटमेंट व खुल्या जागेपर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 12 | 2,00,00,000 | | शिव कॉलनी गट नं. 60 मधील प्रमुख रस्ते डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 13 | | | शिव कॉलनी गट नं. 54 मधील प्रमुख रस्ते डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 14 | | | शिव कॉलनी गट नं. 53 व 55 मधील प्रमुख रस्ते डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 15 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 मनपा निधीतून चंदू आण्णा नगर ते कचरा फॅक्टरी पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 45,00,000 |
| | 45,00,000 | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16 | श्री.सदाशिवराव ढेकळे | 14 | प्र.क्र.14 कै.तात्यासाहेब गणपतराव ढेकळे जिम्नॅशियम हॉल रस्त्याच्या कारणामुळे तोडण्यात आला आहे तरी विद्या इंग्लीश मेडियम फाऊंडेशनच्या जागेला लागुन मनपाच्या जागेवर नव्याने बांधणे | |
| 17 | | | प्र.क्र. 14 मधील मेहरुण स्मशानभुमीचे सुशोभिकरण करणे | |
| 18 | | | प्र.क्र. 14 मधील गणपती नगरचे सर्व रस्ते डांबरीकरण करणे | |
| 19 | | | प्र.क्र. 14 मधील आदर्श नगरचे सर्व रस्ते डांबरीकरण करणे | |
| 20 | | | प्र.क्र. 14 मधील गायत्री नगरचे सर्व रस्ते डांबरीकरण करणे | |
| 21 | | | प्र.क्र. 14 अंतर्गत गायत्री नगर मधील सर्व आरसीसी गटारी बांधणे व स्लॅब कल्व्हट बांधणे | |
| 22 | सौ.रंजना वानखेडे | 17 | प्रभाग क्र. 17 मधील हनुमान नगर मधील हनुमान पॅराडाईज ते गार्गी पार्क पर्यत डांबरीकरण रस्ता करणे (सर्वे नं.57/58) व इतर रस्ते करणे | 40,00,000 |
| 23 | 3,45,00,000 | | प्रभाग क्र. 17 मधील सर्वे नं.39/1 मधील बापु सैंदाणे यांच्या घरापासून ते माकोडे चक्की पर्यत डांबरीकरण रस्ता करणे | 4,55,000 |
| 24 | | | प्रभाग क्र. 17 मधील देवराज ऑटो गॅरेज ते सृजन क्लासेस पर्यत डांबरीकरण रस्ता करणे | 5,45,000 |
| 25 | | | प्रभाग क्र. 17 मधील सिध्दी विनायक शाळा ते हनूमान नगर पुलापर्यत डांबरीकरण करणे | 6,00,000 |
| 26 | | | प्रभाग क्र. 17 मधील सिध्दी विनायक शाळा ते भारुळे साहेबांच्या घरापुढील भाग डांबरीकरण रस्ता करणे | 8,00,000 |
| 27 | | | प्रभाग क्र. 17 मधील सुर्यकांत लाहोटी यांच्या घरापासुन ते रेमंन्ड कॉलनी गेट व पुढील भाग डांबरीकरण रस्ता करणे | 6,00,000 |
| 28 | | | प्रभाग क्र. 17 मधील सदगुरु नगर मधील विविध ठिकाणचे डांबरीकरण रस्ते करणे (सर्वे नं. 39/1, 39/2, 42/1, 43 कौतिक नगर) | 35,00,000 |
| 29 | | | प्रभाग क्र. 17 मधील सदगुरु नगर येथील राम मंदीराकडील भाग कौतिक नगर, अपनाघर कॉलनी येथे ठिकठिकाणी डांबरीकरण रस्ते करणे | 1,25,00,000 |
| 30 | | | प्रभाग क्र. 17 मधील हनुमान नगर सर्वे नं. 57/58 व कौतिक नगर मधील सर्वे नं. 43 येथील आरसीसी गटारींचे व कल्व्हट करणे | 20,00,000 |
| 31 | | | प्रभाग क्र. 17 मधील लक्ष्मीनारायण नगर येथील आरसीसी गटारींचे व कल्व्हट करणे गट नं. 57/58 खेडी शिवार | 40,00,000 |
| 32 | | | प्रभाग क्र. 17 मधील सदगुरु नगर सर्वे नं. 39/1 व सर्वे नं. 40/8, 141/3 साई पार्क मधील आरसीसी गटारींचे व कल्व्हट करणे | 55,00,000 |
| 33 | इब्राहीम पटेल | 18 | वा.क्र.18 अंतर्गत सर्वे नं. 16 व 17 व सर्वे नं. 20 रजा कॉलनी मधील भागात आरसीसी गटार बांधणे व स्लॅब कल्व्हट बांधणे | 60,00,000 |
| 34 | 1,70,00,000 | | वा.क्र.18 अंतर्गत सर्वे नं. 22/1, 22/3, 22/4 गजानन नगर उपासणी नगर मध्ये खडीकरणासह डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 35 | | | वा.क्र.18 अंतर्गत मेहरुण सर्वे नं. 15 मध्ये रस्ता कॉक्रीट करणेसाठी इकरा कॉलनी सिमेंट गल्ली | 10,00,000 |
| 36 | | | वा.क्र.18 अंतर्गत मेहरुण सर्वे नं. 10/1, 10/2 मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हट बांधणे | 40,00,000 |
| 37 | | | वा.क्र.18 अंतर्गत रस्त्यावरील नविन विद्युत पोल उभारणे | 10,00,000 |
| | 14,30,78,597 | | | 14,30,78,597 |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १४ :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभागातील रस्ते दुरुस्ती कामी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबत मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-** विषय क्रं. १४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदयस्थितीत जळगांव शहरात अमृत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजने अंतर्गत जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या टाकणेची कामे कार्यपथावर आहेत. सदर कामांदरम्यान शहर प्रमुख रस्त्यासह बहुतांश रस्त्यावर चाऱ्या खोदण्यात आलेल्या आहे. तसेच पावसाळा सुरु झाल्याने शहरातील रस्त्याची अवस्था खराब झालेली असून शहरवासियांकडून रस्ते दुरुस्ती बाबत वारंवार मागणी होत असून नागरीकांकडून वृत्तपत्रकांमार्फत दैनंदिन नकारात्मक व मनपा विरोधी बातम्या प्रसिध्द होत असल्याने जळगांव शहरातील विविध प्रभागातील सर्व खराब, खड्डेमय रस्ते दुरुस्ती कामी खालील नमुद अत्याधुनीक व आवश्यक यंत्रसामग्री मनपा फंडातुन खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल/मॉडेल | नग |
|---|---|---|
| १ | जेसीबी | ०४ |
| २ | रोड रोलर | ०२ |
| ३ | २१० पोकलॅन्ड | ०१ |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १५ :-** शासकीय सनदी अधिकारी शहर अभियंता यांना रक्कम रु.१० लक्ष मात्र पर्यंतच्या कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये १० लाखांच्या ऐवजी शहर अभियंता यांना ५ लाखांपर्यंतचे अधिकार शहर अभियंता यांना देण्यात यावेत. तसेच डिपीडीसी चे असतील तर ते १० लक्ष पर्यंतचे देण्यात यावेत. त्यानंतर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग, भुयारी गटारी, विद्युत विभाग व इतर पुढील प्रशासकीय मान्यता देण्याला शहर अभियंता यांचे मार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर ठेकेदारासोबत करारनामा करणेस व कार्यादेश देण्यात मान्यता प्रदान करण्यात येत आहे. निविदा आवश्यकतेनुसार मुदतवाढ मंजुर किमतींच्या मंजुरीस व खंड ३८ मध्ये नमुद केल्यानुसार मंजुरी देण्यास मान्यता देण्यात यावी तसेच कार्यादेश दिल्यानंतर निविदेत भाग घेतलेल्या ठेकेदारांची निविदा अनामत रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या विविध विकास कामांना अशा कामांसंबंधित निधी उपलब्ध होवोस्तोर जिल्हाधिकारी साहेबांकडे अंदाजपत्रक सादर करणे व त्याबाबतीत पत्रव्यवहार करणेस मान्यता देण्यात येत आहे. म्हणजे शहर अभियंत्यांना हे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तरी हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निविदांना ८ दिवसांची मुदत ठेवण्यात यावी आणि निविदा ज्या दिवशी अंतिम तारीख असते त्या ही दिवशी निविदा प्रक्रीया संपल्यानंतर त्यावेळी निविदा प्रक्रीया पुर्ण करून त्या संदर्भातील कार्यादेश देण्याची पुढील कार्यवाही दोन दिवसांत करण्यात यावी. कारण काय होते की आपल्या येथे निविदा प्रक्रीयेलाच जास्त वेळ लागतो आणि त्याच्यामुळे कामाच्या गतीवर परिणाम होतो.

**मा. महापौर :-** सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या सर्व बाबीप्रमाणे विषय क्रं. १५ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, बऱ्याच वर्षाच्या प्रतिक्षेनंतर जळगांव शहर महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदी श्री.एम.जी.गिरगांवकर यांची महाराष्ट्र शासनाकडून पदस्थापना करण्यात आलेली असून यामुळे मनपाच्या विकास कामांमध्ये सुसुत्रता आलेली दिसून येत आहे. मनपातर्फे शहरवासियांना मुलभूत सोईसुविधा पुरविणेसाठी बांधकाम विभागाची महत्वाची भुमिका असून या वर्षी महानगरपालिकेस जिल्हा नियोजन समिती तसेच शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातुन मुबलक निधी उपलब्ध होत आहे. सदर निधीचा सुयोग्य नियोजनाव्दारे विकास कामांवर खर्च करणे अपेक्षित असून मनपाच्या बांधकाम विभागा अंतर्गतच्या कामकाजात गतिमानता आणणे तसेच श्री.एम.जी.गिरगांवकर हे महाराष्ट्र शासनाकडीहल दिर्घ अनुभवती सनदी अधिकारी असल्यामुळे महानगरपालिकेच्या कामात प्रशासकीय गतिमानता आणण्याच्यादृष्टीने शहर अभियंता श्री.एम.जी.गिरगांवकर यांना सभागृहात झालेल्या चर्चेनूसार खालील प्रकारे अधिकार प्राप्त करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) महापालीका फंडाचे रु.५ लक्ष पर्यंत किंमतीचे तसेच डी.पी.सी.फंड व शासनाच्या फंडाच्या रु.१० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२) महानगरपालिकेतील पाणी पुरवठा, भुयारी गटार, बांधकाम विभाग, विदयुत विभाग व इतर अभियांत्रीकी संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील निविदा प्रक्रिया शहर अभियंता मार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर किंमतीनुसार संबंधित प्राधिकर्त्याची मान्यता मिळाल्यावर ठेकेदारासोबत निविदा स्वीकृती करारनामा करणे, कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) निविदेस आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यास, मंजुर किंमतीच्या मर्यादित अतिरिक्त बाबीस व खंड ३८ अंतर्गत प्रस्तावास मंजुरी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) तसेच कार्यादेशानंतर निविदेत भाग घेतलेल्या ठेकेदारांची निविदा अनामत (EMD) परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) महानगरपालिकेस जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विविध विकासाच्या कामांना निधी उपलब्ध होत असतो अशा कामा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास अंदाजपत्रक सादर करणे व त्याअनुशंगीक पत्र व्यवहार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मात्र असे करीत असतांना प्रशासकिय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेणेत यावी. जर प्रशासकिय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल तर सदर प्रकरणी आयुक्त यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील या अटीवर मान्यता देणेचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १६ :-** रामदास कॉलनी परिसरातील “ओपनस्पेस” उदयान विकसित करणेसाठी मिळणेबाबत जळगांव पिपल्स को-ऑफ बँकस्, रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट,जळगांव यांचा मा.महापौर,मनपा,जळगांव यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** सदर प्रस्ताव मान्यता देण्यात यावी आणि यापुर्वी त्या जागेवरील ठराव केलेले आहेत. ते रद्द करण्यात यावे आणि पुर्वीपासुन त्या कॉलनीचे रामदास कॉलनी नांव असल्यामुळे त्या जागेला रामदास पार्क म्हणुनच ओळखले जाईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, आयुक्त महोदया, रामदास कॉलनीच्या बगीच्याच्या ज्या निविदा निघालेल्या होत्या त्यासाठी मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी २५ कोटींचा विशेष निधी मंजुर केलेला होता. त्यातील ८३ लक्ष रूपये आपल्या या बगीच्यासाठी विकसित करण्यासाठी देण्यात आलेले होते. त्यानंतर प्रभाग क्रं. १५ नं. १२ नं. आणि १८ नं. यांच्या निविदा एकत्र क्लब करण्यात आलेल्या होत्या. तर त्या एकत्र क्लब केल्या का हा पहिला मुद्दा आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** त्याच्या विरूध्द हायकोर्टात केस चालु आहे ताई, सुजित नारखेडे हायकोर्टात गेले होते. त्याची याचिका हायकोर्टाने फेटाळलेली होती. म्हणजे की ही बाब महानगरपालिकेची आहे तर तसे आदेश हायकोर्टाने देवुन टाकले होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ते तर बरोबर आहे तुमच्या म्हणण्याप्रमाणे

**श्री.सुनिल महाजन :-** हो माझे नाहीये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हायकोर्टाचे आहे ना, ठिक आहे. त्यानंतर बांधकामच्या लक्षात आले की आम्ही पत्र दिले आयुक्तांना की हे असे असे क्लब केलेले आहे आणि याच्यात जर काही ईश्यु झाला तर याला जबाबदार तुम्ही असाल. त्याच्यानंतर पहिली निविदा निघाली आणि त्यानंतर अर्ज दिला त्याच्यानंतर परत दुसरी निविदा निघाली. म्हणजे त्यांनी वेगवेगळे केल्यानंतर जे म्हणजे विशेष निधीचा जो भाग होता तो वेगळा केला आणि १२ नंबरचा वेगळा आणि १५ व १८ नंबरचा वेगळा केला आणि या ज्या दोन निविदा निघाल्या याचा खर्च कोणी केला .

**मा.आयुक्त :-** सोनगिरे साहेब मला वाटत त्यावेळी कुलकर्णी साहेब होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो कुलकर्णी साहेब होते त्यावेळी

**श्री.सुनिल महाजन :-** ताई तो विषय वेगळा आहे. तुमच्या ते लक्षात येत नाहीये आणि जे जिल्हा नियोजन मंडळाकडुन मिळालेले होते आणि मग १२ , १५ आणि १८ हे दलितवस्ती आणि नगरोत्थान निधी होते त्याच्यामुळे निविदा तर एकच निघाली ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** निविदा एक निघाली हे आमच्या लक्षात आले.

**श्री.सुनिल महाजन :-** हो बरोबर ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** निविदा त्यांनी एकच काढली होती.

**श्री.सुनिल महाजन :-** बरोबर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तर आम्ही आयुक्त महोदयांना एक अर्ज दिला की हे अस करता येत का ? जर करता येत नसेल तर याला जबाबदार तुम्ही असाल. हे केल्यानंतर परत दुसरी निविदा काढण्यात आली. पहिली तर निघालेली होती पण परत निविदा का प्रसिध्द केली जर ते करता ये नसेल तर

**श्री.सुनिल महाजन :-** ताई त्याच्यात मक्तेदार पार्टीशिपेशन झाले नसतील म्हणुन परत काढली असेल निविदा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग लगेच आठ आठ दिवसांमध्ये महिन्याभरामध्ये लगेच होत का ?

**श्री.सुनिल महाजन :-** रिकॉल तर होणारच आहे ना. जर प्रतिसाद नाही मिळाला तर रिकॉल होते ताई ते. टेन्डर रिकॉल होतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोण संबंधीत असेल त्यांना बोलवा.

**श्री.सोनगीरे :-** याठिकाणी जो मुद्दा उपस्थित झालेला आहे. त्या संबंधित या विषयाशी अशी माहीती देवु शकतो की आपण ज्यावेळेला निविदा काढली म्हणजे या कामाची निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली होती. त्यावेळी काही सन्मा.सदस्यांनी अस ऑब्जेक्शन घेतलं होत की, या निविदा प्रक्रीयेतील ज्या अटी शर्ती आहेत. तर या अटी शर्ती या बदलविणे आवश्यक आहे. त्यामुळे मक्तेदारांना मुदतीत काम करणे किंवा जेवढं बंधन पाहीजे तेवढ नाहीये म्हणुन सुधारीत अटी शर्ती तयार करण्याची प्रक्रीया ही तत्कालीन आयुक्त साहेब त्यांनी या टेंडर मधील अटी शर्ती बदलविणेबाबत आदेश दिलेले होते की सुधारीत टेंडर प्रक्रीया राबविण्यात यावी आणि त्यानुसार टेंडर प्रक्रीया करण्यात यावी. तर मग त्यावेळेचे आपले जे शहर अभियंता होते व्हि.ओ.सोनवणी साहेब त्यांनी या टेंडर प्रक्रीयेतील अटी व शर्ती बदलविल्या आणि त्यानुसार नविन अटी-शर्तींनुसार ते टेंडर प्रक्रीया पुर्ण करून काढण्यात आले. जस आता सुनिलभाऊंनी सांगीतले की टेंडर रिकॉल करण्याचे पुर्ण अधिकार हे प्रशासनाला आहेत किंवा आयुक्तांना आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** टेंडर बदलविले गेले आहेत. टेंडर वेगवेगळे झाले होते.

**श्री.सोनगीरे :-** हो ना

**सौ.उज्वला बेंडाळे :-** १२ नंबरचे टेंडर वेगळे झाले आहे आणि १५ व १८ नंबरचे वेगळे झाले आहे.

**श्री.सोनगीरे :-** हो पण त्या टेंडर मधील अटी-शर्तींना बदलविण्यासाठीचे जे काम बाकी होते तर ते काम बाकी होते तर ते सगळेच टेंडर नविन अटी शर्तीनुसार काढलेले आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पहिले टेंडर केले का मग पत्र दिल्यांनतर ते टेंडर का काढले?

**श्री.सोनगीरे :-** ताई ते जे

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याचा खर्च कोण देणार आहे मग

**श्री.सोनगीरे :-** ताई ते जे टेंडर काढले होते ना त्या टेंडर मधील अटी-शर्ती या कडक करून टेंडर काढुन आणि जेणेकरून मक्तेदाराला ते काम मुदतीत पुर्ण करून देणेसाठी म्हणजे LB वाढवुन न देता ते काम पुर्ण करणे या सगळ्या गोष्टींची सुधारणा करणे आवश्यक होते आणि मग त्याचवेळी ती सुधारणा केली आणि खुप कमी टेंडर येणार होते आणि त्या निधीचा पैसा आपल्याला खर्च करायचा होता आणि ते टेंडर काढायचे होते आणि ही सर्व प्रक्रीया बदलविण्यासाठी मंजुरी झाल्यानंतरच आपण नविन टेंडर काढले होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** या प्रक्रीयेचा आमचा आरोप राहील. जर तुम्हाला टेंडर प्रक्रीया ही वाटत होती तर तुम्ही एकदा क्लब केले आणि मग वेगळं करायचे कारण काय आणि मग अटी शर्तींच कारण हे काही कारण आहे का?

**श्री.सोनगीरे :-** ताई मी तेच म्हणतोय की ज्यावेळेला आपण टेंडर एकत्रितपणे काढलं होत त्यावेळेला काही अटी शर्ती बदलवायच्या होत्या आणि मग अटी-शर्ती बदलविण्यासाठी ही टेंडर प्रक्रीया थांबवली होती आणि मग नविन अटी-शर्ती बदलवुन नविन टेंडर काढले त्यावेळेला आयुक्त साहेबांची मान्यता घेवुनच आपण नविन टेंडर काढलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण मग आम्हाला एक कळत नाही की ते काम अटी-शर्तींप्रमाणे झाले आहे का?

**श्री.सोनगीरे :-** ताई झालच पाहीजे. नविन अटी-शर्तींप्रमाणे काम झालेच पाहीजे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याच्यामध्ये मग मशिनरी च काम होत तर मशिनरी ने केले आहे का?

**श्री.सोनगीरे :-** ते नाही सांगता येणार ताई ज्या अटी-शर्तीनुसार ही जी टेंडर प्रोसेस होती ती संपुर्ण त्याबद्दलची माहीती सांगीतली. आता तुम्ही सांगताहेत की ते काम कुठल्या पध्दतीने झाले कशा पध्दतीने झाले हे त्या संबंधित इंजिनियरला काम देण्यात आलेले होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही पण आपण जेव्हा ही निविदा काढली तेव्हा

**श्री.सोनगीरे :-** आणि त्याच्याच बाबतीतील माहीती जी मला आहे ती मी सांगतो की जी ती मशिनरी होती. त्याच्यात काय काय वापरले पाहीजे तशाच काही तांत्रिक अडचणी आहेत. तर समजा की आपली जी कार्यालयीन प्रणाली आपल्याकडे उपलब्ध नाही. तर कॉन्ट्रक्टरला जरी आपण टेंडर काढुन काम दिले तरी त्याने जो दर भरला असेल तरी आपण तो शासनाच्या निर्देशानुसार कमी करून त्याचे टेंडर तयार करत असतो. तसे शासनाने निर्देश दिलेले आहेत की ज्या ठिकाणी साडा वापरण्यात आलेला परंतु रेट साडा सह घेतलेले आहे आणि काम पुर्ण झाले तर याच्या बिलातुन साडाची रक्कम वजा करुन रेट कमी करून त्याचे बिल आपण बनवु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हा एक मुद्दा झाला आणि दुसरा मुद्दा आहे की मी माहीतीच्या अधिकारात याची सगळी माहीती मागीतलेली होती.

**मा.महापौर :-** ताई एक मिनिंट या विषयाशी संबंधित माहीती असेल ती विचारा

**सौ.उज्वला बेंडाळे :-** रामदास कॉलनीचाच विषय आहे ना बगीच्याच विषय आहे.

**मा.महापौर :-** या विषयाशी संबंधित आहे का ? याचा आणि त्याचा काही संबंध आहे का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई याच्यामध्ये कस आहे की दोन वेगवेगळ्या विषयांची चर्चा होतेय.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** रामदास कॉलनीचाच विषय आहे ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमचा मुद्दा याच्याशी संदर्भित नाहीये ताई, आज आपण धोरण ठरवायचे आहे की रामदास सेवा ट्रस्टने उद्यान विकासासाठी मागणी केलेली आहे. ती त्यांना द्यायची की नाही द्यायची हा एक विषय आहे. तुमचा जो विषय आहे तो बांधकाम विभागाशी संदर्भित विषय आहे. त्याचा आज रोजी जो विषय चालु आहे त्याचा दुर-दुर पर्यंत संबंध नाहीये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीनभाऊ हा रामदास कॉलनीच्या बगीच्याचा हा विषय आहे आणि याचा पत्र व्यवहार केलेला आहे आणि त्या पत्र व्यवहाराच एकही उत्तर मिळालेले नाहीये. जवळजवळ मी जानेवरी महिन्यामध्ये आणि माहीतीच्या अधिकारात हे दिलेले आहे पण हे माहीती देत नाहीयेत म्हणुन हा संताप आहे. बांधकाम विभाग करत काय आहे. पण मग तेव्हा पण असच झालेले आहे. कारण जेव्हा मी कलेक्टर साहेबांना निवेदन दिल आणि माहीतीच्या अधिकारात माहीती मागवली तेव्हा मी ०७/०३/२०२२ ला अर्ज दिला होता त्यानंतर त्यांनी १८/०४/२०२२ ला इकडे ईनवर्ड केला आणि बांधकाम विभागावाले सांगतात की तो अर्ज आमच्याकडे आलेला नाहीये. म्हणजे ते कलेक्टर ऑफीस वाले खोट बोलताहेत का ? हे लक्षात आणुन द्यायच आहे मला की काय प्रकार चाललाय बांधकाम विभागामध्ये आणि नगररचना विभागामध्ये ते कुठल्याही प्रकारची माहीती देत नाहीत आणि फाईली गायब होत आहेत. परत माहीतीच्या अधिकारातील माहीती मिळत नाहीये. मग काय करता आहेत अधिकारी?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही हा दुसरा मुद्दा आहे ताई तुम्ही जो प्रश्न उपस्थित करत आहात ना. तो तुम्ही कलम ४४ अंतर्गत उपस्थित करू शकतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भाऊ माहीती अधिकारात विचारलेले असुन सुध्दा

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना ताई मग

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भाऊ माहीती लगेच द्यावी लागते. अपिल करून सुध्दा माहीती द्यायला तयार नाहीत. आमच्याकडे अर्जच आला नाही अस म्हणतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना मग त्यांना विचाराण्यासाठीची आपली दुसरी प्रक्रीया आहे आपण कलम ४४ अंतर्गत माहीती मागवा आणि तुम्हाला ज्या-ज्या विषयांच्या संदर्भात ज्या काही शंका असतील. त्या दृष्टीने आपण कलम ४४ अंतर्गत प्रश्न उपस्थित करा आणि हा विषय या विषयाला धरून नाहीये एवढच मला सांगायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता उडवाउडवीचे उत्तर मिळताहेत. तर याच्यामध्ये हा विषय असा आहे की मान्यता आहे पण तिथल्या नागरीकांना तिथे सोई उपलब्ध झाल्या पाहीजे आणि तिथे जे युज एन्ड पे चे शौचालय आहे त्याला आमचा विरोध करावा.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, यांच सगळ्यात पहिले मी आभार व्यक्त करतो जळगांव मनपा तर्फे आज त्या ठिकाणी शहरातील भाऊंचे उद्यान असेल किंवा गांधी उद्यान असेल. नंतर एक भव्य उद्यान जळगांव शहरामध्ये उभारले जाणार आहे ते रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट यांच्या मार्फत म्हणजे पिपल बँके मार्फत , पिपल बँकेचे माजी चेअरमन बंडुदादा पाटील असतील आणि त्यांची बॉडी असेल यांचे सगळ्यांचे मी जळगांव महापालिकेच्या वतीने आणि स्थानिक नगरसेवक नितीनभाऊ , मी आणि सर्व आमच्यावतीने त्यांचे आभार व्यक्त करतो आणि यासाठी ज्यांनी विशेष रेफर्ड दिलेले आहे. ज्यांनी पाठपुरावा केला आणि त्यांच्या शब्दाला मान देवुन त्याच्यात नितीनभाऊ लढ्ढा, मा.महापौरताई , मा.विरोधी पक्ष नेते आणि कैलासआप्पा सोनवणे या चार लोकांचे या ठिकाणी या विषयासाठी यांचे मी आभार व्यक्त करतो आणि अतिशय सुंदर आणि छान असे उद्यान जळगांव करांना मिळणार आहे. नितीनभाऊ लढ्ढा, मा.महापौरताई, सुनिलभाऊ आणि कैलासआप्पा यांचे आभार व्यक्त करतो आणि याठिकाणी मला दोनच सुचना मांडायच्या आहेत. उद्यानाच्या अवती भवती जे आहे ते तिन रस्ते येतात. म्हणजे ती जी जागा आहे रामदास कॉलनीची त्या जागेला तिन रस्ते येतात. त्याठिकाणी जे उद्यान डेव्हलप होणार आहे त्याठिकाणी ते रस्ते येतात आणि त्या कॉलनीतील भाग आणि जळगांव शहरातील मोठे उद्यान आहेत. त्याठिकाणी सुध्दा मोठे रस्ते आहेत. तर त्याठिकाणी पार्कींग आणि हॉकर्स यांच्यामुळे त्रास वाढतो तर आपण ठरावामध्येच हा विषय घेतला पाहीजे की त्या तिन्ही रस्त्यांना म्हणजे त्या रामदास पार्कला लागुन अवती भवती जे तिन रस्ते आहेत. त्याठिकाणी ५० मिटरच्या अंतरावर कुठलेच हॉकर्स नसले पाहीजे अशी माझी सुचना आहे या ठिकाणी , नो हॉकर्स झोन आपण केले पाहीजे आणि दुसरी सुचना अशी आहे की रामदास कॉलनीचे जे रहिवाशी आहेत किंवा रामदास कॉलनी आहे, समर्थ कॉलनी म्हणा किंवा त्याला लागुन विवेकानंद नगर आहे तर त्या ठिकाणी अनेक वर्षापासुन मी गेल्या तिस चाळीस वर्षापासुन पाहतोय की नवरात्रौत्सव साजरा केला जातो. त्याचप्रमाणे हनुमान जयंतीचा मोठा कार्यक्रम असतो. गजानन महाराजांच्या पालखीचा कार्यक्रम असतो. तर त्याच ग्राऊंडमध्ये हे सगळे नवरात्रौत्सव असेल किंवा भंडारा असेल हे सगळे कार्यक्रम म्हणजे हनुमान जयंती आहे, पालखी आहे हे सगळे कार्यक्रम साजरे केले जातात तर या सगळ्याकरीता पिपल बँकेचे जे प्रकाशशेठ चौबे आहेत. ते सगळ्या युनिटला बघणार आहेत आणि नितीनभाऊ , बंडुदादा यांची चर्चा झालेली आहे. त्यामुळे त्यांनी विनंती केली की गेल्या अनेक वर्षापासुन त्याठिकाणी जे उपक्रम साजरे केले जातात. तरी उद्यानाचा ताबा जरी पिपल बँकेकडे असला देखरेख जरी त्यांच्याकडे असली तरी कोणत्याही कार्यक्रमासाठी कॉलनीतील रहिवाश्यांना अडविण्यात येवू नये तो त्यांचा अधिकार राहील. हे त्या ठरावात नमुद करण्यात याव. गोराणेसाहेब हे ठरावात घ्यायचे आहे. तेथील स्थानिक रहिवाशी नवरात्रौस्तवाचे, पालखी असेल, हनुमान जयंती असेल आणि भंडारा म्हणजे वर्षातील जे काही उत्सव असतील तर ते त्या कॉलनीतील रहिवाश्यांना, पिपल बँकेचे जे संबंधित अधिकारी आहेत किंवा चेअरमन आहेत. त्यांच्याशी नितीनभाऊ लढ्ढा यांची चर्चा झालेली आहे. हे आपण ठरावात घेतले पाहीजे. नो हॉकर्स झोन आणि तेथील रहिवाश्यांना मुभा देऊन त्याठिकाणी त्यांनी कार्यक्रम घेण्याची परवानगी द्यावी.

**ॲड. शुचिता हाडा :-** आयुक्त मॅडम , महापौर महोदया , बगीचे संदर्भात मला एक सुचना करायची आहे. जस आता आपण बघतो आहेत की ज्या मोक्याच्या मोठ्या जागा आहेत. जेव्हा मोठे उद्याने होतात तेव्हा अशी कोणती तरी संस्था येते आणि ती बगीचा निर्माण करून देण्यासाठी व देखभाल दुरूस्ती साठी तयार राहाते. ती सक्षम असते आणि ती संस्था नंतर ते पार पण पाडते. पण आपल्या जळगांव शहरातील जी मनपाची उद्याने आहेत. त्यांची आज

जी दुरावस्था झालेली आहे ती सर्वश्रुत आहे. आयुक्त महोदया या मनपाच्या उद्यांनांची तर प्रत्येकाच्या प्रभागात मनपाची अशी एक-दोन उद्याने आहेत आणि आज जर त्या मनपाच्या उद्यानांची परिस्थिती आज जर बघितली तर ती अत्यंत गंभीर आहे. तिथे साफसफाई सुध्दा होत नाही. माळी तिथे कधीच पोहचु शकत नाही. मनुष्यबळाच्या अभावी आपण तिथे कोणत्याच सुविधा नागरीकांना देवु शकत नाही. तो बगीचा असतो किंवा त्या ठिकाणची जी जागा असते. आम्ही आमदार ,खासदार निधीमधुन ते उभारून देतो त्यामध्ये व्यायामाचे साहीत्य उभारून देतो त्या ठिकाणी बाकडे लावुन देतो. पण त्यानंतर ते मेंटेंन होवु शकत नाही. त्याला एकमेव कारण हे मनुष्यबळ आहे. तर जस आपण मनुष्यबळ मागवतो आहे तर माझी आज प्रशासनाला आणि सभागृहाला विनंती आहे की आपण उद्यान या विषयासाठी मनुष्यबळाची निगा का घेत नाही. प्रत्येक प्रभाग निहाय आपण नेमावे आणि प्रभागासाठी आपण विभागाला विचारावे की कितीची गरज आहे काय आहे आणि हा निर्णय प्रशासनाकडुनच घ्यावे तो आकडा मी येथे देत नाही. पण अस मनुष्यबळ उपलब्ध करून द्याव आणि मनपाच्या मालकीची जी उद्यानं आहेत त्यांची सुध्दा अवस्था आपण चांगली करावी. स्थानिक नागरीकांचा तो जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रभागातील प्रभागात त्यांच्या घराजवळच ते उद्यान असते. त्यांच्या हक्काची ती जागा असते. माझ्या प्रभागात सुध्दा मी म्हणजे टागोर नगरचा जो बगीचा आहे तिथे आम्ही खेळणी लावली सगळ केलं. पण वॉचमन नाही. मी अनेक वेळा प्रशासनाला वॉचमनची मागणी केली आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** तीन चार ठिकाणी जातो. या नात्याने लोकं माझ्या संपर्कात असतात. काही सन्मा.सदस्यही मला त्या निमित्ताने फोन करतात. पण मागच्या आठ दिवसाची गोष्ट आहे. एक महिला होती. तिची डिलेव्हरी झाली. डिलेव्हरीच्या वेळेस मी त्या ठिकाणी गेलो होतो. त्या वेळेस तिला सांगण्यात आले की, तुला अडीच हजाराच्यावर फी लागणार नाही. पण डिलेव्हरी झाल्यानंतर तिला १६ हजार रूपये मागितले गेले. जी आपण ही संस्था म्हणते की, माफक दरात किंवा मोफत. जेव्हा त्यांना १६ हजार मागीतले गेले तेव्हा जो तिथे मॅनेजर होता त्यावेळी त्याला फोन केला की ही फी का तर रूमचे चार्जेस वेगळे आहेत. नर्सिंग चार्जेस वेगळे आहेत. त्याच्यात सिजेरिन झाले त्याचे चार्जेस वेगळे आहेत. म्हणजे आपण एवढी मोठी प्रापर्टी जळगांव शहरातील मध्यवर्ती असलेल्या प्रापर्ट्या अशा संस्थेला दिली आहे. जी संस्था म्हणते की आम्ही माफक दरात सेवा देवु व मागणी करते आणि मग जर अशे पैसे कमवत असेल तर मला वाटत की भविष्यामध्ये जर अशा कधी जागा देत असेल अशा संस्थेला तर आपण ठराव करतांनाच याचा विचार केला पाहीजे. हा अनुभव माझा रोजचा आहे मी डॉक्टर आहे. त्यामुळे माझी आता या ठरावा मध्ये किंवा त्याच्यासंबंधी माझी सुचना अशी असेल की त्यांना एक सुचना वजा नोटीस देण्यात यावी की अशा तक्रारी याच्यापुढे आल्या नको पाहीजे आणि आपण एक खुप मोठा दवाखाना त्यांना दिलेला आहे. याच्यामुळे आपले मुख्य वैद्यकीय अधिकारी घरी बसतात. त्यांच्याही लक्षात या गोष्टी आणुन दिल्या पण आपल्या कुठल्या दबावामुळे असु द्या किंवा प्रशासनामुळे असु द्या. ही ॲक्टिव्हिटी तिथे झाली नाही. त्यामुळे गोरगरीब जनता जी आहे त्यांच्यावर अन्याय होतोय आणि त्या ठिकाणी कोणी येत नाही पण त्याठिकाणी आल्यानंतर त्यांना अक्षरश: त्यांच त्याठिकाणी आर्थिक शोषण केले जाते. माझी एक विनंती अशी आहे की त्यांना एक नोटीस देण्यात यावी आणि त्याचा आपल्याकडे ठराव झालेला आहे त्याप्रमाणे म्हणजे जो ठराव झालेला आहे आपला २ हजार , अडीच हजार अशे हे जे ठराव झालेले आहेत आपले त्याप्रमाणे तिथे बोर्ड लावण्यात यावा त्याठिकाणी दवाखान्यामध्ये आणि त्याप्रमाणे चार्जेस घेण्यात यावे. कारण ईर्मजन्सी चार्जेस नसले तर ते आपण समजु शकतो. पण समजा ज्या साठी पैसे नसले तर त्यासाठी का घ्यावेत. जस आपण एकीकडे म्हणतोय की महिला सक्षमिकरण म्हणतोय. त्यामुळे आपण त्यांच्याकडुन १६-१६ हजार रूपये घेतोय. म्हणजे शासन स्वत: म्हणत की आपण शासकीय रूग्णालयांमध्ये डिलीव्हरीची ट्रिटमेंट घ्या डिलीव्हरी करा आणि आम्ही तुम्हाला ५ हजार रूपये देवु आणि पैश्यांची मागणी करता आहे. म्हणजे आपल्यासाठी ही दुर्देवी घटना आहे आणि आपण याची दखल घ्यावी आणि संबंधितांनी नोंद घ्यावी.

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई ज्याप्रमाणे डॉक्टर साहेबांनी सांगीतले

**मा.महापौर :-** या पार्कच्या संदर्भात आहे का?

**श्री.महेश चौधरी :-** हो पार्कच्या संदर्भातच आहे ज्या पार्कसाठी तुम्ही त्या ट्रस्टला पार्क मंजुर करत आहेत. त्याच्या संदर्भातच आहे ना ताई त्याच्यामुळे विषयाच्या विरूध्द नाही बोलत आहे मी ताई , आपण आता त्यांनी जे पत्र दिले आहे ना ताई त्या पत्रामध्ये त्यांनी नमुद केलेले आहे की आम्ही सेवा देवु आणि ज्या सेवा त्यांनी नमुद केल्या आहेत त्या सेवांबद्दल मी बोलतोय. आता आपले आणि त्यांच मागच्यावेळेस जेव्हा ॲग्रीमेंट झाले आहे २०१७ ला आपण त्यांना आपण ज्या अटी-शर्तीवर तो दवाखाना त्यांना चालवायला दिला आहे. खरच तो दवाखाना देतांना भाऊंचे व त्यांचे सगळयांचे चांगले विचार होते. त्यांनी त्या सगळ्या गोष्टींचा विचार करून ती सेवा गरीबांपर्यंत ती सेवा

पोहोचली पाहीजे म्हणुन तो करारनामा झाला होता. पण परिस्थिती आता अशी आहे की त्या करारनाम्यामध्ये असे स्पष्ट म्हंटलेले आहे करारनामा आहे माझ्याकडे मी करारनामा सोबत आणलेला आहे. प्रसुतिगृह विशेष म्हंटलेले आहे की प्रसुतिगृहाचे जे दर असतील ते शासकीय दराप्रमाणे असतील. तर ते दर कुठल्याही शासकीय दराप्रमाणे घेतले जात नाहीत. तिथे स्पष्ट आपण म्हंटलेले आहे की तुमचे जे दरपत्रक आहे. ते दरपत्रक तुम्ही त्या दवाखान्यांत घुसल्याबरोबर दिसायला पाहीजे की किती रेट आहेत ते त्यांनी लावायला पाहीजे. याची माहीती नागरीकांना दिली पाहीजे. पण ती माहीती तिथे दिली जात नाही. तिथे दरपत्रक सुध्दा लावलेले नाही आणि आपण जर जेव्हा सांगतो की दरपत्रक लावा आणि त्याचा हजारो लोकांना त्याचा फायदा झाला आहे. महापौरताई तर आपली जी ५ ते ७ हजार स्के.फुट जागा आहे. बांधकाम मला वाटत आपण त्याच केलेले आहे. ते पण विस वर्षांसाठी ते पण आपण तिथे शहरातील नागरीकांना माफक दरात किंवा मोफत सेवेचे सुविधा झाली पाहीजे पण अस होतांना दिसत नाही. जे दवाखाने आहेत जसे खाजगी दवाखान्यांमध्ये जे खाजगी दवाखान्यांमध्ये ज्या योजना आहे. म्हणजे जश्या पध्दतीने आपल्याला ऑपरेशन करायचे असेल तर आपल्याला सरकार कडुन रूपये मिळतात. त्या पध्दतीच्या ज्या योजना आहेत आणि ते सरकार कडुन लाखो रूपये घेताहेत आणि आपण त्यांना मोफत वास्तु दिलेली आहे. तर आपल्या करारनाम्यामध्ये असे म्हंटलेले आहे की, प्रसुतिगृह विभागात ते जे लाईट बिल आहे ते पण आपण भरावे. आता ते आपण भरतो की ते भरतात हे मला माहीती नाही. मी अजुन या विषयावर काही बोललो नाही पण मी हे जे व्यक्तिगत पाहीले आहे मी स्वत: तिथे गेलो त्यांना रिक्वेस्ट केली मी स्वत: भेटलो. मी त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर तुमच्याशी बोलतोय. पण आता तुम्ही बाकीच्या योजनांचा फायदा घेताहेत. याच्यावर तुमची संस्था कमवते आहे. पण तुम्ही कमीत कमी प्रसुतिगृहाचा विषय या शहरातील ज्या महिला भगिनी आहेत त्यांच्या प्रसुतिचा विषय तर तो प्रसुतिसाठी तेवढा करून द्या एवढी एक विनंती मी त्यांना केली. त्यांनी ती मान्य केली नाही ती त्यांनी धुडकावुन लावली आणि ते सांगत होते की विमा काढायला लावा. याला सांगा विमा काढायला लावा. त्याला सांगा विमा काढायला लावा. अशी उत्तरे दिली.

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ मी काय म्हणतोय.

**श्री.महेश चौधरी :-** भाऊ दोन मिनिंट फक्त

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ त्यांना प्रशासनाने एक नोटीस काढुन समज द्यायला लावा.

**श्री.महेश चौधरी :-** नाही भाऊ मी काय म्हणतोय एकच मिनिंट माझा विषय मांडु द्या. तर त्या करारनाम्यात असेही लिहीलेले आहे की, याच्यावर अभ्यास एक समितीने करावा. मला असे वाटत नाही की अशी एक समिती तयार आहे. प्रमुख वैद्यकीय अधिकारी साहेब ईथे बसलेले असतील. मी या विषयावर त्यांच्यांशी चर्चा करतो. सर जे प्रसुति संदर्भात जे आपले शासनाचे रेट ठरलेले आहे तर मग शासनाचे रेट काय आहेत. तर पहिला प्रश्न माझा हा आहे तर शासनाचा रेट काहीतरी ५०-६० रूपये असा आहे. तर मग साहेब आपण ३५००/- रूपये नॉर्मल चे आणि सिझेरियनचे १५ ते १६ हजार रूपये आहेत आणि या सगळ्या गोष्टींचा विचार करावा आमचा या विषयाला कोणताच विरोध नाहीये. आपण हा विचार करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-** विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.महेश चौधरी :-** साहेब एक मिनिंट , महापौरताई

**मा. महापौर :-** या विषयशी संबंधित आहे का?

**श्री.महेश चौधरी :-** नाही आरोग्याशी संबंधित आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचे विषय घ्या.

**श्री.महेश चौधरी :-** नाही ताई तुम्ही काय म्हणाले की हा विषय होवुन गेल्यावर मग बोला. म्हणुन बोलतोय.

**मा. महापौर :-** या विषयशी संबंधित आहे का?

**श्री.महेश चौधरी :-** ताई एकच मिनिंट फक्त जास्त वेळ बोलणार नाही. ताई आपल्या नगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये प्रसुतिगृह चालु होते ते बंद करण्यात आले. ते बंद झाले आता ते पुन्हा चालु करण्यात येणार होते. मी तिन महिन्यांपुर्वी पण हे बोललो होतो. पण ते काही अजुन चालु झाले नाही गोराणेसाहेब याच्या संदर्भात तो विषय मांडावा आणि २४ दवाखाने आपले मंजुर झालेले आहेत. तर त्या २४ दवाखान्यांमध्ये डॉक्टरांची तपासणी मोफत असणार आहे आणि मेडिसीन सुध्दा मोफत असणार आहे. जळगांव शहराच्या नागरीकांसाठी तर आपण या दोन गोष्टींचे काय झाले याचे मला उत्तर देण्यात यावे.

**श्री.सुनिल गोराणे,सहा.आयुक्त (दवाखाने):-** सन्मा.महापौर महोदया, सन्मा.सभागृह आताच मा.महेशभाऊ चौधरी यांनी दवाखाने संदर्भात काही माहीती सांगीतलेली आहे. त्या अनुषंगाने मी स्पष्टिकरण देतो. जळगांव शहर महागनरपालिकेचे जे हेल्थ पोस्ट आहेत. पहिले प्रसुतिगृहाबाबत स्पष्टिकरण देतो. याठिकाणी आस्थापना सूचिवर फक्त दोन MBBS डॉक्टर कार्यरत आहेत. कोरोनाच्या अगोदर प्रसुतिगृह सुरू होते. जर आपण प्रसुतिगृह सुरू केले. तर तिन शिफ्ट मध्ये त्याठिकाणी महिला, MBBS डॉक्टर लागतील. त्या MBBS डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाला विनंती करण्यात आलेली आहे. प्रसुतिगृह सुरू करावं यासाठी संपुर्ण जे आता डॉक्टर्स जे आता अव्हेलेबल आहेत. म्हणजे MBBS डॉक्टर जे आहेत किंवा आम्ही प्रयत्नशील आहोत. प्रशासनाने MBBS डॉक्टर उपलब्ध करून दिल्यानंतर तात्काळ प्रसुतिगृह सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. जोपर्यंत जे ही MBBS डॉक्टर उपलब्ध होत नाही तोपर्यंत प्रसुतिगृह सुरू करता येणार नाही. हे नम्रपणे मी सभागृहाला सांगु ईच्छितो. तदनंतर २४ हेल्थ पोस्ट संदर्भात ज्या मार्गदर्शक सुचना शासनाने दिलेल्या आहेत त्यानुसार बांधकाम विभागाला पत्रव्यवहार केलेला आहे. नुकतेच मी आता मा. सुनिलभाऊ जे आपले विरोधी पक्ष नेते आहेत तसेच मा.महापौर महोदया व सर्व सन्मा.सदस्यांना याबाबत सर्व माहीती दिलेली आहे या संदर्भात , त्यांनी त्याप्रमाणे जागा उपलब्ध करून दिल्या तर पुढील तसा प्रस्ताव महासभेसमोर आणण्यात येईल आणि तसे शासनाला कळविण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चला घ्या पुढील प्रस्ताव घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.जळगाव पीपल्स बँक रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट (रजि.न.ई ४६०) जळगांव नोंदणीकृत संस्था असुन संस्थेचे माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, वैदयकीय क्षेत्रात समाजउपयोगी कार्य करीत आहे. संस्थेचे माध्यमातून म.न.पा. शाळा नं. ३ चे (जळगाव पब्लिक स्कुल) व्यवस्थितरित्या संयोजन करण्यात येते तसेच, ज.श.म.न.पा.चे राजर्षी श्री छत्रपती शाहू महाराज रुग्णालय हे चालविण्यास घेऊन त्याठिकाणी सर्व प्रकारचे वैदयकीय सेवा एकाच छताखाली मोफत / माफक दरात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्याचा फायदा आज पर्यंत हजारो रुग्णांना होत आहे.

जळगांव शहरातील नागरीकांचे उत्तम आरोग्य राहणेसाठी रहिवास परिसरात चांगले उदयान असावे जेणेकरुन परिसरात स्वच्छता राखण्यात मदत होऊन ज्यात लहान मुलांना खेळणे, तसेच सर्वांना फिरणेसाठी जागा असावी या उद्देशाने शहरातील मेहरुण स.नं.४९४/१+२ मधील खुली जागा (नगररचना योजना क्र.३ अंतीम भुखंड क्र.(C) (गार्डन) ) रामदास कॉलनी परिसरातील जळगांव शहर महानगरपालिकेची “ओपनस्पेस” मध्ये संस्थेच्या माध्यमातून एक उत्कृष्ट उदयान विकसित करण्याचा संस्थेचा मानस आहे.

सदर उदयानात लहान मुलांचे खेळणे, ओपन जिम, फिरण्यासाठी जॉगिंग ट्रॅक, बसण्यासाठी जागा तसेच विविध उपक्रम राहतील. संस्थेचे वतीने संपूर्ण उदयान सुशोभीकरण/ विकसित करण्यात येईल तसेच सदर उदयानाची दैनंदिन देखरेख ठेवणेची व्यवस्था देखील संस्थेचे वतीने करण्यात येईल. मात्र उदयानासाठी आवश्यक वीज पुरवठा व पाणी पुरवठा हा मनपाने करावा. सदर उदयान म.न.पा.ने आम्हास दीर्घकालासाठी (किमान ३० वर्षे) दिल्यास आम्ही ही, जबाबदारी घेण्यास तयार आहोत असे संस्थेने आपल्या अर्जात नमूद केलेले असल्याने रामदास कॉलनी परिसरातील “ओपनस्पेस” उदयान विकसित करणेसाठी जळगांव पिपल्स को-ऑफ बँकस्, रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट,जळगांव यांना मनपाच्या अटी शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद मागणी केलेली रामदास कॉलनी परिसरातील “ओपनस्पेस” ही जागा देणे संदर्भात यापूर्वी जे जे ठराव झालेले असतील ते सर्व ठराव रद्द करण्यास तसेच रामदास कॉलनी परिसरातील “ओपनस्पेस” येथिल तिन्ही रस्ते नो-हॉकर्स झोन जाहीर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर ओपनस्पेसचा वापर करणेची मुभा येथिल स्थानिक रहिवाशांना देण्यात यावी. स्थानिक रहिवाश्यांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या गजानन महाराज पालखी सोहळा, भंडारा, गरबा इत्यादी विविध कार्यक्रमांना मुभा देण्यास सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- बरडे नितीन मनोहर**

**अनुमोदक :- जोशी अनंतर हरिश्चंद्र**

**नगरसचिव विषय क्रं. १७ :-** जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२३ सह ५ वर्ष दुहेरी लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेसाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लद्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-** विषय क्रं. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयाबद्दल थोडस बोलायचं आहे.

**मा. महापौर :-** बोला ताई

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई, आता सनदी लेखापाल यांची पाच वर्षांसाठी दुहेरी नियुक्ती करावी असा प्रस्ताव समोर आलेला आहे आणि त्याच्यासाठी आपण ई-निविदा मागविण्यासाठी आपण मंजुरी देतो आहे. या सभागृहाला मी थोडीशी माहीती देवु ईच्छिते महापौरताई आपलेकडे जि.एस.टी , ईन्कम टॅक्स आणि जि.एस.टी , टी.डी. एस आणि ईन्कम टॅक्स टि.डी.एस यासाठी आपण सनदी लेखापाल नेमणुक करू. तर मला प्रशासनाला असं विचारायचं आहे की आपण यासाठी वेगवेगळा माणुस का नियुक्त करतो तर मला म्हणायचे आहे की आपण या सगळ्यांसाठी एकच माणुस का नाही नियुक्त करतो. हे सगळे अत्यंत महत्वाचे निर्णय आहेत. सनदी लेखापालांनी या सगळ्या नोंदी करायच्या आहेत. या सगळ्यांसाठी जर एकत्रितच निविदा प्रक्रीया राबविण्यात आली तर एकत्रित पणे जर काम नाही झालं तर ते म्हणजे मला म्हणायचे आहे की ते मनपा प्रशासनासाठी सुध्दा सोईचे होणार आहे. पण हा विचार प्रशासनाने आजपर्यंत का केला नाही. याबद्दल याचे मला आश्चर्य वाटते आणि आजचा जो विषय आहे याच्याबद्दलचे फॅक्ट सुध्दा मी सभागृहाच्या आणि प्रशासनाच्यापण लक्षात आणुन देवु ईच्छिते की कसा येथे भोंगळा कारभार चालतो आणि सर्वसामान्यपणे आपल्या या विभागांला काही फरक पडत नाही व सर्व सामान्यपणे मी याच्यात पडतच नाही. याच्यामध्ये सनदी लेखापालांच्या नोंदीचा विषय असेल किंवा अर्थ विभागातील विषय असेल. त्यातले आपल्याला नंतर कळणार नाही. म्हणुन ते आपल्यापासुन गुढ राहते आणि तशी मनमानी अधिकाऱ्यांची चालते. ताई मी आपल्या लक्षात आणु ईच्छिते की आत्ता येथे जो प्रशासनाचा प्रस्ताव आपल्यासमोर आलेला आहे. त्याच्यात प्रशासनाची पार्श्वभुमि आहे की शाम सदारिया यांनी या वर्षी लेखापरिक्षण केले होते आणि त्याच प्रमाणे त्यांनी ते काम करण्यासाठी मुदतवाढ मागीतलेली होती. ताई काही फॅक्ट मी यासंदर्भात सभागृहाला सांगते की जो दुहेरी लेखापालांचा विषय समोर आलेला आहे. तो शाम सदारिया यांना टेंडरींग मध्ये मिळाले आणि महापौर महोदया तुमच्या लक्षात आणुन देते की त्या मध्ये मुंबईची एक एजन्सी २०२०-२१ मध्ये ते काम करत होती. जे की त्यांना ई-टेडरिंग ने मिळालेले होते आणि दोन वर्षांसाठी आयुक्त महोदया हे काम देण्यात आलेले होते. तर त्यांच्या हातुन २०-२१ चे काम करतांना एक चुक झालेली आहे ती त्यांनी कमी मांडलेले आहे आणि त्यांनी स्वत:च हे काम सोडलं. तर ई-टेंडरिंग केल्यानंतर हा ते पारदर्शक पणे या स्पर्धेत उतरतात आणि तेव्हा त्यांना याची फारशी गरज नसते किंवा आपल्या स्थानिक संस्थेशी त्यांना काही घेणदेणं नसत फारस अस काही नसत आणि तसे कोणीतरी स्थानिक संबंधित येवुन हे काम करतात आणि थातुरमातुर पध्दतीने हे काम केले जाते आणि त्याच्या होणाऱ्या परिणामांला आपल्याला शेवटी सामोरे जावे लागते. तर असा जर घोळ या सिस्टिम मध्ये झाला आणि मग प्रशासनाने नंतर हे मॅन्युली टेंडर काढले आणि मॅन्युली काढल्यानंतर ते शाम सदारिया यांनी भरले. त्यावेळेचे सुध्दा काही फॅक्टस मी येथे सांगते आहे की शाम सदारिया यांना जे काम मिळालेले आहे आणि ०३/०९ ला टर्म ईयर प्रमाणे केलेले आहे आणि मुंबईची जी संस्था आहे. त्याच्यात आपण त्यांना हे काम १७ लाख प्रमाणे दिलेले होते लोढा असोसिएटसला म्हणजे जे काम शाम सदारिया यांना ९ लाखप्रमाणे पर ईयर प्रमाणे परवडते आहे. पण जे काम पुढच्या दोन वर्षांसाठी पण ते नोंदले जात आहे. म्हणजे २०-२१ मध्ये जेव्हा मुंबई ची जी संस्था ईन्व्हाल्व झाली

होती. त्याआधी आपण दिलेले आहे प्रशासनाने १७ लाख पर ईयर प्रमाणे म्हणजे हा सगळा काय घोळ चाललेला आहे. मी जे हे सगळ क्लब जे म्हणते आहे त्याची कारणं मी येथे सांगते तुम्हाला आयुक्त महोदया ८ लाख जास्तीचे टेंडर आपण दिलेले होते. म्हणजे १७ लाखाचे पर ईयर प्रमाणे दिले होते. यात अजुन एक महत्वाचा विषय आहे. महापौरताई तुमच्या लक्षात आणुन देते की, जि.एस.टी टि.डि.एस चे काम सुध्दा शाम सदारिया हे करीत होते आपल्याकडे आणि त्यांनी ई-टेंडरच घेतले होते. ते टेंडर निघाल्यामुळे त्यांना काम मिळालं आणि ते टेंडरच त्यांच त्यांनी रेट दिलेला होता ३६ हजार पर ईयर ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की त्यांनी ३६ हजार रेट कोड केला होता. त्या रेटला जे एल-२ आहेत त्यांनी एक कोड दिला होता आणि हे एल-२ वाले कोण होते माहीती आहे का जे एल-२ वाले जे आहेत ते यापुर्वी ते टि.डि.एस चे काम करत होते त्यांनी दिले होते २ लाख २८ हजार प्रमाणे जे २ लाख २८ हजार प्रमाणे काम करीत होते. त्यांनी जेव्हा हे ई-टेंडर निघालं टि.डि.एस चे तेव्हा त्यांनी रेट कोड केला ४८ हजार पर ईयर प्रमाणे किती तफावत आहे महापौर महोदया ही, जर कोणाच येथे लक्षच नाहीये की कोणी भरायलाच तयार नाहीये आणि कशा पध्दतीने कारभार चाललेला आहे. म्हणजे आपण वेगवेगळ्यांचे घर भरण्यासाठी हे काम याठिकाणी देतोय का? हे काम शाम सदारिया करतो आहे. हे काम कोणीतरी लोढा करतोय, हे काम कोणी शहा करतोय आणि हे काम कोणी चौथा कोणीतरी चौधरी करतय का ? हे सगळे क्लब करा कारण हे अत्यंत महत्वाचे विषय आहेत. मला सांगा आयुक्त महोदया आजपर्यंत कोणत्या सनदी लेखापालाने मनपाच्या मालमत्तांच लेखापरिक्षण केले आहे आणि ते महासभेसमोर आणलं. महासभेसमोर किंवा मनपाचे हित म्हणुन काही केलय का ? मी तर असं म्हणेल महापौर महोदया की यांच्यावर कंम्पलशन करा की त्यांना प्रत्येक महासभेसमोर त्यांच बॅलन्स शिट आणायला लावा. या सगळ्या गोष्टी क्लब करा आणि तरी आयुक्त महोदया अजुन एक तुमच्या माहीती साठी सांगते की आता हे जे जि.एस.टी टि.डि.एस बद्दलचे जे सांगीतले त्या जि.एस.टी टि.डि.एस बद्दलच्या तर शाम सदारिया यांनी सुध्दा सांगीतले की पुन्हा जुन्याच रेट मध्ये करून देतो असे पत्र दिले होते. ते पत्र नाकारलं त्याच्याबद्दल माझं काहीही म्हणण नाही. ते कोणालाही मिळु द्या. पण हे मैंन्युअली केलं पाहीजे आणि मनपाचं आर्थिक हित येथे जोपासले गेले पाहीजे आणि जि.एस.टी टि.डि.एस ची प्रक्रीयाबद्दल प्रशासनाने दि.२९/०७/२०२२ ला या जि.एस.टी टि.डि.एस च्या टेंडरला ओपनिंग रेट सुध्दा नाही. आयुक्त महोदया तुमच्या लक्षात आणुन देते की , टेंडर चे पाकीट स्विकारण्यासाठी तिथे पेटी पण ठेवण्यात आलेली नव्हती ते सिलबंद करण्यात आलं नाही. हातात पाकीट दिले आहे अशी तक्रार आमच्या पर्यंत आलेली आहे की वेळ संपल्यानंतर सुध्दा पाकीट स्विकारण्यात आलं आणि अजुनही मला वाटत की हा जि.एस.टी टि.डि.एस चा विषय सभेसमोर आलेला नाही. तर हे अस सगळ काय चालल आहे. आपण स्वत: याच्याकडे लक्ष घाला. या सगळ्या क्लिष्ट बाबी आहेत म्हणुन कुणीच लक्ष घालत नाही आणि मनमानी पध्दतीने असेच कारभार चालु आहेत. या सगळ्या निविदा प्रक्रीया एकत्रित करा. परत एक विनंती करते की स्थानिक लोकांना याच्यात प्राधान्य देण्यात यावे. कारण की या कामासाठी स्थानिक माणुस येईल तर तो आपल्याला वेळोवळी अव्हेलेबल असेल आणि आपण आपल्या प्रत्येक अडचणीच्या वेळी बोलावु शकतो. मुंबई पुण्याकडची कोणीतरी एजन्सी येणार प्रत्यक्ष ते सनदी लेखापाल येणार नाहीत आणि याचे काम त्यांचे असिस्टंट येवुन काम करतील. मागचा जो अनुभव आहे जसं भोंगळ काम झालं पर्यायाने आपल्याला सगळ करावं लागणार आहे. अजुन एक विनंती आहे की जे कोणी सनदी लेखापाल असतील त्यांना स्वतंत्र दालन उपलब्ध करून द्या. त्यांच्यावर मॅनेटरी करा की त्यांनी कार्यालयीन वेळेत येथे हजर असलं पाहीजे आणि त्यांनी त्यांचा स्टाफ येथे मेंटेंन केला पाहीजे आणि बॅलन्स शिट प्रत्येक महासभेसमोर सादर झाली पाहीजे. तरी या सगळ्या गोष्टी म्हणजे जि.एस.टी, जि.एस.टी टि.डि.एस, ईन्कम टॅक्स, ईन्कम टॅक्स टि.डि.एस आणि दुहेरी नोंद या सगळ्यांसाठीचे एकत्रित टेंडर काढा अशी प्रशासनाकडे आग्रही विनंती आहे आणि सुचना आहे आणि बाकीच्या ज्या सुचना दिलेल्या आहे त्या सगळया सुचनांचा अंतर्भाव करून हा ठराव करावा. प्रशासनाला तशा सुचना द्याव्यात. आपण जर याचे ईस्टिमेट चेक केले असतील तर म्हणजे दुहेरी नोंद जी पाच वर्षांची करावी असं होईल. मी जे मुद्दे मांडलेले आहेत हे जर सभागृहाला आणि प्रशासनाला पटत असतील तर आणि मी ज्या तक्रारी येथे केलेल्या आहेत. त्या मधील जो घोळ मी येथे सांगीतलेला आहे. एकच एजन्सी याबद्दल काम करते आहे. तिच एजन्सी दुसरे काम करण्यासाठी दुसरी रक्कम कोड करते. म्हणजे हा सगळा भोंगळ कारभार चाललेला आहे ना , आपण मनपाचं आर्थिक हित जोपासा ना, एकत्रितपणे या सगळ्या विषयांची ई-निविदा काढा काम कोणालाही मिळु द्या त्याबद्दल माझ काहीही म्हणणे नाही. जो कोणी असेल त्याला काम मिळेल. पण त्याला अटी-शर्ती टाका आणि स्थानिकांना प्राधान्य द्या आणि ही अट का टाकायला म्हणते आहे की आपल्याला सोईचं व्हाव. त्यांना आपण वेळोवेळी बोलावु शकलो

पाहीजे. नेहमी उपलब्ध असले पाहीजे आपले सनदी लेखापाल आपल्याला यासाठी या सगळया गोष्टींचा अंतर्भाव करून घ्या यामध्ये आणि एकत्रित करून घ्यावे.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** आदरणिय महापौरताई , सन्मा.व्यासपीठ आणि सन्मा.सर्व सदस्य आता या सन्मा सदस्या. शुचितातार्इंनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण महापालिका दरवर्षी चार्टर्ड अकाऊंटंटची नेमणुक करतो. आता मुद्दा असा आहे की, मी स्वत: एम कॉम आहे. चार्टर्ड अकाऊंटंटचे काम पण केले आहे. हा विषय टाकायचे प्रोव्हीजन असे होते की, ज्या वेळेस माझ्याकडे हा प्रस्ताव मुख्यलेखाधिकारी म्हणुन आला तर मी विचार केला की, मागच्या महासभेमध्ये मुदतवाढीवर एवढी चर्चा झाली. तर मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवु नये. त्याच्यासाठी मी विचार केला की, मुदतवाढीचा प्रस्ताव आपण ठेवु नये.

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब मी थोडस थांबवते मी तुमच्या अभिप्रायाला आक्षेप घेतलेला नाही. तुम्ही जो अभिप्राय दिलेला आहे. तो मनपाचे आर्थिक हित जोपासणाराच आहे.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** मी तेच सांगतोय ताई

**ॲड. शुचिता हाडा :-** हे जे काम आहे ते पाच वर्ष ठेवा आणि ती ई-निविदा राबवा आणि याला माझा अजिबात विरोध नाही. माझे म्हणणे काय आहे की या सगळ्या गोष्टी एकत्रितपणे राबवा आणि मी म्हणते आहे की पुन्हा एकत्रित पणे राबवा.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** आता तार्इंनी जे विचार मांडले तर मी असा निर्णय घेतला आहे की हा मुदतवाढीचा प्रस्ताव हा थोडासा चर्चेला गेला आणि महासभेमध्ये आपला प्रस्ताव जर नामंजुर झाला तर आपल्याला अडचण येईल आणि शासकीय सनदी लेखापालांचे काम असं असतं की एकदा आपलं लेखापरिक्षण जेव्हा सुरू झालं आपले लेखापरिक्षण तर ते १ एप्रिल ला सुरू होते आणि ३१ मार्च ला जस संपत तस तर त्या वर्षामध्ये अकाऊंटट ने जे काही कंम्पलेंट केलेली आहे किंवा काही ज्या क्युरी असता तर त्याला सात ते आठ महिने लागतात. त्याला काही कालवाधी लागतो आणि मी व्हेरीफाय केले की मागचे जे टेंडर आपले ९ लाखमध्ये दिलेले होते. त्यांच्याशी विचार विनिमय करून आपण करू शकतो. तर मी विचार केला आहे की आपण जर याबाबतीतील शासनाचा ०७ मे २०२१ चा जो शासन निर्णय आहे तर त्याप्रमाणे १० लाखापर्यंतचे आपण दरपत्रक मागवु शकतो. ती एक चांगली गोष्ट आहे की शासनाने आपल्याला एवढी मुभा उपलब्ध करून दिली आहे. मी अजुन त्या गोष्टीचा विचार केला की जर म्हणजे प्रत्येक वर्षाचा आता उदाहरणार्थ की आपण आता २०२१-२२ हे संपलेले आहे. आपण वर्ष संपल परंतू ते काम जसे आता शाम सदरिया आहेत. त्यांच काम जे ड्युएट चे आहे ते आपण करू आणि दरवर्षी जर आपण कोटेशन केलं तर प्रत्येक वेळी जर नविन माणुस आला आता उदाहरणार्थ बाविस्कर साहेबांची नेमणूक झाली आणि वर्कऑर्डरप्रमाणे काम सुरू करायच आहे. पण काय झालं आहे की याबाबत अजुन माझे मागचे काम संपलेलं नाही आणि मला वेळ लागेल आणि त्या कामाला कमीत कमी सहा महिने लागतील. मग हा टेक्निकल प्रॉब्लेम क्रियेट होईल आणि आता मी काय केलं की मागचे जे मागील लेखापाल ४ ते ५ जणांना फोन केला की काम करण्याची पध्दती काय आहे त्यासाठी तर आपण साहेब आता समजा की आर्थिक वर्ष उलटल्यावर त्याचा लेखा तयार होतो. तर आमच्याकडे आम्ही असं पाच ते दहा वर्षाची नेमणुक करतो. का करतो. तर त्यांचे जे चार्टर्ड अकाऊंट आहे. आता ती महापालिका लहान आहे त्यांच्याकडे चार पाचच विभाग आहे. आपली महापालिका मोठी आहे. १०-१० , १५-१५ विभाग आहे. चार्टर्ड अकाऊंटंटने हे पहायचे असते त्यांना सगळीकडुन डेटा गोळा करणे, त्याच्यावरती प्रोसेस करणे, त्यांना नेमणुका लागतात.आणि चार्टर्ड अकाऊंटंटकडची जी माणसे असतात. त्यांनी जर महापालिकेत एक दोन वर्ष काम केले तर त्यांना या सगळया गोष्टींचे आकलन होते. आणि ते परत चांगल्या पध्दतीने काम करु शकतात. आणि दर वर्षी जर चार्टर्ड अकाऊंटंट तुमचा बदलला गेला तर त्याची माणसे बदलतात आणि तुमच्या डेटाला प्रॉब्लम येतो. तर या सर्व गोष्टींचा विचार करुन टेन्डर काढण्यापुर्वी कारण मला माहित होते की, काही प्रॉब्लम येऊ शकतो. म्हणुन मी टेन्डर काढण्यापुर्वी ह्या विषयाला महासभेची मान्यता घेऊ. जर त्यांनी आपल्याला दोन पाच वर्षासाठी परवानगी दिली तरच टेन्डर कॉल करायच. अदरवाईज आपण दरवर्षी कोटेशन मागवायचो आणि याच्या मागे दुसरा हेतु असा होता की, जेव्हा आपण ५ वर्षाचा टेन्डर कॉल केले तर आजचा रेट त्याला ५ वर्षापर्यंत कन्टींन्यु लागु राहील आणि महापालिकेच हित जोपासल जाईल. हा माझा त्या मागचा प्राजंळ हेतु होता.

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब आपल्या हेतूबद्दल कोणतीही शंका नाही.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** आता तार्इंनी जो उपस्थित केला मुद्दा याठिकाणी

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब माझ एकच हे आहे की हे सगळं एकत्रित करण्याला काही अडचण आहे का ?

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** ताई ते ही सांगतो एकच मिनिंट चार्टर्ड अकाऊंटंट जे असतात ना त्यांचे रजिष्ट्रेशन वेगळे असते. ते काही चार्टर्ड अकाऊंटंट फक्त जि.एस.टी चे काम करतात, काही आपले ईन्कम टॅक्सचे देतात, काही फक्त महापालिकेचेच काम घेतात. सर्व अकाऊंटंट या सेवा देत नाहीत आणि आपले ईन्कम टॅक्सचे जे आहेत. त्यांना काही जे आहेत जे ईन्कम टॅक्सचे रिटर्न भरतात. म्हणजे मी तरी बोललो की चार्टर्ड अकाऊंटंट चे जे काम आहे ते म्हणजे हे क्लरिकल कामं जी आहेत हे त्यांच्या हाताखालील माणस जी असतात ते हे काम करतात कारण आम्ही स्वत: केलेले आहे. तर त्याच्यामुळे त्यामध्ये तत्थ होते. म्हणजे रोज तोच विषय हाताळुन तर हे विषय वेगळे आहेत. आता ताईंनी सांगीतले जस आता हा विषय कसा आहे अकाऊंट चा की याच्यामध्ये पर्टीक्युलर आपण जे चार्टर्ड अकाऊंटंट जो नेमतो आहे. ताई हे एकत्र करायला आम्हाला काही अडचण नाहीये. परंतू तसे दर आपल्याकडे यायला पाहीजे जर नाही आले तर त्यावेळी आपल्याला अडचणी येतील म्हणुन आपण हे टेंडर करतो.

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब आपण तशी प्रसिध्दी करावी का नाही येणार येतील, येतील ना आपण असं आहे का की त्यांना परमिशन नाहीये. एकाच व्यक्तिला हे सगळ काम करण्याची परमिशन नाहीये अस तर काही नाहीये ना अस तर होणार नाही.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** एकत्र करायला काहीच अडचण नाही सभागृहाने जर मान्यता दिली याला एकत्र करायला तर सभागृह ज्याप्रमाणे सांगेल त्याप्रमाणे हे क्लब करायला तयार आहे. सर्वस्वी अधिकार महासभेला आहेत. आपण म्हणत असाल की एक एक वर्षाचे महासभा जो निर्णय घेईल तो मला कॅफो म्हणुन आणि शासनाचा सेवक म्हणून काम करेल.

**ॲड. शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, माझा उद्देशच फक्त एवढा आहे की हे जे मी तुमच्या लक्षात आणुन दिलेले आहेत की जे प्रॉब्लेम क्रियेट झालेले आहेत. आपल्या महापालिकेत हे प्रेझेंटमध्येच झालेले आहे. तर हे सगळे घोळ टाळण्यासाठीचा मार्ग म्हणुन हे सगळ क्लब करा आणि ई-निविदाच काढा. ई-निविदा करतांना सगळ्यांची एक वर्षासाठी करा की पाच वर्षांसाठी काढा किंवा कितीही सुटेबल कालावधी साठी काढा. पण प्रत्येक वेळेला वेगवेगळा माणुस येतो आणि घोळ होतो हे सगळ टाळण्यासाठी हे सगळ एकत्रित करा आणि साहेब आपण जस म्हणतात की हे सगळे वेगवेगळे करण्यासाठी स्पेशल माणुस असतो. तर या सगळ्यांसाठी तर आपण बघुयात ना काय होते तर ते जर तसे आले तर आपण ते वेगवेगळ करू.

**मा.आयुक्त :-** वानखेडे साहेब आपण जे आऊट सोर्सींगचे टेंडर काढले होते जर तसे करता येत असेल तर तस करा. आपण जस त्यात म्हणु ते तसे तसे लोकं आपल्याला प्रोव्हाईड करतील आपण ती एजन्सी फायनल करू.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो तसेच करा.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** म्हणजे एजन्सी नेमायची का?

**मा.आयुक्त :-** हो एजन्सी वाल्यांना देवु.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** आपल्याला प्रत्येक कामासाठी तस आपण म्हणु टेंडरमध्ये की हे हे कामांसाठी नेमणे आहे.

**मा.आयुक्त :-** हो तस म्हणा.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** आपला जो मुद्दा असेल जसे जि.एस.टी चा तसा आपण म्हणु. सगळ्यांचा एकत्रित काढायला काही प्रॉब्लेम नाही.

**मा.आयुक्त :-** एजन्सी नेमु आपण माणस वेगळे यासाठी

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** नाही माणस वेगळे नाही येणार.

**मा.आयुक्त :-** म्हणजे जि.एस.टी चा वेगळा करा , आय.टीचा वेगळा करा.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** मॅडम एजन्सी येणार नाही. कारण काय आहे माहीती आहे का, की आपल्याला या कामांसाठी चार्टर्ड अकाऊंटंटच नेमावा लागेल. म्हणजे तो एकटा चार चार काम करेल किंवा त्याच्याकडुन व्हायला पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा :-** असोसिएटलाच काम द्यावे लागेल.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** म्हणजे त्यांच्याकडे जे आहेत. चार्टर्ड अकाऊंटंट आहेत ज्यांच्याकडे रजिष्ट्रेशन असेल त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही टेंडर भरू शकत नाही आणि हे टेंडर जे आहे जर एखादी एजन्सी जर सगळ्या प्रकारच काम करायला तयार असेल तर अतिशय उत्तम तसे आपण करू.

**ॲड. शुचिता हाडा :-** असोसिएट असा येईल की त्यांच्याकडे सगळ्या प्रकारचे काम करणारा स्टाफ आहे आणि म्हणुन ते हे टेंडर करतील.

**श्री.वानखेडे, मुख्यलेखाधिकारी :-** महासभा जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** या सगळ्या ज्या सुचना आहेत की त्यांच्याकरीता स्वतंत्र दालन असाव. त्यांनी त्यांचा स्टाफ मेंटेंन करावा. त्यांना माईंडेटरी करावं कार्यालयीन वेळेत हजर राहाव आणि स्थानिकांना प्राधान्य द्यावं. जेणेकरून आपल्या सोईचं होईल. ते आपल्याला आवश्यकतेनुसार ते ईमिजेट हजर होवू शकतील. या सगळ्या गोष्टी त्याच्यामध्ये येवू द्या आणि या सगळ्या विषयांची एकत्रित निविदा प्रक्रीया राबवा.

**मा. उपमहापौर :-** नविन निविदा प्रक्रीया करायची.

**ॲड. शुचिता हाडा :-** कुलभुषणभाऊ या विषयाची जी निविदा आपण राबवणार होतो त्यांची सगळ्यांची एकत्रित निविदा राबवावी.

**मा.महापौर :-** सन्मा.नगरसेविका शुचिताताई यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्या पध्दतीने कार्यवाही करावी. विषय क्रं. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शाम सदारिया असोसीएट्स जळगाव यांची जळगाव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी दुहेरी लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेकामी नियुक्ती करण्यांत आलेली होती. शाम सदारिया असोसीएट्स जळगाव यांचे कडील दि.२३/०६/२०२२ चे पत्र इकडेस प्राप्त झाले असुन सदर पत्रान्वये त्यांनी जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या २ वर्षासाठीचे व्दिनोंद लेखापध्दतीचे कामकाज करण्याबाबत मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

शाम सदारिया असोसीएट्स यांनी मागील मंजुर दरात व अटीशर्तीनुसार पुढील दोन वर्षाकरीता म्हणजेच सन २०२२-२३ व २०२३-२४ करीता दुहेरी नोंद लेखापध्दतीचे कामकाज मिळणेबाबत सदर पत्रान्वये विनंती केलेली आहे. मात्र मनपा दुहेरी लेखे ठेवण्यांसाठी सनदी लेखापाल यांची १ वर्षाऐवजी ५ वर्षाकरीता नेमणुक केलेस मनपा लेखे तयार करुन ठेवणेची कार्यवाही अधिक सुलभ होवु शकेल व सन २०२२-२३ सह ५ वर्ष नेमणुक केलेस ई-निवीदा व्दांरे दर देखिल कमी प्राप्त होवुन मनपाचे आर्थिक हित जोपासले जावु शकेल त्याअनुषंगाने ई निवीदा मागविण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सभागृहात सदर प्रस्तावाबाबत सन्मा.सदस्यांनी चर्चा करतांना केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १८ :-** श्री.अरविंद दिनकर भोसले यांना म.न.पा.सेवेतून बडतर्फ करण्यात येवून त्यांची सेवा समाप्त केलेल्या प्रकरणाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** त्यांनी अपिल केलेल होत त्या अपिल अर्जावर निर्णय घेणे.

**ॲड. शुचिता हाडा :-** यापुर्वी लुलेशी संबंधीत असाच एक प्रस्ताव येथे येवुन गेलेला आहे आणि तो अशासकीय प्रस्ताव त्यांची शिक्षा रद्द करण्याचा विषय मांडलेला होता. दोघेही आपलेच कर्मचारी आहेत आणि जो निर्णय आपण येथे घेवु तोच न्याय दुसऱ्याला द्यावा अस मत मी येथे मांडते आणि यांची शिक्षा आपण रद्द करावी आणि त्यांना सेवेत पुन्हा सामावुन घ्यावे. याची जी काही शिक्षा आपण प्रशासनाने केली आहे ती सगळी रद्द करण्यात यावी. लुलेंना जो न्याय देणार तोच भोसलेंना सुध्दा देण्यात यावा. सभागृहाला तो अधिकार आहे.

**मा.आयुक्त :-** प्रशासनाने केलेली कार्यवाही कायम करण्यात यावी कारण की अशा अधिकाऱ्यांवर प्रशासनाचा त्यांच्यावर अंकुश राहणार नाही.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता :-** प्रशासनाने योग्य ती कायद्यानुसार कार्यवाही करावी.

**मा.महापौर :-** प्रशासनाने कायदेशीर सर्व त्यांची कागदपत्र, आतापर्यंत त्यांनी केलेल्या अपिले व त्यांच्यावर आतापर्यंत झालेल्या कार्यवाही या सगळ्यांचा कायदेशीर अभ्यास करून त्याच्यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**सौ. रंजना सोनार :-** हो ताई माझही तेच म्हणण आहे की ताई त्यांचे अपिल अर्ज मंजुर करण्याबाबत विचार व्हावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.अरविंद दिनकर भोसले यांचे अपील अर्जाचे अनुषंगाने त्यांची प्रशासनाकडुन करण्यात आलेली सगळी शिक्षा रद्द करण्यात यावी व त्यांना पुन्हा सेवेत सामावुन घेण्यात यावे.

प्रशासनाने श्री.भोसले यांची सर्व कागदपत्र, आतापर्यंत त्यांनी केलेले अपीले व त्यांच्यावर आतापर्यंत झालेल्या कार्यवाई या सगळयांचा कायदेशीर अभ्यास करुन त्याच्यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**
**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १९ :-** जळगांव महानगरपालिकेचे संकेत स्थळाच्या नोंदणीचे व संकेतस्थळाची माहिती सुरक्षित ठेवणे कामी सेवा पुरवठादार कंपनी Tech ९ Services, Kothrud, Pune यांची सेवे पोटी थकीत देय्यक खर्च रक्कम रु.२,२९,८६४/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** मला प्रशासनाला याच्या संदर्भात काही माहीती विचारायची आहे की महापालिकेची वेबसाईट बंद होती आणि आता महापालिकेची वेबसाईट सुरू करण्यात आली. ते आता दिसतय जे आता ई-टेंडरींग झाल्यानंतर त्यांना ते काम देण्यात आलं आणि त्यांनी ती वेबसाईट सुरू केली. कारण माझ्या माहीतीप्रमाणे ही वेबसाईट वर्षानुवर्षांपासुन फक्त लाँच करण्यात आलेली होती ती कार्यान्वीत नव्हती. ती आता गेल्या आठवड्याभरापासुन ती सुरू झाली व कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. १०० टक्के परिपुर्ण आजही ती वेबसाईट नाही. तर हे जे आता आपण देयक अदा करायचे आपण म्हणतो आहे तर प्रशासनाने हे सगळं तपासलेलं आहे का ? म्हणजे हा मला गलथान कारभार दिसतो आहे. योगेशदादा मी आपल्याला सांगीतलेले होते की आपली वेबसाईट कशी परिपुर्ण असली पाहीजे आणि काय काय गोष्टी अंतर्भुत असल्या पाहीजे. आपण जे देयक त्यांना अदा करतोय त्यांना तो कसल्या कामाचा मोबदला आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हे फक्त ईन्स्टॉलेशन चार्जेस आहेत. जी वेबसाईट लागते ई-टेंडरींगसाठी आणि त्याच्यानंतर ई-मेल सर्वर साठीचे आहेत.

**ॲड. शुचिता हाडा :-** आता सप्टेंबर २०१७ पासुन हे सर्वर आपलं बंद आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो चार वर्षांपासुन चे शुल्क आहे त्याच्यामध्ये नोंदणी शुल्क आहे आणि त्याच्यानंतर स्पेसचे शुल्क आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** मग आपण ती निविदा प्रक्रीया राबवुन ते टेंडर का काढले नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही ताई काय आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** ते फक्त आपण वेबसाईट करीता जागा पर्चेस केली आणि सर्वर पर्चेस केले आणि त्याच हे देयक आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो बरोबर आहे ताई नोंदणी शुल्क पण आहे ताई त्याच्यात

**ॲड. शुचिता हाडा :-** बर मग बाकीचे टेंडर साठीच्या वेबसाईट सुरू करावायासाठीच्या ज्या आपल्याला अत्यावश्यक गोष्टी आपल्याला अपेक्षित असतात. ती महानगरपालिकेची वेबसाईट आहे तर महानगरपालिकेशी संबंधित सगळ्या विभागांचा डाटा तिथे उपलब्ध असला पाहीजे. महापालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आणि वगैरे यांचे कॉन्टॅक्ट नंबर तिथे दिसले पाहीजे. त्यांच्या जबाबदाऱ्या तिथे दिसल्या पाहीजेत. मी स्थायी समिती सभापती असल्याच्या आधी सुध्दा सभागृहात या सुचना दिलेल्या होत्या, की आपली जी वेबसाईट आहे आणि ती कार्यान्वित करण्यात यावी. जस आपले म्हणणं आहे तर प्रत्येक महासभेचा आणि प्रत्येक स्टँडिंग कमिटीचे ईतिवृत्त प्रकाशित झाले पाहीजे. तर त्याचा उद्देश माझा हा होता की , वर्तमान पत्रात आपल्या मिटींगबद्दलचे काही प्रकाशित

असतात. पण काही पर्टीक्युलर फक्त त्यात महत्वाच्या विषयांबद्दल किंवा महत्वाचे म्हणजे जे खाजगी विषय आहेत. त्यात पण प्रत्येक प्रभागातील नगरसेवक त्याच्या प्रभागातल्या सदस्यांच्या ज्यांनी त्यांच्या प्रभागातील प्रत्येक समस्येबद्दल गाऱ्हाणे मांडलेले आहेत येथे ते जर जळगांवातील जागरूक नागरीकांना जाणुन घ्यायचे असेल तर ते वेबसाईट वर जावुन ते बघु शकतात आणि माझ्या या सुचना मी स्थायी समिती सभापती असतांनाच्या आधीपासुनच्या आहेत आणि आपण त्या गोष्टी कार्यान्वीत केलेल्या नाहीत.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मॅडम ही जी वेबसाईट आहे तर ही वेबसाईट जी आहे ती ही कंपनी काही फ्री ऑफ कॉस्ट मध्ये मेंटेन करणार आहे आणि त्यांनी ही वेबसाईट तयार करून दिलेली आहे आणि जसे-जसे आपले डिपार्टमेंट कडुन ॲप्रुवल होतात. ते आपण त्याप्रमाणे त्याच्यामध्ये डेव्हलपमेंट करणार आहोत.

**ॲड. शुचिता हाडा :-** ते बरोबर आहे आणि मल्टिमिडीयाला ते फ्रि-ऑफ कॉस्ट दिलेले आहे. ते आपण

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो मल्टिमिडीयाला दिले आहे

**ॲड. शुचिता हाडा :-** पण ते होत नाहीये मल्टिमिडीयाला ते फ्रि-ऑफ कॉस्ट गरज का वाटली मग आपल्याला

**मा.आयुक्त :-** यासाठीच आपण आता आपली जी वेबसाईट होती. ती बंद होती. माझ्याकडे वारंवार तक्रारी येत होत्या. मी विचारणा केली तर त्यांनी सांगितले, स्पेसच्या बाबतीतील कामही होते म्हणुनच आपण हे ज्या आऊटसोर्सींगने कर्मचारी घेतो आहे. संगणक तज्ञ घ्यायचे त्यामुळे आपल्याला शासनाची इन्टीग्रेटेड सर्व्हीस आपल्याला ऑनलाईन सुरु करता येते. त्यामध्ये वेबडेव्हलप्मेंट, वेबस्पेस, या सगळया सर्व्हीसेस इन्टीग्रेट करणे, मग एकत्रित करणे त्यामध्ये हा विषय येतो.

**ॲड. शुचिता हाडा :-** याच सुध्दा ईन्टीग्रेट करीता फ्रि-ऑफ कॉस्ट सर्व्हिस घेण्यापेक्षा

**मा.आयुक्त :-** मॅडम याच्यामध्ये आपण हे जे काम करून तयार घेतले आहे ना तर आपले जे ई-टेंडर असतात तर ते भविष्यात फ्रि ऑफ टेंडर होईल. त्यामुळे आपले ही कामं सुरू आहेत आणि हे काम एकत्रित रित्या करणे आवश्यक आहे आणि व्यवस्थित रित्या सुरु आहेत. सध्या त्यांच मागच्या दोन वर्षांपासुनचं यांच बिल पेंडींग आहे. त्याला मान्यता नव्हती म्हणुन आपण वेबसाईट सुरू केली नव्हती.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** कोऑर्डीनेटर चे पण आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** याविषयी पण योगेश दादा आपलं बोलणं झालेले आहे की डाटा एन्ट्री बाबत की मी आपल्याला मागे सुध्दा सुचना केल्या होत्या की ते सुध्दा आपलं आवश्यक आहे आणि ते सुध्दा आपलं होत नाहीये. तर ते सुध्दा , जस आपलं याच्याकडे दुर्लक्ष होतय की आता आपण ज्या युगात जगतो आहोत. तर आजच्या आधुनिक युगात आपल्या आता ज्या परिपुर्ण गरजा आहेत त्या अपडेट असणं आपल्यासाठी आवश्यक आहे. त्यादृष्टीने मागच्या सगळ्या गोष्टींवर सुध्दा काम व्हाव आणि ते योग्य पध्दतीने व्हावं.

**नगरसचिव :-** सुचक अनुमोदक कोण आहे?

**ॲड. शुचिता हाडा :-** विषय मंजुर आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.प्रशांत नाईक :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** अनुमोदन द्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव, करीता संकेत स्थळ Hosting शुल्क, इमेल सुविधा शुल्क यासाठी सेवा पुरवठादार कंपनी Tech ९ Services, Kothrud, Pune यांचे कडुन सेवा उपलब्ध करुन घेणेकामी रक्कम रु.३५८९०/- मात्र वार्षीक शुल्कानुसार येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नुसार सदर पुरवठादाराकडुन सेवा प्राप्त करुन घेणेसाठी स्थायी समिती ठराव क्रं.३७६ दि.०८/०९/२०१६ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने पुरवठादार यांचे नियमितपणे देय्यके सादर करुन अदायगी करणेत आलेली होती. मात्र मध्यंतरीच्या काळात कोवीड -१९ च्या प्रादुर्भावामुळे कामकाजावर प्रभाव झाल्याने देयकाची अदायगी झाली नाही. कोवीड १९ ची संपुर्ण परिस्थिती आटोक्यात आल्याने पुरवठादार कंपनी Tech ९ Services, Kothrud, Pune यांची थकीत देय्यके (१८ सप्टेंबर २०१७ ते १७ सप्टेंबर २०२१) Hosting शुल्क, इमेल, सुविधा शुल्क इत्यादी बाबत सुविधा पुरविण्यात आलेली असल्याने सदर कामाचे कालावधीत पुरविण्यात आलेल्या सेवे पोटी खर्च

रक्कम रु.२,२९,८६४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव विषय क्रं. २० :-** आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावा नुसार आरोग्य विभागातील कायम महीला व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेशा करीता कापड खरेदी करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१०,१३,८४०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** माझी फक्त याच्यात एक सुचना होती की

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ आता

**श्री.धिरज सोनवणे :-** नाही फक्त एक सुचना होती की या गणवेशा सोबत जे आपले सफाई कर्मचारी आहेत. त्यामध्ये बऱ्याचश्या महिला अशा आहेत की त्यांनी ५० वर्ष वय क्रॉस केलेले आहेत आणि त्याच्यासोबत त्यांना ९ मिटर , १२ मिटरचे रस्ते त्यांना झाडु काम करावं लागताय, म्हणजे माझ म्हणणं एकच आहे की त्यासोबत त्यांना ते साहीत्य पण पुरवा की त्यांना कचरा उचलण्यासाठी जे साहीत्य व सोबत हॅन्डग्लोज लागतात इतर साहीत्य लागते. ज्या वयस्कर महिला आहेत त्यांना ९ मिटर , १२ मिटरचे रस्ते झाडु काम कराव लागत. तर त्यांना लांब काडीचे झाडु उपलब्ध करून देण्यात यावे. म्हणजे त्यांना काम करायला अडचण येणार नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील कायम सफाई पुरुष कर्मचाऱ्यांकरीता पॅन्ट शर्ट साठी कापड व महिलांकरीता साडी, ब्लाऊज प्रत्येकी ०२ नग याप्रमाणे दरपत्रकावर खरेदी करणेकामी मुख्य लेखा परीक्षक यांच्या कडेस संचीका सादर केली असता त्यांनी सदर कापड उदयोग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४ दि.०१/१२/२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे कडून खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने उपलेखापाल, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांच्या कडून पत्र क्रं.MSPC/YC/२०२२-२३/२४२ दि.१७/०६/२०२२ अन्वये प्राप्त झालेले असून त्या मधील दर खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कापडाचा प्रकार | एकुण कर्मचारी संख्या | प्रत्येकी नग | एकुण कापड मिटर मध्ये | प्रती व्यक्ती कापड मिटर मध्ये | एकुण दर प्रति मिटर/ नग (GSTसह)रु. | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खाकी सुटींग कापड | ४०१ (पु.) | ०२ | २४०६ मिटर | ०३ मिटर | रु.३०७.०० +GST ५% १५.३५ ३२२.३५ | ७७५५७४.१० |
| २ | खाकी टेरिकॉट साडी सहावारी ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | १८६ (स्त्री) | ०२ | - | - | रु.५२८.०० +GST ५% २६.४० ५५४.४० | २०६२३६.८० |
| ३ | खाकी रंगामध्ये उत्तम प्रतिचक ब्लाऊज पॉलिस्टर ६७% व्हिसकॉस ३३% कॉटन | १८६ (स्त्री) | ०२ | - | - | रु.८२.०० +GST ५% ०४.१० ८६.१० | ३२०२९.२० |
| | | | | | | एकुण : | १०१३८४०.१० |

| | | | | | | Round Off : | १०१३८४०.०० |
|---|---|---|---|---|---|---|---|

वरील प्रमाणे कायम आरोग्य विभागातील पुरुष सफाई कर्मचाऱ्यांकरीता पॅन्ट शर्टचे कापड व महिलांसाठी साडी, ब्लाऊज कापड महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२)(२) नुसार निविदा न मागविता पुरवठादार उपलेखापाल, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांचे दि.१७/०६/२०२२ चे पत्रातील दरानुसार खरेदी करणेकामी लागणारा खर्च एकूण रक्कम रु.१०,१३,८४०/- मात्रचे खर्चास व कर्मचारी गणवेश या लेखाशिर्षा मधुन खर्च करणेस तसेच पुरवठादार महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांना कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. २१ :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे, २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय मान्य आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई माझी याच्यामध्ये एक सुचना आहे, तर याच्यामध्ये प्रत्येक प्रभाग समिती निहाय एक-एक माणुस करावे अशी माझी विनंती आहे. आणि काय आहे की एक सुटीवर जातो आणि हा विषय मागेही मांडला होता.

**श्री.सुनिल महाजन :-** दोन वाढवुन घ्या मान्य आहे. माझे अनुमोदन आहे. पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सुचनांनुसार दोन मजुर त्या ठिकाणी वाढवुन कामकाज करावे. विषय क्रं. २१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०४/०७/२०२२ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती ठराव क्रं.७४५ दि.१४/०२/२०२२ चे मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरर्ती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.२९/०१/२०२२ पासून ते पूढील ६ महिने दि.२८/०७/२०२२ रोजी संपत असल्याने पूढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.०१/०८/२०२२ ते दि.३१/०१/२०२३ पर्यंत (६ महिने) तात्पुरती नियुक्ती देवुन रु.१६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरिता दोन्ही मानसेवी कामगारांचा एकूण रु.२,०३,०४०/- खर्च नुसार मेलेले जनावरांची विल्हेवाटीचे काम दैनंदिन सुरु आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रु.२,०३,०४०/- खर्चास व तात्पुरर्ती नियुक्ती देणेस स्थायी समिती ठराव क्र.७४५ दि.१४/०२/२०२२ मंजूरी अन्वये दोन्ही मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१२ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती दि.०१/०८/२०२२ ते दि.३१/०१/२०२३ पर्यंत कामाची मुदत आहे. सदर मुदत संपल्यानंतर दोन्ही मानसेवी कामगार १.नंदु शहादु नाडे २.अशोक रामा सोनवणे यांना दोन दिवसांचा खंड देवून पुन्हा ६ महिने (दि.०१/०८/२०२२ ते दि.३१/०१/२०२३) अशा मुदतीस व प्रती मानसेवी कामगार प्रत्येकास रु.१६,९२०/- X २ कामगार रु.३३,८४०/- प्रतीमहा प्रमाणे ६ महिने कालावधीसाठी येणारा एकूण रक्कम रु.२,०३,०४०/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. २२ :-** ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम योग्य रितीने कार्यन्वीत ठेवण्यासाठी दि.०१/०४/२०२२ पासुन दि.३१/०३/२०२३ पर्यंतच्या कालावधीसाठी महा आय.टी.कडून नियुक्त करण्यात आलेल्या ०१ मनुष्यबळा करीता येणाऱ्या एकूण रक्कम रु.६,८८,७१४/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयाबद्दल मी बोलत आहे. नविन टि.पी रूल जो आहे तो सन २०२० पासुन चालु झालेला आहे आणि अजुनही त्याच डिप्रेसेशन होत नाहीये आणि अजुन तो बंदच आहे तर आपण त्यांची सेवा आपण का घेतोय. त्यांची अपॉईंटमेंट चा विषय मागच्या सहा महिन्यापुर्वी सुध्दा आलेला होता. आता पुनश्च एकदा हा विषय आलेला आहे. दि.०१/०४ ते ३१/०३ पावेतोचा हा विषय आलेला होता. त्यावेळेलाही सुध्दा मी ऑब्जेक्शन घेतलेले होत. त्यावेळेलाही मला असेच थातुरमातुर कारण देण्यात आले आणि ऑनलाईन प्रक्रीया बंद असली तरी त्या माणसाला ऑफलाईन पध्दतीने काम करावं लागत काय वर्क होत ते ऑफलाईन करून दाखवावं मला सांगांव. आम्हाला जी माहीती मिळते आहे. त्यानुसार कुठलेही काम तिथे चाललेल नाही. तरी पगार काढला जातो आहे तर हे का होतं आहे? जी प्रक्रीयाच बंद आहे. बंद कामाची अदायगी आपण का करतो आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** आता जे आपले ऑनलाईन काम करतो आहे . तर ते मध्ये मध्ये चालु होत असतं. याच्यासाठी जी प्रोसिजर असते ती ऑनलाईन सुरू आहे. तसेच काही विषय ऑनलाईन प्राप्त होत असतात तर त्यांचे ते काम करीत असतात. मध्यंतरी बीपीएस मध्ये जे प्राब्लेमस आलेत.

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब ही प्रोसेस चालु आहे अस म्हणताहेत आणि आता तुम्ही हे ०१/०४/२०२१ पासुन ते ३१/०३/२०२२ पर्यंतचे तुम्ही मागत आहात.

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** हो.

**ॲड. शुचिता हाडा :-** पण जी प्रोसेसच बंद आहे. जी सेवाच आपण देत नाहीयेत.

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** नाही पुर्ण पोर्टल बंद नाहीये मॅडम सुरुच आहे, कारण त्याच्यात आपण जे रजिष्ट्रेशन केलेत. आर्कीटेक्ट लोकांचे रजिष्ट्रेशन, परवाना धारकांचे रजिष्ट्रेशन त्या व्यतिरिक्त माहिती जी आपल्याला शासनाला द्यावी लागते. किंवा बी.पी.एल.रेफरन्सला मागीतली जाते.

**ॲड. शुचिता हाडा :-** बी.पी.एल रेफरन्स ०२ डिसेंबर २०२० ला सुरू झाला तो आता बंद नाहीये त्याच काही आलेलच नाहीये आपल्याकडे

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** नाही मॅडम , ०१ जानेवारी २०२१ पासुन ऑनलाईन प्रोसिजर करून याच्यामधील जे काही प्रॉब्लेम्स आहेत. त्याबाबत आपण शासनाला याचे पत्र दिले आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** त्याच्यानंतर ती ऑनलाईन पध्दत बंदच झाली आहे.

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** नाही, झाली होती पण परत ती शासनाने

**ॲड. शुचिता हाडा :-** आता ती सुरू आहे का ? ते तुम्ही सभागृहासमोर सांगु शकता का?

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** हो सुरू आहे ना.

**ॲड. शुचिता हाडा :-** केव्हा पासुन सुरू आहे.

**श्री.शकील शेख, नगररचना विभाग :-** ती कंन्टीन्यु सुरूच आहे पण मध्यंतरी जे प्रॉब्लेम्स आले ना त्याच्यामुळे ते महा. आय.टी ने बंद केलेली होती.

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये अस आहे की ज्यावेळी जे सीसी सेंक्शन झाले त्यावेळी ते अपडेट करत असतांना व ती प्रोसिजर सुरू असतांना किंवा रजिष्ट्रेशन्स करत असतांना शासनाने दोन तिन वेळेस ती कंन्टीन्युएस्टली शासनाने हे सुरू ठेवलेले आहे आणि ते बंद पण नाहीये यावेळेला आणि आपला जो आहे मनपाचा तो आणि ज्या तक्रार पोर्टल आहे आपला टाऊन प्लॅनिंगचा तर त्यासाठी रजिष्ट्रेशन असलं तर ते आपल्यासाठी खुप आवश्यक आहे. दुसरे असे की ज्याकाही प्रॅाब्लेम्स येतात. त्या प्रॅाब्लेम शॅार्टआऊट करून देतात ते आल्यानंतर त्यामुळे ते ऑनलाईनचं सुरू असतं. त्यावेळी ते अपडेट करून देतात. सॉफ्टवेअर जे असते ते सुध्दा ते सुरू करून देतात. म्हणुन आपण ही मान्यता शासनाची घेतो व महा.आय.टी आपल्याला हो म्हणतं म्हणुन आपण त्यांना पगार देतो. म्हणुन हे पत्र प्राप्त झाल्यानंतरच आपण त्याच्या पुढचे काम पालिकेचे करतो.

**ॲड. शुचिता हाडा :-** प्रशासनाने याची संपुर्ण खातरजमा करावी आणि जर ते पोर्टल सुरू असेल तरच ती अदायगी करावी.

**मा.आयुक्त :-** आपण ते पैसे महा.आय.टी देतो आणि ते या व्यक्तिला देतील.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण आहे.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांसाठी बांधकाम परवानगी देणे करीता संगणकीय आज्ञावलीची अंमलबजावणी सुरु करणे बाबतचे क्र.टी.पी.एस.-१८१७/१८२/मु.स./नवि-१३ चे दि.२८/०३/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने संगणकीय आज्ञावलीची प्रक्रिया सुरु करणे बाबत शासनाने आदेशीत केलेले आहे. तसेच शासनाच्या महा.आय.टी.विभागाकडून महा.आय.टी./ पी.आर.जे/ ०१/००३-२०१६ दि.०५/०५/२०१८ च्या पत्रानुसार सर्व संबंधीत महापालिकांनी दि.०१/०८/२०१८ किंवा त्या पुर्वी ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम कार्यान्वीत करण्याचे आदेश दिलेले होते.

त्यानुसार ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम राबविणेसाठी दि.०३/०४/२०१८ च्या शासन निर्णया नुसार ०२ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि.०५/०९/२०१८ रोजी मागणी करण्यात आलेली होती.

त्यानुसार दोन तांत्रिक मन्युषबळ महा आय.टी.ने उपलब्ध करुन दिलेले आहेत.

शासनाचे पत्र क्र.टीपीएस-१८१५/५२७/प्र.क्र./१३९/१५/नवि-१३, दि.२१/०१/२०२२ अन्वये सर्व विकास परवानगी प्रस्ताव महा आय.टी.ने विकसीत केलेल्या बी.पी.एम.एस संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन स्विकारुन अशा प्रस्तावांना मंजुरी देण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. उक्त संगणकीय प्रणालीव्दारे परवानगी देणे कामी मनुष्यबळा संदर्भात खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१) उपरोक्त सर्व प्राधिकरणांनी महाआयटीकडे संपर्क साधुन Unified DCPR प्रमाणे महाआयटीने तयार केलेल्या संगणक प्रणालीनुसार (BPMS) ऑनलाईन विकास परवानगी देण्याबाबत कार्यवाही करावी.

२) उपरोक्त संचालक,नगर रचना व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालये वगळता सर्व प्राधिकरणांना (महानगरपालिका,विशेष नियोजन प्राधिकरणे,क्षेत्र विकास प्राधिकरणे इ.) या प्रणालीच्या तांत्रिक मदतीकरीता प्रत्येकी एक या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध राहिल. या प्रमाणे महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च त्यांचे निधीतुन,महाआयटी कळवेल त्यानुसार संबंधित प्राधिकरणांनी महाआयटीकडे जमा करावा.

३) महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळाव्यतिरीक्त अतिरीक्त मनुष्यबळ आवश्यक असल्यास त्याबाबतचा निर्णय संबंधीत प्राधिकरणांनी त्यांचे स्तरावर घेऊन अशा अतिरीक्त मनुष्यबळाचा खर्च संबंधीत प्राधिकरणांनी त्यांचे निधीतुन महाआयटीकडे जमा करावा.

४) प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या अधिकाऱ्याच्या व कार्यालयाच्या स्तरावर या प्रणालीचा तांत्रिक मदतीकरीता मनुष्यबळ आवश्यक असल्यास त्याप्रमाणे त्यांचे

स्तरावर निर्णय घेऊन महाआयटीकडे कळवावे.व त्यानुसार महाआयटीकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च संबंधित कार्यालयांनी त्यांचे निधीतून, महाआयटी कळवेल त्यानुसार महाआयटीकडे जमा करावा.

५) संचालक,नगररचना यांचे अधिपत्याखालील नगर रचना विभागाच्या शाखा कार्यालयांच्या स्तरावर या प्रणालीच्या तांत्रिक मदतीकरीता प्रत्येकी एक या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध राहिल याप्रमाणे महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च नगरविकास विभागाच्या संगणकीकरणाच्या निधीतून,महाआयटी कळवेल त्यानुसार महाआयटीकडे जमा करावा.

महा-आयटी/ओ डब्ल्यु/०६२२/०१४३७ दि.२८/०६/२०२२ अन्वये महाआयटी यांनी एका मनुष्यबळा करीता Proforma invoice नुसार दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ पर्यंतचा एकुण खर्च रक्कम रु.६,८८,७१४/- इतका दिलेला आहे.

महा-आयटी/ओ डब्ल्यु/०६२२/०१४३७ दि.२८/०६/२०२२ च्या अनुषंगाने दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ पर्यंत पुढील १२ महिन्या करीता १ (एक) तांत्रिक कर्मचारी यांचे १२ महिन्याचे वेतना पोटी रक्कम रु.६,८८,७१४/- मात्र (अक्षरी रुपये सहा लक्ष अठ्ठयाएंशी हजार सातशे चौदा मात्र) च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. २३ :-** मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३४,६३३/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** विषय क्रं. २३ सुचक कोण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) या वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Bolt -01 Nos | 15 | Regulator Assy, Front -1 Nos |
| 2 | Bolt -01 Nos | 16 | Channel Comp, FR Glas -1 Nos |
| 3 | Lock Washer 2 Nos | 17 | Rubber, RR Glass Bottom Channel -2 Nos |
| 4 | Bulb 12V (SX4 Minor 2009) - 2 Nos | 18 | AC Dis-Infection -1 Nos |
| 5 | Element Oil Filter - 1 Nos | 19 | Cabin AIR Filter Swift -1 Nos |
| 6 | Plug Assy, Oil Drain -1 Nos | 20 | Strut Kit Swift -2 Nos |
| 7 | Cover Set Clutch -1 Nos | 21 | Paper Floor MAT (20X15) -4 Nos |
| 8 | Cylinder Assy, Clutch Operating -1 Nos | 22 | Grease, Caliper Assy -2 Nos |
| 9 | Unit, Headlamp RH -1 Nos | 23 | Super Cleaner (480 -1 Nos) |
| 10 | Unit, Headlamp LH -1 Nos | 24 | PRF Little Tree-Crisp N Cool Hangin -1 Nos |
| 11 | Weight, Wheel Balance (5Gram)-2 Nos | 25 | BDY.G.Mop Microfbr Finish CLTH 4 Pack -1 Nos |
| 12 | Weight, Wheel Balance (15Gram)-2 Nos | 26 | Screen Wash 50 -4 Nos |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | Weight, Wheel Balance (25Gram)-2 Nos | 27 | MGDO (15W40) -Shell -3 Nos |
| 14 | Latch Assy, Front Door, L -1 Nos | 28 | All Labour Charges |

तरी वर नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स,प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस दि.०९/०५/२०२२ प्रमाणे रक्कम रु.३४,६३३/- मात्र खर्च अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदरील खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.३४,६३३/- मात्रचा कार्यादेश देण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- महाजन सुनिल सुपडू**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव विषय क्रं. २४ :-** मनपा आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ०४६६ (जेटींग मशिन) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.७,५९०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २३ आणि विषय क्रं. २४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** २५ पण

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ०४६६ (जेटींग मशिन) या प्रकारातील महानगरपालिकेकडे एकच वाहन असुन सदर वाहनाव्दारे शहरातील सार्वजनिक शौचालय साफ-सफाईचे काम करण्यात येत असुन सदरचे वाहन हे आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टससह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ एम ०४६६ (जेटींग मशिन) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Kit-CL/PR Plate TATA ACE W/BRG -1 Nos | 5 | Assy. Clutch Release Yoke BS2/3/4/6 -1 Nos |
| 2 | Assy. Clutch Cable BS2/3/4 - 1 Nos | 6 | TMGO Gear Oil 80W90 Long Life |
| 3 | Brake Fluid (Dot 4) -500 ML | 7 | Clutch Plate Set Repaced |
| 4 | Sub Assy. Gear Shift Lever- Upper Part -1 Nos | 8 | Clutch Cable Change |

तरी वर नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह, प्रा.लि.जळगांव यांच्याकडील पार्टस इस्टिमेट दि.१४/०६/२०२२ अन्वये रक्कम रु.४,९३५/- + लेबर इस्टिमेट दि.१५/०६/२०२२ अन्वये रक्कम रु.२,६५५/- या प्रमाणे एकूण खर्च रक्कम रु.७,५९०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह, प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.७,५९०/- मात्रचा कार्यादेश देण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. २५ :-** महानगरपालिका मालकीच्या कार्यरत वाहनांसाठी मे.सवौदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचे मार्फत किरकोळ दरात १२००० लिटर डिझेल (इंधन) खरेदी करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,६४,४८०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** २६ पण तेच आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या वाहनांसाठी डिझेल साठा करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.२४/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये ५३३१ लिटर डिझेल साठा शिल्लक असुन सदरील साठा ४-५ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.२७/०६/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.१३४.७८/- | प्रती लिटर दर रु.९७.०४ |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१६१७४५७.५५/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,६४,४८०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.४५२९७७.५५/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना ४.५ लक्षापेक्षा अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.४५२९७७.५५/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

त्यानुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यासाठी सदयास्थितीत मनपाकडे शिल्लक साठा हा रिझर्व्ह ठेवून विहीत मुदतीत अधिकृत विक्रेता यांना कार्यादेश देवून किरकोळ डिझेल खरेदी करता येईल. महानगरपालिकेचे आर्थिक हीत जोपासता येईल. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.०१ दि.२७/०६/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,६४,४८०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ६१
**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २६ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी मे.सवौदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचे मार्फत किरकोळ दरात १२००० लिटर डिझेल (इंधन) खरेदी करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,२८,३६०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.२५/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये ३७४८ लिटर डिझेल साठा शिल्लक असुन सदरील साठा ३-४ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.२५/०७/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.१२४.६९/- | प्रती लिटर दर रु.९४.०३/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१४,९६,२८३.२३/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२८,३६०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.३,६७,९२३/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना ३.५ लक्षापेक्षा अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.३,६७,९२३/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

त्यानुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यासाठी सदयास्थितीत मनपाकडे शिल्लक साठा हा रिझर्व्ह ठेवून विहीत मुदतीत अधिकृत विक्रेता यांना कार्यादेश देवून किरकोळ डिझेल खरेदी करता येईल. महानगरपालिकेचे आर्थिक हीत जोपासता येईल. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस | मे.अमल ऑटो | मे.लक्ष्मी साठे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्टेशन, जळगांव | आय.ओ.सी.डिलर जळगांव | & सन्स,जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.०३/- | प्रति लिटर दर रु.९४.०३/ | प्रति लिटर दर रु.९४.०३/- |
| | | | रु.११,२८,३६०/- | रु.११,२८,३६०/- | रु.११,२८,३६०/- |
| | | एकुण रक्कम रुपये | रु.११,२८,३६०/- | रु.११,२८,३६०/- | रु.११,२८,३६०/- |

उपरोक्त आलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पाहता तीन्ही पुरवठादारांचे दर समान आहेत. आलेले दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने दर स्विकृत करण्यास हरकत नाही. परंतु वर नमूद तीन पुरवठादारांपैकी एक पुरवठादार निश्चित करणे क्रमप्राप्त आहे. मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.०७ दि.२५/०७/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२८,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २७ :-** जैन सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस (न्यु जैन वेअर हाउसिंग कार्पोरेशन) च्या पिटीशन कामी विधी सल्लागार नेमणुक करणे तसेच त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५ लक्ष मात्रच्या खर्चास व अदायगीस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिंट २७ वर

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई, आयुक्त महोदया आज जो विषय क्रं. २७ आपल्यासमोर आलेला आहे. तो ॲडव्होकेट श्री.ब्रम्हे यांची नेमणुक करतोय. या केससाठी तर ही त्यांची फी आपण ५ लाख रूपये ठरवतोय. त्यांची नियुक्ती आणि या खर्चाला मंजुरी असा विषय आहे. तो विषय अर्थातच आपल्याला मंजुर करावा लागणार आहे. कदाचित सभागृहातील कमी सदस्यांना त्या केसबद्दलची माहीती असेल. सभागृहाच्या आणि मुख्यकरून मी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देवु ईच्छिते की हा काय विषय होता. मला वाटते २००२-०३ मध्ये आपण जैन सर्व्हिसेस.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ताई मागच्या महासभेमध्ये सुध्दा या विषयावर सगळा विषय झाला होता.

**ॲड. शुचिता हाडा :-** नाही नितीनभाऊ याच्यात कस आहे की मुळ रक्कम आपण त्यांची अदा केलेली आहे पण आपल्या भोंगळ कारभारामुळे आणि आपल्या त्याचे रेकॉर्ड मेंटेंन नसल्यामुळे ७८ चे जे बिल होते. तर १७ ते १८ कोटींची डिक्री झालेली आहे आता.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ताई हो ना मग

**ॲड. शुचिता हाडा :-** तर १७ ते १८ कोटींची डिक्री झालेली आहे आता तर हे किती भयंकर आहे. ज्या अक्ष्यम्य अशा चुका प्रशासन करत आहे. कोणत्या पध्दतीने कामकाज प्रशासन पुढे नेत आहे. मुळ जी रक्कम आहे बिलाची ती अदा करून झालेली आहे आणि जे बिल अदा झालेले होते त्यामध्ये आता डिक्री झाली की डिक्री होतांना मुळ रक्कम व्याजासह अदा करावी व १८ पर्सेंट त्यांना पर ईयर व्याज द्याव अशी डिक्री झाली. आपले त्याच्याकडे लक्षच नाही. आपण आता मुळ रक्कम दिली. त्याच्याविरोधात अपिल करणे आणि अपिल केल्यानंतर अपिलाकडे लक्ष देणे. त्या तारखांवर हजर राहाणे. यावर बऱ्याच गोष्टी केल्या नाहीत. त्यावर आता आपल्याला डिले रिज्वेशन व कन्वेंशन कराव लागणार आहे. त्यापोटी आपल्याला ५ लाख रूपये ही फी भरावी लागते आहे आणि ती डिक्री झालेली आहे हा १७-१८ कोटींचा विषय आहे. १७-१८ कोटी किती मोठी रक्कम आहे आज आयुक्त महोदया, आता नगरसेवक २५-२५ लाखांसाठी भांडताहेत. कोटींमधील येथे खेळ होतात या गोष्टी मॅनेज केल्या जातात

सगळ्या, या डिक्री प्रॉपर ॲडजस्ट करून त्या रि-पेमेंट केल्या जातात आणि मनपाचे अधिकारी काय करतात. कुठे लक्ष आहे की सगळ प्रॉपर मॅनेज करण्यात आलेले आहे. या सगळ्या याच्याकडे प्रशासकीय प्रमुख म्हणुन तुम्ही याचा मागोवा घ्या या प्रकरणाचा हे महत्वाच आहे. तत्कालीन कोण-कोण याच्यामध्ये ईन्व्हाल होतं. बांधकाम विभागामध्ये तिन बिल अदा झाल्याची बिल एका कोपऱ्यात सापडली. प्रचंड शोधाशोध केल्यानंतर भाऊ सांगतील आपल्याला एक शनिवार- रविवार घालवला यांनी ती फाईल शोधण्यासाठी , पण आज ती फाईल आपल्याला निदान सापडलेली आहे आज ती फाईल गहाळ झाली होती हे ओळखु शकता का? अननॉन फाईल होती त्या फाईलवर राईटिंग सुध्दा नव्हत. म्हणजे आपण मुळ रक्कम अदा केलेली आहे. अशा त्या दोन तिन होत्या आणि या नोंदी जाणीवपुर्वक अदा करण्यात आल्या का? आणि याच्यात कोणी-कोणी काय-काय केलेले आहे हे कारस्थान याच्यात हात कोणाकोणाचा आहे. या सगळ्या गोष्टींचा मागोवा घ्यावा. हे चुकीचे पायंडे पडताहेत. म्हणजे अशा प्रकारच्या डिक्री उद्या झाल्यात तर अशाच पध्दतीने भरावेच लागणार आहेत आपल्याला, आपण अनेक ठेकेदारांचे बिल थकवतो आपण बऱ्याच वर्षानंतर त्यांना अदायगी करतो. १७-१८ कोटी रक्कम कुठे जात आहे हे गणित , गंभिर लक्ष प्रशासनाने या बाबींकडे द्यायच आहे आणि सभागृहाला सुध्दा माझी विनंती आहे सर्व सदस्यांना की जागृत राहायचं आहे की काय चाललय. २००२-०३ मधील हा विषय आहे आणि २०२२ उजाळले. तेव्हा १७-१८ कोटींची लायबीलीटी आपल्यावर फिक्स झालेली आहे. आपल्याला त्याच्यासाठी कोर्टात झगडावे लागणार आहे आणि हे जर कॅन्सल झालं नाही तर उद्या कोर्टात त्या डिक्रीचं ईम्लीटेंशन होईल. कुठुन देणार आहोत आपण १७-१८ कोटी रूपये , नगरसेवकांच्या किरकोळ कामांसाठी आम्ही येथे झगडे करतो. अनेक नगरसेवकांच्या चपला घासुन गेल्यात येथे किरकोळ कामांसाठी पाठपुरावे करून करून

**मा.उपमहापौर :-** मक्तेदाराला जेवढी रक्कम होती तेवढी आपल्याला द्यायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही

**मा.आयुक्त :-** ज्यावेळेला ही केस आली त्यावेळेला आपण जज्ज साहेबांना विनंती करून आपण सगळा विषय समजावुन सांगीतला सगळा विषय की जी प्रायव्हेट एजन्सी होती जैन त्यांनी जो पिरियेड होता तो

**ॲड. शुचिता हाडा :-** २००२-०३ चा आपण त्याविषयी ११ वर्ष त्यांनी काहीच केले नाही. १२ व्या वर्षी त्यांनी हे केले आहे.

**मा.आयुक्त :-** आपण त्यांना पैसे दिलेले असल्यामुळे प्रशासने दिलेले आणि प्रशासनाने याची दखल नाही घेतली. कारण की आपण त्यांचे बिल दिलेले आहे. परंतू त्यांच अस म्हणण आहे की तुम्ही दिलेल बिल आम्ही व्याजात पकडलेले आहे आणि मुळ रक्कमेवर जे व्याज होत ते व्याजावर व्याज चढत गेलेले आहे अस त्यांनी कॅल्क्युलेट केलेले आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** माझ्या माहीतीप्रमाणे आयुक्त महोदया त्यांनी कोर्टासमोर ॲफेडेव्हिट दिलेले आहे. त्यांच्या त्या ॲग्रुमेंटच्या बेसवर आपण कॉसीलींग करणार आहेत. की कोर्टासमोर त्यांनी शपथेवर खोट सांगीतले आहे. परंतू बिलाची रक्कम त्यांना आपण अदा केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** म्हणुन हे सर्व मुद्दे घेवुनच आपण हायकोर्टात गेलो आणि हे सिनियर कॉन्सील नेमतोय. की हे एक सबक सगळ्यांना मिळायला पाहीजे की नंतर कोणाची हिंमत झाली नाही पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा :-** बरोबर आहे सबक सगळ्यांना मिळणार आहे . पण भविष्यात झालेल्या प्रशासकीय अधिकारी व पदाधिकाऱ्यांच आज काय करणार आपण, ज्यांच्या मिलीभगत मुळे हे सगळं कारस्थान रचलं गेल, जर योग्य वेळी हे लक्षात आलं नसत तर आपण याचे बळी ठरणार होतो. जळगांव महापालिका म्हणुन आपल्याला हे पैसे द्यावे लागणार होते. १२ कोटी रूपये आपण दिलेच आहेत. कोण कोण याच्यामध्ये सहभागी होते याची प्रशासकीय चौकशी आपण केली पाहीजे. अशी मी आपल्याला मागणी करते आणि गंभीरपणे याची दखल घेतली पाहीजे.

**नगरसचिव:-** सुचक कोण आहे?

**श्री.सुनिल महाजन :-** सुचक मी आहे आणि अनुमोदक कुलभुषण भाऊ आहे.

**मा.महापौर :-** आता या ठिकाणी शुचितातार्इंनी मांडलेल्या सगळ्या सुचना या योग्य आहेत. यावर सखोल अशी तपासणी झाली पाहीजे. याला कोणकोण जबाबदार आहे हे सुध्दा निश्चित केलं पाहीजे. प्रशासनाने या सगळ्यांची नोंद घ्यावी आणि हा विषय क्रं. २७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जैन सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस (न्यु जैन वेअर हाउसिंग कार्पोरेशन) यांनी जळगांव शहर महानगरपालिके विरुध्द समरी सुट मं.१२/२००२ दाखल केलेले होते. त्यात महानगरपालिकेने वादी यांचे बिलाची मुळ रक्कम अदा केलेली होती तथापी वादी जैन सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस,जळगांव/इंदौर (न्यु जैन वेअर हाउसिंग कार्पोरेशन) यांनी व्याजाची मागणी करत दरखास्त दाखल केल्याने त्यात महापालिके विरुध्द निर्णय गेल्याने त्यांनी व्याजाच्या रक्कमेसह मुळ रक्कमेची मागणी केलेली असल्याने महानगरपालिकेने त्या निकाला विरुध्द औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल केलेले होते ते फेटाळण्यात आले.

जळगांव न्यायालयातील दरखास्तीत नमुद रक्कम निर्णय होऊन ही महानगरपालिकेने भरली नसल्याने सदर रक्कम वाढत जाऊन १७ ते १८ कोटी रुपये झाल्याने वादी यांनी न्यायालयात दरखास्त डिक्री आदेश बजावणी करणे पर्यंत दाव्याची वाटचाल केलेली असुन सदर डिक्री आदेश महानगरपालिकेला बजावणी होऊ शकते करीता डिक्री आदेशात नमुद रक्कम रद्द बातल होणे कामी महानगरपालिकेने उच्च न्यायालयात औरंगाबाद खंडपीठात पुनश्च Delay & Restoration व Reconstruction of Record दाखल केलेले आहे.

सदर कामी महानगरपालिकेच्या विधी पॅनल वरील श्री.ॲड. नावंदर यांचे मार्फत सदर पिटीशन मा.उच्चन्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे दाखल केलेले आहे. सदर दावा हा आर्थिक बाबीशी निगडीत असुन त्यामध्ये मनपाची बाजु सक्षमपणे मांडणेसाठी विशेष विधीज्ञ (special council) यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. तरी सदर दाव्यासाठी विशेष विधीज्ञ औरंगाबाद उच्च न्यायालय श्री.ॲड शैलेश ब्रम्हे यांची नेमणुक करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५ लक्ष मात्रच्या खर्चास व अदायगीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. २८ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२७/०६/२०२२ ते दि.०१/०७/२०२२, दि.०४/०७/२०२२ ते दि.०८/०७/२०२२, दि.११/०७/२०२२ ते दि.१५/०७/२०२२ व दि.१८/०७/२०२२ ते दि.२२/०७/२०२२ (एकूण - ०४ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर आहे.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्रं. २८

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२७/०६/२०२२ ते दि.०१/०७/२०२२, दि.०४/०७/२०२२ ते दि.०८/०७/२०२२, दि.११/०७/२०२२ ते दि.१५/०७/२०२२ व दि.१८/०७/२०२२ ते दि.२२/०७/२०२२ (एकूण - ०४ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.सुनिल महाजन :-** माहीती घेतली
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २८ आणि २९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाला विनंती आहे की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभं राहायचे आहे.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक सुचना मांडायची आहे फक्त
**मा.उपमहापौर :-** भाऊ एक मिनिंट
**श्री.विशाल त्रिपाठी :-** सर्वांनी जी व्यवस्था केली त्यांच सगळ्यांच अभिनंदन
**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ तुमचा उपवास आहे आज सर्वांचा उपवास घडवला आहे तुम्ही आज

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझा स्वत:चा झाला आहे. गोराणेसाहेबांच सगळ्यांनी टाळ्या वाजवुन अभिनंदन कराव. त्यांनी विशेष महासभेचे विशेष आयोजन केल्याबद्दल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३४ दि.२८/०६/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्र.०१ जळगांव शिवार स.नं.३७१/३ मधील मनपा मालकीच्या ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९५८/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३५ दि.२८/०६/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ गट नं.२०/२ प्लॉट नं.४/१ जवळील आणि गट नं.२०/३ प्लॉट नं.५ जवळील गट नं.२५ निवृत्ती नगर येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट टाकणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,५२६/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३६ दि.२८/०६/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०१ जळगांव शिवार स.नं.३७१/२ मधील मनपा मालकीच्या ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,५६,३४८/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**